01-12-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

PNG/ 10:00

12-01-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

PNG/ 10:00

12-01-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

PNG/ AKA/ KTG/ 10:00

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी.**: लेखी उत्तरे.

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तरांची 18 ते 27 वी सभागृहासमोर ठेवणे.

विशेष कार्य अधिकारी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची 18 ते 27 वी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अतारांकित प्रश्नोत्तराची 18 ते 27 वी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी)

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ AKA/ KTG/

**पृ.शी./मु.शी.**: अंदाज समितीचा अहवाल सादर करणे.

श्रीमती मंदा म्हात्रे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा अकरावा, बारावा, तेरावा व चौदावा अहवाल सभागृहास सादर करते.

सभापती महोदय, हे अहवाल सादर करतांना मी सदर अहवालातील काही प्रमुख बाबींचा उल्लेख करु इच्छिते.

सन 2007-2008 च्या अर्थसंकल्पामध्ये राज्यात नव्याने निर्माण केलेल्य तालुक्याच्या ठिकाणी तहसिल कार्यालय बांधण्याची तरतूद केली आहे. ही तरतूद करण्यामध्ये सुसुत्रता, निकष मात्र शासनाने ठरविलेले नाहीत. दहा वर्षापूर्वी निर्माण केलेल्या तालुक्याच्या कार्यालयांना कमी तरतूद आणि नव्याने निर्माण केलेल्या काही विशिष्ट तालुक्यांना जादा तरतूद केल्याचे समितीला आढळून आले आहे. म्हणून महसूल, सार्वजनिक बांधकाम व वित्त विभागांनी एकमेकांशी समन्वय साधून सदर बांधकामासाठी निकष ठरविण्याची समितीने अकराव्या अहवालात प्रामुख्याने शिफारस केली आहे. मराठवाडयातील निजामकालीन झालेली बांधकामे आता जीर्ण झालेली आहेत. त्यांचे दुरुस्तीसाठी तरतूद करणे आवश्यक आहे.

राज्यशानाच्या अर्थसंकल्पातील 2235 व 7610 या दोन लेखाशीर्षाअंतर्गत प्रत्येक विभागातर्फे तरतूद करण्याची पध्दती खर्चमेळा (रिकन्सिलेशन) च्या दृष्टीने अत्यंत सुलभ आहे. सदर पध्दती कायमस्वरुपी सुरु ठेवण्याबाबत वित्त विभागाने समितीला विनंती केली आहे. समितीच्या बाराव्या अहवालात सदर विनंतीस सहमती दिली आहे.

नाशिक येथील राज्य शासनाची महाराष्ट्र इंजिनिअरिंग रिसर्च इन्स्टिटयूट (MERI) मेरी ही संशोधन संस्था आहे. तसेच, औरंगाबाद येथे जल व भूमी व्यवस्थापन (WALMI) वाल्मी या नावाची प्रशिक्षण संस्था आहे. यासंदर्भात 2005-2006 या वर्षाच्या अंदाज समितीने सभागृहास अहवाल सादर केले होते. त्यावरील तेरावा व चौदावा अनुपालन अहवाल आज मी सादर करीत आहे. 50% पेक्षा कमी साठा असलेल्या प्रकल्पांच्या साठवूणक क्षमतेचा नव्याने अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. जायकवाडी प्रकल्पाच्या पाणी साठवण क्षमतेचा अभ्यास करण्यासाठी तज्ञ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व्यक्तींची समिती नियुक्त करण्याची तसेच, मेरी संस्थेतील प्रशासकीय खर्च कमी करुन संशोधन कार्यासाठी जास्त तरतूद करण्याची शिफारस समितीने तेराव्या अहवालात केली आहे.

.....2



श्रीमती मंदा म्हात्रे .....

औरंगाबाद येथील वाल्मी संस्थेमध्ये जलसंपदा विभागातील अभियंत्यांना नियमितपणे आणि अद्ययावत प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येते. वाल्मी संस्था स्थापन करुन 25 वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे. सदर संस्थेचे मुल्यमापन करणे गरजेचे आहे. अत: सदर संस्थेचे अहमदाबाद (गुजराथ) येथील आय.आय.एम.या जगप्रसिध्द नामांकित संस्थेकडून मुल्यमापन करण्यात येणार आहे. मुल्यमापन झाल्यानंतर सदर वाल्मी संस्थेची कार्यक्षमता वाढविण्यात यावी, अशी शिफारस चौदाव्या अहवालात केली आहे.

अंदाज समितीच्या या चारही अहवालातील शिफारशीवर शासनाने विनाविलंब कारवाई करावी. समित्यांच्या अहवालातील या बाबींचा उल्लेख करण्यासाठी मला परवानगी दिल्याबद्दल मी आपणास धन्यवाद देते.

**उपसभापती** : अंदाज समितीचा अकरावा अहवाल अमुद्रीत स्वरुपात आणि बारावा, तेरावा व चौदावा अहवाल मुद्रीत स्वरुपात सभागृहास सादर करण्यात झाला आहे. अमुद्रीत स्वरुपातील अहवालाच्या प्रती मुद्रीत झाल्यानंतर सदस्यांना पाठविण्यात येतील.

-----

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ KTG/ AKA/ प्रथम श्री. गागरे..... 10:05

**पृ.शी.** : मुंबई महानगरपालिका( तात्पुरती सुधारणा )विधेयक

L.C. BILL NO. XIII OF 2007

(A BILL TO TEMPORARILY AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.)

श्री. राजेश टोपे (नगर विकास राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.प.वि. क्रमांक 13 मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये तात्पुरत्या सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, मुंबईकरांनी सदनिका विकत घेत असताना, तेथील विकासकाने महानगरपालिकेकडून सीसी, आयओडीसी झाल्यानंतर ओसी घेणे आवश्यक असते. तसे सर्टिफिकिट न घेता तेथील विकासकांनी या सदनिका विकल्या व तेथील लोकांनी सदनिका विकत घेऊन त्यांचा ताबा घेतला. मुंबई महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये तरतूद आहे की, ओसी न घेता सदनिकांचा ताबा घेण्यात आल्यास तेथे पाणीपुरवठा दिला जात नाही. त्यामुळे तेथील लोकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. यासर्व अडचणी दूर करण्यासाठी, मुंबई महानगरपालिका विधेयक 2007 येथे आणले आहे. दिनांक 25/3/1991 ही आपण कट ऑफ डेट ठेवली आहे. या तारखेच्या पूर्वी बांधलेल्या इमारती ऑक्युपेशन सर्टीफिकेट न घेतलेली इमारत किंवा सदनिकांबाबत या विधेयकामध्ये तरतूद करण्यात आली आहे. तसेच असे ठरविण्यात आले आहे की, का`ऑप.सोसायटी ही एखाद्याच्या व्यक्तिगत मालकीची असेल, किंवा एखाद्या कंपनीच्या मालकीची असेल तर त्यांना ओसी घेण्यासाठी दोन महत्वाची प्रमाणपत्रे असणे आवश्यक ठरणार आहे. लायसन्स नंबर हे आवश्यक सर्टिफिकेट आहे. तसेच लायसनधारक नळकारागिराने दिलेले आधीच्या नळ कारागिराने केलेले काम प्रमाणित करणारे प्रमाणपत्र तसेच लायसन सर्व्हेअर नेमणे, व प्लान प्रमाणे संपूर्ण इमारतीचे बांधकाम झालेले आहे किंवा नाही हे तपासून सर्टिफिकेट घेणे बंधनकारक असणार आहे. ही सर्टिफिकेट सादर केल्यानंतर ओसी मिळणार आहे. पूर्वी ओसी देण्याची तरतूद कायद्यात नव्हती. आता या विधेयकाद्वारे ओसी देण्या बाबत सुधारणा करण्यात आली आहे. विधेयकाचा कार्यकाळ हा 3 वर्षे असणार आहे. 3 वर्षानंतर हे अधिनियम आपोआप रद्द

..2..

श्री. राजेश टोपे .........

होणार आहे. मुंबईकरांना होत असलेल्या अडचणी दूर करण्याच्या हेतूने हे विधेयक येथे आणण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**उपसभापती** : वि.प.वि क्रमांक 13 मुंबई महानगरपालिका विधेयक 2007 यासंदर्भात मी काही सूचना मांडणार आहे. मी केवळ ठाणे शहराबाबत बोलत नाही. आताच माननीय मंत्री महोदय, श्री. राजेश टोपे यांनी सांगितले की, हे विधेयक 1991 पर्यंतच्या इमारतींना लागू होईल. त्यासाठी ओसी प्रमाणपत्र मिळण्याकरिता लायसन्स नंबर हे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. मला असे म्हणावयाचे आहे की, काही भागामध्ये उंच उंच इमारती बांधल्या जातात. त्या इमारतींमध्ये फायर फायटरची व्यवस्था केलेली नसते. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये अनेक उंच उंच टॉवर्स सध्या बांधले जात आहेत तेथे अशाप्रकारची आग विझविण्याबाबतची उपकरणे बसविलेली नाहीत.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ....

एका दैनिकाच्या वार्ताहराने हा प्रश्न उपस्थित केला होता आणि त्यावर एक मोठे आर्टिकल देखील आले होते. प्लॅनमध्ये तरतूद केलेली असतानाही ही सुविधा तेथे नसेल तर भविष्यात होणाऱ्या जीवित आणि वित्ताची हानीला तोंड कोण देणार आहे, त्याला जबाबदार कोण राहणार ? तेव्हा अशा प्रकारच्या टॉवर्सना ओसी दिली आहे काय ? असल्यास, ती कशी काय दिली ? अन्यथा यावर उपाय योजना व्हायला पाहिजे. हे नेहमीच व्हायला लागले तर नियमांची तमा कोणी बाळगणार नाही. तेव्हा याबाबत नवी मुंबई प्रशासनाला विचारणा करून, तपशील मागवावा आणि 15-20 दिवसात शासनाला योग्य वाटेल तेव्हा संबंधित लोकप्रतिनिधी आणि महापालिका आयुक्त यांची एक बैठक शासनाने बोलवावी आणि मग याबाबत सविस्तर विचार करून उपाय योजना आपणास करता येईल.

***

...... सी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विधेयकावर माझे विचार मांडण्यापूर्वी मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो आणि सरकारच्या घाईगर्दीमुळे या शहराच्या लाखो नागरिकांच्या जीवित व वित्त हानीचा प्रश्न कसा निर्माण होतो ते आपण सांगितले. त्यामुळे बरे वाटले. सभापती महोदय, या ठिकाणी आता माननीय मुख्यमंत्री उपस्थित नाहीत. पण या संदर्भात फायर ॲक्ट यावा म्हणून मी यापूर्वीही मागणी केली होती. त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहे. पण या ॲक्टला केंद्र सरकार मान्यता देत नाही तोपर्यंत आपल्याकडे होत होऊ शकत नाही म्हणून मग मी त्या प्रशासनाशी पत्र व्यवहार केला आणि त्या दृष्टीने कायद्यात तरतूद नसली तरी मी या विषयावर बोलणारच आहे. राज्यमंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, तुम्ही हे डावलले त्यादिवसापासूनची ही खंत आहे. इमारतीमध्ये फायर फायटिंगची सुविधा सुरूवाती पासून बसवितात आणि त्याची दर तीन महिन्यांनी टेस्टिंग झाले पाहिजे. कारण ती एक आपत्कालीन व्यवस्था आहे आणि ज्यावेळेस त्याची अकस्मात गरज भासते तेव्हा ती व्यवस्था कार्यान्वित व्हायला पाहिजे असते. एखाद् दुसऱ्यावेळी टेस्टिंग केल्यानंतर त्याकडे दुर्लक्ष केले जाते आणि त्यामुळे मग त्याचे व्हॉल्व्हज् निघून जातात, पाईप्स निघून जातात व ते तसेच महिनोन् महिने पडून असतात. आणि अशा प्रकारे न वापरता ही व्यवस्था काही कालावधीतच बाद झालेली असते आणि जेव्हा प्रसंग येतो, आग लागते तेव्हा ती व्यवस्था काम करीत नाही आणि मग काय करावयाचे हा प्रश्न निर्माण होतो. मुंबई महापालिकेच्या माध्यमातून हा प्रश्न मी उपस्थित केला होता. तेव्हा फायर फायटिंगच्या बाबतीत एनओसी देण्यासाठी लाखो रूपये दिले जातात. ती देतानाही फायर फायटिंगची व्यवस्था कोणत्या कंपनीची आहे यावर देखील खूप काही अवलंबून असते, कारण त्या कंपनीकडूनही त्यांना हप्ता दिला जातो. सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकचे अग्निशमन दल हे देशामध्ये अत्यंत उत्कृष्ट असे दल आहे आणि त्यातील जवान हे निधड्या छातीचे असून कोणत्याही अशा प्रसंगी ते अतिशय चांगले काम करू शकतात हे त्यांनी सिद्ध केलेले आहे. परंतु वरचे अधिकारी भ्रष्टाचार करतात. आज या मुंबईत करोडो रूपये कोण मिळवत असेल तर ते फायर ऑफिसर मिळवित असतात. या मुंबईच्या बाबतीत कशा अगतिक घटना घडतात हे आपल्याला माहितीच आहे. मुंबईची व्याप्ती आता इतकी प्रचंड झाली आहे की, मुंबई शहर आणि पूर्व व पश्चिम अशी दोन उपनगरे यांचे नियंत्रण व्हावे म्हणून महापालिकेमध्ये तेवढेच उपायुक्त

...... सी 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

नियुक्त केलेले आहेत आणि त्यांच्याकडे विविध कामे दिली आहेत. तसेच अग्निशमन दल असते आणि त्याचा प्रमुख अधिकारी एक असतो आणि त्याचे दोन सहाय्यक असतात पण त्यांचा दर्जाही प्रमुख अधिकाऱ्याच्या इतकाच असतो आणि ते मुंबई उपनगरासाठी आहेत. परंतु सगळ्या मुंबईचे फायर फायटिंगची एनओसी देण्याचे अधिकार हे श्री.झंडवाल नावाच्या फायर फायटिंगच्या प्रमुख अधिकाऱ्याने स्वत:कडे ठेवले आहेत. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... डी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्याची मेख काय आहे? मी एकटाच कमवीन, मी एकटाच खाईन असे करुन सहकाऱ्यांना उपाशी ठेवल्यामुळे सहकारी त्यांच्या नावाने बोंब मारतात. त्यांच्या कार्य कर्तृत्वाबद्दल बोंब मारीत नाहीत. मुंबई महानगरपालिकेत खाण्याच्या भागीदारीबाबत जो वाद निर्माण झाला आहे तो सर्वात महत्वाचा आहे. आणि म्हणून मी फायर ॲक्ट यावा याकरिता प्रयत्न केले. हा ॲक्ट आपण या सदनामध्ये आणल्याबद्दल मला आनंद झाला. 80 पानांचे ते पुस्तक, ॲक्ट होता. हा ॲक्ट संमत करण्याकरिता आम्ही तुमच्या दाढीला हात लावीत नाही तर तुम्ही दुसऱ्यांच्या दाढीला हात लावता? या विधेयकावर चर्चा करीत असतांना तुमच्या दाढीला हात लावण्याचे परिणाम मी सांगणार आहे. तुम्ही लांगूलचालनामध्ये सर्वांची वाट लावून टाकली आहे. सभापती महोदय, आपण शेवटच्या दिवशी अधिवेशन संपतांना हे विधेयक आणले. त्यावर मला खूप बोलावयाचे होते. यामधील सर्व गोष्टींचा मी अभ्यास केला आहे. मुंबईच नव्हेतर महाराष्ट्रात ज्या ज्याठिकाणी अग्निशमनाचा प्रश्न आहे त्या संदर्भात सदनातील अनेक माननीय सदस्यांनी उपयुक्त सूचना मांडल्या असत्या. ही 80 पाने आम्ही केव्हा वाचणार? आम्हाला इतर कामे असल्यामुळे फक्त ते घेऊन यायचे आणि न वाचता त्यावर भाषण करावयास उभे रहावयाचे. म्हणून मी आपणास विनंती केली, हे विधेयक आपण नंतर घ्या. परंतु आपल्याला ते ताबडतोब मंजूर करुन घ्यावयाचे होते. ते विधेयक मंजूर झाले, पुढे त्याची अंमलबजावणी झाली काय? त्या कायद्यातील तरतुदीचे पालन अजून झालेले नाही. त्या कायद्याची नियमावली करावयाचे काम अधिकाऱ्यांच्या मनात येईल तेव्हा करणार. त्यासाठी ते चर्चेचे गुऱ्हाळ फिरवीत रहाणार. त्यांच्या मनात आले तर एक तासात नियमावली तयार होते. आणि जर त्यांना करावयाची नसेल तर ती एक वर्षभर रखडते. आय.ए.एस. ऑफिसर तोच, त्यांची बुध्दिमत्ता तीच, त्यांचा आय.क्यू तोच, निर्णय घेण्याची क्षमता तीच, कार्यक्षमता तीच, परंतु त्या त्या फाईलप्रमाणे ती हलते. आणि मग त्या ॲक्टचे पुढे काय झाले? असा आपण प्रश्न उपस्थित केला. 60-70 माळयाच्या इमारती मुंबईत होत आहेत. दादरच्या चैत्यभूमीजवळ असलेल्या कोहिनूर मिलच्या जागेवर 80 माळयाची इमारत उभी रहात आहे. परवा मुस्लिमांबाबत तुम्ही आमदार म्हणून टाहो फोडत असल्याचे मी सांगितले. परंतु कधीही रिट फाईल केली नाही. बेकायदेशीर कामाबाबत कधी बोंब मारली नाही. आपल्या समाजासाठी कधी कोर्टात गेला नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चैत्यभूमी येथील स्मारकाकरिता कोहिनूर मिलची जमीन मिळविण्याकरिता आंदोलने काय झाली. 6 डिसेंबरला आंदोलने करतात, फोटो छापून आणतात.

01-12-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) D 2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ AKA/ KTG/

श्री. दिवाकर रावते...

त्याठिकाणी आता टॉवर उभा रहात आहे. प्रश्न असा आहे की, 60 माळयाचे टॉवर आताच मुंबईत झ ाले आहेत. त्याच्या फायर फायटींगची काय परिस्थिती आहे? मुंबईतील अग्निशमन दल हे जास्तीत जास्त दहा माळयापर्यंत शिडीने पोहोचू शकते. त्याच्यापुढे काय? त्यावेळचे आमचे महापौर श्री. हरेश्वर पाटील असे म्हणाले की, फायर फायटींगकरिता वरुन पाणी मारण्याकरिता आता हेलिकॉप्टर घेतले पाहिजे. हे नवीन काहीतरी आहे म्हणून मी त्याबाबत माहिती घ्यायला गेलो. त्यांच्या मनात प्रश्न उभा राहिला आग लागली तर ती कशी विझविणार? "टॉवरींग इन्फर्नो" हा चित्रपट फारच उत्कृष्ट होता. आपण याठिकाणी मांडलेला विषय अत्यंत महत्वाचा आहे. केंद्राने अग्निशमनाचा कायदा केल्यानंतर आर्टीकल 249/250 मध्ये केंद्राला असलेल्या अधिकाराचा वापर करुन तो कायदा झाला आणि त्यानंतर आपण ॲक्ट केला. माननीय सदस्य श्री. सरपोतदार दादा त्यावेळी म्हणाले की, आपण हे थांबवा. हे 80 पानांचे पुस्तक आम्ही केव्हा वाचणार? परंतु आपण ते संमत करुन घेतले. मघाशी बोलतांना मला कौतुक वाटले. आम्हाला चर्चा करावयाची आहे, तुम्ही हे थांबवा अशी अजीजी करुन तुम्हाला विनंती केली. कायदा मंजूर करतांना आपण तो चर्चा न होता संमत करुन घेता. यासाठी हे कायदेमंडळ आहे काय? आयत्यावेळी यायचे आणि जुलाब लागल्यासारखे माणूस धावतो त्याप्रमाणे या सभागृहात कायदे मंजूर होतात. आम्हाला बाकी कोणत्याही विषयावर बोलायला मिळाले नाहीत तरी चालेल, एखाद्या लक्षवेधी सूचनेवर बोलायला मिळाले नाहीतरी चालेल. परंतु आम्ही इथे कायदे करायला आलो आहोत. उद्या आम्हाला जनता क्षमा करणार नाही. हे विधीमंडळ आहे याठिकाणी कायदे तयार होतात. त्या कायद्यातील फटी तुम्हाला सांगणे आमचे काम आहे. त्या ठेवायच्या की नाहीत हा तुमचा अधिकार आहे. तुम्ही चुकीचा कायदा करीत आहात हे मांडण्याचा आमचा अधिकार आहे तो आम्ही बजावला नाहीतर भविष्यात कधीही लोक आम्हाला माफ करणार नाहीत.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

चुकीचे कायदे होता कामा नयेत. आता आपण हा कायदा आणलेला आहे. त्यामध्ये आपण लायसनधारक प्लंबर असा उल्लेख केला आहे. ते बरोबर आहे. त्यानंतर आपल्या निवेदनामध्ये इमारतीचे बांधकाम व्यवस्थित झाले की, नाही याचा दाखला घेणे अशा प्रकारचा उल्लेख आला आहे. हा दाखला कोण घेणार ? हा दाखला लायसनधारक प्लंबर घेणार काय ? माननीय मंत्रिमहोद हा दाखला सर्व्हेअर घेणार असे बसून सांगत आहेत. त्यांनी तसे उभे राहून सर्व्हेअर म्हणजे काय ते सांगावे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, लायसनधारक सर्व्हेअरचा अर्थ आर्किटेक्ट असलेले, डिप्लोमा असलेले आणि मुळात महापालिकेच्या आयुक्तांकडून ते लायसन घेऊ शकतात आणि मान्यता घेऊ शकतात.

श्री. दिवाकर रावते : तोच खुलासा पाहिजे होता. पुन्हा आपण मूळ पदावर आला. आपल्याला यामध्ये असे अपेक्षित आहे की, लायसनधारक सर्वेक्षकाने किंवा आयुक्तांने मान्यता दिलेल्या व्यक्तीने इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणित करणारे प्रमाणपत्र सादर केल्यावर आपण पाणी देणार. मग आपण कायदा कसला आणला आहे ? हे तर आहेच. हे प्रमाणपत्र दिल्यानंतर ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळतेच. सर्व्हेअर म्हणजे कोण तर आर्किटेक्ट म्हणजेच वास्तूविशारद. आपण या कायद्यामध्ये नवीन काय आणले आहे ? ऑक्युपेशन सर्टिफिकेट म्हणजे त्या इमारतीचे बांधकाम नियमाप्रमाणे व्यवस्थित झालेले आहे, जो आराखडा मंजुरीकरिता दिला होता त्याप्रमाणे बांधकाम झालेले आहे याचे सर्टिफिकेट. त्याचा दाखला आणल्यानंतर ऑक्युपेशन सर्टिफिकेट द्यावेच लागते. ऑक्युपेशन सर्टिफिकेट आल्यानंतर पाण्याचे कनेक्शन द्यावेच लागते. आपण या कायद्यामध्ये नक्की काय आणले आहे ? या कायद्यामागचा मूळ भाग म्हणजे अशा प्रकारे बिल्डर पळून गेले आणि थकलेल्या गाळेधारकारने कर्ज काढलेले आहे म्हणून त्याने असेल त्या परिस्थितीमध्ये ताबा घेतला. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण आणि आम्ही यासंदर्भात त्यावेळी जागरुकपणे काम करीत होतो आणि आजही करीत आहोत. बांधकामाकरिता परवानगीचा जो अर्ध्या इंचाचा पाईप आलेला असतो त्यावर ते सगळे चालते आणि त्यानंतर टँकरवर चालते. त्यावेळेला

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KTG/ AKA/

श्री. दिवाकर रावते .....

श्री. तिनईकर हे मुंबई महापालिकेचे आयुक्त असताना आणि मी महापौर असताना यासंदर्भात परिषद घेतली होती. आमच्या सभागृहात जनतेच्या भावना व्यक्त केल्या. अशा प्रकारे त्यावेळेला ऑक्युपेशन सर्टिफिकेट असो किंवा नसो, माणुसकीच्या दृष्टीने एखाद्या इमारतीला आज दीड इंचाचे कनेक्शन लागत असेल तर ते एक इंचाचे द्यावे, पाऊण इंचाचे द्यावे परंतु त्यांची अजिबात कुचंबणा करु नये अशा प्रकारचा निर्णय त्यावेळला आयुक्तांनी केला होता. त्याप्रमाणे अनेक इमारतींना हा कायदा नसताना आम्ही पाणीपुरवठा केलेला आहे. ते आयुक्त गेल्यानंतर आणि दुसरे आयुक्त आल्यानंतर ते कायद्यावर अडले असतील आणि ते थांबले असेल. या कायद्याचा अर्थ मला अजून कळलेला नाही. या कायद्यामध्ये अशी अट घातल्यानंतर हा कायदा मंजूर होऊन सुध्दा काही होणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी हे सर्व परत एकदा बघावे. माझे हे 100 टक्के वाचून झाले आहे. जी शंका होती ती फिटली. सर्व्हेअर म्हणजे अर्किटेक्ट म्हणजेच वास्तूविशारद. वास्तूविशारद म्हणजे कोण तर ज्याला आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे तो. कदाचित आयुक्ताच्या मान्यतेचे एखादे पॅनेल तयार करतील. तो आर्किटेक्ट असला पाहिजे. त्याने हे सर्व योग्य आहे असा दाखला दिला तर आणि तरच हे होईल. यामध्ये लायसनधारक असा उल्लेख केला आहे. मला एक कळत नाही. लायसनधारक नळकारागीर असा शब्द यामध्ये का वापरला ? लायसनला मराठी शब्द नाही काय ? लायसनधारक याला मराठी शब्द परवानाधारक असा आहे. हे भाषांतर कोणी केले ? मराठीमध्ये हा इंग्रजी शब्द का ठेवला. मराठीमध्ये परवानाधारक नळकारागीर असताना तशी दुरुस्ती आपण यामध्ये करणे आवश्यक आहे. अमेंडमेंट म्हटले की त्यांची शासकीय मराठी समजते. आपण काय करता हो ? कधी सुधारणार की नाही ? हे जाणीवपूर्वक होते काय हे माहीत नाही. यामध्ये परत लायसनधारक सर्वेक्षकाने असा उल्लेख केलेला आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ AKA/ D/ KTG/ MMP/ पूर्वी श्री. बरवड 10:25

(श्री. दिवाकर रावते...

सर्वेक्षक म्हणजे आर्किटेक्ट, वास्तुविशारद किंवा आयुक्तांनी मान्यता दिलेल्या व्यक्तीने, म्हणजे ओ.सी. मिळणार नाही. मग हे विधेयक आपण कशासाठी आणले ? हे विधेयक आणण्यामागे सरकारचा काय उद्देश आहे. बनवाबनवी करणे हा या सरकारचा धंदा आहे काय ? सरकारने जनतेला दिलेली वचने पूर्ण केलेली आहेत काय ? निवडणुकीच्या वेळी कापसाला 2700 रु. भाव देण्याची घोषणा तुम्ही केली. मोफत वीज देण्याची घोषणा तुम्ही केली. आता शेतक-यांना कर्जमाफी देण्याची मागणी आम्ही करीत असताना हे सरकार सांगते की, बघू. आता ही बनावाबनवी तुम्ही करता पण कायदेशीर बनवाबनवी देखील तुम्ही कशी काय करता ? म्हणून हे विधेयक मागे घ्यावे. आर्किटेक्टने जबाबदारी घेतलेली नाही. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे बांधकामाला दिलेल्या कनेक्शनच्या आधारावर ज्यांन पाणी उपलब्ध करण्यात आलेले आहे त्यांना आम्ही तातडीने पाणी पुरवठा करु अशी तरतूद या विधेयकामध्ये नसल्यामुळे हे विधेयक मागे घ्यावे लागेल, ते मंजूर करता येणार नाही. आर्किटेक्ट ठेवला तर मग ओ.सी. मिळेल आणि ना हरकत प्रमाणपत्र देखील मिळेल. तेव्हा जागा राहाण्याजोगी ठरवून ना हरकत प्रमाणपत्र देण्याची अट टाकली असेल तर ही पुन्हा फसवाफसवी आहे. आपण पाणी देण्यासंबंधीचा जो कायदा केलेला आहे तो अंमलात येणार नाही. या विधेयकामध्ये चुकीची तरतूद आलेली आहे. त्यामुळे अशा प्रकारचे विधेयक सरकारला मंजूर करता येणार नाही. या विधेयकामधील तरतुदीमध्ये बदल करुन ते पुन्हा मांडावे लागेल. सभापती महोदय, अशा प्रकारे त्या इमारतीला राहाण्यायोग्य परवना मिळाला नसेल परंतु लोक राहात असतीलस तर त्यांना आम्ही तातडीने पाणीपुरवठा करु... तीन वर्षामध्ये त्या संबंधात सहकारी संस्थांनी, या विधेयकामध्ये म्हटल्याप्रमाणे परवानाधारक सर्वेक्षक, शासनाच्या भाषेमध्ये लायसन्सधारक सर्वेक्षक याची नियुक्ती करावी, आणि 3 वर्षाच्या आत त्यांना इमारतीत राहाण्यायोग्य परवाना द्यावा.. यातून 2 गोष्टी घडतात. एकदा लोक राहायला आहे आणि अशा प्रकारचा दाखला घेण्याची पाळी एखाद्या सोसायटीवर आली की जे निकष दिलेले आहेत त्याबरहुकूम इमारतीमध्ये काही बदल झालेले असतील आणि ते योग्य असतील आणि त्याला मंजुरी मिळालेली असेल, पण बेकायदेशीर बदल असतील ते काढून टाकावे लागतील त्या शिवाय तो दाखला मिळणार नाही, तो मिळाला नाही तर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

जी पाण्याची जोडणी दिलेली आहे ती कापून टाकावी लागेल अशा प्रकारची तरतूद या विधेयकामध्ये असली पाहिजे. पण या विधेयकामध्ये वेगळीच तरतूद केलेली आहे. मला माननीय मंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे की ज्या गोष्टी करावयास पाहिजेत त्यामध्ये अडचणी आणून लोकांची फसवणूक करणे हे पाप आहे. पण असे करण्यामध्ये हे सरकार वाकबगार आहे. या मुंबई शहरामध्ये तुमची हिंमत असेल, धाडस असेल, मानसिकता असेल ...

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

तर भेंडीबाजारात जा, बेहरामपाड्यात जा. कोण विचारतो तुमच्या लायसन्सला? रस्ता खोदला, जोडणी केली, मिटर नाही, पाणी सुरु आहे. तोडता? बिचारा गरीब, बिचारा मध्यमवर्गीय. काल सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी सांगितल्याप्रमाणे 11.5.55, त्यांच्याकरीता हे सगळे चालले आहे. तुम्ही त्यांच्या दाढ्या कुरवाळता, ते तुमच्या छाताडावर नाचत आहेत. करा ती हिंमत. जो कायद्याने जगतो, प्रामाणिकपणे जगतो, तुमचे कर भरतात, पापभिरु आहेत, या देशाचे कायदे पाळतात त्यांना असा कायदा आणून पाणी घेण्याची पाळी येणार आहे. या देशाचे कायदे पाळत नाहीत, देणे घेणे नाही, माझ्या मताची किंमत किती आहे हे महत्वाचे ठरते. धर्माशी आपले काही देणे घेणे नाही. सेक्युलर कंट्री म्हणवता. इंग्रजीमध्ये धर्मनिरपेक्ष आणि मराठीमध्ये सेक्युलर. या देशामध्ये त्याचाच ढोल वाजतो आहे. संपूर्ण हिंदुस्थानात. घटनेच्या बाबतीत लाज, लज्जा, शरम या देशात राहिलेली नाही. तस्लीमा नसरीन तीन पानाचे पत्रक काढायचे आणि म्हणायचे, तू कलकत्त्यात ये. तो त्यांच्या धर्माचा विषय आहे. प्रश्न असा आहे की, ही परिस्थिती आहे. त्या भागामध्ये जाल का? मुंब्रा भागामध्ये जाल का? मी ठाण्याचे उदाहरण देतो. आपण ते करु शकत नाही. पीठासीन अधिकारी म्हणून बोलू शकत नाही. नंतरही बोलू शकत नाही. चला मुंब्रा भागात. अर्ध्या भागात पाणी चोरुन घेतले जात आहे. खरेच वाईट वाटते. हे पापभिरु, देशाचे कायदे पाळणारे, सामान्य जीवन जगणारे अशा या देशाच्या नागरिकांचे वर्णन काल सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांनी केले. 11.5.55, त्यांच्याकरीता हा कायदा आहे. गुंतागुंतीची आणलेली घटना आहे. आता लायसन्सधारक सर्वेक्षकाने किंवा आयुक्तांनी मान्यता दिलेल्या व्यक्तीने इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यावर म्हणजे ओ.सी.आल्यावर याची काय गरज आहे? ओ.सी.आल्यानंतर पाण्याचे कनेक्शन मिळते. तुम्ही कायद्यात काय तरतूद केली? खरे म्हणजे मंत्रीमहोदयांच्या मनामध्ये असे आहे की, पूर्ण न झालेल्या इमारतींना कनेक्शन देणे, तीन वर्षात बाकीच्या गोष्टी करुन घ्याव्यात. परंतु चुकीचे वाक्य आल्यामुळे हा कायदा अंमलात येणार नाही. घाईघाईने कायदे पास केले आणि आपली पाठ थोपटून घ्यायची हे बरोबर नाही. चुकीचा कायदा करण्यासाठी आपण याठिकाणी बसलेलो नाही. अशा पध्दतीचा कायदा करीत असतील, ज्याच्यामुळे पाण्याची जोडणी द्यायची, ती मिळणारच नसेल तर ते बरोबर नाही.

(नंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

त्यामुळे कमीतकमी तरी ती सुधारणा आता वगळावी असे मला वाटते. आता ते करता येईल की नाही हे मला माहिती नाही. कारण अमेंडमेंड येथे प्रपोज केलेली आहे. शासनाच्या पातळीवर अशा प्रकारची अमेंडमेंड करता येत असेल, अशा प्रकारे बदल करता येत असेल तर तो त्यांनी करावा. अन्यथा या विधेयकाला पाठिंबा देणे कठीण जाईल एवढे मी आपल्या निदर्शनास आणतो. धन्यवाद.

---------------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : या विधेयकाच्या संदर्भात मी थोडक्यात विचार मांडणार आहे. मी महानगरपालिकेमध्ये काम केलेले आहे. मी महानगरपालिका मतदार संघातून निवडून येत आहे. सन्माननीय मंत्री महोदयांनी एक गोष्ट गांभीर्याने घेणे आवश्यक आहे ती ही की, आपण अनाधिकृत बांधकामाच्या संदर्भात या सभागृहात वारंवार चर्चा केलेली आहे. एखादा माणूस झोपडी बांधतो तेव्हा ती अनाधिकृत असते. परंतु मोठ मोठया इमारतीमध्ये अनाधिकृत बांधकामे कशी होतात त्या बाबत मी थोडक्यात सांगतो. एखाद्या इमारतीचा प्लॅन मंजूर झाल्यानंतर त्या इमारतीचे काम कम्पलीट होईपर्यंत आर्किटेक्ट त्या ठिकाणी राहतो. त्याने सगळे सर्टीफाय केले, ओ.सी.दिल्या नंतर तो त्याचा राजीनामा पत्र पाठवतो. त्यांनतर उर्वरित मजल्याचे काम चालू होते. तोपर्यंत महानगरपालिका, नगरपालिकांकडून मिळणा-या सर्व सुविधा या इमारतीला मिळालेल्या असतात. त्यामुळे यावर एकच उत्कृष्ट उपाययोजना होऊ शकेल की, अशा प्रकारे कोणत्याही इमारतीचे बांधकाम झाले तर त्याच्यावरचे जे मजले तयार होतात त्याला आपण अनाधिकृत समजतो. अशा प्रकारे जर काम झाले तर काम करणा-या परवाना धारक वास्तुविशारदचा परवाना देखील रद्द केला गेला पाहिजे. तसेच सदरच्या इमारतीच्या वर जे अनाधिकृत बांधकाम झालेले आहे ते आता आपण सरसकट रेग्युलराईज करायला घेतलेले आहे. त्यामुळे लोकांना आता प्लॅन मंजूर करण्याची देखील आवश्यकता उरली नाही, अशा प्रकारे राजरोस कारभार सुरु झालेला आहे. ज्या गोष्टीला शासनाने आळा घालावयाचा आहे त्यामध्ये जर या कायद्यात पळवाटा ठेवल्या तर मला वाटते या कायद्याचा आपल्याला फारसा काही उपयोग होऊ शकणार नाही. त्यामुळे या बिलाच्या संदर्भात मी ज्या एक दोन सूचना केलेल्या आहेत त्या देखील गांभीर्याने घ्याव्यात अशी माझी विनंती आहे.

-----------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सन्माननीय सभापती महोदय, तात्पुरती सुधारणा म्हणून हे विधेयक या ठिकाणी आणण्यात आलेले आहे. 25 मार्च 1991 ही या कायद्याची मुदत दाखवण्यात आलेली आहे. नगरपरिषदेमध्ये जेव्हा आपल्याला बांधकाम करावियाचे असते त्यावेळी सुरुवातीला आपल्याला प्लॅन द्यावे लागतात, प्लॅन प्रमाणे मंजुरी घ्यावी लागते. त्यानंतरची दुसरी स्टेप्स आहे ती म्हणजे आपल्याला आय.ओ.डी. घ्यावे लागते. आणि तिसरी महत्वाची स्टेप्स म्हणजे काम पूर्ण झालेले आहे त्याचे ऑक्यूपेशन सर्टिफिकेट घेतल्यानंतर त्या ठिकाणी फ्लॅट धारकाने जावे अशा प्रकारची कल्पना आहे. परंतु आज अनेक बिल्डर्स काम पूर्ण न करता ताबा देतात. फ्लॅटच्या वाढत्या किंमती लक्षात घेता आधी ज्याने फ्लॅट विकत घेतलेला असतो तो नफ्यातच असतो. पाच हजार रुपये प्रती चौरस फूटाने अगोदर खरेदी केली असेल तर सहा महिन्याने या जागेचा भाव सहा हजार रुपये होतो. काम पूर्ण झाले आहे की नाही, ऑक्यूपेशन सर्टिफिकेट आहे की नाही याची खात्री करुन न घेता ऑक्यूपेशन करुन घेतले जाते. जे ऑक्यूपेशन सर्टिफिकेट देत नाही आणि ताबा देतात त्यांच्यावर कारवाई करण्याच्या संदर्भात प्रयत्न झाला पाहिजे व तशा प्रकारची तरतूद व्हावी. नाही तर ही बांधकामे रेग्युलराईज केल्यानंतर पुढे असेच चालत राहील. आपल्याला माहिती आहे की, सन 1991 मध्ये सवलत दिली गेली नंतर सन 1995 मध्ये सवलत दिली गेली आणि त्यांनतर सन 2000 मध्ये अशी मर्यादा घातली गेली. ऑक्युपेशन सर्टिफिकेट देण्याची काही गरज नाही ही जी सवय बिल्डरला लागलेली आहे ती गेली पाहिजे. त्यामुळे यासंदर्भात कायद्यात कडक तरतूद व्हावी जेणे करुन बिल्डरने ऑक्यूपेशन सर्टिफिकेट देण्याच्या संदर्भात योग्य ती काळजी घेतली नाही तर त्याच्यावर काही तरी कडक कारवाई व्हायला पाहिजे. फ्लॅट धारकांवर कारवाई करण्याची काही आवश्यकता वाटत नाही. फ्लॅट धारकाला ती जागा केव्हा ताब्यात मिळेल असे वाटत असते. ही परिस्थिती केवळ मुंबईतच आहे अशी परिस्थिती नाही तर नाशिक, पुणे, नागपूर येथे सुध्दा अशीच परिस्थिती आहे. ऑक्यूपेशन सर्टिफिकेट नसले तरी देखील लोक ताबा घेतात. पाणी मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. यासंदर्भात आपण तरतूद केलेली आहे की, जो ॲथोराईज प्लंबर असेल त्याच्याकडून सर्व तपासणी करुन घेण्यात यावी. गरीब माणसाला, मध्यमवर्गीयाला पाणी मिळण्याच्या संदर्भातील बाब या विधेयकात देण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.........

या कायद्यात फ्लॅटधारकाचे संरक्षण करण्याची तात्पुरती सुधारणा आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना विनंती करतो की, या विधेकाच्या बाबतीत त्यांच्या पॉझीटीव्ह सूचना असतील तर त्यांनी माननीय मंत्रिमहोदयांकडे द्याव्यात. हा कायदा योग्य आहे असे मला वाटते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्यामार्फत सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांना सांगू इच्छितो की, मी महापौर असताना परिषद घेऊन हा निर्णय घेतलेला आहे. प्रश्न असा आहे की, या कायद्यात जी अट टाकली आहे, त्यामुळे अडचण झालेली आहे. ती काढून टाकावी अन्यथा आपण हा कायदा मंजूर करुन काही साध्य होणार नाही. खरे म्हणजे इमारत पूर्ण झाल्याची सी.सी.सुध्दा घेतली पाहिजे. मुंबईत 99 टक्के इमारतीची सी.सी. घेतलेली नाही. सी.सी. घेतल्यावर डिपॉझीट परत मिळते. परंतु बिल्डर सी.सी. घेत नाही आणि डिपॉझीट परत घेण्याचे सोडून देतात. त्यावेळी 15-20 हजार डिपॉझीट होते, आता ही रक्कम काही लाखो रुपये आहे. या कायद्यामध्ये जी अट आहे त्यामुळे या कायद्याचा काही उपयोग होणार नाही असे मला ठामपणे वाटते. मी सांगितलेल्या मुद्यांचे मंत्रिमहोदयांनी स्पष्टीकरण करावे. अन्यथा आपण जो कायदा मंजूर करीत आहात त्यास आमचा विरोध राहीलच एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

-------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी याठिकाणी एक गोष्ट निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आपण कन्व्हेयन्स बिल मंजूर केले त्यामध्ये आणि या विधेयकामध्ये अॅनॉमली होईल. कन्व्हेयन्स विधेयकात म्हटले आहे की,सहा महिन्यांत ओ.सी. घेतली नाही तर ओ.सी.दिली असे समजले जाईल. ते विधेयक आता माननीय राज्यपालांकडे सहीसाठी गेलेले आहे. त्यांची सही झाल्यावर एक-दीड महिन्यात त्याचे कायद्यात रुपांतर होईल. तो कायदा आल्यानंतर या कायद्यास काहीच अर्थ राहणार नाही. कारण ते बिल मंजूर झाल्यानंतर, ओ.सी.मिळाल्यानंतर आपोआपच त्याला सर्वसवलती मिळणार आहेत. त्यामुळे या कायद्याला काहीच अर्थ राहणार नाही.

या विधेयकाच्या पृष्ठ दोन वर असे म्हटले आहे की, "... अगोदरच्या नळ कारागिराने केलेल्या कामाची तपासणी करून ते प्रमाणित करणारे प्रमाणपत्र आयुक्तास सादर करील." यामध्ये भ्रष्टाचारास वाव दिलेला आहे. नवीन प्लंबर असे सांगेल की, पहिल्या प्लंबरने बरोबर काम केलेले नाही, माझ्याकडून काम करुन घ्यावे. नाहीतर मी तुम्हाला सर्टीफिकेट देत नाही. अशावेळी आपण काय करणार ? इमारत बांधताना अगोदरच्या प्लंबरने प्लंबिंगचे काम केलेले असते तो परवानाधारकच असतो. तेव्हा पहिल्या प्लंबरने केलेले काम बरोबर आहे किंवा कसे हे दुसरा प्लंबर तपासणार आहे याचा अर्थ याठिकाणी भ्रष्टाचाराला वाव ठेवलेला आहे. तो सर्टीफिकेट देणार नाही.

दुसरी गोष्ट म्हणजे या विधेयकाद्वारे 1991 पूर्वीच्या इमारती घेण्यात आलेल्या आहेत, 2007 पर्यंतच्या का नाहीत? कारण अनेक इमारती अशा आहेत की, त्यांना 1991 पूर्वीच्या इमारतींप्रमाणे त्रास होतो. तेव्हा मला असे वाटते की, याठिकाणी तीन वर्षाच्या कालावधीची अट घालण्याचे कारण काय ? तीन वर्षात या सर्व गोष्टी पूर्ण करणार आहात ? त्यानंतर काय करणार आहात ? माननीय उपसभापती यांनी देखील या कायद्यातील विसंगती सांगितलेली आहे. काहींचा एफ.एस.आय.शिल्लक राहिलेला असतो. सुरुवातीस बिल्डर ग्राऊंड प्लस सिक्स इमारत बांधतात. माननीय उपसभापतींनी सांगितल्याप्रमाणे आर्किटेक्टचर स्वत:ला विथ्ड्रॉ करुन घेतो. नंतर बिल्डर त्याच्याकडे असलेल्या टी.डी.आर.वर आणखी दोन मजले बांधतो त्यास परवानगी घेत



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...........

नाही. जर ग्राऊंड प्लस सिक्स इमारतीमध्ये 50 फ्लॅटस असतील व त्या इमारतीस आवश्यक असणारे पाणी दिलेले असते तेच पाणी तो वरच्या दोन मजल्यांसाठी वापरतो त्यासाठी तो महानगरपालिकेची परवानगी घेत नाही. जादा बांधलेले फ्लॅटस तो अगोरच्या परवान्यामध्ये घुसडून देतो. अशा गोष्टींबाबत आपण कोणते धोरण घेणार आहात ?

सभापती महोदय, हे कायदे मंडळ आहे. या कायदे मंडळात कोणत्याही कायद्याची सखोल चर्चा होणे आवश्यक आहे. अन्यथा या कायद्यातील पळवाटांचा फायदा घेतला जाईल. त्यादृष्टीने आपण परिपूर्ण कायदा केला पाहिजे. कारण अधिकाऱ्यांची वृत्ती व्यापक नसते तर ती छिद्रान्वेशी असते. तेव्हा याठिकाणी ज्या शंका व्यक्त करण्यात आलेल्या आहेत त्याचे निरसन झाले पाहिजे. आपण लोकांसाठी कायदा केलेला आहे. पण करायला गेलो एक आणि झाले दुसरेच असे होता नये एवढेच मला सांगावयाचे आहे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

----------------

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2007 चे वि.प.वि.क्रमांक -13 मुंबई महानगरपालिका (तातपुरती सुधारणा) विधेयक,2007 वर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मला याठिकाणी फक्त एकच सूचना करावयाची आहे. विधेयकामध्ये असे म्हटले आहे की, " वास्तुविशारद व प्लंबरच्या सर्टीफिकेटनंतर ऑक्युपेशन मिळेल." त्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी विषय मांडला की, हे केल्यानंतर ॲक्यूपेशन मिळतेच. परंतु याठिकाणी विकासक मध्येच काम सोडून गेला असेल आणि त्याने ओ.सी. घेतली नसेल तर काय ? यामध्ये दोन गोष्टी आहेत. एक तर त्याने अनधिकृत बांधकाम केले असेल किंवा नकाशाप्रमाणे इमारत बांधली नसेल. अशा परिस्थितीमध्ये महापालिकेचे आर्किटेक्ट हे कसे सर्टीफाय करणार ? अनधिकृत बांधकामाला अधिकृत करणार का ? याचा खुलासा कृपया माननीय मंत्रिमहोदयांनी करावा.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, याठिकाणी सन 2007 चे वि.प.वि.क्रमांक -13 मुंबई महानगरपालिका (तात्पुरती सुधारणा) विधेयक,2007 मंजुरीसाठी व चर्चेसाठी सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे. परंतु याठिकाणी विधेयक मंजूर करीत असताना सदनामध्ये गणसंख्या असवयास पाहिजे. ज्यावेळी आपण एखाद्या कायद्यातील तरतुदीसंदर्भात किंवा त्यात काही बदल करण्याच्या दृष्टीने याठिकाणी चर्चा करतो. त्यावेळी सत्ताधारी पक्षाच्या वतीने आवश्यक ती गणसंख्याही राखली जात नाही, हे योग्य नाही. मग, अशाप्रकारे जर आपण याठिकाणी कायदा पास करीत असताना, तो मुळात बेकायदेशीरपणेच पास होईल. याबाबतीत गणसंख्या राखण्याची जबाबदारी ही सत्ताधारी पक्षाची आहे. सत्ताधारी पक्षातील जास्तीत जास्त सन्माननीय सदस्य अशावेळी उपस्थित राहावयास पाहिजेत. त्यावरील चर्चेत त्यांनी भाग घ्यावा की नाही हे त्यांनी ठरवावे. परंतु कमीत कमी त्यांची उपस्थिती आवश्यक आहे. गणसंख्या ठेवण्याची जबाबदारी ही शासकीय पक्षाचीच असते. परंतु याची काळजी कोणालाच नाही. बिलाच्या संदर्भातील मंत्रिमहोदयही याठिकाणी उपस्थित पाहिजेत. आम्ही याबाबतीत याठिकाणी रोज ओरडतो. या सभागृहामध्ये रोज असेच पहावयास मिळते की, याठिकाणी अन्य एका विभागाचे बिल असते व दुसऱ्याच विभागाचे मंत्री ते मांडतात, त्यावेळी त्यांना काहीच कळत नाही. या सभागृहाची ती शोकांतिका आहे, असे मला वाटते. आपण या सभागृहास वरिष्ठ सभागृह म्हणून संबोधतो. परंतु हे सभागृह कशाच्या बाबतीत वरिष्ठ आहे, याचा शोध घेण्याची वेळ आज आलेली आहे.

सभापती महोदय, या बिलातील त्रुटींवर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी बोट ठेवलेले आहे. महापालिकेत काम केल्यामुळे त्यांना याबाबतची सर्व माहिती आहे. याठिकाणी मला माननीय मंत्रिमहोदयांना विचारावयाचे आहे की, ऑक्यूपेशन सर्टीफिकेट दिल्याशिवाय विकासक सोसायटयांमध्ये राहणासाठी लोकांना जागा ताब्यात देतात, हे शासन सहन करणार का ? जोपर्यंत ओ.सी. मिळत नाही, तोपर्यंत तेथे राहता येत नाही. याबाबतीत कायदा आहे, परंतु त्याची कडक अंमलबजावणी होत नाही. माननीय मंत्रिमहोदयांना माहीत आहे की, अशाप्रकारे बेकायदेशीर बांधकामे करण्यामध्ये महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे. याबाबतीतील आपल्या राज्याचा

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

कित्ता देशातील इतर राज्येही गिरवत आहेत. यासंदर्भात मी आपल्याला एका भागातील उदाहरण दिले होते. त्या भागात मी फेरी मारुन आलो, परंतु त्याठिकाणी अद्याप कोणतीच कारवाई झालेली नाही. त्याठिकाणी बांधकाम सुरुच आहे. अशाप्रकारे एखादा विषय शासनाच्या निदर्शनास आणूनसुध्दा त्याबाबतीत आपली इच्छाशक्ती होत नाही, याचेच हे एकमेव उदाहरण आहे. आपण त्या भागातील वस्ती विचारात घेता, मतदार विचारात घेता परंतु याबाबतीतील कायदा आपण विचारात घेत नाहीत. आज त्या भागात 5-6 माळयांच्या इमारती असून त्याठिकाणी जाण्यासाठी जागासुध्दा शिल्लक नाही. दुर्दैवाने त्या इमारतीमध्ये आकस्मिक आग लागली तर तेथील सगळया माणसांची राखरांगोळी झाल्याशिवाय राहणार नाही. असे काही घडले की, शासनाच्या मदतीचा ओघ सुरु होतो व आपण म्हणतो की, अरे काय झाले ? ये अल्हा, यह क्या हुआ ? परंतु या ज्या काही बेकायदेशीर गोष्टींना प्रोत्साहन देण्याचे काम आपण करीत आहात, त्याचा मी निषेध करतो. या विधेयकाच्या माध्यमातून हे सर्व ओ.सी. नंतरच व्हावयास पाहिजे. परंतु ओ.सी. न घेताच त्याठिकाणी लोकांना वास्तव्य करण्यास आपण पाठवत आहात.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार........

मला असे सांगा की, ज्या ठिकाणी ऑक्युपेशन सर्टिफिकेट नाही, शासनाची परवानगी नाही, महापालिकेची परवानगी नाही तरी सुध्दा नळाचे कनेक्शन दिले आहे, याबाबतीत शासन काय करणार आहे, त्यावर कोणत्या प्रकारचे बंधन आणणार आहे ? अनेक ठिकाणी महापालिकेचे पाणी वाहून जात आहे, महापालिकेची इच्छाशक्ती कमी आहे आणि शासनाची तर अजिबात नाही. यावर इलाज कोणता करणार आहात ? हा विषय जो येथे मांडला आहे, या विषयामधील अतिशय महत्वाची गोष्ट ही आहे की, हे विधान परिषद विधेयक क्रमांक 13 ज्याव्दारे तुम्ही काही बदल करु इच्छिता त्याचा नेमका फायदा कोणाला होणार आहे ? इमारत पूर्ण झाली की ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळविण्याची जबाबादारी तेथील इमारत वास्तुविशारदावर आहे. माझा प्रश्न असा आहे की, स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग हा जो विभाग आहे त्यांचे सर्टिफिकेट घ्यावे लागते आणि त्यानंतर सर्व गोष्टी होतात, अशी तरतूद कोणत्या कायद्यात केली आहे आणि अंमलबजावणी होत नाही त्यावर इलाज करण्यासाठी एखादे विधेयक का आणले नाही, त्याची अंमलबजावणी होण्यासाठी आग्रह का धरला जात नाही, अशी अंमलबजावणी झाली नाही तर अंमलबजावणी न करणा-यांवर कारवाई केली जाईल यासंदर्भामध्ये शासन कोणती पावले उचलणार आहे ? याचे कारण असे आहे की, सगळया कायद्यामध्ये असे लुपहोल्स ठेवायचे आणि त्या मार्गाने आपले साध्य साधायचे. उल्हासनगर, कल्याण, डोंबिवली आणि अन्य भागातील इमारतींचा अनुभव आपल्यापाशी आहे.

सभापती महोदय, यासंदर्भामध्ये मी एक उदाहरण या ठिकाणी देऊ इच्छितो. गोविंद टॉवर ही इमारत 3 ऑगस्ट 1998 रोजी कोसळली. सन्माननीय राज्यमंत्री श्री.राजेश टोपे हेच त्यावेळी हा विभाग हाताळीत होते, असे मला वाटते. त्यांच्या स्मरणात ही घटना आहे की नाही, याची मला कल्पना नाही. ही इमारत ज्यावेळी कोसळली त्यावेळी त्या इमारतीचे दोन मजले अनधिकृत होते. हाऊसिंग बोर्डाचा असलेला भूखंड त्यांनी खाजगी व्यक्तिला दिला होता. हाऊसिंग बोर्डाच्या कायद्यामध्ये तरतूद नसतांना हा भूखंड एका खाजगी व्यक्तिला दिला गेला. या खाजगी व्यक्तिने या भूखंडाचा विकास केला. ग्राऊंड + 3, अशी चार मजल्यांची परवानगी होती, पण विकासकाने वरच्या दोन मजल्यांची परवानगी न घेता सहा मजले उभे केले. मुंबई महापालिकेच्या तीन

....2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार........

उपायुक्तांना बरोबर घेऊन मी त्या इमारतीची पाहणी केली, वरपासून खालपर्यन्त इमारतीत फिरलो, कुठे कुठे लिकेजेस आहेत, ते त्यांना दाखविले. या इमारतीला ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळालेले नव्हते, हाऊसिंग बोर्डाला द्यावयाचे दोन फ्लॅट विकासकाने दिलेले नव्हते, कोणत्याही प्रकारची कायद्याची बंधने पाळली नव्हती, असे असतांना विकासकांने रहिवाश्यांना पझेशन दिले, असा सर्व पत्रव्यवहार मी त्यावेळी हाऊसिंग बोर्ड आणि मुंबई महानगरपालिकेशी केलेला आहे, आजही हा सर्व पत्रव्यवहार माझ्याजवळ आहे. त्यानंतर ती इमारत 3 ऑगस्ट 1998 रोजी कोसळली. त्यावेळी मी लोकसभेचा सदस्य होतो,. इमारत कोसळली त्यामध्ये 34 माणसे मृत्युमुखी पडली. अद्यापही तो भूखंड मोकळा पडला आहे, हायकोर्टात लोक गेले, हाऊसिंग बोर्डाकडे गेले, आजही तेथे इमारत पुन्हा उभी राहिलेली नाही. कितीतरी कुटुंबे उद्ध्वस्त झाली, एका कुटुंबातील सर्व माणसे इमारतीखाली गाडली गेली, हे सर्व परिणाम आहेत तुमच्या शासनाच्या निष्काळजीपणाचे. शेवटी बळी कोणाचा जातो ? जे निरपराध आहेत, त्यांचा जातो. कमावणारे कमावून निघून जातात, भ्रष्टाचार चालू राहतो, गरजू माणसे असतात ती अशा इमारतींमध्ये राहण्यासाठी जातात, ते उद्ध्वस्त होतात, याची काळजी कोणी घ्यायची ? ही जबाबदारी शासनाची आहे. ही जबाबदारी शासन पार पाडते का ? हा माझा शासनाला सवाल आहे.

सभापती महोदय, अशाप्रकारे कायद्यामध्ये बदल सूचविले जातात, ते मंजूर करण्याचा प्रयत्न होतो, घाईगर्दीने विधेयक आणले जाते, आज किती विधेयके पास केली याचा हिशेब मांडला जातो, मिडियाला सांगितले जाते, या अधिवेशनामध्ये एवढी एवढी विधेयके पास झाली. कालच आपण दोन विधेयके मंजूर केली, आज अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी आणखी काही विधेयके मांडली जातील, अर्धा-तास देखील या विधेयकांवर चर्चा करण्यासाठी मिळणार नाही, होयचे बहुमत, होयचे बहुमत, विधेयक संमत झाले. हे काय चालले आहे ? सन्माननीय उपसभापती यांच्याशी याबाबतीत माझा संघर्ष झाला. एखाद्या कायद्यात दुरुस्ती करावयाची असेल, काही तरतुदी करावयाच्या असतील, नवीन कायदा आणायचा असेल तर त्यासंदर्भामध्ये व्यवस्थित चर्चा झाली पाहिजे. सामाजिक प्रश्न आहेत, समाजाला सवलती द्यायच्या आहेत, इतर अनेक प्रश्न आहेत, हे

....3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.........

मलाही मान्य आहे. परंतु, कायदा हा सर्वात महत्वाचा आहे. आपण जो कायदा करतो त्याची अंमलबजावणी करण्याची क्षमता शासनात नसेल तर अशा शासनाला कायद्यात बदल करावे लागतात.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...........

आपण विधेयकामध्ये सुधारणा करतो. परंतु त्याची अंमलबजावणी कोणी करावयाची ? ती ताकद, ती इच्छाशक्ती या महाराष्ट्र शासनामध्ये आहे काय ? अजिबात नाही. अंमलबजावणी करण्याची ताकद, इच्छाशक्ती शासनामध्ये असती तर अनधिकृत बांधकामे झाली नसती. आपण विधेयकामध्ये दिनांक 25 ऑगस्ट, 1991 ही तारीख दिलेली आहे. तुम्ही ही तारीख कोणत्या आधारावर निश्चित केली हे मला माहीत नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे फायर फायटींगची काय व्यवस्था आहे ? कोठे आग लागली तर रस्त्यावर हायडन्स लावलेले आहेत. ते हायडन्स सुध्दा काम करत नाहीत, ते बंद पडलेले आहेत. फायर फायटींग ही जीवनातील अतिशय आवश्यक गोष्ट आहे. मुंबईचे अग्निशमन दल अतिशय कर्तबगार आहे. कोठेही आग लागली तरी स्वत:च्या जीवनाची पर्वा न करता ती आग विझविण्यासाठी तुटून पडतात. लोकांना जीवदान देण्यासाठी मुंबईचे अग्निशमन दल सक्षम आहे. आपण या विधेयकामध्ये असे म्हटलेले आहे की, "लायसनधारक नळकारागीर..." मंत्रालयामध्ये हे मराठी कोण करते ? त्याला नळ कारागीर असे म्हणत नाहीत. त्याला नळ जोडणी करणारा असे म्हणतात. माननीय मंत्री महोदयांनी मागच्या अधिवेशनामध्ये असे सांगितले होते की, या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना घेऊन आपण एस.आर.ए.च्या इमारतींची पाहणी करु, ज्या सोसायटींची नावे दिलेली आहेत त्या सोसायटयांना आपण भेट देऊ. आपण त्या ठिकाणी जरुर आलात. आमच्या बरोबर त्या सोसायटयांची पाहणी केली. मी नाही म्हणत नाही. मी सभागृहामध्ये सांगितले होते की, ऑन ॲण्ड ॲव्हरेज त्या सिलींगची हाईट 8 फुट 2 इंच निघाली. मंत्री महोदयांनी हे स्वत: बघितलेले आहे. या पद्धतीने मुंबईत इमारती बांधल्या जात आहेत. मंत्री महोदय ही तुमची जबाबदारी आहे. तुम्ही नगर विकास खात्याचे राज्यमंत्री आहात. मुख्यमंत्री महोदयांना किती वेळ मिळतो, हे मला माहीत नाही. तुम्ही नगर विकास खाते समर्थपणे सांभाळत आहात, त्याबद्दल मी तुमचे कौतुक करतो. सन्माननीय सदस्यांनी कोणताही प्रश्न विचारला तरी त्या प्रश्नाचे उत्तर तुमच्याकडे असते, हे बघून आम्हाला खूप बरे वाटते. मंत्री असा अभ्यासू असला पाहिजे. कोणताही प्रश्न विचारला तरी मंत्र्याने त्या प्रश्नाचे उत्तर लगेच दिले पाहिजे. नाही तर सन्माननीय सदस्यांनी एखादा प्रश्न विचारल्यानंतर त्या मंत्र्याने मुख्यमंत्र्यांकडे बघायचे, हे बरोबर नाही. ज्या पद्धतीने एस.आर.ए.च्या इमारती मुंबई

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...........

शहरात उभ्या राहत आहेत, त्या ठिकाणी ऑक्युपेशन सर्टिफिकेट नाही. पण त्या विकासकाला त्यांना पैसे द्यावे लागतात म्हणून त्यांना जबरदस्तीने त्या इमारतीत कोंबतात आणि ऑक्युपेशन सर्टिफिकेट नसतांना हे लोक एस.आर.ए. च्या इमारतीत रहावयास जातात. 5-6 माळे खाली उतरुन ते लोक पाणी भरतात. मुंबईतील सर्वसामान्य माणसाचे जीवन इतके दुर्लक्षित असेल तर मग शासन कशासाठी कायदे करते, असा माझा प्रश्न आहे. शासनाने यादृष्टीकोनातून तिकडे पाहिले पाहिजे. आपण काही सोसायटयांना भेट दिली त्यावेळी तुम्ही अनुभव घेतला. खरे म्हणजे आम्ही तुम्हाला जास्त वेळ थांबविले नाही. आपल्याला अजून चार-पाच सोसायटयांमध्ये जायचे होते. तुम्हाला घाई असल्यामुळे आम्ही तुम्हाला जास्त वेळ थांबविले नाही. मोठया लोकांसाठी तुमच्याकडे नगर विकास खाते आलेले नाही. तुम्ही गरीबांचे प्रतिनिधी आहात, हे तुम्ही लक्षात ठेवले पाहिजे. झोपडपट्टीमध्ये राहण्या-या लोकांसाठी आपण आयुष्यभर झगडत आहोत. त्यांना न्याय देण्याची जबाबदारी तुमच्यावर आलेली आहे. तुम्ही मुख्यमंत्र्यांना सांगितले पाहिजे की, मी प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे आणि माझ्या मताप्रमाणे असे व्हायला पाहिजे. मुख्यमंत्री तुम्हाला नाही म्हणणार नाहीत. कारण तुम्हाला त्या लोकांची मत पाहिजेत. त्या लोकांची मत मिळाली नाही तर तुम्ही निवडून येऊ शकत नाहीत. शेवटी हे सर्व मतांचे राजकारण चालले आहे, याचे खूप दु:ख होते. निवडून आल्यानंतर चोख काम केले तर ते लोक तुम्हाला पुन्हा निवडून देतील, याची मला खात्री आहे आणि माझा तसा अनुभव आहे. आपण कामच करत नाही आणि मग पैशाच्या बळावर निवडणुका लढवायच्या आणि जिंकण्याचा प्रयत्न करायचा. It has became the deciding factor in the elections. माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, आपण ज्या सुधारणा आणत आहात त्या सुधारणांचा खरोखर काही उपयोग होणार आहे की नाही हे आधी तपासून घ्या आणि उपयोग होणार नसेल तर हे विधेयक मागे घ्या आणि नव्याने विधेयक सभागृहामध्ये मांडा. या विधेयकामध्ये अनेक त्रुटी आहेत. पण अशा सुधाणा आणा की ज्याचा परिणामकारक वापर आपण करु शकू.

यानंतर कु.जयश्री.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

JPK / D / MAP प्रथम श्री.बोरले..... 11:00

श्री.मधुकर सरपोतदार......

एक - दोन विकासकांना टाका ना जेलमध्ये ! ही सुधारणा होते की नाही ते बघा. पण या सुधारणा होणार नाहीत. कारण आजपर्यंत कोणताही विकासक जेलमध्ये गेलेला कोणाला माहीत नाही. वांद्रे येथील गोविंद टॉवर्स ही इमारत पडल्यानंतर त्या इमारतीचा विकासक आजपर्यंत जेलमध्ये गेला नाही तर तो चैनीत आहे. तो म्हणतो मी मॅनेज केले. "मॅनेज केला " हा शब्द राजकारणामध्ये खूप भयानक आहे. सभापती महोदय, मला एकच विनंती करावयाची आहे की, सदर विधेयक हे गरीबांसाठी, सर्वसाधारण मध्यमवर्गींसाठी आहे, त्यांच्या घरांच्या सोसायटयांचा हा प्रश्न आहे. सामान्य मध्यमवर्गीच्या घराला जर ओ.सी.नसेल तर त्यांच्या नळपाण्याची व्यवस्था कशी व्हावी, प्रामुख्याने या संदर्भातील हे विधेयक आहे. हे नळपाणी ज्यांना आपण देतो. अनेक इमारतींमध्ये लोक राहायला गेले त्या लोकांना पाणी नाही म्हणून आज त्यांची अशी परिस्थती आहे की, पाच सहा माळे खाली उतरुन त्यांना पाणी भरावे लागते. यासंबंधीचा उपाय करण्यासाठी विधेयक आणलेले आहे. त्यात काही त्रूटी आहेत. हे विधेयक सभागृहामध्ये विचाराकरिता मांडावयाच्या आधी जर आम्हाला त्याच्या प्रती मिळाल्या असत्या तर या विधेयकातील त्रूटींविषयी आम्ही शासनाला पत्राद्वारे कळविले असते. शासनाने या सभागृहामध्ये काल एकतर्फी विधेयक मांडले आणि आज ते चर्चेला आणून मंजूर करावयाचे असा विचार दिसत आहे. यासंदर्भात मी सन्माननीय सभापतींना विचारले होते की, आज तुम्ही विधेयक सभागृहात मांडले आणि उद्या लगेच चर्चेला घेता आहात. "We should get adequate time, at least for a study of this bill."तसे होत नाही, हे दुर्दैव आहे. म्हणून मला असे वाटते की, मंत्रिमहोदय आपण हे विधेयक जर मागे घेतले आणि पुन्हा नव्याने सादर केले तर ते जास्त परिणामकारक होईल आणि त्याचा जनतेला उपयोग होईल, असे काहीतरी करा. विधेयक फक्त समाधानासाठी पास करुन घेणे, असे काम करु नये. हे अत्यंत महत्वाचे विधेयक आहे. या विधेयकाच्या संदर्भात सत्शील हृदय ठेवून यातील त्रूटींमध्ये सुधारणा करुन त्या नव्याने या विधेयकामध्ये इनकॉर्पोरेट करुन मग या सभागृहासमोर मांडण्यात यावे, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

------

.......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, याठिकाणी हे जे विधेयक आहे, ते अतिशय महत्वाचे असे विधेयक आहे. लाखो करोडो लोकांशी या विधेयकाचा संबंध आहे. यातील सुधाणेचा संबंध आहे. आणि त्यामुळे माझ्या या विधेयकासंदर्भात तीन-चार सूचना आहेत. कारण या विधेयकामध्ये एवढया त्रूटी आहेत की, विधेयकाच्या शब्दरचनेमध्ये देखील बदल करण्याची आवश्यकता आहे. उदा.सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सांगितल्याप्रमाणे "लायसन्सधारक" या ऐवजी "परवानाधारक " एवढा चांगला शब्द असल्यानंतर देखील तो यामध्ये वापरला गेला नाही.

**उपसभापती** : लायसन्सधारक या शब्दाबद्दल शब्दछल आता पूरे झाला.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माझी दुसरी सूचना अशी आहे की,सन 1991 पूर्वीच्याच का ?सन 1991 नंतर एवढया इमारती झालेल्या आहे. मुंबई भरल्यानंतर या ठाणे जिल्हयामध्ये प्रचंड इमारतींचे जंगल झाले. या पंधरा ते वीस वर्षामध्ये खूप इमारती बांधून झालेल्या आहेत. सन 1991 हे आपण का ग्राहय धरलेले आहे. सन 1991 नंतरचे काय हे त्या ठिकाणच्या मध्यमवर्गीयांना, कनिष्ठ लोकांना त्या ठिकाणी राहाणा-या लोकांसाठी हे अतिशय महत्वाचे असे विधेयक आहे. हा देखील यामध्ये बदल केला जावा.

तिसरी सूचना अशी आहे की, जी माननीय सभापती महोदयांनी देखील मांडली होती. त्या इमारती बांधल्यानंतर विकासक त्या इमारतीत राहण्यासाठी पार्टली ओ.सी.घेतो. मग त्यामध्ये राहणा-या लोकांकडे ऑक्यूपेशन सर्टिफिकेट, कंप्लिशन सर्टिफिकेट नाही. यामुळे फ्लॅटधारकाचे नुकसान होऊन भविष्यात तो अडचणीत येतो. वरच्या माळयाच्या फ्लॅटधारकांजवळ पार्टली ओ.सी असते, त्यामुळे त्याला भरपूर प्रॉपर्टी टॅक्स भरावा लागतो. इमारत बांधून झाल्यावर विकासक निघून जातो तसेच, त्याचा जो आर्किटेक्चर असतो तो राजीनामा देऊन निघून जातो. अशा प्रकारे त्या इमारतीला कोणीही जबाबदार राहत नाही. यामध्ये देखील एक महत्वाचा बदल करण्याची आवश्यकता आहे की, जेणेकरुन या विधेयकामध्ये संबंधित असलेले लाखो फ्लॅटधारकांना या माध्यमातून दिलासा मिळाणार आहे. हे जे विधेयक आहे ते अत्यंत महत्वाचे विधेयक आहे, याच्यामध्ये अनेक प्रकारच्या सुधारणा करण्याची गरज आहे, माझी विनंती आहे की, पुन्हा एकदा हे विधेयक परिपूर्ण करुन या सदनासमोर आणावे.

-----

यानंतर श्री.गागरे....

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये तात्पुरती सुधारणा करण्याकरिता हे विधेयक माननीय नगरविकास राज्यमंत्री महोदयांनी आणलेले आहे. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे भाषण आपण सर्वांनी ऐकले असेल, माझेही भाषण ऐकावे अशी मी विनंती करतो. मी याबाबत सांगू इच्छितो की, मुंबईतील चाळी, त्यांच्या पुनर्रचित इमारतीत रुपांतरीत करताना एस.आर.ए. सारख्या योजना राबविण्यात आल्या. या इमारतीसाठी अनेक योजना राबविल्या हे आपल्याला ज्ञात आहे. मी माननीय नगरविकास राज्यमंत्री महोदयांना भेटलो होतो व प्रभादेवी येथील सिव्हरड्युस इमारतीबाबत मी त्यांच्याशी चर्चा केली. यानंतर आपण एक चांगला निर्णय घेतला आहे व त्यातून संपूर्ण मुंबईला लाभ मिळाला आहे. अशा प्रकारे जो ॲसेसमेंट टॅक्स येत आहे, तो गैर आहे. त्यामध्ये आणखी काही सुधारणा करण्याची गरज आहे, ती अद्याप झाली नाही. मी अगोदर दुसरा मुद्दा सांगतो, नंतर या मुद्दयावर येतो. याबाबत कशी अडचण होत आहे हे सांगतो, आता तेथे अनेक इमारत बांधल्या गेल्या आहेत. आपण पुन्हा एक घोषणा केली आहे की, 350 चौरसफुटापर्यत ज्या सदनिका असतील त्यांना 10-20 टक्क्यांपासून 100 टक्क्यापर्यंत 20 वर्षातच्या कालावधी संपूर्ण ॲसेसमेंट टॅक्स लावण्याची तरतूद करणार आहे. या तरतूदीमध्ये अशी अडचण आहे की, जुन्या इमारतीमधील सर्व खोल्या छोटया होत्या असे नाही. काही ठिकाणी नवीन सदनिका 574 चौ.फुटापर्यत दिलेल्या आहेत परंतु याबाबत काय घडले आहे ते सांगतो. 350 चौ.फुटापेक्षा जास्त क्षेत्राची जी सदनिका आहेत, तिच्या बाबतीत आपण केलेला नियम लागू होत नाही. त्याला मात्र पूर्ण ॲसेसमेंट टॅक्स लावला जाणार आहे. तेथे 350 चौ.फुटाचे रिलॅक्सेशन केले तर बरे होईल. परंतु त्याचा विचार आपण कायदा व नियम करताना केलेला नाही, असे अनुभवास येत आहे. 345-400 चौ.फुटाच्या सदनिका खूप कमी असतील, त्यांना मात्र संपूर्ण ॲसेसमेंट टॅक्स भरावा लागतो. आता तेथे पाण्याचा प्रश्न निर्माण आहे. तेथे जी मुळ चाळ होती, तिला पाण्याचे कनेक्शन होते, ते कनेक्शन गृहीत धरले गेले नाही. नव्या इमारतीला नवीन कनेक्शन दिले असे समजून त्यांना आता जो कर आकारला जात आहे तो दुप्पट तिप्पट नसून दीडशे-दोनशे पट इतका भयानक आहे. इतक्या पटीने कर आकारला गेला तर मुंबईच्या चाळीतील जो गरीब मराठी माणूस नव्या सदनिकेत

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ AKN/

श्री.अरविंद सावंत .....

गेलेला आहे, तो उध्वस्त होणार आहे. मी या निमित्ताने दोन मागण्या करतो की, नवीन नियम करताना केवळ 1991 साल गृहीत धरता कामा नये. कारण तुम्हाला कल्पना आहे की, त्यानतरसुध्दा एन.ओ.सी. किंवा ओ.सी. न घेता लोक राहण्यासाठी गेले आहेत. हे लोक चाळीत किंवा ट्रान्झिट कँपमध्ये राहात होते. ट्रान्झिट कँपमधील अवस्था अतिशय वाईट होती. इमारत तयार झाली की, लोकांना लगेच तेथून हलविले जाते. सर्वसामान्य माणसाला कायदा कळत नाही. एन.ओ.सी. मिळाली की नाही हे त्याला काही माहिती नसते. He his a lay man. त्याला फक्त हेच समजते की, मला घर मिळाले आहे. बिल्डर मला चावी देत आहे व मी रहायला जाणार आहे एवढेच त्याला माहिती असते. नंतर बिल्डर पळून जातो व सर्वसामान्य माणसांना भुर्दंड बसतो. त्याचा आपण विचार केला पाहिजे. यासाठी केवळ 1991 हे वर्षे गृहीत धरु नका. अशा प्रकारचे काम जेथेजेथे असेल त्याला इसवीसनाची मर्यादा घालू नका. कारण काल-परवापर्यत सोसायटया निर्माण झालेल्या आहेत, त्यांच्या बाबतीत काय करणार ? म्हणून ही मर्यादा आपण वाढवावी. तसेच सदनिकांच्या एरियाची मर्यादा वाढवावी. या विधेयकामध्ये आपण आवश्यक त्या सुधारणा करुन आणले तर बरे होईल. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी थोडयापूर्वी ओ.सी. कशा प्रकारे मिळते हे सांगितले आहे, हे ऐकून मला आश्चर्य वाटले आहे. ओ.सी. मिळाल्यानंतर काहीच द्यायचे शिल्लक राहात नाही. एकदा आर्कीटेक्टने सर्टीफाय केले की, लगेच ओ.सी. मिळते. त्यामुळे वरील सुधारणा आपण कराव्यात अशी अपेक्षा करतो. या विधेयकाचे उद्देश चांगले असले तरी तो मार्ग साधण्यासाठी जे मार्ग आहेत ते बरोबर नाही अशी अपेक्षा करतो.

-------

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण हा कायदा येथे आणत आहेत, हे स्वागतार्ह आहे. मी महापौर असताना, चेअरमन असताना काम केलेल आहे त्यामुळे मला याबाबत माहिती आहे.. या कायद्यामध्ये काही त्रुटी आहेत. या त्रुटी आपण दूर केली नाही तर या विधेयकाचा जो उद्येश आहे तो सफल होणार नाही असे मला वाटते. त्यामुळे विधेयक अंमलात आणावयाचे असेल तर या बिलामध्ये आपल्याला सुधारणा करणे आवश्यक आहे. पुढील अधिवेशनामध्ये पहिल्या किंवा दुसऱ्या दिवशी या सुधारणा आणू व त्यानंतर तो कायदा आपण संमत करावा असे मी आपणास सांगू इच्छितो.

श्री. राजेश टोपे ( नगर विकास राज्य मंत्री ): सभापती महोदय, सदर विधेयकासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, मधुकर चव्हाण, अरविंद सावंत, मुझफ्फर हुसेन,संजय केळकर तसेच माननीय उपसभापती यांनी देखील त्यांची मते मांडली आहेत. त्यांनी ज्या सूचना येथे केल्या आहेत त्या संदर्भात मी आपणास सांगू इच्छितो की, मध्यमवर्गीय लोकांना दिलासा मिळण्याच्या दृष्टीने हे विधेयक शासनाने आणले आहे. सन्माननीय सदस्यांनी फायर फायटींग बाबत तरतुदीं संदर्भात प्रश्न विचारला होता. लोकशाही आघाडी शासनाने महाराष्ट्र फायर प्रिव्हेंशन अँड लाईफ सेफटी ॲक्ट आणला आहे. यासंदर्भात मी आपणा सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपले सभागृह हे कायदे मंडळ आहे. त्यामुळे याठिकाणी कयदे तयार करताना त्या मध्ये कोणत्याही त्रुटी राहू नये यासाठी विधेयकावर सविस्तर चर्चा व्हावी असा सरकार पक्षाचा नेहमी उद्येश असतो. कोणते कामकाज घ्यावयाचे, कोणते कायदे सभागृहात मांडावयाचे हे सर्व बीएसई च्या बैठकीमध्ये ठरत असते. व त्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे येथे कामकाज घेतले जाते. याठिकाणी सातत्याने असा आरोप केला जातो की, अतिशय घाईने बिले मंजूर केले जात आहेत. ते योग्य नाही. महाराष्ट्र फायर प्रिव्हेंशन अँड लाईफ सेफटी ॲक्ट संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी प्रश्न विचारला होता.....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी येथे अधिकृत बोलत आहे. एका एका दिवसात 6 बिले मंजूर केली जात आहेत. दहा मिनिटामध्ये 6 विधेयके मंजूर केली गेली. दोन विधेयके ही परिवहन संबंधी होती, एक बिल मनी रिकव्हरी संदर्भात होते. मी विनंती केली होती की, याबिलांवर मला चर्चा करावयाची आहे. मी संदर्भात सर्व मुद्दे काढले होते. माननीय मुख्यमंत्री श्री.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .........

विलासराव देशमुख म्हणाले की, एक बिल मागे ठेवू व दुसरे बिल पुढे नेऊ. परंतु त्या नंतर ते बिल मंजूर करण्यात आले. त्या कायद्याची अंमलबजावणी देखील झाली. अशाप्रकारे आमची फसवणूक केली जात आहे. त्यामुळे आपण याबाबत काही बोलू नये.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, महाराष्ट्र फायर प्रिव्हेंशन अँड लाईफ सेफ्टी ॲक्ट हे विधेयक माननीय राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आले होते व जून 2007 रोजी त्या विधेयकास मान्यता देण्यात आली. त्यासंदर्भातील रुल्स लचकरच तयार करण्यात येत आहे. अशाप्रकारे विधेयक आणणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. मुबईमध्ये सध्या अनेक टोलेजंग व उंच इमारतीचे बांधकाम करण्यात येत आहे. तेथे आग लागून जीवीत व मालमत्तेचे नुकसान होऊ नये याकरिता हा कायदा आणण्यात येत आहे. हा कायदा तयार झाल्यावर लगेच त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. या कायद्याच्या माध्यमातून फायर ऑफीसर्सना पाहणी करण्याची परवानगी मिळणार आहे. सीसी मिळाल्यानंतर तेथे तेथे बसविण्यात येणारी आग विझविण्याची जी उपकरणे आहेत ती, योग्य प्रकारे बसविण्यात आली आहे किंवा नाही, ती उपकरणे चालू परिस्थितीत आहे किंवा नाही हे पाहण्याची तरतूद कायद्यामध्ये नव्हती.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे ....

या ॲक्टमुळे अग्निशनम अधिकाऱ्यांना अधिकार मिळाला आहे. ते त्याबाबतीत तपासणी करू शकतात, अग्निशमन व्यवस्था तेथे आहे की नाही हे पाहू शकतात आणि नसेल वा नादुरूस्त असेल तर ती चालू करण्याच्या दृष्टीने कारवाई करू शकतात.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी या संदर्भात माननीय राज्यमंत्र्यांना एक विनंती आहे. या बाबतीत आपण दोन्ही सभागृहाच्या सदस्यांच्या एक दोन बैठका घ्याव्यात. कारण काही गोष्टी अशा आहेत की, त्या नियमात आपल्याला अंतर्भूत करायला पाहिजेत. आज नाही तरी फायर ऑफिसर प्रमाणपत्र देताना काय अडवणूक करतात याची आपल्याला कल्पना आहेच. तसेच या परवानाधारक प्लंबर आणि सर्व्हेअर यांचेदेखील होईल. 500 रूपये द्या मग आम्ही तुम्हाला प्रमाणपत्र देतो असे प्रकार सुरू होतील. आज असे प्रकार सुरू नाहीत असे नाही. पण आता हे नियम नव्याने आपण करीत आहात त्यामुळे माझी आपल्याला सूचना आहे की, आपण या संदर्भात दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची, ज्यांना यामध्ये इंटरेस्ट आहे अशांची एक बैठक घ्या, त्यात चर्चा करून, सदस्यांच्या सूचना येतील त्या नियमात अंतर्भूत होतील असे पहा.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.रावते यांची सूचना मान्य करतो. ज्यांना ज्यांना या विषयात इंटरेस्ट असेल, त्या दोन्ही सभागृहाच्या सदस्यांना, खरे तर मी सर्वांनाच याबाबत निमंत्रण पाठविन आणि बैठकीला येणाऱ्यांनी आपली नावे कळवावीत असेही त्यांना सांगेन, त्याप्रमाणे त्यांची बैठक घेऊन त्यामध्ये चीफ फायर ऑफिसर श्री.देशमुख आहेत यांनाही बोलावून घेऊन एकत्रित चर्चा करून आपण हे नियम तयार करू या. सभापती महोदय, या पहिल्या प्रश्नाबाबत मी हे सांगितले. त्यानंतर दुसऱ्या प्रश्नाबाबत मला सन्माननीय सदस्य श्री.रावते यांना सांगावयाचे आहे की, महापालिकाच आपली असल्याने सगळ्या पदाधिकाऱ्यांचा समन्वय आपला जवळून असला पाहिजे. मी माझे मत या संबंधात जाणीवपूर्वक व्यक्त करू इच्छितो. कारण या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांच्या पक्षाची महापालिका असताना हे विधेयक आले कोठून ? आपल्याच महापालिकेकडून हा प्रस्ताव आलेला आहे, त्यामुळे हा पूर्ण प्रस्ताव मान्य करून हे विधेयक आम्ही येथे आणलेले आहे. त्यामुळे या ज्या महत्त्वाच्या तरतुदी आहेत की, परवानाधारक प्लंबर आणि परवानाधारक सर्व्हेअर यांचे प्रमाणपत्र घेण्याची तरतूद यात आहे. सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी सांगितले की, अगोदर पाणी द्या आणि नंतर तीन वर्षात

...... पी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. टोपे ....

प्रमाणपत्र घ्या. कोणालाही गरज असेल तर तो हे काम करील. पण जीविताच्या धोक्याच्या बाबतीत

**<u>सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री.उल्हास पवार</u>**

आपण नेहमी म्हणतो की, इमारत बरोबर झाली की नाही, आराखड्यानुरूप तिचे काम केले आहे की नाही ? ज्या काही गोष्टी स्ट्रक्चरल आणि इंजिनिअरींगच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत त्या पार पडल्या आहेत की नाही हे पाहण्याचे काम परवानाधारक सर्व्हेअर करणार आणि त्याचे प्रमाणपत्र देणार आहे. बिल्डर पळून गेल्यानंतर तेथील ज्या व्यक्ती किंवा कंपनी असेल किंवा जे कोणी सदनिकाधारक असतील त्यांनी प्लंबिंगचे काम करून घेतले आहे की नाही हे पाहणेही आवश्यक आहे आणि ते काम बरोबर झालेले आहे की नाही हेही तपासले गेले पाहिजे आणि त्यासाठी आपण परवानाधारक प्लंबरचे प्रमाणपत्र मागितले आहे. म्हणजे त्या इमारतीत जे काही काम झाले आहे ते योग्य प्रकारे, नियमानुसार झाले आहे हे तो परवानाधारक प्रमाणित करील. ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय श्री.राजेश टोपे हे राज्यमंत्री म्हणून येथे उभे आहेत आणि मंत्री आहेत त्यामुळे कायद्याच्या तरतुदी त्यांना पूर्णपणे माहिती असण्याची गरज आहे, तशी त्यांच्याकडून अपेक्षा आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, ते मूलतः चुकीचे समीकरण येथे मांडत आहेत. इमारत पूर्ण झाली असेल, बिल्डर पळून गेला असेल .. असे काही नाही. मी आता येथे केवळ मुंबई महापालिकेच्या बाबतीतील बोलतो. आपल्याला ऑक्युपेशनचा प्रश्न पडला आहे. पण खरे तर बांधकामाला सुरूवात करण्यापूर्वी आयओडी दिली जाते. तसेच प्लंबरची नेमणूक करून पाणी खात्याची एनओसी लागते. म्हणजे हे सारे दाखले आणल्यानंतरच आयओडी मिळते. ते दाखले कोण घेते ? आर्किटेक्ट घेत नाही तर परवानाधारक प्लंबर घेत असतो. ..

( यानंतर श्री. सरफरे .... क्यू 1 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

ते बिल्डींग डिपार्टमेंटकडे आल्यानंतर आम्ही त्याला पुन्हा सर्टिफिकेट देवू शकतो, त्यानंतर तो प्लॅन मान्य होतो. तेव्हा इंटीमेशन ऑफ डिसअॅप्रुव्हल हे पहिले मिळते. त्यानंतर पाणी खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र लागते. ते प्रमाणपत्र लायसन्स प्लंबर्सना घ्यावे लागते . कोणताही प्रकल्प उभा रहातांना कायदेशीर वास्तू विशारद, परवानाधारक प्लंबर यांची आवश्यकता असते. बिल्डर इज नॉट अे क्वॉलिफाईड ॲथॉरिटी. बिल्डर ही संज्ञा कुठेही स्वीकारलेली नाही. ती जनतेमध्ये, राजकारणामध्ये आहे. परंतु तुमच्या कायद्यामध्ये बिल्डर ही संज्ञा नाही. आणि म्हणून याठिकाणी निवेदन करीत असतांना आणि सरकारच्या वतीने बोलतांना आपण बिल्डर हा चुकीचा शब्द आणीत आहात. कोर्टामध्ये आरोपी आणि फिर्यादी यांच्या वतीने वकील बोलत असतो. त्याप्रमाणे या ठिकाणी वास्तू विशारदाची ओळख कायद्यामध्ये आहे. बिल्डरची ओळख नाही. कायद्यामध्ये परवानाधारक प्लंबर आणि परवानाधारक सर्व्हेअर या दोहोंची ओळख आहे. आणि तिसरा स्ट्रक्चरल इंजिनिअर आहे. तो कंप्लिशन सर्टिफिकेटच्या वेळी लागतो. आय.ओ.डी. साठी तो लागत नाही. त्यामुळे आपण बिल्डर बाबत म्हणत आहात ती मुळात अस्तित्वात नसलेली संज्ञा आहे. आपल्या कायद्यातील तरतुदीमध्ये वास्तू विशारद आहे, त्यालाच त्याचे लायसन्स मिळाले पाहिजे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, अनेक माननीय सदस्य बिल्डर या शब्दाबाबत बोलले. त्यामुळे मी त्याची पुनरावृत्ती केली. बिल्डर पळून गेल्यामुळे जी परिस्थिती निर्माण झाली, त्यामुळे नंतर ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळाले नाही. अशावेळी लोकांनी सदनिकेचा ताबा घेतला असतांना ओ.सी. नाही म्हणून पाणी नाही असे समीकरण तयार झाले. हे मी त्यांच्या भाषेत सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. यामध्ये लायसन्स प्लंबर आणि लायसन्स सर्व्हेअरना प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

श्री. दिवाकर रावते : मी तुम्हाला पुन्हा एकदा कायद्यातील तरतूद सांगतो...

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : मंत्रिमहोदयांनी उदाहरण देऊन स्पष्टीकरण केले आहे.

श्री. दिवाकर रावते : तसे नाही, त्यांनी ते नाकारले पाहिजे. कन्व्हेंअन्सच्या संदर्भात कायद्यातील तरतुदीबद्दल त्यावेळी चर्चा झाली. सरकारने सांगितले की, आम्ही कायद्याने सहकारी गृहनिर्माण संस्थांना ओळखतो, विकासक ओळखत नाही. याठिकाणी विकासकाची व्याख्या काय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

दिली आहे? तो कोण आहे? त्याची बंधने काय आहेत? यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्था हीच जबाबदार आहे. त्या कायद्यात अशी तरतूद आहे की, इमारत कोण, कशी बांधतो? "Society has appointed an agent on behalf of the society." जो कुणी विकासक असेल तो बिल्डर आहे. कायद्याप्रमाणे आपले नाते सहकारी सोसायटीबरोबर आहे. त्यामुळे बिल्डर पळाला हा विषय नाही. सोसायटीचे सदस्य एकत्र येऊन वास्तू विशारदाला बरोबर घेऊन काम करुन घेण्याबाबत कायद्यात तरतूद आहे. त्यामुळे हा कायदा सहकारी संस्थेसाठी आहे. त्यासंबधी मी बोलत आहे. ज्या गाळेधारकांनी गाळे विकत घेऊन सहकारी संस्था निर्माण केली आहे, त्याचा अंतर्भाव या कायद्यामध्ये आहे. त्यावर आपण चर्चा केली आहे. आपण विकासकाला नाकारले आहे. हा कन्व्हेअन्सचा कायदा आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, प्रामुख्याने कन्व्हेअन्सच्या संदर्भात माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण ंयानी मुद्दा उपस्थित केला. महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये कन्व्हेअन्सबद्दल जरुर तरतूद असेल परंतु याठिकाणी महानगरपालिकेचा कायदा आणि कन्व्हेअन्स हे दोन वेगवेगळे विषय आहेत. तेव्हा महानगरपालिकेच्या डी.सी. रुलप्रमाणे बांधकाम झाले नाही तर त्यासाठी आपण ओ.सी. देत नाही. त्यादृष्टीने दोन वेगवेगळे भाग आहेत एवढेच सांगतो.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .....

या ठिकाणी 25.3.91 ही कट ऑफ डेट का असे सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी विचारले. मुंबई महानगरपालिकेचे डी.सी.रुल्स 20.3.1991 ला लागू झाले. डी.सी.रुल्स लागू होण्याच्या अगोदरच्या ज्या इमारती किंवा सदनिका असतील त्यासंदर्भात महानगरपालिकेने हा प्रस्ताव पाठविलेला होता आणि ती बाब या विधेयकाच्या माध्यमातून या ठिकाणी आणलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी एस.आर.ए.मध्ये जास्तीत जास्त 350 चौरस फूट पोर्शन पर्यंत असेसमेंटमध्ये माफी द्यावी असे विचार व्यक्त केले. याबाबत विचार करु. कारण आपण टेलिस्कोपिक सवलत दिलेली आहे ती सेक्शन 33(10), 33(7) अंतर्गत दिलेली आहे. एस.आर.ए.ला 350 चौरस फुटापर्यंत द्यावे अशा पध्दतीची जी अपेक्षा व्यक्त केलेली आहे त्याबाबतीत विचार करु असे मी सांगितले आहे. आज आपण याबाबतीत कमिटमेंट करु शकत नाही. 1991 नंतरच्या ज्या इमारती आहेत त्या ठिकाणी जर अशा पध्दतीची घटना झाली असेल तर त्यांना ऑक्युपेशन सर्टिफिकेट देण्याच्या संदर्भात काय ? असा प्रश्न अनेक सन्माननीय सदस्यांनी विचारला. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, 1991 च्या अगोदरची जी माहिती माझ्याकडे आहे त्यानुसार 1991 च्या अगोदरच्या 2200 इमारती यामध्ये लाभार्थी असणार आहेत. पुढची व्याप्ती काय असू शकेल त्याचा अभ्यास करुन 1991 च्या नंतरच्या संदर्भात काही नियम करता येतील काय यासंदर्भात सुध्दा निश्चितपणे पुढच्या काळामध्ये विचार करु. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी ज्या सुधारणा सुचविलेल्या आहेत त्यासंदर्भात हे बिल पास झाल्यानंतर आणि काही काळ दिल्यानंतर किती लोक या लायसनधारक सर्व्हेअर, लायसनधारक प्लंबर यांच्या माध्यमातून सर्टिफिकेट घेऊन ऑक्युपेशन सर्टिफिकेट घेतात याचा अभ्यास करुन त्यांचा जो विचार आहे तो आवश्यक असेल तर जरुर पुढे सुधारणा आणण्यासंबंधी शासनाची तयारी राहील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माननीय मंत्रिमहोदयांना दोन बाबतीत धन्यवाद देतो. आमचे जे म्हणणे आहे त्यावर आम्ही ठाम आहोत. माननीय मंत्रिमहोदय असे म्हणाले की, मुंबई महानगरपालिकेकडून प्रस्ताव आला. मुंबई महानगरपालिकेतील शिवसेना-भारतीय जनता पक्षाने असे करण्याबाबत जो आग्रह धरला त्याबद्दल मुंबई महानगरपालिकेच्या नगरसेवकांना

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

धन्यवाद देतो. त्यांनी मुंबईतील सामान्य नागरिकांचा विचार केला. त्यांना ते करता येत नव्हते. कारण त्यासाठी कायद्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता होती आणि म्हणून ते शासनाकडे आले. मुंबई महानगरपालिका शिवसेनेच्या ताब्यात दिल्याबद्दल त्यांनी सामान्य मुंबईकर नागरिकांचा विचार केला. त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. त्यासंदर्भातील कायदा आपण करावयास घेतला पण त्यामध्ये त्रुटी आहेत याची आपल्याला जाणीव करुन दिली आहे. त्या त्रुटीचा विचार करुन पुढच्या अधिवेशनात आपण ते आणणार आहात. या विधेयकामध्ये ज्या त्रुटी आहेत त्या ताबडतोब सुधाराव्यात अशी मी विनंती करतो.

श्री. गिरीश गांधी : सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे मुंबई महानगरपालिकेच्या इंदिरा काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांनी याला विरोध केला नाही त्यामुळे धन्यवाद मानावयाचे असतील तर महापालिकेच्या सर्व सदस्याचे मानावेत.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** (श्री. उल्हास पवार) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2, विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. प. वि. क्रमांक 13 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2007 चे वि. प. वि. क्रमांक 13 संमत झाले आहे.

----

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महानगरपालिका व नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. LXXVIII OF 2007

( A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. स. वि. क्रमांक 78 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007चे वि. स. वि. क्रमांक 78 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, आज देशामध्ये जवाहरलाल नेहरु अर्बन रिन्युअल मिशनच्या माध्यमातून एक अत्यंत महत्वाकांक्षी योजना देशातील सर्वच शहरांच्या विकासाच्या दृष्टीकोनातून केन्द्र सरकारच्या नगरविकास विभागाने आणलेली आहे. याबाबतीत काही अनिर्वाय आणि वैकल्पिक अटी याबाबतीत केन्द्र आणि राज्य सरकारमध्ये एमओयू झालेला आहे. यूआयडीएसएसएमटी हा जेएनयूआरएमचा भाग आहे आणि त्या माध्यमातून नगरपालिकांना मोठ्या पध्दतीने निधी उपलब्ध होण्याची संधी उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे हे विधेयक आणलेले आहे. या विधेयकाचा हेतू





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राजेश टोपे...)

अतिशय स्पष्ट आहे. या विधेयकाच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्था, अर्बन लोकल बॉडीज यांचा कारभार पारदर्शक, सक्षम आणि लोकाभिमुख व्हावा हा या विधेयकाचा हेतू आहे. या विधेयकाला पब्लिक डिस्क्लोजर ॲक्ट असेही म्हणता येईल. नगरपालिका आणि महानगरपालिका यांनी स्वत:हून त्यांच्या संदर्भातील माहिती डिस्क्लोज करण्यासंबंधीची तरतूद या विधेयकामध्ये आहे. आज नगरपालिका आणि महानगरपालिका यांचा विचार केला तर ज्या स्वायत्त संस्था आहेत, त्या स्वत: टॅक्स लावतात आणि तो वसूल करतात. हा पब्लिक मनी कसा वापरायचा, कोणत्या विकास कामासाठी तो वापरायचा यासंबंधीचे सर्व अधिकार नगरपालिका आणि महानगरपालिकांना आहेत. हा पब्लिक मनी असल्यामुळे नगरपालिका, महानगरपालिका कशा पध्दतीने काम करीत आहेत, त्यांच्या कोणकोणत्या योजना आहेत, त्यांची बजेट प्रोव्हिजन काय आणि किती आहे, धोरण काय आहे, त्यांच्या जनरल बॉडी मिटींगमध्ये, कमिट्यांमध्ये कोणकोणते निर्णय घेतले गेले या सर्व गोष्टींची माहिती व्हावी, पारदर्शकता वाढावी, एक पब्लिक फ्रेण्डली असा या विधेयकाचा उद्देश आहे. या सर्व गोष्टींची माहिती नगरपालिका आणि महानगरपालिकांनी द्यावी ...

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.........

तर त्यांच्या नोटीस बोर्डवर ते लावू शकतात, जेवढी म्हणून माहिती देण्याचे मार्ग आहेत मग वृत्तपत्रात जाहिरातीच्या माध्यमातून देऊ शकतात, बातमीच्या माध्यमातून देऊ शकतात, इंटरनेट व वेबसाईटच्या माध्यमातून देऊ शकतात. जेवढे माहितीचे मार्ग असतील त्या माध्यमातून माहिती द्यावी हा महत्वाचा विषय या बिलाच्या माध्यमातून याठिकाणी आणलेला आहे. पुढील काळात आपण ज्याला कम्युनिटी पार्टिसिपेशन म्हणू, असे बिल आणण्याचा विचार करीत आहोत. महानगरपालिकांच्या वॉर्डचा एरिया मोठा झालेला आहे. त्यामुळे अतिशय सामान्य लोकांच्या विचारांचा सुध्दा नगरपालिका आणि महानगरपालिकांचे निर्णय घेत असताना विचार व्हावा यादृष्टीने एक एरिया समिती स्थापन करण्याच्या दृष्टीने पुढील काळात विधेयक आणणार आहोत. जेणेकरुन एरिया कमिटीची बैठक होऊन त्यांच्यातील माणसाला वॉर्ड कमिटीमध्ये प्रतिनिधीत्व करता येईल आणि त्यातून या सगळया नगरपालिका आणि महानगरपालिकांना निर्णय घेण्याच्या दृष्टीकोनातून सुकर होऊ शकेल हा प्रामाणिक हेतू आहे. अधिक पारदर्शकता या कारभारामध्ये निर्माण हावी, सामान्य माणसांची, नागरिकांची मते त्यामध्ये घेता यावीत अशा पध्दतीचा पब्लिक फ्रेंडली उद्देश या विधेयकाचा आहे. त्यामुळे जेएनयुआरएमअंतर्गत एमओयू करीत असताना ज्या अटी व शर्ती आहेत त्यामधील हा एक भाग आहे. मुंबई आणि संपूर्ण राज्यामध्ये काही हजार कोटी रुपयांच्या योजना लोकशाही आघाडी शासनाच्या वतीने, नगरविकास विभागाच्या वतीने राबविणार आहोत हे सांगण्यास मला अभिमान वाटतो. महाराष्ट्र हे देशातील प्रथम क्रमांकाचे राज्य आहे, ज्या राज्याने सर्वात अधिक प्रस्ताव जेएनयुआरएमच्या संदर्भात पाठविले आहेत. या संदर्भात अधिक पारदर्शकता आणि चांगले प्रशासन व्हावे, चांगली सेवा देता यावी यासाठी हे विधेयक आणले आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आज मंत्रीमहोदयांचे चित्त बरे दिसत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांचा बुरखा फाडण्याचे काम सन्माननीय राज्यमंत्र्यांनी आपल्या निवेदनात केल्याबद्दल त्यांना मी मनापासून धन्यवाद देतो. पुन्हा एकदा बनवाबनवी करण्याचा आपल्या किर्तीमान सरकारचा उद्देश पुढे चालू ठेवल्याबद्दल पुन्हा एकदा आपले आभार मानतो आणि सरकारच्या प्रवृत्तीबद्दल या सदनाच्या माध्यमातून जनतेपर्यंत अशा प्रकारचे जाहीररित्या बोलल्याबद्दल धन्यवाद देतो. मुळामध्ये जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान कार्यक्रम हा केंद्राचा कार्यक्रम आहे. निधी केंद्राकडून येणार आहे. हजारो कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे अशी दिशाभूल या सदनाची केली गेली. नागरी कमाल जमीन धारणा कायदा रद्द केला नाही तर हा पैसा मिळणार नाही आणि मग मुंबईचे काय होईल? मी माननीय मुख्यमंत्र्यांविरुध्द हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल केला. तो पैसा मिळविण्याकरीता हा सुधारणा कायदा आणला आहे. Repeal Act passed by the House हे कारण दिले. ते फक्त आम्हाला दिले नाही. वृत्तपत्राच्या माध्यमातून ज्या ज्यावेळी पत्रकार परिषद घेतली तेव्हा सांगितले आणि मुंबईच्या जनतेमध्ये हवा निर्माण केली, बिल्डरांच्या स्वार्थाकरीता. 22000 कोटी रुपयांचा विचार झाला. हे पैसे आले नाहीत तर काय होईल मुंबईचे? या सदनाला आणि महाराष्ट्रातील जनतेला जी माहिती नव्हती ते सत्य आपण या विधेयकाच्या माध्यमातून पुढे आणल्याबद्दल व ढोंगी आणि फसवणूक करणाऱ्या मुख्यमंत्र्यांचा बुरखा फाडल्याबद्दल तुम्हाला धन्यवाद देतो.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

का आपण अशी फसवा फसवी करता? आपण जो रिपिल ॲक्ट केला आहे तो परत घ्या. हा कायदा केला नाही तर आपल्याला केंद्राचे जे 22 हजार कोटी मिळणार आहे ते पैसे हा कायदा केला नाही तर मिळणार नाही असे सांगून आपण महाराष्ट्रातील जनतेस फसवलेले आहे. गुडघे टेकण्याची सरकारची जी प्रवृत्ती आहे ती बरोबर नाही. . The Repeal Act has not been passed by the West Bengal Government, the Repeal Act has not been passed by the Andhra Pradesh Government, but still nothing has been done by the Central Government. या सरकारने महाराष्ट्राला मान खाली घालायला लावली आहे परंतु या कायद्याच्या संदर्भात पश्चिम बंगाल सरकारने केंद्र सरकारला सांगितले की, "हा आमच्या राज्याचा प्रश्न आहे. आमच्या राज्यातील गोरगरीब जनतेला घरे मिळाली पाहिजेत व अशा प्रकारे घरे देण्यासाठी आम्हाला अतिरिक्त जमीन गरिबांना उपलब्ध करुन द्यावयाची असल्यामुळे आम्ही हा कायदा रद्द करणार नाही, तुम्ही आम्हाला कसे पैसे देत नाही हे बघतो". असे त्यांनी केंद्र सरकारला ठणकावून सांगितले. परंतु ती धम्मक तुम्ही दाखवली नाही उलट महाराष्ट्रातील जनतेची तुम्ही फसवणूक केलेली आहे. शेतक-यांना न्याय मिळावा, त्यांना कर्जमुक्ती मिळावी यासाठीच आम्ही "देता की जाता" ही घोषणा केलेली आहे. आम्ही अशी घोषणा केली तरी सरकारला त्याचा राग आला नाही. ज्या प्रमाणे केंद्रसरकारचे पश्चिम बंगाल सरकारने ऐकले नाही तसेच आंध्र प्रदेश सरकारने सुध्दा ऐकले नाही. आंध्र प्रदेश मध्ये सुध्दा आपलेच सरकार आहे. आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, "हा कायदा मागे घेतला तर गोरगरिबांना घरे देता येणार नाही". सभापती महोदय, सुदैवाने या विषयावर मी भाषण केले नाही. या कायद्याच्या संदर्भात लोकसभेत जी भाषणे झालेली आहेत त्याचे प्रोसिडींग माझ्याकडे होते. ज्यावेळेस या खात्याचे मंत्री रामजेठमलानी होते त्यावेळे आताचे माननीय पंतप्रधान श्री.मनमोहन सिंग यांनी युएलसी कायद्याच्या बाजूने मत मांडले होते व यासंदर्भातील जे प्रोसिडींग आहे ते सुध्दा माझ्याकडे आहे. त्यामुळे मला कळेनासे झाले आहे की, आपण कोठल्या तोंडाने आता कायद्याच्या विरुध्द बोलत आहात ? कोण कसे, केव्हा, काय बोलेल हे मला कळेनासे झालेले आहे. बेकायदेशीर

....2

श्री. दिवाकर रावते....

गोष्टीवर भाष्य करणे म्हणजे त्याला मान्यताच देणे असा खरा याचा अर्थ आहे. म्हणून मी त्या दिवशी भाष्य केले नाही. या विषयाच्या संदर्भात माझ्याकडे पुष्कळ माहिती होती परंतु मी बोललो नाही. या सदनाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेला असे सांगितले गेले की, केंद्रसरकारच्या कायद्याप्रमाणे आपण कार्यवाही केली नाही तर आपल्याला केंद्रशासनाचे जे 22 हजार कोटी रुपये मिळणार आहेत ते मिळणार नाहीत. या शासनाने खरे म्हणजे दादागिरीच केलेली आहे. सरकारच्या उर्मटपणालाही काही मर्यादा असतात. शिक्षकांचे प्रश्न आमचे सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख देहभान विसरुन मांडत असतात परंतु तसा प्रकार सरकारला करता येत नाही. सरकार हे नेहमी संयमीच असले पाहिजे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

विधानसभा सभागृहात दादा असे म्हणाले की, आमचे बहुमत आहे, आम्ही तो कायदा मंजूर केला, याला उर्मटपणा म्हणतात, सदनाचा अवमान म्हणतात. हा कायदा रद्द केल्यामुळें मुंबईकरांना इतका इतका निधी मिळणार आहे तेव्हा हा कायदा मंजूर करु या. समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांना वाटले सरकार किती चांगले आहे, मुंबईच्या भल्याकरिता चांगला निर्णय घेत आहे. मुंबईसाठी मोठ्या प्रमाणावर निधी मिळणार, आपण सरकारच्या मागे राहिले पाहिजे. परंतु विधानसभा सभागृहात सरकारच्या विरोधात भाषणे झाली. कर्तव्य म्हणून सरकारच्या बाजूने उभे राहिले. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.सुनील तटकरे यांना हे सर्व माहीत असेल कारण ते विधानसभा सभागृहात असतात. त्यांनी या विषयावरील भाषणे ऐकली असतील. ते या विभागाचे राज्य मंत्री होते. सरकारने जी फसवाफसवी केलेली आहे ती मला सांगावी लागेल. सरकारचे काय चालले आहे ते मला सांगावे लागेल.

सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी विधेयक मांडताना या विधेयकाचा उद्देश सांगताता "पारदर्शकता" असे भाष्य केले. म्हणून मघाशी मी मंत्रिमहोदयांना ऑफ दी रेकॉर्ड विचारले. त्यांनी विधेयक मांडताना सांगितले की, महानगरपालिका स्वायत्त आहे. ती जनतेच्या करातून निधी उभारत असते. यातून मोठमोठी कामे होत असतात त्यामध्ये पारदर्शकता असावी. स्टॅन्डींग कमिटी जी काही बिले मंजूर करते, ठराव करते ते लोकांना कळावे.म्हणजे महानगरपालिकेच्या निधी संदर्भात पारदर्शकता असावी असे आपल्या भाषणातून प्रतीत झालेले आहे. आपणास खात्री वाटत नसेल तर ते प्रोसिडींग्ज काढून वाचावे. Preamble of the Bill which you have placed before the House. मुंबई महानगरपलिकेने आपल्या ताकदीच्या जोरावर 600 -600 कोटीचे प्रकल्प स्टॅन्डींग कमिटीसमोर आणून मंजूर केले. मी स्टॅन्डींग कमिटीचा चेअरमन असताना महानगरपलिकेच्या भ्रष्टाचाराची श्वेतपत्रिका काढली होती. त्यावेळी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त श्री.तिनईकर मला म्हणाले, "तुम्हाला असे करता येणार नाही." मी त्यांना सांगितले, " असे का करता येणार नाही ". ही हिम्मत मी ठेवली होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

सभापती महोदय, या विधेयकाच्या पहिल्या पानावर मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये सुधारणा करण्याकरिता विधेयक असे हेडींग आहे. नंतरच्या पानावर मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये सुधारणा यामध्ये जी माहिती दिलेली आहेत तीच माहिती पुढच्या पानावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 यामध्ये सुधारणा या शीर्षकाच्या खाली दिलेली आहे. हीच माहिती वेगवेगळ्या हेडींगखाली दिलेली आहे. मला वाटले की, पुन्हा पुन्हा काय छापले आहे. पाने छापण्यामध्ये की चूक झाली की हे पुनर्मद्रित झाले आहे की बायडींगमध्ये चूक झाली आहे. परंतु मुंबई प्रांतिक महानगर अधिनियम 1949 यामध्ये सुधारणा, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम 1948 यामध्ये सुधारणा याचा अर्थ काय ? याचा अर्थ एकच आहे की, जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान कार्यक्रम ही केंद्राने पुरस्कृत केलेली योजना राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेतून मिळणारा निधी संपूर्ण महाराष्ट्रात, मुंबईत नाही त्यामध्ये मुंबई शहर, नागपूर शहर आणि जिल्हापरिषदेच्या माध्यमातून पंचायत समित्यांच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचणार आहेत. केंद्राकडून करोडो रुपये येणार आहेत. या करोडो रुपयांची जी काही टेन्डर्स निघतील त्यामध्ये पारदर्शकता असली पाहिजे. कामांबाबत लोकांना माहिती झाली पाहिजे अशी या कायद्यात तरतूद आहे. या योजनेंतर्गत मिळणारा निधी संपूर्ण महाराष्ट्राकरिता आहे. सर्व महानगरपालिका, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा यांच्यासाठी आहे ही चांगली बाब आहे. महाराष्ट्राच्या विकासासाठी 23 हजार कोटी रुपये मिळणार आहेत ही चांगली बाब आहे. या निधीतून कोणकोणती कामे होणार आहेत हे मंत्रिमहोदयांनी सांगितले असते तर आम्हाला आनंद झ ाला असता. शहरामध्ये कोणती कामे होणार आहेत, नगरपालिकांमध्ये कोणती कामे होणार आहेत, ग्रामीण भागांमध्ये कोणती कामे होणार आहेत,

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

आणि मुंबई सारख्या किंवा औरंगाबाद सारख्या मोठया महापालिकेमधील मलनि:सारणाच्या, पाणी पुरवठयाच्या योजना राबविण्यासाठी आर्थिक तरतूद नाही. या महापालिकांसोबत राज्यातील अनेक मोठया महापालिकांमधील या योजना राबविण्याच्या दृष्टीने आर्थिक तरतूद नसल्यामुळे त्या राबविता येत नाहीत. या योजनांसाठी मोठया प्रमाणात निधी लागणार आहे, परंतु तो उपलब्ध करुन दिला जात नाही. ही जी परिस्थिती निर्माण झालेली आहे, ती अतिशय गंभीर आहे. आपण या माध्यमातून निधी कशा पध्दतीने देणार आहात, यामध्ये अटी काय आहेत, कोणती कामे घेणार आहात, हे यामधून आपण सांगितलेले नाही. याठिकाणी आपण मुंबईसाठी आणि महाराष्ट्रासाठी पैसा येणार नाही म्हणून आपण युएलसीचा ठराव मंजूर केला. परंतु या माध्यमातून आपण मुंबईतील आणि महाराष्ट्रातील जनतेची बनवाबनवी व दिशाभूल केलेली आहे. आज येथील प्रत्येक प्रकरणांमध्ये आपण फसवणूक करीत आहात, हे दुर्दैवाने याठिकाणी मला नमूद करावेसे वाटते. या कायद्याला आमचा विरोध नाही, परंतु आपल्या प्रवृत्तीस आमचा निश्चितपणे विरोध आहे. आपण याठिकाणी सतत आणि सातत्याने फसवणूक करीत आहात. यातून आपण काय साध्य करणार आहात ? याठिकाणी आम्ही एकदा, दोनदा, तिनदा ऐकू परंतु चौथ्यांदा जनताच आपले ऐकणार नाही, हे आपण लक्षात घ्यावे. आपण सातत्याने याठिकाणी जी फसवणूक करीत आहात, ती चालणार नाही. 23 हजार कोटी रुपये मुंबईकरिता मिळणार म्हणून आपण आमची व पर्यायाने जनतेची फसवणूक केली आणि बळाच्या आधारे व आग्रहाने सगळे नियम बाजूला ठेऊन युएलसीचा ठराव मंजूर करुन घेतला. त्यावेळी आपण ज्या भावना व्यक्त केल्या, त्या भावनांचा व प्रवृत्तीचा मी खेद व्यक्त करतो. केंद्र सरकारच्या पावलावर पाऊल ठेऊन जनतेची फसवाफसवी करणारे सरकार या राज्यामध्ये अस्तित्वात आहे, असे मी म्हणेन. वेस्ट बेंगॉलने केंद्र सरकारला सांगितले की, देता का जाता. त्यावेळी केंद्राने सांगितले की, देतो, आम्हाला दिल्याशिवाय चालणार नाही. कारण, सत्तेची लालच आहे. परंतु या माध्यमातून पिचक्या पाठीचे सरकार आपल्या राज्यास वाकवण्याचे काम करीत आहे. त्याच प्रमाणे राज्य सरकारही महाराष्ट्रातील जनतेला विधीमंडळातील बहुमताच्या आधारे वाकविण्याचे काम करीत आहे, हेही मी यानिमित्ताने सांगू इच्छितो, एवढे बोलून मी येथेच थांबतो.

----

(..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 78-महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) विधेयकाचे मी स्वागत करण्यासाठी व त्यास पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुन:रुत्थान कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्रात निधी येणार आहे. या माध्यमातून सर्वात जास्त प्रस्ताव महाराष्ट्र राज्यातून गेलेले आहेत. मुंबई महापालिकांपासून ते "क" वर्ग नगरपरिषदापर्यंत किंवा नगरपंचायतीपर्यंत जास्तीत जास्त निधी कसा मिळेल यासंदर्भात काळजी शासनाने घेतली पाहिजे. या योजनेच्या माध्यमातून जर निधी मिळवायचा असेल तर त्यांनी जी अट घातलेली आहे, ती अट मंजूर केली पाहिजे. मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगेन की, ज्या नगरपालिकांनी किंवा महानगरपालिकांनी याबातीतील प्रस्ताव दिले नसतील तर आपण याबाबतीत भूमिका घेऊन तसे प्रस्ताव पाठवण्यास त्यांना सांगावे. सर्वात जास्त लोकसंख्या नागरी भागामध्ये आहे. येत्या 10 वर्षांमध्ये 50 टक्क्यांपर्यंत किंवा त्यापेक्षाही जास्त लोकसंख्या नागरी भागत राहील. पैशाशिवाय विकास नाही, ही एक वस्तुस्थिती आहे. म्हणून आपल्याला चार कायद्यांमध्ये व अधिनियमांमध्ये बदल करावे लागेल. यानिमित्ताने मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगेन की, महाराष्ट्राचा एक कायदा करा, मुंबई महापालिकेसाठी वेगळा कायदा करा आणि नागपूर महापालिकेसाठी वेगळा कायदा करा आणि उर्वरित ज्या महापालिका आहेत त्यांच्यासाठीही वेगळा कायदा करा. यासाठी आपल्याला तीन सुधारणा कराव्या लागल्या. मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम 1986 (अ), मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम 1960 (अ) मध्ये व नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम कलम 1956 (अ) या तीन सुधारणा केवळ तीन वेगळे कायदे आहेत, म्हणून त्यात सुधारणा कराव्या लागल्या. मध्यंतरी असा प्रयत्न होता की, संपूर्ण राज्यांमध्ये एकच कायदा महानगरपालिकांसाठी असेल. त्यामुळे यासंदर्भातही आपण विचार करावा. महाराष्ट्र नगरपरिषदा आणि नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम 1965 च्या कलम 87 (अ) अशी सगळी नवीन कलमं आपल्याला टाकावी लागली. आपण म्हणालात की, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुन:रुत्थान कार्यक्रमांतर्गत ही अट आहे म्हणून आम्ही पारदर्शकता आणतो अशातला भाग नाही. महाराष्ट्र राज्य हे प्रथम क्रमांकाचे राज्य असले पाहिजे. पारदर्शकता पहायची असेल तर ती आपल्याला शासनाच्या माध्यमातून मिळेल.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी........

अट म्हणून आम्ही स्वीकारतो, हा त्या पाठीमागचा उद्देश नसावा. ही जी पारदर्शकता आणत आहात ती फार व्यापक पध्दतीने आणत आहात. माहिती प्रकट करण्याच्या पध्दतीमध्ये वृत्तपत्र आहे, इंटरनेट आहे, सूचना फलक आहेत, मंत्रीमहोदय सांगत होते की, पारदर्शकता, 'पब्लिक फ्रेंडली' असा शब्दप्रयोग त्यांनी त्यांच्या भाषणात केला, लोकांना जे हवे असेल त्याला ते देऊ. टेंडर कोणाला दिले, किती अबाऊ दिले, किती लोअेस्ट दिले, कितीतरी माहिती या माध्यमातून आपल्याला मिळू शकेल. कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन व परवानगी यातून मिळणारी फी, वसूल न केला गेलेला कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन व परवानगी यातून मिळणारी फी आणि वसूल न करण्यामागची कारणे, राज्य शासनाने वसूल केलेल्या करांचा नगरपरिषदेकडे हस्तांतरित केलेला हिस्सा आणि नगरपरिषदेला मिळालेली अनुदाने, नगरपरिषदेला नेमून दिलेल्या किंवा तिच्याकडे सोपवलेल्या योजना, प्रकल्प व आराखडे यांच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने दिलेली अनुदाने, त्यांचे स्वरुप आणि विनियोगाची मर्यादा अशा सर्व प्रकारची माहिती या माध्यमातून आपल्याला मिळणार आहे, यादृष्टीने हे अतिशय चांगल्या पध्दतीचे विधेयक आहे.

सभापती महोदय, 'पब्लिक डिसक्लोजर' हा शब्द देखील मंत्रीमहोदयांनी वापरला होता. या विधेयकामध्ये विरोध करावा असा एकही शब्द नाही. यापेक्षा अधिक काय सुधारणा व्हावयास पाहिजे यासंदर्भातील विचार आपल्याला करायला हवा. पब्लिक पार्टिसिपेशन, जनतेचा सहभाग कसा वाढेल, स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका, नगरपालिका, नगर पंचायती, यांच्याबाबतीतील जनतेचा विश्वास कसा वाढेल, यादृष्टीकोनातून पारदर्शकता महत्वाची आहे. मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करीन कारण त्यांनी अतिशय चांगली सुधारणा या ठिकाणी या विधेयकाच्या माध्यमातून आणली आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, या चार कायद्यात बदल करीत असतांना पुढच्या तीन महिन्यानंतर होणा-या अधिवेशनामध्ये विधानसभेत, विधानपरिषदेत किती महापालिकांसाठी किती निधी आणला, अ, ब, क महापालिकांसाठी किती निधी आणला, नगरपंचायतींसाठी किती निधी आणला याची माहिती मिळाली पाहिजे. पैशांशिवाय विकास होत नाही, हजारो कोटी रुपयांचा निधी या माध्यमातून केंद्र शासनाकडून मिळणार आहे. सर्वसामान्य माणसाच्या जीवनाकडे बघितले

....3........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.........

तर महापालिका हद्दीतील, नगरपालिका हद्दीतील झोपडपट्ट्यांमध्ये राहणारा असेल, दुर्बल घटकातील, उपेक्षित, दलित, वंचित, रंजला-गांजलेला, शेवटचा माणूस असेल दरडोई उत्पन्न किती खर्च करतो आहे, हे करीत असतांना ज्या प्रभागांमध्ये विकास झाला नाही, ज्या प्रभागांमध्ये अनुसूचित जाती-जमातींचे लोक राहतात त्यांना या योजनांचा किती लाभ झाला, हे पाहणे देखील अत्यंत महत्वाचे आहे. सामाजिक न्याय लक्षात ठेवून आलेली रक्कम वेगवेगळया महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतींना देत असतांना त्यातील पारदर्शकता आणि उपयुक्तता या दोन्ही बाबी आपण पाहिल्या तर फार चांगल्या पध्दतीने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान कार्यक्रमाची महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकाची अंमलबजावणी झाली असे होईल आणि याचा महाराष्ट्राला निश्चित लाभ मिळेल, याचे क्रेडिट निश्चित मिळेल.

सभापती महोदय, या सर्व पार्श्वभूमीवर मी सन 2007 चे विधानसभा विधेयक क्रमांक 78 ला पाठिंबा व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------------

....3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता सन 2007 चे विधानसभा विधेयक क्रमांक 78 यावर सभागृहात चर्चा सुरु आहे व त्यामध्ये सहभागी होण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जी बोचरी टीका केली ती विधेयकाच्या तरतुदींबद्दल केली नाही, विधेयकाची जी उद्दिष्टे सांगितली गेली आहेत, त्याबद्दल केली आहे. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान कार्यक्रम ही केंद्राने पुरस्कृत केलेली योजना, राज्यात राबविण्यात येत आहे. उक्त योजनेच्या शर्तीनुसार, राज्य शासनाने, इतर गोष्टींबरोबरच, महानगरपालिका व नगरपरिषदा यांच्या कामामध्ये, खात्रीपूर्वक पारदर्शकता यावी आणि नागरिकांना व करदात्यांना त्याबाबतची माहिती व्हावी म्हणून महानगरपालिकांनी व नगरपरिषदांची त्यांच्या संबंधीच्या माहितीचे सार्वजनिक प्रकटीकरण करण्याबाबत एखादा कायदा करणे आवश्यक आहे, ही भूमिका या विधेयकाच्या उद्दिष्टांमधून मांडली गेली आहे. त्यामुळे कालपरवा आपण जो अर्बन लॅण्ड सिलिंगचा कायदा पास केला त्याचा संदर्भ घेऊन ही टीका सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी केली आहे.

सभापती महोदय, अर्बन लॅण्ड सिलिंगचा कायदा सन 1973 साली स्वर्गीय इंदिरा गांधी यांनी पंडित जवाहरलाल नेहरु यांची समाजवादी विचारधारा घेऊन आणला, कारण गोरगरीबांना, पददलितांना अग्रक्रम मिळावा. आपली उद्दिष्टे काय आहेत तेच मला कळत नाही.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .........

मग हिम्मत होती तर मुंबई शहर सोडून करावयाचे होते. मुंबई शहरातील एका विशिष्ट परिस्थितीमध्ये त्या कायद्याला विरोध केला जात होता. पण दुर्दैवाने या कायद्याची अंमलबजावणी मुंबई शहरातच प्राबल्याने करायची आहे. कारण मुंबईतील भुखंडांवर सर्वांचे लक्ष आहे. थोडेफार लक्ष पुण्यातील भुखंडांवर असेल. इतर शहरांच्यासंदर्भात या अडचणी येत नाहीत. कारण मुंबई शहराला लोकसंख्या वाढीमुळे पुढच्या काळात जे ताणतणाव सहन करावे लागणार आहेत त्याचा विचार करुन त्या कायद्याला विरोध करण्यात आला होता. कायदा वाईट होता म्हणून विरोध करण्यात आला नाही. त्यातून उद्या जे निर्माण होईल ते मुंबई शहराला सोसेल काय ? साधा पाणी पुरवठा करता येईल काय या भूमिकेतून विरोध केला गेला. आज तुम्ही हा कायदा आणतांना सांगता की, राज्य शासनाला केंद्र शासनाकडून जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान कार्यक्रमाअंतर्गत निधी मिळवायचा आहे. म्हणून आम्ही या कायद्यात बदल करीत आहोत. तुम्ही नक्की कशासाठी या कायद्यात बदल करत आहात ? मग तुम्ही नागरी कमाल जमीन धारणा कायदा का रद्द केला. जर ते करायचेच होते तर सांगायचे होत की, आंध्र पदेश, कलकत्ता, बंगाल प्रमाणे आम्ही सुध्दा हा कायदा रद्द करणार नाही. तुम्हाला निधी द्यायचा असेल तर द्या. दोन लाख कोटी रुपयांवर पाणी सोडून दोन हजार कोटींसाठी आपण कायदा बदलला. ही प्रॉपर्टी दोन लाख कोटी रुपयांची आहे. दोन हजार कोटींसाठी आपण केंद्र शासनापुढे गुढगे टेकलेत. सभापती महोदय, या कायद्यातील तरतुदी स्वागतार्ह आहेत. त्या तरतुदी बद्दल कोणी बोलले नाही. तुम्ही ज्या पद्धतीने बुरखा फाडला, तुम्हीच फाडलात, स्वत:च स्वत:ची वस्त्र फेडलीत, बर झाल. लोकांना कळू तर द्या की तुम्ही कसे आहात. यासाठी मराठी भाषेत कोणता शब्द वापरावा, हे मला कळत नाही. मी वापरलेला शब्द असंसदीय होईल की काय, अशा भितीपोटी थांबाव लागत. आणखी मला असे सांगावेसे वाटते की, आपण मुंबई महानगरपालिकेच्या संदर्भात हा कायदा आणत आहात. माझा आपल्याला प्रश्न आहे की, इतर महानगरपालिकांच्या संदर्भात आपण काय करणार आहात ? मी माननीय मंत्री महोदयांना दिनांक 1 ऑक्टोबर, 2007 रोजी पत्र पाठविले. मी अत्यंत खेदाने सांगतो की, पिंपरी-चिंचवड या औद्योगिक शहरातील भूखंड उद्योगपतींनी लाटले. एम.आय.डी.सी. चे भूखंड घेतांना त्या माणसाला महाराष्ट्रातील 15 वर्षाचा वास्तव्याचा पुरावा द्यावा लागतो. त्यांनी

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .........

सर्व बनावट पुरावे सादर केले. जागा लाटल्या आणि आता त्यांनी त्या जागा विकायला काढलेल्या आहेत. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे 1982 ते 2004 पर्यंतचे लेखापरिक्षण झालेले नाही. तुम्ही इंटरनेटवर माहिती देता की बघा आम्ही किती पारदर्शक आहोत. मी माननीय मंत्री महोदयांना दिनांक 1 ऑक्टोबर, 2007 रोजी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या लेखापरीक्षणासंदर्भात पत्र पाठविले. सन 1982 ते 2004 या कालावधीतील प्रलंबित आक्षेपांची संख्या 34,018 इतकी आहे. 1982 ते 2004 या कालावधीतील प्रलंबित अहवालांची संख्या 1,781 इतकी आहे आणि 1982 ते 2004 या कालावधीत कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे आक्षेपाधीन रक्कम रुपये 116 कोटी 65 लाख 34 हजार 16 रुपये आहे. 116 कोटी रुपयांचे ऑडिट आजतागायत झालेले नाही. महानगरपालिका कोणाच्या ताब्यात आहे, हे महत्वाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी साहेब आपल्याला आश्चर्य वाटेल की, कागदपत्रे गहाळ झालेली आहेत, म्हणून ऑडिट होत नाही. ते अधिकारी कोण आहेत, त्यांच्यावर शासनाने काय कारवाई केली ? मी दिनांक 1 ऑक्टोबर, 2007 रोजी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय नगर विकास राज्यमंत्री श्री.राजेश टोपे व इतर सर्व संबंधितांना पत्र पाठविले होते. आपण चौकशी सुरु केली काय ? आपल्याला पारदर्शी व्हावयाचे आहे. आपण नवीन कायदे तयार करतो. हा पारदर्शीपणा सर्वांसाठी असला पाहिजे. राज्यातील कायदे व नियमांचे पालन सर्वांनी करावे, ही अपेक्षा आहे. या पूर्वी मी एक गोष्ट मांडली होती की, आपण कशा पद्धतीने कायदे करतो. आपण मुंबई शहराचा विचार केलात. काल परवा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी एका विशिष्ट मुद्यावर कायद्यासंदर्भात भाष्य केले आणि आम्ही सभात्याग केला. त्या कायद्याची चिरफाड करतांना आम्हाला बरेच काही सांगता आले असते.

यानंतर कु.जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

तुम्ही विसरताय सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी माझ्या प्रश्नाला उत्तर देतांना उल्लेख केला की, आमचे सरकार आता पारदर्शी होत आहे. तुम्ही पारदर्शी होताय ना ? अभिलेख देताय ना ? मुंबईच्या गोरेगावमधील रॉयल पार्कचे काय चालले आहे ? मुंबईच्या हिरानंदानीचे काय चालले आहे ? त्याबाबत माहिती सांगावी. तसेच काल परवा माननीय उप मुख्यमंत्र्यांनी एका मुद्यावर उत्तर देतांना सांगितले की, आम्हाला प्रोसिडींग मिळाल्यानंतर आम्ही कारवाई सुरु करतो. गेल्या अधिवेशनात मी रॉयल पार्कविषयी मुद्दा मांडला होता, त्याचे प्रोसिडिंग अजून मिळाले नाही का ? किती पारदर्शी आणि गतिमान सरकार आहे आपले ? रॉयल पार्क आरे कॉलनीमध्ये जो धुडगूस घालत आहे त्याबद्दल टाईम्स ऑफ इंडियामध्ये प्रचंड मोठया जाहिराती येत आहेत. आमच्या मुंबईची हिरवळ गायब होत आहे त्यात कोणाकोणाचे हात गुंतले असतील? याचा खुलासा होणे आवश्यक आहे. आमच्या शिवसेनाप्रमुखांनी रॉयल पार्कची जागा गोल्फसाठी सुंदर हिरवळ व्हावी, लॉन्स तयार व्हावेत. आपल्या आंध्रमध्ये ज्याप्रमाणे रामोजी फिल्मसिटी आहे त्यासारखे मुंबईतही एक सुंदर हिरवळ तयार व्हावी, या भावनेने दिले होते. परंतु त्या जागेमध्ये प्रचंड मोठमोठया इमारती उभ्या राहत आहेत.

श्री.मधुकर चव्हाण : आता त्याला " गोविंद स्वरुप " असे नाव द्या.

श्री.अरविंद सावंत : होय, त्याला आता "गोविंद स्वरुप" असे नाव देणे योग्य होईल, अतिशय चांगली सूचना आहे. त्या ठिकाणी हिरवळ, लॉन्स तयार होऊन तेथे मुंबईकरांनी तसेच महाराष्ट्रातील इतर ठिकाणच्या लोकांनी पर्यटनासाठी यावे, याकरिता ती जमीन देण्यात आली होती. आपण म्हणाल की, ती जमीन तुम्ही दिली होती परंतु त्यावेळी आमचे उद्दिष्ट तसे नव्हते. आता तेथे अम्बी-व्हॅली सारखे नवीन इमारतींचे जंगल झाले आहे. माननीय मंत्री श्री.राजेश टोपे यांना माझी विनंती आहे की, आपण जरा रॉयल पार्क येथे जाऊन बघा की, तेथील दरवाजा, तलाव बघा, तेथे किती इमारती, बंगले झालेले आहेत, त्यांची एंट्री कशी आहे ते पहा. त्या कोणाच्या जमिनी आहेत ? कोण त्यांना परवानगी देत आहे ? ती परवानगी तर आपण 33/7 खाली काढून घेतली होती ना ? म्हणून जे पाहिजे ते, मनाला येईल तसे वागताय. तुम्हाला मुंबई

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

महानगरपालिकेची पारदर्शकता पाहिजे आपण एम.एम.आर.डी.ए. सारखी ऑथॉरिटी आमच्या बोडक्यावर आणून ठेवली, ते मनाला येईल ते करतात, शिव्या आम्ही खातो. सर्वसामान्य माणसाला घर घेतांना काही कळत नाही की, आपल्या बिल्डरने सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे का ? त्याला महानगरपालिकेने इमारत बांधण्याची परवानगी दिलेली आहे का ? सर्वसामान्य माणसाला आपल्या स्वत:च्या घराची चावी मिळाली, की त्याला खूप आनंद होतो आणि त्या आनंदात तो या गोष्टींचा विचार करीत नाही. दुर्देवाने अशी परिस्थिती आज मुंबईत दिसून येत आहे. ही माणसे ज्या ज्या पध्दतीने दादागिरी करीत आहेत. बिल्डर्सची नामावली किंवा ती नावे कायद्यात कुठेही नाही. पण दुर्देवाने अदृश्य स्वरुपात तीच एक लॉबी वावरत असते. तुमच्याच नेत्यांच्या सामाजिक विचारांचा पराभव तुमच्या प्रत्येक वाक्यागणिक, वर्तनागणिक दिसून येत असतो. हा कायदा निश्चित चांगली आहे. पण हा पारदर्शकपणा आम्हाला व आमच्याचसाठी दाखविण्यात येतो. आम्ही अशी अपेक्षा करतो की, पिंपरी चिंचवडच्या संदर्भात लवकरात लवकर चौकशी होऊन तेथील भूखंड कसे विकले गेले ? हे शोधून काढले पाहिजे. माननीय मंत्री श्री.राजेश टोपे आपण एकदा श्री.अर्जून खोतकरांकडे आले होते,त्यावेळी आपण पाहिले की, त्यांच्या घरामागे डोंगर जे आहेत. करवतीने सुळका कापावा तसे बेफाट कापत असल्याचे आपल्याला दिसले. सरकारच्या जी मुलभूत 10 टक्के घरांच्या सुविधा आहेत, त्याचा अर्थ काय आहे मुलभूत जी काही आपण उभारणी कराल त्या ठिकाणच्या इमारतीमध्ये 10 टक्के सदनिका माननीय मुंख्यमंत्र्यांच्या स्वेच्छा अधिकाराखाली वितरित करण्यात येतील ते त्यांनी ओळखून काय करावे ? समजा या 10 टक्के सदनिका जर 80 असतील तर अशा सदनिका एक स्वतंत्र झोपडपट्टी आम्ही एक टॉवर सर्व सोयीसुविधांच्या तरतूदीसह म्हाडाच्या दर्जाच्या प्राधिकरणाच्या अखत्यारित बांधकामाकरिता सोपविले. परंतु असेसमेंट टॅक्स दोघांनाही सारखा. अशी लबाडी ही माणसे करतात. मी एकदा तत्कालीन जिल्हाधिका-यांना भेटलो आणि म्हणालो साहेब सुरुंग लावतो तोडतो, फोडतो, काय चाललय काय ? ते म्हणाले की, काय करु तुम्हाला ऑफ दि रेकॉर्ड सांगतो, की यात सगळयांचेच हात कापले आहेत. वेदना होतात, हे सर्व पाहिल्यानंतर की, किती बेमुर्वतखोरपणे त्यांच्या मनाला येईल तसे करतात. एक सुंदर गार्डन

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ...

तयार करावयाचे आणि पूर्ण संकुलातील इमारतींना ते एकच गार्डन दाखवून टी.डी.आर.,एफ.एस.आय. मिळविण्याचे काम हे लबाड लोक करीत असतात. या इमारतीची जाहिरात करतांना एक गार्डन दाखवितात आणि दुस-या इमारतीतील घरांची जाहिरात करतांना देखील तेच गार्डन दाखवायचे अशा प्रकारे संपूर्ण संकुलातील इमारतींची जाहिरात करतांना एकच गार्डन दाखवून सोयी सुविधा, सवलती मिळविण्याचे काम हे बिल्डर्स करतात. अशा प्रकारे ते सरकारची देखील फसवणूक करीत असतात.

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .....

सरकारची फसवणूक होते असे नाही. कारण सरकार डोळे मिटून, हात दाबून, हातात हात मिळवून हा सर्व कारभार करु देत आहे. यामध्ये पारदर्शीपणा आला पाहिजे. या सर्व महानगरपालिकेचे ऑडीट रिपोर्टसुध्दा जनतेसमोर आले पाहिजेत, अशा प्रकारची अपेक्षा मी व्यक्त करतो. या कायद्याचे उद्दिष्ट नक्कीच चांगले आहे, असे मी समजतो. खऱ्या अर्थाने त्याची अंमलबजावणी व्हावी, अशा प्रकारची अपेक्षा करुन मी माझे विचार भाषण येथेच थांबवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक आणलेले आहे.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान कार्यक्रमांतर्गत जर काही शर्ती नसत्या तर मला वाटते की, हे विधेयक आले नसते. कारण महाराष्ट्रात 22 महानगरपालिका आहेत. विधेयकामध्ये महानगरपालिकेच्या पारदर्शकतेसंबंधी म्हटलेले आहे. मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, महानगरपालिकेच्या पारदर्शकतेसंबंधी बोलावयाचे असेल तर 300 कोटीपासून 1000 कोटीपर्यत विविध महानगरपालिकांचा एका वर्षाचा टर्नओव्हर आहे. यापूर्वी त्यांच्या ऑडीटचा प्रश्न का उपस्थित केला नाही? ज्यावेळेला जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान कार्यक्रमांतर्गत शर्ती घातल्या गेल्या, त्यांच्याकडून विकासाकरिता पैसे येत असल्याने हे केले जात आहे. विकास हवा आहे परंतु महानगरपालिकांकडे पैसे नाहीत. महानगरपालिका लोकसंख्येच्या दृष्टीने वाढत आहेत, तेथे विकास होत नाही, निरनिराळे प्रकल्प राबविले जात नाही. तेथे पैसे पाहिजेत, त्यामुळे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान कार्यक्रमांतर्गत 23 हजार कोटी रुपये आणत आहात, ही अतिशय चांगली व स्वागतार्ह बाब आहे. परंतू यापूर्वीदेखील महानगरपालिकांमध्ये जो कारभार होत होता, त्याबाबत मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, किती महानगरपालिकांचे ऑडीट रिपोर्ट व ताळेबंद सरकारकडे सादर केलेले आहेत ? माझ्या माहितीप्रमाणे 3-3, 5-5, 10-10 वर्षे ऑडीट रिपोर्ट, लेखाजोखा शासनाकडे सादर केलेला नाही. जनतेचा हजारो कोटी रुपयाचा पैसा कसा खर्च केला, याबाबतची माहिती जनतेला मिळाली नाही तर जनतेमधील विश्वार्हता जाईल. आपण पारदर्शकता हवी असे म्हणतो आणि दुसऱ्या बाजूला आपली विश्वार्हता राहात नाही असे प्रकार दिसून येत आहेत. त्यामुळे या निमित्ताने माझी मागणी आहे की, ज्या महानगरपालिकेमधून ऑडीट रिपोर्ट आलेले नाहीत, निरनिराळया खात्यांचे रिपोर्ट आलेले नाहीत त्याची माहिती सरकार घेणार का ? कारण त्यांनी अनाधिकृतपणे, कोणताही ठराव पास न करता देखील करोडो रुपये खर्च केलेले आहेत, तेथे अनेक प्रकारच्या त्रुटी आहे, अनेक

.....3

श्री.संजय केळकर .....

प्रकारची अनियमितता झालेली आहे, त्याची माहिती सरकार घेणार का ? सरकार ऑडीट रिपोर्टसंबंधी आग्रही राहणार का ? महानगरपालिकेचे ऑडीट रिपोर्ट आपण ठराविक कालावधीत मागविणार का ? हे देखील या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान कार्यक्रमातील शर्तीमुळे आपण हे विधेयक आणले असले तरी याचा उपयोग होणार आहे. हे निश्चित चांगले आहे. आपण सुनावणीसंबंधी सांगितले आहे. ज्यावेळी अशा प्रकारचे प्रकल्प येतात, तेव्हा जनतेचा सहभाग अपेक्षित असतो. आपण या विधेयकातील तरतूदीद्वारे वर्तमानपत्र, इंटरनेट, नोटीसीद्वारे माहिती देणार आहात. पारदर्शकता केवळ माहिती देण्याकरिता नको आहे. ग्रामपंचायतीमध्ये जशी ग्रामसभा घेतली जाते, ग्रामस्थांचा त्यामध्ये सहभाग असतो व विधायक सूचना केल्या जातात, तसे केले पाहिजे. काही योजना मंजूर होतात, पैसे येतात व योजना चालू होण्याची वेळ येते तेव्हा काही वेळेला त्या त्या महानगरपालिका क्षेत्रातील जागरुक नागरीक कोर्टामध्ये रिट पिटीशन दाखल करतात. त्याची सुनावणी होते व ते प्रकल्प देखील प्रलंबित होतात. शासनाने ठाणे येथे सॅटीस प्रकल्प आणला आहे. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान कार्यक्रमांतर्गत आपण पैसेही आणले. परंतु तेथील जागरुक नागरिकांनी कोर्टामध्ये हया प्रकल्पाबाबत दावे दाखल केल्यामुळे व सुनावणी सुरु असल्याने हा प्रकल्प 18 महिन्याच्या कालावधीत पूर्ण् होणार नाही. वाहतुकीची कोंडी दूर करण्याकरिता हा प्रकल्प आहे. या प्रकल्पाचा कालावधी 18 महिने असला तो किती महिने रखडणार आहे, हे प्रश्नचिन्ह आहे. माझी सूचना आहे की, जनतेच्या सहभागासाठी आपण काही योजना आखलेली आहे का ? माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या भाषणात वार्ड समितीबाबत उल्लेख केला आहे.

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ MMP/ D/ प्रथम श्री. गागरे... 12:15

श्री. संजय केळकर.....

तज्ज्ञ व्यक्तिंनी केलेल्या सूचनेचा उपयोग आपण करुन घेतला तर अनेक प्रकरणामध्ये जी कोर्टबाजी होते, ती होणार नाही. प्रकल्प राबविताना जनतेचा सहभाग आपण घेतला तर विकासाच्या दृष्टीने त्याचा आपल्याला फायदा होईल. ऑडिट रिपोर्ट संबंधी काय कार्यवाही करण्यात आली आहे, जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी जनतेचा सहभाग घेऊन पारदर्शकता आणण्यासाठी कोणत्या प्रकारची उपाययोजना केली जाणार आहे, याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी. या विधेयकामध्ये विकासाच्या दृष्टीने अनेक तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. फक्त यामध्ये काही तरतुदी आहेत, त्या आपण दूर करुन हे विधेयक आणावे. एवढे मला यानिमित्ताने आपणास सांगावयाचे आहे. धन्यवाद.

.................

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी. देशमुख ( अमरावती विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, माननीय नागरी विकास मंत्र्यांनी वि.स.वि. क्रमांक 78 महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदांच्या संदर्भातील हे विधेयक मांडले आहे, त्यासंदर्भात बोलण्याकरिता मी येथे उभा आहे.

या राज्यातील निरनिराळया चार कायद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी हे विधेयक शासनाने आणले आहे. या विधेयकातील तरतुदी या स्वागतार्ह अशा आहेत. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय ग्रामीण पुनरुत्थान योजना ही केंद्र शासनाने पुरस्कृत केलेली योजना आहे. त्या योजनेने यासंदर्भात काही मार्गदर्शक तत्वे मांडली. त्या अनुषंगाने केवळ निधी मिळविण्यासाठी या विधेयकामध्ये तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. मतांचे सार्वजनिक प्रकटीकरण करणे हे लोकशाहीमधील एक महत्वाचे अंग आहे. त्यामुळे डावपेच, कटकारस्थान होऊ शकणार नाही. जनतेसमोर आपण उजळपणे गेले पाहिजे ही जी भावना आहे, ती यामुळे संरक्षित होते. मी या विधेयकातील एका तरतुदीला दुरुस्ती सुचविणार होतो. या विधेयकाचे जे स्वरुप आहे, ते अतिशय चांगले आहे यामध्ये काहीच वाद नाही. मतांचे सार्वजनिक प्रकटीकरण करण्याचे बंधन आपण संस्थांवर टाकतो तसेच बंधन या योजनेच्या बाबतीत शासनाने स्वत:हून आपणावर घेतले पाहिजे. माननीय मंत्री महोदय या सर्व मुद्दयांचा समावेश त्यांच्या भाषणामध्ये करतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, मला आपणास विचारावयाचे आहे की, ही योजना केंद्र शासनाने का पाठविली आहे, या योजनेला मंजुरी देण्यात आली आहे काय, या योजनेसंदर्भात केंद्र शासनाकडून किती निधी मिळालेला आहे, या निधीचे वाटप करण्यात आले आहे काय ? महाराष्ट्र राज्य हे घटनेच्या कलम 377(2) अंतर्गत काम करणारे राज्य आहे. याचा विसर ज्यांच्या हातात घटना आहे त्यांनी पडू देऊ नये. विशेषत: अशी व्यवस्था महाराष्ट्रासाठी केली आहे. गुजराथ या राज्यासाठी देखील अशी तरतूद करण्यात आली होती. परंतु त्या राज्यामध्ये याची आवश्यकता भासली नाही. याचे भान महाराष्ट्रातील कर्त्या पुरुषांनी ठेवले पाहिजे. अशा उपाययोजना न झाल्यामुळे होरपळणाऱ्या भागाचे प्रतिनिधीत्व करणारा मी माणूस आहे. अमरावती जिल्हयामध्ये, 100 टक्के पाणीपुरवठा हा बोअरच्या पाण्याद्वारे केला जातो. अशा दुर्लक्षित विभागातून मी आलेलो आहे. अमरावती जिल्हयामधील 5 लाख लोकसंख्येची पिण्याच्या पाण्याची गरज ही बोअरच्या पाण्यावर किती तरी वर्षे विसंबून होती. दांडेकर समितीच्या अहवालामध्ये नागरी पाणीपुरवठयाचा सर्वात जास्त अनुशेष असलेला जिल्हा म्हणून अमरावती जिल्हयाला किताब मिळालेला आहे.

यानंतर श्री. सुंबरे...

प्रा.बी.टी.देशमुख...

म्हणजे हे प्रथम क्रमांकाचे शहर आहे की महत्तम अनुशेष असलेल्या भागातील महत्तम पाणीपुरवठ्याचाही अनुशेष असलेले शहर. या शहराची पाणीपुरवठ्याची योजना करून पाठविली. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी एक शब्द येथे वापरला आहे तो मला अतिशय आवडला. अदृश्य स्वरूपातील काही लॉबी काम करीत असतात. या अधिकाऱ्यांनी नेमकी तीच योजना पाठविली नाही की, जी पहिल्या प्रथम पाठविणे आवश्यक होते. माननीय राज्यमंत्री सभागृहात उत्तर देत होते. त्यांनी त्यावेळी उत्तर दिले की, आम्ही त्या समितीला आदेश देऊ आणि ती योजना पाठविण्यास सांगू. त्याप्रमाणे मग ती योजना पाठविण्यात आली. पण सभागृहात प्रश्न मांडल्यानंतर माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिल्यानंतर हे सारे झाले. ही झाली पाणीपुरवठ्याची गोष्ट. भुयारी गटार योजनेचे तसेच कौतुक आहे. या राज्याच्या मंत्रिमंडळाने 1998 मध्ये विशेष ठराव करून असे सांगितले की, हे एकमेव डिव्हिजनल हेडक्वार्टर आहे की जेथे भुयारी गटार योजना नाही. त्यासाठी लोकवर्गणी मंत्रिमंडळ भरेल. 1998 मध्ये मंत्रिमंडळाने हा निर्णय घेतला. त्यानंतरही किती आश्वासने या संबंधात दिली गेली त्याची गणतीच नाही. मंत्री महोदयांनी, दिली, मुख्यमंत्र्यांनी दिली. पण शेवटी ती योजना पूर्ण झालीच नाही. 3 वर्षात पूर्ण होणारी योजना आहे, तिच्यासाठी 30 कोटी रूपये मातीत टाकले गेले आहेत आणि सध्या ठप्प अशा अवस्थेत आहे. ती योजनाही आपल्या अधिकाऱ्यांनी पाठविलीच नाही. अदृश्य स्वरूपात काम करणाऱ्या लॉबीने ही योजना पाठविली नाही. सभागृहात हा प्रश्न आला तेव्हा माननीय मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी उत्तर देताना ठामपणे सांगितले की, ही गोष्ट बरोबर नाही., सर्वात प्रथम ही योजना पाठविली गेली पाहिजे होती. आम्ही त्या समितीला तसे आदेश देऊ. त्याप्रमाणे त्यांनी आदेश दिले आणि मग ही योजना पाठविली गेली. म्हणजे प्रसव वेदनांचे वर्णन चालू आहे. बाळ-बाळंतिणीचा भाग अजून पुढेच आहे. बाळंतीण सुखरूप आहे की नाही, बाळ बाहेर दिसते आहे की नाही हा पुढे आहे. तेव्हा सन्माननीय राज्यमंत्री श्री.टोपे साहेबांना मी सांगू इच्छितो की, याचे उत्तर असे आहे की, आजपर्यंत या दोन्ही योजनांवर एक रूपयादेखील खर्च झालेला नाही. एक योजना अकोला जिल्ह्यात नाही, एक योजना बुलढाणा जिल्ह्यातील नाही, एक योजना वाशिम जिल्ह्यातील नाही. यवतमाळ जिल्ह्यातील एक लहानशी योजना आहे ती मात्र पाठविली. माझे म्हणणे असे आहे की, अनुशेषाचा नवा डोंगर रचण्यासाठी या योजनेचा दुरूपयोग या राज्यात होऊ नये. याबाबत 'असे होणार नाही'

..... सीसी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख .....

असे ठाम आश्वासन आता माननीय राज्यमंत्र्यांकडून आम्हाला अपेक्षित आहे. त्यासोबत या कायद्यात नसले तरी उद्या याला अमेंडमेंट मांडण्याची संधी आम्हाला देऊ नये. त्यासाठी त्यांनीच स्वत:वर बंधन घालून घ्यावे. सभापती महोदय, राज्याच्या निधी वाटपामध्ये तर गोंधळ होतोच. परंतु केंद्राकडून जो निधी येतो त्याचादेखील गोंधळ होतो. पाटबंधारे विभागासाठी ज्याला आपण एक्सलेटरी योजना म्हणजे वर्धितवेग योजना म्हणतो ती योजना आहे. पण वर्षानुवर्षे एकतर्फी निधीचे वाटप झाले. शेवटी माननीय पंतप्रधानांना नागपूर शहरामध्ये येऊन जाहीर करावे लागले की, आम्ही वर्धितवेग योजनेतून 2700 कोटी रूपये या 5-6 जिल्ह्यांसाठी देऊ. अशी पाळी येऊ नये अशी काळजी घेण्याच्या मुक्कामावर आज आपण आहोत. म्हणून मी या विधेयकावरील चर्चेचा उपयोग एक संसदीय आयुध म्हणून वापर करू इच्छितो. हा वापर करीत असताना दोन ठाम आश्वासने माननीय राज्यमंत्र्यांकडून मी घेऊ इच्छितो. केंद्रीय मंत्री श्री.जयपाल रेड्डी आहेत, त्यांना आम्ही भेटलो होतो. ते म्हणाले की, राज्य सरकारने प्रायॉरिटी पाठवावी, त्याप्रमाणे आम्ही करू. त्यांनी आम्हाला आश्वासन दिले नाही आणि आम्हीही त्यांच्याकडे ते मागितले नाही. म्हणून आता संसदीय आयुध म्हणून मी या चर्चेचा वापर करू इच्छितो. या विधेयकातील ज्या तरतुदी आपण मांडलेल्या आहेत त्याबद्दल दुमत नाही. मोठा निधी येत असताना आपण पारदर्शी राहिले पाहिजे. कपट कारस्थान झाले तर त्याबद्दल लोकांच्या लक्षात आल्यावर जागरून लोकांना बोलता आले पाहिजे हा त्यातील उद्देश आहे आणि तो चांगला आहे. तथापि याबाबतीत राज्य सरकारने जी बंधने पाळावयाची आहेत ती आपण ठामपणे पाळू. पहिला मुद्दा असा की, दरवर्षी सभागृहामध्ये आपण या बाबतीतील निवेदन दिले पाहिजे आणि या दोन योजनांच्या बाबतीत आपण जी कारवाई केली ती यशस्वी होण्यामध्ये कोणती कारणे आहेत आणि या दोन्ही योजनांना निधी मिळणार आहे की नाही याचे देखील उत्तर आपल्याकडून मिळण्याची मी अपेक्षा करतो आणि या विधेयकाला पाठिंबा देऊ मी माझे भाषण संपवितो.

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

***

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझी एक सूचना आहे. आता या ठिकाणी मंत्री महोदय एक निवेदन करण्यासाठी आलेले आहेत. हाफकीन संबंधात तीन दिवसात निवेदन व्हायचे होते, त्याबाबतीत माननीय सभापती महोदय म्हणाले की, राज्यमंत्री श्री.बाबा सिद्दिकी हे येथे निवेदन करतील. तर ते आता येथे आलेले आहेत तेव्हा त्यांनी मला चिठ्ठी पाठविली आहे की, त्यांना बोलायला येथे आपण परवानगी द्यावी. आणखी एक सूचना आहे की, त्यांनी आता एक महत्त्वाची सूचना केली आहे की, पारदर्शकता यावी यासाठी जशा अटी तुम्ही महापालिकेला घालणार आहात तशा अटी शासन स्वत:लाही घालून घेणार आहे का ? आणि दुसरे म्हणजे यामध्ये आलेला एकही पैसा हा ज्या कारणासाठी येईल त्याच कारणासाठी, शहरांच्या विकासासाठी खर्च केला जाईल असे आपण येथे जाहीर करावे.

( यानंतर श्री. सरफरे .... डीडी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

त्याच कारणासाठी शहराच्या विकासासाठी खर्च केला जाईल हे आपण जाहीर करावे. नाहीतर हा पैसा दुसरीकडे जाईल. ही योजना अतिशय महत्वाची असल्यामुळे आपण त्यामध्ये स्वत:वरही अट घातली पाहिजे की, आलेला पैसा किती आणि तो कुणाला दिला ? एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

श्री. राजेश टोपे (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, अनेक माननीय सदस्यांनी याठिकाणी आपले विचार व्यक्त केले. या विधेयकाचे सर्वांनी स्वागत केले त्या अनुषंगाने काही प्रश्न उपस्थित केले. मी सुरुवातीला सांगितले की, पारदर्शकता हा या विधेयकाचा मुख्य गाभा समजतो. माननीय सदस्य श्री. केळकर म्हणाल्याप्रमाणे जे.एन.यू.आर.एम. ची अट नसती तर आपण आणले असते कां? माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी म्हणाले आणि सर्वांना माहीत आहे की, आपले राज्य पुरोगामी आणि प्रोग्रेसिव्ह विचारांचे आहे. कोणतीही नवीन गोष्ट पहिल्यांदा आपण करतो. त्याच्या नंतर त्याची अंमबजावणी इतर राज्यामध्ये आणि देशात केंद्र सरकार स्वीकारते. आज माहितीचा अधिकार हा कायदा आहे. खरे म्हणजे माहिती मागविल्यानंतर मिळणारी माहिती. त्यामध्ये अशी तरतूद आहे की ती स्वत:हून दिली पाहिजे. माहिती मागितल्यानंतर ती देणे बंधनकारक आहे. हा कायदा आपल्या राज्याने आणला. आणि म्हणून माहितीचा अधिकार यापेक्षा त्याचे वेगळेपण असे की, स्वत:हून प्रकटीकरण करावयाचे हे त्याचे वेगळेपण त्यामध्ये आहे. त्यामुळे ही अट जर नसती तर आणले असते कां? या अगोदर आपण हा कायदा आणला आहे. मला याठिकाणी सांगावयाचे आहे की, याठिकाणी सर्वांना माहिती व्हावी अधिक कार्यक्षमतेने प्रशासन नगरपालिका आणि तिनही महानगरपालिका यांच्या अंतर्गत असलेल्या महानगरपालिकांचे व्हावे हा मुख्य उद्देश आहे तेवढयापुरते सांगतो. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी प्रामुख्याने दोन प्रश्न विचारले की, जे.एन.यू.आर.एम. किंवा यू.आय.डी.एस.एस.एम.टी. च्या पैश्याच्या वाटपामध्ये प्रादेशिक असमतोल राहू नये. हे रहाणार नाही याबाबत निश्‍चितपणे शासनाच्या वतीने काळजी घेतली जाईल. ज्या नगरपालिका किंवा महानगरपालिका जे प्रस्ताव पाठवितात ते स्टीअरींग कमिटीकडून वर पाठवितो. त्याबाबत निश्चितपणे काळजी घेतली जाईल. कदाचित ज्या अविकसित भागाकडून प्रस्ताव येत नसेल तर त्यासाठी त्या भागातील संबंधित महानगरपालिका, नगरपालिकांना सूचना दिल्या जातील की, आपण हे प्रस्ताव लवकर पाठवावे. आणि म्हणून फर्स्ट कम फर्स्ट ही दुनियेची जनरल रीत आहे. आणि म्हणून आलेले प्रस्ताव पाठवावयाचे नाहीत हा विषय कधी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे...

कधी अडचणीचा हेतो. म्हणून सर्व प्रादेशिक प्रदेशांनी, नगरपालिका महानगरपालिकांनी याबाबत दक्षता घेण्याची गरज आहे. दोन योजनांच्या बाबतीत प्रस्ताव वर पाठविले आहे. त्या ठिकाणी क्रमवारी लावली आहे. नगरविकास विभाग त्यानंतर केंद्रीय नगरविकास मंत्रालय या क्रमवारीने निधी पाठविण्याचे काम केंद्र सरकारकडून केले जाते.

माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी याठिकाणी यु.एल.सी. च्या संदर्भात मुद्दा मांडला. खरे म्हणजे या विधेयकावर बोलतांना खूप भाष्य झाले आहे. त्याचवेळी त्यांनी सभात्याग केला होता. त्यांनी सांगितले की, या ॲक्टमधून आपण मुंबईला वगळायला पाहिजे असे त्यांनी मत व्यक्त केले. जे काही 9 समूह आहेत ते आठ मधून रिपिल करावयाचे आणि एक मध्ये ठेवावयाचे हा विषय त्यांनी मांडला. हा केंद्राचा कायदा आहे आणि केंद्राच्या कायद्यामध्ये आपण अमेंडमेंट करु शकत नाही. म्हणून काही सुधारणा कर ता येईल काय याची खात्री केली होती? अशाप्रकारे मुंबई आणि ठाण्यापुरते ठेवता येईल काय, तशापध्दतीने ठेवता येत नाही .ही माहिती कायदेशीररित्या मिळाल्यानंतर याठिकाणी सर्वच राज्यातून, राज्यभारातून कायदा रिपिल व्हावा अशापध्दतीने सरकारच्या वतीने ठराव आणला होता. याठिकाणी लेखा परिक्षणाच्या दृष्टीकोनातून प्रश्न उपस्थित केला . शेवटी हा कायदा आणावयाचा हेतू असा की, ही सर्व माहिती दिली गेली पाहिजे. अधिक पारदर्शकता राहिली पाहिजे. सामान्य माणसाचा विकास प्रक्रियेमध्ये सहभाग असला पाहिजे. यासाठी हा कायद्याचा मुख्य हेतू आहे. त्यामुळे लेखा परिक्षण कदाचित वेळेत झाले नसेल. त्यांनी पी.सी.एम.टी. चे काही दाखले दिले की, लेखा परिक्षणाच्या आक्षेपाचा अजून निर्णय झाला नाही.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .....

या ठिकाणी काही आक्षेपाधिन निधी आहे त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी आकडेवारी दिली. या सगळ्या गोष्टी कायद्यानुसार निश्चितपणे तपासण्याची आवश्यकता आहे. कायदेशीर चुका झाल्या असतील तर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. ही बाब सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी निदर्शनास आणून दिली. जरुर त्याची चौकशी करु. एवढे मी या निमितने सांगू इच्छितो. हे बिल शासनाने चांगल्या उद्देशाने आणलेले आहे. पारदर्शकता अधिक वाढावी, लोकांचे पैसे असणारे लोकल सेल्फ गव्हर्नमेंट आहेत. त्या दृष्टीकोनातून त्यांचा व्यवहार पारदर्शक असावा, निर्णय क्षमता अधिक कार्यक्षम आणि परिणामकारक असावी यादृष्टीकोनातून या विधेयकाच्या माध्यमातून ज्या तरतूदी केलेल्या आहेत त्याचा चांगला परिणाम महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या प्रशासनावर होणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी सांगितले की, तीन महानगरपालिकांच्या बाबतीत तीन वेगवेगळे कायदे आहेत. बी.पी.एम.सी.ॲक्ट, नागपूर महानगरपालिकेचा वेगळा कायदा तसेच मुंबई महानगरपालिकेचा वेगळा कायदा आहे. त्याचा एकच कंसॉलिडेटेड कायदा करावा अशी त्यांनी सूचना केली. केंद्र सरकारने मॉडेल ॲक्ट प्रत्येक राज्याला पाठविलेला आहे. त्यावर अभ्यास करण्यासाठी आपल्या राज्याने एक समिती गठीत केलेली आहे. या तीनही महापालिका कायद्यामध्ये काय तरतुदी आहेत आणि त्या मॉडेल ॲक्टमध्ये काय तरतुदी आहेत, त्यांचे एकत्रिकरण करुन मॉडेल ॲक्ट कसा करावयाचा याचा अभ्यास करण्यासाठी समिती गठीत केलेली आहे. त्यांच्या शिफारशी लवकरच अपेक्षित आहेत. त्या शिफारशी आल्यानंतर मॉडेल ॲक्टच्या संदर्भात सुध्दा शासन लवकर निर्णय घेणार आहे. सभागृहाने या बिलाला मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

श्री. अरविंद सांवत : रॉयल पामच्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आरे कॉलनीतील रॉयल पामच्या संदर्भात घुडघूस घालत आहेत. त्याची सुध्दा जरुर माहिती घेऊ. यासंदर्भात आता जी माहिती सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी दिली त्याबाबत माहिती घेऊ आणि जर काही चुकीचे होत असेल तर त्यामध्ये दुरुस्ती करण्याची शासनाची नेहमीच तयारी राहील.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ AKN/ MAP/

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, आपण परवानगी दिल्यामुळे मी एकच प्रश्न विचारतो. दुसरे काही विचारत नाही. प्रायोरिटी देण्याविषयी माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, ते क्रमाने घेतात. आपले राज्य हे कलम 371(2) खाली असलेले राज्य आहे. घटनेप्रमाणे या तीनही विभागाना समान वागणूक देण्याची जबाबदारी शासनाची आहे, हे आपण त्यांना क्रम लावताना कळविलेले आहे काय ? आपण त्यांना पुन्हा कळवावे की, 371 (2) प्रमाणे हे तीन विभाग वेगवेगळे आहेत, घटनात्मकदृष्ट्या यांना इक्विटेबल डिस्ट्रीब्यूशन देणे आवश्यक आहे. 371(2) चा मेकॅनिझम ऑपरेटिव्ह आहे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे आपण त्यांना असेही कळवावे की, अतितणावात असलेले केंद्राने निश्चित केलेले जिल्हे या ठिकाणी आहेत त्यांनाही प्रायोरिटी द्यावी. असे कळविण्यामध्ये आपल्याला काही हरकत आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, केंद्र सरकारचे असे म्हणणे आहे की, राज्य शासन जी प्रायोरिटी कळवील त्याप्रमाणे आम्ही मंजूर करतो. राज्य सरकारने जर आपण स्वत:वर बंधन घेतले आणि 371 कलमाच्या माध्यमातून जर खऱ्या अर्थाने सर्व विभागांना समतोल पध्दतीने निधी वाटप करण्याचे ठरविले तर केंद्र सरकारची कोणतीही अडचण असण्याचे कारण नाही. सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी जी सूचना केलेली आहे त्याचा निश्चितपणे शासनाच्या वतीने विचार केला जाईल.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** ( श्री. उल्हास पवार ) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 5 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. स. वि. क्रमांक 78 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2007 चे वि. स. वि. क्रमांक 78 संमत झाले आहे.

-----

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>सभागृहातील कामकाजासंबंधी</u>**

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, कामकाजपत्रिकेवर सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 53, महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक दाखविलेले आहे. परंतु संबंधित मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित नाहीत.

दुसरी महत्वाची बाब ही आहे की, काल-परवा हाफकिनच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये निवेदन केले होते. त्या निवेदनामध्ये दुरुस्ती करुन ते पुन्हा सभागृहाच्या पटलावर ठेवण्यासंबंधी निदेश दिले होते. माननीय मंत्री महोदयांची देखील निवेदन करण्याची तयारी आहे. तेव्हा माननीय मंत्री महोदयांना ते निवेदन करण्यास सांगावे, अशी माझी आपणास विनंती आहे.

**तालिका सभापती** : सन 2007चे वि.स.वि.क्रमांक 53 हे माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या विभागाशी संबंधी आहे. त्यांचे विधानसभेमधील काम अजून चालू आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे देखील सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. मी आता सभागृहाची बैठक 10 मिनिटाकरिता स्थगित करीत आहे.

( दुपारी 12.36 ते 12.46 पर्यन्त सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ AKN/ 12:47

(स्थगितीनंतर)

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.उल्हास पवार)**

**पृ.शी.**: विदर्भातील खारपान पट्टयातील लघुपाटबंधारे योजनेचे मापदंड शिथील करणे

**मु.शी.**: विदर्भातील खारपान पट्टयातील लघुपाटबंधारे योजनेचे मापदंड शिथील करण्यासंबंधी माननीय वित्तराज्यमंत्र्यांचे निवेदन.

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढीलप्रमाणे निवेदन करीत आहे :-

"विदर्भातील पूर्णा खोऱ्यातील खारे पाणी प्रदेश हा अमरावती, अकोला व बुलढाणा या जिल्हयातील 4692 चौरस कि.मी.क्षेत्रात पसरलेला आहे. यात या तीन जिल्हयातील 16 तालुक्यातील 894 गावे येतात.

खारे पाणी पट्टयातील समस्यांचा एकत्रितपणे विचार करण्यासाठी शासनाने एप्रिल 2000 मध्ये नेमलेल्या समितीने दिलेल्या अहवालातील स्वीकृत शिफारशींपैकी खारपान पट्टयातील शेततळी व गावतळ्यांचा आर्थिक निकष शिथील करणे ही प्रमुख शिफारस होती.

या शिफारशीच्या अनुषंगाने दिनांक 29.11.2007 रोजी मंत्रिमंडळाने खारपान पट्टयातील लघुपाटबंधारे योजनांचा सर्वसाधारण निकष प्रचलित मापदंडाच्या तिप्पट करण्याचा तसेच लाभव्यय गुणोत्तर विचारात घेऊ नये, असा निर्णय घेतला आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, नियम 46 अन्वये केलेल्या निवेदनावर एखादा प्रश्न विचारता येतो. दिनांक 29.11.2007 रोजी म्हणजे दोन दिवसापूर्वी मंत्रिमंडळाने निर्णय घेतला, प्रचलित मापदंडाचे लघुपाटबंधारे योजनांचे निकष तिप्पटीने वाढवून दिले आहेत. लाभव्यय गुणोत्तर विचारात घेऊ नये असा निर्णय घेतला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून लोकांची ही मागणी होती. मी कितीतरी नद्या दाखवून देईन, त्यावर एकही योजना केलेली नाही. अशा नद्याच्या ठिकाणी फाऊंडेशन सापडत नाही. लाभव्यय गुणोत्तरात बसत नसल्यामुळे अडचण निर्माण होत होती. समुद्राच्या काठी खाजण जमिनी पुष्कळ असतील परंतु असा खारपान पट्टा भारतामध्ये केवळ या तीन जिल्हयांमध्येच आहे. खारपान पट्टयामुळे लोकांचे जीवन त्रस्त झालेले आहे. आता हा लाभव्यय गुणोत्तर विचारात घेऊ नये आणि प्रचलित मापदंड तिप्पट करण्याचा निर्णय केला.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...........

याप्रमाणे 16 तालुक्यांमध्ये नवीन मापदंडानुसार सर्व लघुपाटबंधारे प्रकल्पांचे सर्व्हेक्षण करुन पुढील सहा महिन्यात, हा पॅकेजमधील भाग आहे आणि पॅकेजमधील दुर्दैवाचा भाग आहे. येथील सर्व लहान योजनांचा सर्व्हे करुन सहा महिन्याच्या आत प्रशासकीय मान्यता देण्यात येतील का?

(नंतर श्री.जुन्नरे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी खार पाण पट्टयाच्या संदर्भात जे सांगितलेले ती वस्तुस्थिती आहे. यासंदर्भातील अत्यंत महत्वाचा निर्णय विदर्भातील तीन जिल्हयाच्या संदर्भात शासनाने घेतलेला आहे. हा निर्णय कित्येक दिवसापासून प्रलंबित होता. 894 गावे खार पाण पट्ट्यामध्ये येत होती. या ठिकाणी पिण्यासाठीही खारे पाणी आणि शेतीसाठीही खारे पाणी मिळत होते. अशा परिस्थितीमुळे आपण या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या योजना घेऊ शकत नव्हतो. जवळ जवळ 90 योजनांचा सर्व्हे करुन आपण ठेवल्या होत्या. प्रचलित मापदंड कॉस्ट पर टी.एम.सी. प्रमाणे होता त्यामध्ये आपण डी.सी. रेषो पकडत नाही. परंतु यामध्ये आपण नॉर्म्स बदलवले. आता नॉर्म्स वाढवल्यामुळे 90 योजनांपैकी 68 योजनांचे काम मार्गी लागणार आहे. त्यामुळे विदर्भातील 3 जिल्हयाच्या दृष्टीने महत्वाचा निर्णय झालेला आहे. या संदर्भात काल माननीय अजितदादा पवार यांनी बैठक घेऊन संबंधित विभागाला तशा प्रकारचे निदेशही दिलेले आहेत. खार पाण पट्टयातील 250 हेक्टरच्या वरचे जे प्रकल्प आहेत ते विदर्भ सिंचन विकास महामंडळाकडे येतात. विदर्भ सिंचन विकास महामंडळाच्या अखत्यारीत येणारे सर्व प्रकल्प या तिन्ही जिल्हयातील तसेच अनुशेष ग्रस्त जिल्हयांना सहा महिन्याच्या आत सर्व सोपस्कार करुन म्हणजे प्लॅन, एस्टिमेट, सर्व्हे करुन सहा महिन्याच्या आत प्रशासकीय मान्यता देण्याचा शासनाने मानस केलेला आहे. काही ठिकाणी अडचणी आल्या तर त्या अडचणी देखील दूर करण्याचा आम्ही प्रयत्न करु. सर्वसाधारण सहा महिन्यामध्ये, अनुशेष ग्रस्त जिल्यातील सर्व प्रकल्पांना मान्यता देण्यात येईल. 250 हेक्टरच्या वरचे प्रकल्प हे विदर्भ सिंचन विकास महामंडळाकडे येत असतात परंतु 0 ते 100 हेक्टरच्या आत मधील प्रकल्प जिल्हापरिषदेकडे येतात. यामध्ये पाझरतलावास जिल्हाधिकारी मान्यता देत असतात. त्यामुळे संबंधितांना तशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील की, 100 हेक्टरच्या आत मधील जे प्रकल्प आहेत ते जलसंधारण खात्याला, जिल्हापरिषदेला आणि जिल्हाधिका-यांना यासंदर्भात सूचना देण्यात येतील.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या भागाच्या दृष्टीने जो निर्णय या शासनाने घेतलेला आहे त्यामुळे या भागात अनेक वर्षापासून जो त्रास होता तो आता दूर होणार आहे. त्यामुळे माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी दिलेल्या आश्वासनाबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

-------------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक.

**L.A. BILL NO.LIII OF 2007.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PREVENTION OF DANGEROUS ACTIVITIES OF SLUMLORDS,BOOTLEGGRS,DRUG-OFFENDERS AND DANGEROUS PERSONS ACT,1981).**

श्री. आर.आर.पाटील ( गृह मंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि. स. वि. क्रमांक 53- महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादाय व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, 1981 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 53 महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, 1981 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, 1981 साली मी आता उल्लेख केलेल्या गुंडाना वचक बसवण्यासाठी इंडियन पीनल कोर्ट, क्रिमीनल प्रोसिजर कोर्ट अशा अनेक पध्दतीच्या प्रोव्हीजन असल्या तरी एखाद्या गुन्हेगाराला अटक केल्यानंतर त्याला शिक्षा होण्याचा कालावधी कोर्टकेसमुळे अनेकवेळा प्रदीर्घ असतो. अशा गुंडापासून समाजाला धोका होऊ नये , राष्ट्र विघातक कृत्य त्याच्या हातून घडू नये म्हणून कायद्या प्रमाणे 1981 साली जो कायदा आपण केला त्या कायद्या प्रमाणे एक वर्ष स्थानबध्द करुन ठेवण्याचे अधिकार राज्यसरकारला आहेत. पण या कायद्यामध्येच अशा प्रकारची

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

तरतूद करण्यात आलेली आहे की, दर तीन महिन्यासाठी हे अधिकार राज्य सरकार राज्यस्थरावर जिल्हाधिका-यांना व जेथे पोलीस आयुक्तालय आहे अशा ठिकाणी पोलीस आयुक्तांना डेलीगेट करु शकेन. प्रत्येक तीन महिन्याला हे अधिकार पोलीस आयुक्तांना व जिल्हाधिका-यांना डेलिगेट केले जातात. तीन महिन्यांनी प्रस्ताव पुन्हा राज्यसरकारकडे येतात. सचिवालयामध्ये अनेक वेळा या प्रस्तावावर निर्णय होत नाहीत, फाईल्स पडून राहतात. अनेक वेळेला जिल्हयामध्ये स्थिती अशी असते की, त्या जिल्हाधिका-याला आणि पोलीस आयुक्तांना आवश्यक असलेले अधिकार मिळत नाहीत. कायद्याप्रमाणे कलम 3(1) प्रमाणे तीन महिन्यासाठी हे अधिकार राज्य सरकार जिल्हाधिकारी आणि पोलीस आयुक्तांना डेलिगेट करु शकते.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.......

इतकीच सुधारणा आम्ही केलेली आहे. हे अधिकार सहा महिन्यांसाठी डेलिगेट केल्यामुळे संबंधित जिल्ह्यांचे प्रस्ताव किंवा आयुक्तालयाचे प्रस्ताव राज्य सरकारकडे प्रत्येक तीन महिन्यांऐवजी सहा महिन्यांमध्ये यावे लागतील. सहा महिन्यांचा कालावधी करण्याचे कारण म्हणजे एखाद्या जिल्ह्यामध्ये कुठेही चुकीची कारवाई होऊ नये तसेच किती प्रकरणांवर कारवाई केली याचा रिव्हयू घेता यावा, नियंत्रण ठेवता यावे म्हणून राज्य सरकारने हा निर्णय घेतलेला आहे. प्रशासकीय कामे कमी व्हावीत आणि खालीही गैरसोय होऊ नये म्हणून तीन महिन्यांऐवजी सहा महिने राज्य सरकारचे अधिकार डेलिगेटस करण्याच्या पॉवर्स या विधेयकाद्वारे मागत आहेत. ज्या दिरंगाई आणि त्रुटी निर्माण होतात त्या दूर करणारे हे विधेयक आहे. या विधेयकास विधानसभेने एकमताने मान्यता दिलेली आहे. या सदनाने देखील एकमताने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी मांडलेले विधेयक अतिशय चांगले आहे. महाराष्ट्रामध्ये विशेषत: मुंबई शहरामध्ये झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधाची भेसळ करणारे अशाप्रकारच्या लोकांना पायबंद बसावा यासाठी भारतीय दंड संहिता असली तरी गुन्हेगाराला सजा मिळण्यास फार उशीर होतो. यामध्ये कधी कधी पळवाटा निघतात आणि त्या माध्यमातून बरेचसे गुन्हेगार मोकळे सुटले जातात. म्हणून अशाप्रकारचे विधेयक आणलेले आहे. या विधेयकात तीन महिन्यांचा कालावधी सहा महिन्यांपर्यंत वाढविण्याची तरतूद केलेली आहे. मी याठिकाणी नम्रपणे सांगू इच्छितो की, या विधेयकामागचा हेतू अतिशय चांगला आहे. परंतु मुंबईत ज्या पध्दतीने एमपीडीए चा वापर केला जात आहे, ते पाहता या विधेयकावर तातडीने विचार करण्याची गरज आहे. अन्यथा हे विधेयक रद्द करण्याची पाळी सरकारवर येईल. पोलीस स्टेशनमधील एक विभाग तडीपार, एमपीडीए,एनएसए अशाप्रकारचे प्रस्ताव तयार करण्याचे काम करतो. नंतर हे प्रस्ताव वेगवेगळ्या स्तरांतून मंत्रालयात मान्यतेसाठी जातात आणि मंत्रालयातून कर्न्फेशन होऊन परत येतात. एमपीडीए कोणाला लावावा यासाठी निकष असले पाहिजेत. दोन-तीन मारामाऱ्या झाल्या. त्यामध्ये एखादी भा.दं.वि 324 ची केस असेल किंवा अन्य कुठली असेल तर ताबडतोब एमपीडीए प्रस्ताव बनवून वरच्या अधिकाऱ्यांकडे पाठविला जातो. या संदर्भात मी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी बोललो, डी.सी.पी.शी बोललो तसेच वेगवेगळ्या स्तरांवर बोललो. प्रत्येकवेळी मला सांगण्यात आले की, आम्हाला कोटा पूर्ण करायचा असतो म्हणून आम्ही काही लोकांना यामध्ये बुक करतो. कोटा बुक करण्यासाठी हा कायदा बनविलेला नाही. गुन्हेगारांना जरब बसावी यासाठी कायदा बनविलेला आहे. मी माननीय गृहमंत्र्यांना काही उदाहरणे देईन, वाटल्यास त्यांची नावे देखील देईन. आर्टीकल 21 प्रमाणे प्रत्येकाला व्यक्तीगत जीवन जगण्याचे स्वातंत्र्य आहे. कारवाई चांगल्याप्रकारे व्हावी म्हणून तीन महिन्यांचा कालावधी सहा महिन्यापर्यंत वाढविला. कमिशनरनां वेळ मिळावा, प्रकरणाची छाननी करण्यासाठी वेळ मिळावा यासाठी कालावधी वाढविला ही चांगली गोष्ट आहे. परंतु अधिकाऱ्यांनी केलेल्या प्रस्तावाची कोणत्याही प्रकारची छाननी न होता कमिशनर यांचेकडे जातात. प्रकरण कमिशनरांकडे गेल्यावर आणि त्याबाबत विचारणा केल्यावर प्रस्ताव नक्की झालेला

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब..........

आहे आम्ही काही करु शकत नाही असे सांगण्यात येते. ही गोष्ट डी.सी.पी. देखील मान्य करतात. त्या प्रस्तावाला एम.पी.डी.ए. लागू शकत नाही. एम.पी.डी.ए. लागू शकत नाही तर हा प्रस्ताव परत का पाठविला असा प्रश्न निर्माण होतो. हा कायदा झोपडपट्टी गुंड, अवैध झोपडपट्टी निर्माण करणाऱ्या गुंडाविरुध्द आहे, दारु गाळणाऱ्यांसाठी आहे. मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, आता नुकत्याच मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका झाल्या. या उमेदवारांची चाचणी चालली होती. त्यावेळी मला दोन-तीन ठिकाणांहून बातम्या मिळाल्या की, अमूक अमूक व्यक्ती उमेदवार होऊ शकत नाहीत अशाप्रकारच्या बातम्या माझ्याकडे यायला लागल्या त्यावेळी मी या प्रकरणी अतिशय बारकाईने चौकशी केली त्यावेळी मला समजले की, त्या उमेदवारांच्या एम.पी.डी.ए. अंतर्गत फाईल करण्यात आल्या होत्या.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब ...

कुठले कुठले गुन्हे त्यांच्यावर आहेत. त्यामध्ये 2 मारामारीच्या घटना असून त्याबाबतीतील 324 चे गुन्हे आहेत. मध्यंतरी एका भागात बंदच्या दिवशी दगडफेक झाली होती, त्यामध्ये पोलीस अधिकाऱ्याला मार लागला, त्यासंबंधी कलम 307 खाली केस दाखल घेण्यात आली. त्या बंदच्या दिवशी ज्या राजकीय पक्षाचे लोक होते त्यांवर एमपीडीएची कारवाई झाली. त्यातील दोन लोकांनी नंतर सदरचे प्रस्ताव रद्द करुन घेतले. परंतु अतिशय पध्दतशीरपणे, प्लॅनिंगकरुन त्या विभागाच्या लोकांना हाताशी धरुन काही राजकीय लोकांनी हे उमेदवार निवडणुकीत उभेच राहू नयेत म्हणून या एमपीडीएचा वापर करण्याचा प्रयत्न केला होता परंतु तो मी हाणून पाडला. नंतर त्यातील काही लोक नगरसेवक म्हणून निवडून आले व आजही ते नगरसेवक म्हणून लोकांमध्ये काम करीत आहेत. परंतु त्यांना पोलीस अटक करीत नाहीत. त्यांचा याबाबतीतील प्रस्ताव प्रलंबित आहे. त्यांना कुठल्याही क्षणी अटक होऊ शकते परंतु ती आपण करत नाहीत. म्हणून एमपीडीएचा वापर कशासाठी केला पाहिजे, कोणासाठी केला पाहिजे व यामध्ये धोकादायक व्यक्तिची नेमकी व्याख्या काय ? याचा खुलासा होणे आवश्यक आहे. दोन इमारतींच्या बाबतीत मारामारी झाली व त्यासंबंधी एखादी एनसी झाली तर त्यासंबंधी पोलीस कलम 109 व 110 नुसार कारवाई सुरु करतात. एखादा सर्वसामान्य माणूस जर त्या मारामारीमध्ये अडकला व या कायद्याच्या माध्यमातून तो धोकादायक होत असेल तर तो उद्या एमपीडीएसाठी लागू होतो. त्यामुळे याठिकाणी धोकादायक व्यक्तिची व्याख्या स्पष्ट झाली पाहिजे. अशा धोकादायक व्यक्ती कोण, त्यावर कोणत्या केसेस आहेत की ज्याच्यामुळे समाजाला धोका निर्माण होणार आहे ? तेव्हा या सर्व गोष्टीचा बारकाईने तपशील करुन एमपीडीए कायद्याची अंमलबजावणी आपल्याला करावीच लागणार आहे. अन्यथा, बाकीच्या कायद्यांचा ज्याप्रमाणे चुकीचा वापर केला जातो त्याप्रमाणे याही कायद्याचा वापर होईल. आपण याठिकाणी 3 महिन्यांचा कालावधी 6 महिन्यांपर्यंत वाढवत आहात. तो अधिकार वाढविण्यासाठी किंवा या प्रस्तावाची छाननी करुन त्यांना वेळ मिळावा यासाठी जर असे करत असाल तर तो चांगला हेतू आहे.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब ...

सभापती महोदय, यामध्ये दुसरी त्रुटी अशी आहे की, यामध्ये बोर्डाचे रि-प्रेझेंटेशन असे आहे की, एकदा एका माणसाला अटक केल्यानंतर त्या माणसाला स्वत:ला बोर्डासमोर जाऊन स्वत:चे म्हणणे मांडावे लागते. याबाबतीत माझे असे स्पष्ट मत आहे की, आपल्या बोर्डाने एकदा त्याला कन्व्हीन्स केल्यानंतर व तो खरोखरच गुन्हेगोर असेल तर याबाबतीतील एक वर्षाची सजा आपण पाच वर्षापर्यंत करा. परंतु एखाद्या चुकीच्या माणसाला जर या कायद्याच्या अंतर्गत पकडले तर त्यांना 3-3 महिने रि-प्रेझेंटेशन मिळत नाही. जर एखादा माणूस बोर्डाकडून सुटला व त्यावर कोणतेही गुन्हे सिध्द झाले नाही तर तीन महिन्यांची भरपाई कोण देणार ? याचाही खुलासा होण्याची आवश्यकता आहे. कारण चुकीच्या माणसांना एमपीडीएमध्ये टाकले जात आहे. हा कायदा आपण ज्या कारणांसाठी आणला आहे, त्याचा खुलासा आपण करावा. कारण या कायद्याची आज पायमल्ली होत आहे. आज भारतीय घटनेची पायमल्ली होत आहे. इतर कायद्यामध्ये ज्याप्रमाणे 8-15 दिवसांमध्ये आपले म्हणणे मांडण्याचे जसे प्रावधान आहे त्याप्रमाणे या कायद्याच्या माध्यमातून एकदा म्हणणे मांडून झाल्यानंतर आपण जर संबंधित व्यक्तिला दोषी ठरवत असाल तर ते योग्य नाही, असे मला वाटते. अशाप्रकारे जर आपण एखाद्या माणसाला त्याचे म्हणणे मांडण्याच्या कारणास्तव तीन तीन महिने जेलमध्ये ठेवणार असाल तर त्याबाबतीत आपण भारतीय घटनेच्या कलम 21 ची पायमल्ली करीत आहात, असाच माझा समज आहे. व्यक्तिला देण्यात आलेलया स्वातंत्र्यांपासून आपण त्यांना दूर ठेऊ नका. गुन्हेगारांना कडक शासन झाले पाहिजे या मताचा मीही आहे. परंतु कुठलाही कायदा हा चुकीच्या कारणांसाठी वापरला जाणार नाही, अशी या बिलाच्या माध्यमातून मी मागणी करतो व याबाबतीत माननीय गृहमंत्र्यांनी खुलासा करावा, अशी विनंती करतो आणि येथेच थांबतो.

-------

..3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माननीय गृहमंत्र्यांनी हे विधेयक सभागृहात मांडले. सभापती महोदय, आपल्या सगळयांच्या लक्षात असेल की, महाराष्ट्र राज्यामध्ये व केंद्रामध्येही पूर्वी लॉ कमिशन होते. त्यावेळी लॉ कमिशनने राष्ट्रीय स्तरावर आणि राज्य स्तरावर कुठल्या कायद्यामध्ये काय बदल करावयास पाहिजेत याबद्दलच्या अनेक शिफारशी दिल्या होत्या. परंतु दुर्दैवाने ते लॉ कमिशन राज्य स्तरावर का गुंडाळले गेले, याबद्दल गेल्या 5-6 वर्षामध्ये दोन्ही सदनामध्ये चर्चा झाल्याचे मी कधीही ऐकलेले नाही. लॉ कमिशन असण्याचा हेतू हा होता की, अशी वेगवेगळी विधेयके येत असताना त्यांस विधी व न्याय विभागाने मान्यता देऊन ती संबंधित विभागाकडून येऊन विधीमंडळाकडे येण्याच्या अगोदर त्यावर साधकबाधक चर्चा तसेच कायदेतज्ज्ञांची मते व याबाबतीत कोर्टामध्ये झालेले वेगवेगळे निकाल यामध्ये शासनाची किंवा त्यातील नोकरवर्गाचीच फक्त एकाधिकारशाही न राहता, लॉ कमिशनच्या शिफारशी कशा अस्तित्वात येतील, याबाबत विचार झाला पाहिजे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे..........

दुर्दैवाने हे जे विधेयक आज येणार आहे. कायद्यातील दुरुस्तीचा फायदा कोणाला होणार आहे, त्याचा लाभ पोलिसांना काय होणार आहे ? त्याचा परिणाम काय होणार आहे, याबद्दल चर्चा करण्यासाठी, अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ विधिमंडळात मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, तिसरा महत्वाचा मुद्दा असा आहे की, अशी विधेयके तयार होतात त्यावेळी या विषयाचा अभ्यास करणारे लोक, या विषयामध्ये ज्यांना आपले म्हणणे मांडावयाचे आहे, असे लोक, त्यांची मते, विचारात घेण्याची प्रक्रियाच आज आस्तित्वात राहिलेली नाही, हे खेदाने नमूद करावेसे वाटते. अधिवेशन संपले की, अनेक ठिकाणचे पत्रकार, लॉ कॉलेजचे प्रिन्सिपॉल, निवृत्त पोलीस महासंचालक अशा लोकांचा फोन येतो, असे विधेयक येणार होते, निदान कळले असते तर मत मांडले असते, असे ऐकावे लागते त्यावेळी खंत वाटावयास लागते. उपमुख्यमंत्र्यांसारख्या व्यक्ती, जे नेहमी सर्वांचे ऐकून घेत असतात, मत जाणून धेत असतात त्यांनी एवढया घाईने कायदा का आणला, हे समजून येत नाही. त्यांचा हेतू चांगला असला तरी दोन एस्क्ट्रीम उदाहरणे मला आपल्याला द्यावयाची आहेत.

सभापती महोदय, कायद्याचा योग्य वापर न झाल्यामुळे अशा व्यक्ती तीन महिन्यानंतर वारंवार सुटून येत असतील, जामिनाचा फायदा धेंत असतील, परत लोकांना, झोपडपट्टीवासीयांना त्रास देत असतील, महिलांना त्रास देत असतील तर त्या ठिकाणी कायदा हातात घेण्याच्या घटनाही घडल्या आहेत. याचे उदाहरण पहायचे झाल्यास, नागपूरमध्ये घडलेली अक्कु यादवची घटना हे उदाहरण देता येईल. जरीपटका पोलीस स्टेशनमध्ये ज्या ठिकाणी महिला दक्षता समिती नव्हती, त्या ठिकाणी महिला चाल करुन गेल्या. ज्यावेळी अशा समाज विघातक शक्ती एखाद्या वस्तीला वेठीला धरल्यासारखे करतात त्यावेळी लोक कायदा हातात घेतात. तो विचार केला तर कायद्याचे जस्टिफिकेशन मिळते, असा कायदा करु शकतो. मला या ठिकाणी आपल्या माध्यमातून सभागृहाचे लक्ष याकडे वेधावयाचे आहे की, सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी धोकादायक व्यक्ती यासंदर्भातील उल्लेख केला. एका महिला संघटनेच्या कार्यकर्तीला धोकादायक व्यक्तीमध्ये सहजगत्या पोलीस स्टेशन गोवू शकते याचे उदाहरण म्हणजे कोल्हापूर येथील रुपा शहा या कार्यकर्तीचे, जी कार्यकर्ती एन.एस.सी.च्या प्रमुख पदावर होती. स्वत: गृहमंत्री त्यांना ओळखतात.

....2........

डॉ.नीलम गो-हे...........

जेव्हा पाच वर्षापूर्वी या सदनामध्ये विषय आला होता, एका घटनेमध्ये पती-पत्नींमध्ये समझोता घडत असतांना सासरच्या लोकांनी रुपा शहाविरुध्द तक्रार केली त्यावेळी पोलिसांनी बेडया घालून पोलीस व्हॅनमध्ये नेण्याची वेळ आली, दोन-अडीच वर्षे खटला चालला. संबंधित जे जे पोलीस अधीक्षक होते त्यांना आम्ही प्रश्न विचारत होतो, रुपा शहाने असे काय कृत्य केले होते ? त्या कार्यकर्तीने बालविवाह मोडले त्यामुळे लोकांचा तिच्यावर रोष होता, बालविवाह मोडावे की न मोडावे, हा वेगळया चर्चेचा विषय होऊ शकतो. परंतु तिने 126 बालविवाह मोडले. जे मोडले त्यामधील वधूचे वय बारा-तेरा वर्षांचे होते. मोठया घरातील बालविवाहामध्ये आंदोलने केली म्हणून पोलीस नाराज होते. नंतर रुपा शहा सारख्या प्राध्यापिकेला खटल्यातून मुक्तता करुन घेण्यासाठी कोर्टाचा दरवाजा खटखटावा लागला. वेगवेगळया शहरांमध्ये पोलीस अधिकारी अनेक बाबतीत समझोता करण्याचा प्रयत्न करीत असतील तर त्यांना ही परवानगी कोणी दिली ? कोणाला म्हटले जाते धोकादायक व्यक्ती ? पिंपरी-चिंचवडमध्ये काही महिलांनी पोलिसांचा ड्रेस स्वत: घातला होता, महिला पोलिसांच्या वेशामध्ये त्या समझोता घडवित होत्या, शहरात फिरत होत्या, नगरसेविकेच्या नातेवाईकांनी त्यांना भरपूर झोडपून काढले, अखेर कळले की त्या ख-या पोलीस नाहीत, बनावट पोलीस आहेत. तंटामुक्त कार्यक्रम ठीक आहे, तो किती यशस्वी होईल माहिती नाही. राज्यातील अदखलपात्र गुन्हयांची संख्या आपल्या सर्वांना माहित आहे, हे गुन्हे दखलपात्र होण्याच्या प्रोसेसमध्ये अनेक चॅप्टर केसेस पेंडिंग असतात, उपायुक्त दर्जाच्या पोलीस अधिका-यांना अधिकार दिलेले असतात. मुळामध्ये तीन महिन्यामध्ये याबाबतचा निर्णय घ्यावयाचा असतो, परंतु ज्या प्रकरणात माहिती घेणे सोपे असेल अशा प्रकरणांमध्ये, "सडू दे यांना चांगला," अशी सुध्दा प्रवृत्ती नाही, अशातला भाग नाही. राजकीय सूडबुध्दीने घटना घडावयाच्या नसतील, निर्णय योग्य करावयाचा असेल तर तर कोणकोणत्या कॅटेगरीसाठी उपयोग करणार हे देखील ठरविले पाहिजे. जे दलाल आहेत, जे वेगवेगळया प्रकारच्या मादक तस्करीमध्ये गुंतलेले लोक आहेत अशा पध्दतीच्या गुन्हयांच्या लोकांबाबतचे साक्षीपुरावे मिळविणे अवघड झालेले असते.

यानंतर श्री.बोरले.........

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे .....

सायबर क्राईमसारख्या विषयामध्ये जे लोक सी.डी. विकण्याचा धंदा करतात ते देखील लगेच साठा नष्ट करुन टाकतात. फक्त सूत्रधार म्हणून ते काम करीत असतात, यासाठी देखील या कायद्याचा उपयोग होऊ शकेल. परंतु उपमुख्यमंत्री, गृहमंत्री ज्यावेळी अशी विधेयके सभागृहामध्ये आणतात त्यावेळी ते त्याची वकिली खूप चांगल्या प्रकारे करतात. मागच्या अधिवेशनामध्ये सुध्दा असे म्हटले होते की, वक्तृत्व चांगले असले की बाकीच्या पोलिसांना असे वाटते की, आपण काहीही केले तरी गृहमंत्री आपल्यावर पांघरून घालणार आहेत असे म्हणून ते त्या त्या जिल्हयामध्ये रेटून नेत असतात. मग पुणे जिल्हयामध्ये जसा स्फोट व्हायची वेळ आली तशी परिस्थिती निर्माण होत असते ही त्यातील वस्तुस्थिती आहे. म्हणून आपण संनियंत्रण, दखलपात्र गुन्हे आणि अदखलपात्र गुन्हे यांचा निपटारा जोपर्यंत करीत नाही तोपर्यंत ही विधेयके अक्षरश: मलमपट्टीसारखी आहेत आणि हे करीत असतांना जी संवेदनशीलता, जबाबदारीची भूमिका पोलीस अधिका-यांनी घेतली पाहिजे ती जर का वेळेवर घेतली नाही तर ते केवळ राजकीय नेत्यांच्या हातातील सूत्रधार म्हणून नाचून सामान्य माणूस त्यामध्ये भरडण्याची शक्यता असते, याकडे मला लक्ष वेधावेसे वाटते, एवढे बोलून मी आपली रजा घेते.

------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माझे मित्र सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी अगदी मर्मावर बोट ठेवलेले आहे. माननीय गृहमंत्री महोदयांच्या मी लक्षात आणून देऊ इच्छितो की, त्यांच्याकडे यासंबंधीची आकडेवारी असेल तर ती सभागृहात सांगावी.

महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, हातभट्टी या विषयावर मी फार जास्त चर्चा करणार नाही, अथवा त्यामध्ये मी जाऊ इच्छित नाही. कारण मुंबई शहर झोपडपट्टीगुंडांनी अतिशय मोठया प्रमाणात व्यापून टाकलेले आहे. जेथे मोकळया जमिनी असतील तेथे झोपडया बांधायच्या हेच काम सुरु आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना मला सांगावयाचे आहे की, आपण पुण्याला जात असतांना पूर्व द्रुतगती मार्गावरुन पनवेलकडे गेलो तर आपल्याला असे दिसेल की, दररोज तेथे हजारो झोपडया उभ्या राहतात. नवी मुंबई शहराच्या कमिशनरांना याविषयी विचारा की, एम.पी.डी.ए. खाली किती झोपडपट्टी दादांना आपण अटक केली. त्यातून कदाचित अशी माहिती समोर येईल की, गेल्या वर्षभरामध्ये एकाही झोपडपट्टी दादाला अटक केली नसेल. नंतर तुम्ही मुंबईच्या विकासाच्या प्रश्नावर चर्चा होते की, आपण मुंबईचा विकास कसा करायचा, कारण कोणच्याच झोपडया राहिलेल्या नाहीत. काल आपण कमाल जमीन धारणा कायदा रद्द केला. आता आपण त्या ठिकाणी हाऊसिंग बोर्डाची योजना आणणार आहात. यासाठी जमीन लागणार आहे. ही सर्व जमीन झोपडपट्टी दादांनी व्यापून टाकली असून त्या जमिनीवर झोपडया बांधून एक-दोन लाखाला विकलेल्या आहेत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, हा कायदा त्यांना का लागू करीत नाहीत ? माझ्या प्रश्नाला माननीय गृहमंत्री उत्तर देतील याचा मला पूर्ण विश्वास आहे. मी सभागृहाचा जास्त वेळ घेत नाही, मी नंतर आपल्याला ती यादी देईन. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, ज्या झोपडपट्टी दादांना काही पोलीस अधिकारी मदत करीत असतात त्या पोलीस अधिकाऱ्यांना सुध्दा तुम्ही हा कायदा लागू करणार काय ? हा कायदा त्यांना लावा. जाऊ द्या एखाद्या पोलीस कॉन्स्टेबलला. त्या दिवशी तुम्ही सभागृहात चर्चेच्या वेळी असे म्हणालात की, हा कायदा तोडला असेल तर मग तो कोणीही असो तरी त्याला त्या ठिकाणी We will go behind bars असे तुमचे उद्‌गार होते. आम्ही आपले कौतुक करतो. आम्ही आपल्या प्रामाणिकपणाबद्दल जराही शंका घेत नाही. हा कायदा खरच चांगला आहे. परंतु मुद्दा असा आहे आणि त्याची माहिती वाटल्यास पुढच्या अधिवेशनामध्ये सभागृहाच्या पटलावर ठेवा.

..3...

श्री.मधुकर चव्हाण ........

परंतु गेल्या वर्षभरात तुम्ही किती गुंडांना अडक केली ? सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये 52 ट्रान्झीट कॅम्प आहेत. त्या 52 ट्रान्झीट कॅम्पमध्ये या दादा लोकांनी सुमारे 60 हजार घरे तोडलेली आहेत. चाळी तोडलेल्या आहेत आणि लोकांना बेकायदेशीररित्या तेथे घुसविलेले आहे. त्या ठिकाणी एम.पी.डी.ए. कायद्याखाली तुम्ही किती लोकांना अटक केली ? म्हणून मला असे म्हणावयाचे आहे की, कायदा करणे हे फार सोपे असते. या विधेयकावर सभागृहामध्ये तास दीड तास चर्चा होईल, त्यावर माननीय गृहमंत्री महोदय उत्तर देतील आणि त्यानंतर कायदा पास होईल. पण त्या कायद्याची अंमलबजावणी होईल काय ? काल मी जसे दोन ओळीमध्ये सांगितले की, शपथ लेना तो सरल है, पर निभाना कठिन है, साधना का पथ कठिन है. तुम्ही हे सर्व दोन मिनिटात कराल. पण त्या ठिकाणी तुम्ही त्याचा अंमल काय करणार ? तुम्ही अंमल केला पाहिजे. माझी माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणामध्ये माननीय गृहमंत्री महोदयांकडून अपेक्षा आहे की, या कायद्याखाली गेल्या सहा महिन्यात आपण किती झोपडपट्टी दादांना अटक केली, त्याच बरोबर त्यांना मदत करणारे शासकीय, निमशासकीय अधिकारी, पोलीस यांना सुध्दा आपण हा कायदा लागू करणार काय ? एवढे बोलून मी थांबतो.

------

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

..4...

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय गृहमंत्र्यांनी धोकादायक व्यक्ती व त्यांच्या कृत्यांना आळा घालण्याबाबत हे सुधारणा विधेयक आणलेले आहे. मनात द्वंद्व असे सुरु आहे की, निश्चितपणे याची जर खरच प्रामाणिकपणे अंमलबजावणी होत असेल तर त्याचे स्वागत आहे.

यानंतर कु.जयश्री....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

आपला हेतून कदाचित प्रामाणिक असेल पण जे शस्त्र त्यांच्या हातात देणार आहात त्यांचे हात प्रामाणिक नसतात हा सातत्याने येणारा अनुभव आहे. माकडाच्या हाती कोलित दिल्यानंतर तो आगच लावणार आहे. निश्चितपणे याचा वापर कसा होतो हा पूर्वी आलेला अनुभव आहे. सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब यांनी नगरसेवकांनाच कसा एम.पी.डी.ए. लावण्याचा प्रयत्न चाललेला आहे, ते सांगितले. जेणेकरुन ते निवडणूकीलाच उभे राहू शकणार नाहीत. सर्वसाधारणपणे असे प्रयत्न पोलिसांकडूनच केले जातात.

मी फार लांबचे बोलणार नाही तर केवळ दोन तीन मुद्दे या बाबतीत मांडणार आहे. या हातभट्टीचा धंदा होत असलेल्या झोपडपट्टी काढण्यात याव्यात, ही आपली मागणी याकरिता मी आपल्याला सांगतो की, आपण त्याबाबत उचित कारवाई करावी. परंतु कदाचित ते तुमचे खाते नाही. मी हे सातत्याने मांडलेले आहे की, अशा प्रकारची झोपडपट्टी उभी राहणार आणि त्यामध्ये नंतर गुंड, दादा उभे राहणार. अगोदर झोपडपट्टी उभी राहते त्यानंतर ते झोपडपट्टीला कसा अधिकृत दर्जा मिळेल यासाठी सारेच प्रयत्न करीत असतात. त्यात नगरसेवक असतात, पोलीस असतात, खासकरुन रेशन खाते असते. रेशन कार्ड त्यांना कोण देते त्यांची तेथे दादागिरी सुरु होते. तुम्हाला सुखसोई युक्त झोपडपट्टी आम्ही देतो, असे सांगण्यात येते. आम्ही येथे मानवतावाद करतो. त्यानंतर ते झोपडपट्टीवाले तेथे तुमच्या आणि आमच्या नावाचे झेंडे तेथे लावतात, हे विदारक सत्य आहे आणि ते तुम्हाला कबूल करावेच लागेल. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी ज्याप्रमाणे येथे व्हाईट कॉलर क्राईम्सबद्दल सांगितले त्यांच्यावरही लवकरात लवकर कारवाई होणे गरजेचे आहे. मी परवा ज्याप्रमाणे मुद्रांक घोटाळयाचे सांगितले. तसेच गेले दोन आठवडे सातत्याने सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर सांगत आहेत की, कायद्याचे पाल करा, शासकीय नियमांचे पालन करा मी सांगतो की, आपल्याच खात्याचा धान्याचा घोटाळा कारवाईनंतर जे अधिकारी कर्मचारी सापडले त्यांना सस्पेंड करण्याचे आदेश देण्यात आले परंतु दुर्देवाने त्यातील दोन अधिका-यांना ते 48 तास तुरुंगात राहिल्यानंतर सुध्दा आजपर्यंत सस्पेंड करण्यात आले नाही. माननीय उप सभापतींनी यांसदर्भात सभागृहामध्ये निर्देश दिले की, संबंधित मंत्र्यांनी यासंबंधात निवेदन करावे. आजतागायत ते निवेदन सभागृहामध्ये केले गेलेले नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

यांनी विशेष उल्लेख सादर केला त्याचे उत्तर नाही. मी देखील औचित्याचा मुद्दा मांडला त्यावेळी संबंधित खात्याचे मंत्रिमहोदय सभागृहामध्ये उपस्थित होते तरीही त्याचे उत्तर आले नाही. कायदे कोणी पाळावयाचे आबा मी आपणासाठी सांगतो या कायद्याचे पालन का केले जात नाही. धान्य घोटाळयातील दोन अधिकारी श्री.सावंत व श्री.तळशेतकर नावाच्या अधिका-यांना सन 2006 मध्ये सस्पेंड करण्याचे आदेश दिल्यानंतरही आजपर्यंत त्यांना तुमचे राज्यसरकार निलंबित करु शकले नाही. कायदा कशासाठी आणता ? सभागृहामध्ये मांडावयाचा, त्यावरील भाषणांवर सुध्दा राज्यकर्ते उत्तर देत नाही, न्याय मिळत नाही. राज्यकर्ते देखील कायदा न पाळणा-यांच्या मागे उभे राहतात. "म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावतो." त्या अधिका-यांचे नितीधैर्य वाढते. या पध्दतीने हे विधेयक आणतांना यातील राजकीय हेतू जो आहे तो बाजूला ठेवण्यात यावा. मी अपेक्षा करतो आणि मागणी करतो की, विधेयकावर पुढील मार्ग नको सन 2000 ते सन 2007 पर्यंत रेशनिंग कार्डस प्रत्येक दुकानातून दिले गेले आपल्या कार्यालयातून त्याची माहिती मिळवा खरोखर किती माणसे ट्रान्सफर होऊन आली. म्हणजे त्यांचे नाव रेशन कार्डवर येते, मतदार यादीमध्ये येते.

यानंतर श्री.गागरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ AKA/ KTG/ MMP/ पूर्वी कु.खर्चे 13:20

श्री.अरविंद सावंत .....

सर्व अधिकार त्या लोकांना प्राप्त आहेत. हे मागच्या दाराने सुरु आहे. कागदावरील कायदे किती इफेक्टीव्ह होईल, असा संशय येतो. मावळ तालुक्यामध्ये लोणावळा येथे गणेशोत्सवाच्या काळात 2-3 कार्यकर्त्यांना पोलिसांनी पकडले. मला तालुका प्रमुखांचा फोन आला. अटक झालेले लोक चांगले असून त्यांना स्थानबध्द केले आहे. जिल्हा पोलीस अधिक्षक श्री.विश्वास नांगरे पाटील यांच्याशी मी बोललो. तसेच पोलीस स्टेशनच्या इन्स्पेक्टरकडे बोललो व म्हणालो की, ते गुन्हेगार असतील तर जरुर ठेवा. त्यांनी कोणता गुन्हा केला आहे तो मला सांगा. त्यांनी कोठेतरी राजकीय धरणे धरले असेल, रस्तारोको केला असेल. हे गुन्हे स्थानबध्द करायला पुरेसे आहेत का ? विचारा मावळच्या पोलीस स्टेशनला, का त्यांना 10-10 दिवस स्थानबध्द केले ? उद्या निवडणुक आली की, त्यांना ठरवून पुन्हा स्थानबध्द करुन टाकतील. माननीय सदस्य श्री.अनिल परब यांनी असेच भय व्यक्त केले आहे. माननीय उपमुख्यमंत्री यांचा हेतू चांगला असतो, परंतु त्यांना माहिती नाही की, खाली कशा प्रकारची माणसे आहेत ? कोणाच्या हातात तुम्ही कोलीत देत आहात ? मी दोन मागण्या केल्या आहेत. तुम्ही भुसावळमध्ये काय केले आहे ? भुसावळमधील आमदार व त्यांचे बंधू यांच्यावर बऱ्याच केसेस आहेत. हिम्मत असेल तर सांगा. आपण त्यांना राष्ट्रवादीचे पदाधिकारी करुन राष्ट्रवादीकडून उमेदवाऱ्या दिलेल्या आहेत. सत्तेत असल्यामुळे त्यांना कायद्यानेच नव्हे तर राजकीय प्रोटेक्शन दिले आहे. गृहखात्याने त्यांना सांगितले आहे का, तुम्हाला आमचे प्रोटेक्शन मिळेल, काय वाटेल ते करा म्हणून. त्यांच्या बऱ्याच केसेस कोर्टामध्ये चालू आहेत. फक्त विरोधकांना दाबायचे म्हणून तुम्ही हे करीत आहात. ते मुंबईमध्ये तुमची मोठ-मोठी 25-30 फुटाची होर्डींग लावतात. भुसावळ येथील आमदारांचा इतिहास काढा. त्यांचे नाव येथे घेणे योग्य ठरणार नाही, कारण ते या सदनात नाहीत. तुम्हाला त्यांचे नाव माहिती आहे. कायदा कोणासाठी आहे ? सत्ताधारी, राजकारणी किंवा आमच्यासाठी नसतील. पण ज्याला कोणाला टारगेट करावयाचे आहे, त्याला बरोबर टारगेट केले जाईल. त्यांना निवडणुकीच्या अगोदर पकडायचे व स्थानबध्द करावयाचे. या संदर्भात घटनेतील मुलभूत अधिकार मांडला गेला आहे. त्या व्यक्तीस पकडल्यानंतर त्याला एन.पी.डी.ए. मध्ये टाकणार असाल तर तीन महिने त्याला बोलताच येणार नाही. अटक का

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .....

केली, हे कोणाला विचारता येणार नाही. अशा प्रकारे माणसे भरडली जात आहेत. जी गुंड मंडळी आहेत त्यांना आत जाऊ द्या. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये दक्षता समिती आहे. त्यांना प्रोटेक्शन असते. नको त्यांना सोडून देतात किंवा अटकेत टाकतात. कायद्याचा हेतू जरी चांगला असला तरी माझा बाजू मांडण्याचा जो अधिकार आहे, तो आपण हिरावून घेत आहात. त्यांना आठ दिवसात त्यांची बाजू मांडू द्या. पोलिसांनी त्याला अटक करताना तुमच्याकडे सर्व पुरावे हवेत. हा गुंड आहे, याच्यापासून समाजाला धोका आहे, त्याला तुरुंगात टाका, पाच वर्षे कदैत टाका. हे पुरावे सादर केले पाहीजेत, न्यायव्यवस्थेवर विश्वास पाहीजे. त्याला कोठे बोलू द्यायचे नाही, त्यात एखादा गरीब भरडला गेला त्याला मात्र विचारायलासुध्दा वाव नाही. 3 महिने नाही तर 6 महिने त्याला सडविले जाते. माननीय गृहमंत्री यांनी या विधेयकाच्या बाबतीत दुसऱ्या बाजूचाही विचार करावा, अशी माझी अपेक्षा आहे. त्यातून यामध्ये काय सुधारणा करता येतील त्या कराव्यात, अशी अपेक्षा मी व्यक्त करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : आज दोन मोठया प्रस्तावावर चर्चा होणार आहे. त्यामुळे या प्रस्तावावर चर्चा करताना बरेच सदस्य बोलणार आहेत. हे सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. यानंतर श्री.मधुकर सरपोतदार बोलतील.

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आपण वेळेबद्दल आम्हाला सांगत आहात, मी सभागृहाबद्दल बोलू इच्छितो. आज सकाळी सभागृहात चर्चा सुरु झाली, आता भाषण करणाऱ्या सदस्यांना माझे सांगणे आहे की, सकाळी सत्ताधारी पक्षाचे फक्त तीन सदस्य उपस्थित होते. कशाकरिता अनुपस्थित राहतात ते ?. सत्ताधारी पक्षाचे तीन सदस्य उपस्थित होते तरी त्यांनी कामकाज सुरु केले आहे. कामकाजाबाबत सत्ताधारी पक्षाची जास्त जबाबदारी आहे.

यानंतर कु.धनश्री.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .......

आम्ही या सदनामध्ये संपूर्ण वेळे सभागृहामध्ये बसतो. त्यामुळे कोणते सन्मानीनय सदस्य सदनामध्ये किती वेळेसाठी बसतात, कधी येतात आणि कधी जातात हे सर्व आम्ही पहात असतो. मी आपणास सांगू इच्छितो की, हे कायदे मंडळ आहे. कायदे करणे हा या सभागृहाचा प्रधान हेतू आहे. त्यामुळे कायद्यावर बोलण्यासाठीच आपण बंधन आणले तर ही मोठी अडचण आहे. इतर सर्व विषयावर 2-2, 3-3 तास चर्चा होते. सन्माननीय उपमुख्यमंत्री यांना आपण विचारावे ते किती वेळ सदनात बोलतात ? त्यांच्या बोलण्याबद्दल मी त्यांचे स्वागत करतो. ते सत्ताधारी पक्षात होते, तरी बोलायचे व विरोधी पक्षामध्ये होते तरी देखील बोलावयाचे. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या बाजुला माननीय भुजबळ बसलेले असतात. त्यांचे देखील तसेच आहे. यासर्व अनुभवातुन आम्ही गेलेलो आहोत. महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याकरिता अधिनियम 1989यामध्ये सुधारणा करण्यासाठी हे विधेयक आणले आहे. आपण हे विधेयक आणले त्याबद्दल आपले स्वागत आम्ही करीत आहोत. माझा आपल्याला प्रश्न आहे की, या कायद्याची अंमलबजावणी कशी होणार आहे ? सन्माननीय सदस्य श्री. अनिल परब व अनेक सन्माननीय सदस्य यांनी यासंदर्भात त्यांची मते मांडली आहे. झोपडपट्टी दादा, औषधीद्रव्य विक्रेते, दाऊद टोळयांची माणसे हे किती ॲक्टीव्हेट असतात, पोलीसांचे त्यांच्यावर आणि त्यांचे पोलीसांवर किती प्रेम असते हे आपल्याकडे पत्रद्वारे मांडले आहे. त्यासंदर्भात अजून काहीही झाले नाही. या घटनेला आता साधारण 4 महिने होऊन गेलेले आहेत. मुंबईमध्ये अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकाम केले जात आहे. पूर्वी नौपाडा हे गावठाण होते. तेथे साधारण एक ते दीड हजार एवढी लोकवस्ती होती . तेथे सर्वत्र बैठी घरे होती. आता पंधरा दिवसांपूर्वी मी त्या संपूर्ण भागाची पाहणी केली त्यावेळी मला आढळून आले की, तेथे आता सर्व ठिकाणी 5 ते 6 मजल्याच्या इमारती उभ्या राहिल्या आहेत. दोन इमारतींमधून जाण्यासाठी पाच फुटांचा देखील रस्ता त्याठिकाणी नाही. यातील एखाद्या जरी इमारतीला धोका निर्माण झाला तर तेथून पळून जाता येणे शक्यच नाही. यदाकदाचित तेथे एखादा अपघात घडला तर सर्व शासन यंत्रणा तेथे धावते परंतु असा अपघात पुन्हा होऊ नये यासाठी काहीही केले जात नाही. या सर्व इमारती अनधिकृत आहेत. यापैकी काही इमारती तर पाच ते सहा मजल्याच्या देखील आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार.......

मुंबईमध्ये बॉंब स्फोट झाले त्यावेळी एम के बिल्डर नावाच्या एका बिल्डरने आरडीएक्स पुरविले असा त्याच्यावर आरोप होता. त्याच्याबद्दल निर्मलनगर पोलीस स्टेशनमध्ये लिहिलेली पत्रे आपण पाहिले तर आपल्या ते लक्षात येईल पोलीस त्यांना किती सांभाळीत आहेत. तत्कालिन माननीय मुख्यमंत्री श्री. सुधाकर नाईक यांच्याकडे देखील मी यासंदर्भात पत्र पाठविले आहे. परंतु याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. त्याठिकाणी एमके बिल्डरनंतर नसीमखान मच्छीवाले आले. त्यांनी स्वत:ची टोळी तयार केली. क्रॉफर्ड मार्केटमध्ये एका इसमावर त्याने गोळीबार केला. ती गोळी त्या इसमाला लागली नाही. परंतु सार्वजनिक ठिकाणी रिव्हॉल्व्हरचा वापर केला. त्यांच्यावर कलम 307 अंतर्गत केस करण्यात आली. त्यांना जामीन मिळाला आणि तो बाहेर आला. हा कयदा आपण अशाप्रकारे अनधिकृत बांधकामे करणाऱ्यांकरिता लावत आहोत मग त्या इसमावर का कारवाई करण्यात आली नाही ? निर्मलनगर पोलीस स्टेशनमध्ये आपण याबाबत विचारणा करावी. मुंबई महानगरमध्ये, विधान परिषदेमध्ये देखील हा प्रश्न उपस्थित करण्यात आला. नगरविकास खात्याच्या राज्यमंत्र्यांशी मी यासंदर्भात बोललो. त्यांच्यासमोर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त यांना देखील मी सांगितले. ते मला म्हणाले वहा जाने के लिये हमे डर लगता है.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/D/MMP. कु. गायकवाड नंतर --- 13:30

श्री. सरपोतदार .....

जरा नीट विचार करा, इतकी गंभीर स्थिती आज महापालिका अधिकाऱ्यांची या मुंबई शहरामध्ये आहे. एखाद्या वस्तीमध्ये जाण्याची त्यांची हिंमतच होत नाही. तरी देखील कोठलीही कारवाई त्या विरोधात पोलीस यंत्रणेकडून होत नाही. तेथे बिनधास्तपणे सगळे कामे चालू आहेत. तेथे मग आपला एमपीडीए का येत नाही. आता तुम्ही येथे 3 महिन्यांचा कालावधी 6 महिने करीत आहात. महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्य विषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम 1991 याच्या कलम 3 मधील पोटकलम 2 च्या परंतुकामध्ये 'तीन महिन्यांपेक्षा' हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे तेथे त्या मजकुराऐवजी "सहा महिन्यांपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल. म्हणजे तीन महिन्यांचा कालावधी वाढवून आपण 6 महिने आज करीत आहात, भविष्यात कदाचित 9 महिन्यांचा देखील आपण कराल आणि त्यानंतर पुढे काही दिवसांनी हा कालावधी एक वर्षांचा देखील होईल. हे जे आपल्याला करावे लागते त्याचे मूळ कारण असे आहे त्या कायद्याची योग्य प्रकारे अमलबजावणी होत नाही. अमलबजावणी करणे हे पोलीस ठाण्यांचे काम आहे. पण तेथे तर सगळ्याच प्रकारची देवाणघेवाण चालते, विचारांची चालते, इतरही सगळेच आदानप्रदान चालते. ते काही कोणाला माहीत नाही असे नाही. त्यामुळे कोणाला एमपीडीए लावायचा आणि कोणाला लावायचा नाही हे पोलीस स्टेशन्सनी ठरवायचे आहे. हा अधिकार काही आपल्याला नाही, आपल्याला तर ते कळतही नाही. सभापती महोदय, या नसीमखान मच्छिवाला यांने तेथील एका मुस्लिम बांधवावर, कुटुंबावर कसा अन्याय केला आहे ते मी उदाहरणादाखल आपल्याला सांगतो. त्यांचा वर जाण्यासाठी जीना आहे. त्याने तेथील खालची खोली विकत घेतली आहे. पाठीमागे त्यांना दरवाजा नव्हता. पण दरवाजा पाडण्यासाठी त्याने एकदा तेथे ड्रीलने होल केले. नंतर त्याला तेथे दरवाजा करावयाचा होता म्हणून त्याने तेथील पोलीस स्टेशनला जाऊन बांधणी केली. पोलिसांनी त्याला सांगितले, तुला जे काही करायचे ते बिनधास्त कर, आम्ही काय ते पाहतो. त्याची बांधणी डीसीपी लेव्हलपर्यंत झालेली आहे. आणि प्रत्यक्षात जेव्हा त्याचे प्रत्यक्ष जेव्हा त्या मुस्लिम कुटुंबाच्या पहिल्या मजल्यावरील घरामध्ये 10-12 गुंड घुसले आणि त्यांनी घरातील महिलेच्या पिस्तुल रोखले. त्यावेळेस तिचा नवरा त्यावेळेस घरात नव्हता, तो बाहेर गेलेला होता. अशा प्रकारे त्यांनी त्यांच्या घरामध्ये घुसून धुडगूस घातला, तेव्हा ते लोक जीव वाचवून निर्मल नगर पोलीस ठाण्यामध्ये आले आणि त्यांनी त्याबद्दलची

...... पीपी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार ....

तक्रार नोंदविली. त्यावेळी त्या गुंडांची दुसरी टीम देखील तेथे आली. मला ही घटना कळल्यानंतर प्रत्यक्षात मी पोलीस स्टेशनला गेलो तेव्हा मी पोलिसांना एवढेच सांगितले की, तुम्ही या प्रकरणात कायद्याच्या दृष्टीने योग्य असेल ती कारवाई करा. आपल्या पोलिसांनी काय केले असेल ? जे गुंड त्या खोलीमध्ये घुसले होते त्या गुंडांवर त्यांनी कारवाई करायला पाहिजे होती. त्या ऐवजी त्यांनी त्या घरातील त्या बाई, तिचा नवरा आणि मुलावर 324 कलम लावून त्यांना जामिनावर सोडून देण्यात आले. कारण त्या गुंडांना म्हणजे तेथील डीसीपीचा आशीर्वाद होता, त्यामुळे ते सुटले पाहिजेत अशी व्यवस्था केली गेली. सभापती महोदय, मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, आम्ही लोकप्रतिनिधी आहोत, अशा घटना आम्ही आपल्यापर्यंत, या सभागृहापर्यंत आणण्याचे आमचे काम आहे त्याप्रमाणे मी ते काम केले. एका मुस्लिम कुटुंबावर अशा प्रकारे गुंडांकरवी जबरदस्ती केली जाते तेव्हा त्याला तुम्ही जातीयवाद मानत नाही. त्या कुटुंबाला मदत करण्याची जबाबदारी कोणाची आहे ? पण या गुंडांकडून पोलीस ठाण्यांना सगळ्या बाजूने बांधून टाकले जाते. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांच्या शब्दात सांगावयाचे तर लक्ष्मीदर्शन घडले की, सगळे काही व्यवस्थित होते. आज त्या बिचाऱ्या कुटुंबावर केस चालू आहे आणि त्यासाठी प्रत्येक आठवड्याला त्यांना पोलीस ठाण्यात हजेरी लावावी लागते आणि त्यांच्या घरात घुसून त्यांना धमकावणारे गुंड मात्र बाहेर मोकाट फिरत आहेत, ते काहीही करू शकतात. अशा प्रकारे कायदा वाकविणारे असतील आणि पोलिसांकडूनच कायद्याचा दुरूपयोग होत असेल तर मग जनतेने कोणावर विश्वास ठेवायचा ? मी येथे या निमित्ताने माननीय उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्र्यांना आवाहनकरतो की, वाटल्यास त्यांनी त्यांचा एक दिवस माझ्या साठी द्यावा, मी तुम्हाला घेऊन जातो आणि हे सारे प्रकार कसे काय चालतात ते दाखवितो. तुम्हाला नाही तरी कोणताही धोका नाही, मात्र महापालिकेचे उपायुक्त बैठकीमध्ये माननीय राज्यमंत्र्यांसमोर म्हणतात की, वहाँ जाने के लिए हम लोगों को डर लगता है. मी त्यांना म्हटले की, मी तुमच्याबरोबर येतो. तर ते म्हणाले की, असे किया तो उससे भी जादा डर लगेगा. तेव्हा आपले पोलीस अधिकारी कोणाला मॅनेज होतात हे आपण लक्षात घ्या. सभापती महोदय, आपण अशा प्रकारे कायद्यात सुधारणा करून तीन महिन्याचा कालावधी वाढवून सहा महिन्यांचा करीत आहात ते योग्य नाही. आज तुरूंगाची परिस्थिती आपण पहा माझा तेथील सगळ्या पद्धतीच्या माणसांशी संबंध आला. जेलमधील पोलिसांच्या व्यथाही समजल्या. ... ( यानंतर श्री.सरफरे ...QQ 1 ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

त्यामध्ये नुकसान काही होत नाही. सरकारच्या मेहरबानीने माझ्यावर काहीही गुन्हा नसतांना जावे लागले. अशा पार्श्वभूमीवर हे राज्य संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीपासून चालले आहे. माझ्या नावावर कोणताही गुन्हा नाही. फक्त 144 कलमांचा भंग केला अशाप्रकारचे तांत्रिक स्वरुपाचे कलम लावले. आणि दुसरे कलम सामुदायिक चळवळीचे लावले. त्यामुळे माझा पासपोर्ट मला मिळत नाही. तेथील पासपोर्ट अधिकारी सांगतात की, जोपर्यंत तुमची चौकशी पूर्ण होत नाही तोपर्यंत तुम्हाला पासपोर्ट देता येत नाही. ठीक आहे, मला पासपोर्ट देऊ नका. मला परदेशात जावयाचे नाही. परदेशामध्ये चकरा मारणारे पुष्कळ लोक आहेत.तसेच, गुन्हेगाराच्या पाठीमागे फिरणारे मंत्रीसुध्दा आहेत. एका गुन्हेगाराला रिसिव्ह करण्यासाठी सभागृहात उत्तर देण्याचे सोडून एक मंत्री स्वत: पुणे येथे जातात. सभागृहात त्यांची आवश्यकता असतांना त्यांनी याठिकाणी गैरहजर रहावयाचे की, एका गुन्हेगाराला रिसिव्ह करण्यासाठी जाणे हे महत्वाचे याचा विचार होणे आवश्यक आहे? हाच या शासनाचा परफॉर्मन्स आहे काय?

सभापती महोदय, मला परवाची एक गोष्ट खटकली. भाजपचे या सदनाचे सदस्य श्री.नवनाथ आव्हाड यांच्यासंबंधीचा विषय सदनामध्ये उपस्थित करण्यात आला. त्याबद्दल मला खूप आश्चर्य वाटले. जो आमदार गेली तीन वर्षे कोमात आहे, त्याची चर्चा कामकाज सल्लागार समितीमध्ये झाली.त्यावेळी आपण देखील उपस्थित होता. आणि म्हणून त्याचबाबतची चर्चा झाली असतांना आणि पुढे त्याचे काय झाले हे माहीत नसतांना केवळ विधानसभेतील चार-पाच माननीय सदस्यांनी त्या सह्या बोगस आहेत की खऱ्या आहेत याची सुध्दा त्यांना माहिती नाही. असे असतांना सुध्दा तो विषय उपस्थित केला. त्या सभागृहात विषय उपस्थित केल्यानंतर या सभागृहात देखील तो उपस्थित करण्यात आला. हे पाहून मला आश्चर्य वाटले. या सभागृहाचा एक सदस्य गेली तीन वर्षे कोमामध्ये आहे, आजारी आहे अशा सदस्यांबाबत सभागृहामध्ये विषय उपस्थित करुन काय आनंद मिळाला. याचे राजकारण कुणी केले आहे हे मला कळले आहे, त्याबाबत मी भाष्य करीत नाही. ही बाब संसदीय लोकशाहीला आणि सभागृहाच्या कार्यपध्दतीला पोषक नाही. ज्यांनी हे केले त्या व्यक्तीचे नाव घेत नाही. सभागृहामध्ये कामकाज करीत असतांना एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करीत असतांना या सभागृहाचे पावित्र्य राखले गेले पाहिजे. या सभागृहातील सर्व लोकप्रतिनिधींचा योग्य तो सन्मान राखला गेला पाहिजें. जो कुणी चुकत असेल तर त्याला संभाळण्याचे आपले काम आहे. आणि म्हणून यामधील नाते अतिशय जवळचे आहे. आपण विरोधी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MMP/

श्री.मधुकर सरपोतदार..

पक्षामध्ये असा किंवा सत्ताधारी पक्षामध्ये असा, असे काही झाले तर आपल्या दोघांमधील नाते संभाळण्याची आवश्यकता आहे. सभागृहामध्ये कुणाचीही अशप्रकारे अवहेलना आणि अवमान करणे योग्य नाही असे मला याठिकाणी माझे मत नोंदवावयाचे आहे.

सभापती महोदय, माझी या विधेयकाच्या निमित्ताने विनंती आहे की, 3 ते 6 महिन्यांचे लेखी करार जरुर झाले पाहिजेत. परंतु तो करार होईल याची काळजी घेतली पाहिजे. याठिकाणी झोपडपट्टी दादा नाहीतर अनधिकृत बांधकाम करणारे लोक सुध्दा सर्रासपणे मोकाट सुटले आहेत आणि इतर सर्वसामान्य माणसे एम.पी.डी.ए. खाली जेलमध्ये जातात ही बाब भूषणावह नाही. हे महाराष्ट्र राज्य देशातील एक नंबरचे अग्रेसर राज्य आहे. असे असतांना या राज्यामध्ये हे प्रकार घडत असतात ही या राज्याची शोकांतिका आहे. ज्याप्रमाणे आपण  इतर गोष्टींकडे अधिक लक्ष देता त्याप्रमाणे या गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे. आपण मला जर एक दिवस वेळ दिला तर मी आपणाबरोबर भर वस्तीमध्ये फिरावयास तयार आहे. आपण मुंबईला गेल्यानंतर मला सांगा. त्याठिकाणी गेल्यानंतर हा सूर्य आणि हा जयद्रथ हे मी आपणास दाखविण्यास तयार आहे. मी याठिकाणी कोणतीही असत्य गोष्ट सांगत नाही. आणि जर मी सांगितलेले असत्य असेल तर आपण मला जेलमध्ये नेऊन बसवा. आणि जर सत्य असेल तर आपण काय कारवाई करणार ते सांगा? एवढेच मला यानिमित्ताने सांगावयाचे आहे. मी या विधेयकाला विरोध केला आहे. परंतु या कायद्याची अंमलबजावणी चांगल्या पध्दतीने होणार असेल तर जरुर त्या तरतुदी अंमलात आणाव्यात एवढे सांगून माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर.पाटील (गृहमंत्री) : सभापती महोदय, याठिकाणी नवीन प्रश्न उपस्थित करण्यात आले आणि विचारण्यात आले की, सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधक ठरेल अस कृत्य जर कुणी केले तर त्याबाबत नेमके काय करावयाचे? कायद्यातील तरतुदीप्रमाणे सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधक ठरणाऱ्या प्रवृत्ती आहेत त्यामध्ये झोपडपट्टी दादा आहेत. आता त्यांचे नाव बदलले असून या लोकांना दादा म्हणणे बरोबर नाही. त्याठिकाणी झोपडपट्टी गुंड अशाप्रकारे नावामध्ये पूर्वी दुरुस्ती केली आहे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील .....

झोपडपट्टी गुंडाच्या बाबतीत, ज्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहोचेल अथवा बाधा पोहोचण्याचा संभव असेल असे, झोपडपट्टी गुंड म्हणून तो काम करीत असेल किंवा करण्याची तयारी करीत असेल अशा व्यक्ती. हातभट्टीवाल्यांच्या बाबतीमध्ये, सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहोचेल अथवा बाधा पोहोचविण्याचा संभव असेल असे, हातभट्टीवाला म्हणून तो काम करीत असेल किंवा करण्याची शक्यता असेल अशा व्यक्ती. कायद्यामध्येच अशा लोकांची व्याख्या करण्यात आलेली आहे. धोकादायक व्यक्ती म्हणजे काय ? धोकादायक व्यक्ती याचा अर्थ भारतीय दंड संहितेच्या प्रकरण 16 किंवा प्रकरण 17 खाली शिक्षापात्र असलेल्या अपराधापैकी कोणताही अपराध किंवा शस्त्र अधिनियम, 1959 च्या प्रकरण 5 खाली शिक्षापात्र असलेल्या अपराधांपैकी कोणताही अपराध स्वत: किंवा टोळीचा सदस्य म्हणून सराईतपणे जो काम करीत असेल किंवा करण्याचा प्रयत्न करीत असेल अशा कृत्याला व अशी अपप्रेरणा देत असेल अशी व्यक्ती व असे कृत्य असा अर्थ आपण धोकादायक व्यक्ती आणि कृत्याच्या बाबतीत केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी अशाही शंका व्यक्त केल्या की, या कायद्याचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. वास्तविक ज्यावेळी मी रिव्ह्यू घेतला त्यावेळी एकंदरीतच या कायद्याचा पुरेपूर वापर केलेला नाही असेच मला आढळून आले आणि वापर न करण्याची कारणे म्हणजे हा कायदा करीत असताना एक दक्षता घेण्यात आलेली आहे की, शक्यतो अत्यंत आवश्यक असेल अशाच वेळी या कायद्याचा वापर केला जावा. आज राज्याची एकंदर स्थिती बघितली तर या वर्षभरात एकंदर एमपीडीएखाली 195 लोकांना अटक करण्यात आली आहे. राज्याच्या लोकसंख्येच्या तुलनेमध्ये आणि जेलमध्ये असलेल्या 26 हजार कैद्यांच्या तुलनेमध्ये या ॲक्टखाली अटक केलेल्यांची संख्या फार आहे असे मानता येणार नाही. याचे कारण असे की, झोपडपट्टी गुंड, हातभट्टी गुंड, औषधद्रव्य विषयक गुन्हेगार व घातक व्यक्ती यांचे प्रमाण बघितले तर त्या तुलनेमध्ये 195 व्यक्ती ही संख्या फार मोठी आहे असा निष्कर्ष निघू शकत नाही. यातही एक तर कागदपत्रांची खूप मोठ्या प्रमाणात पूर्तता करावी लागते. अशा व्यक्ती निश्चित झाल्यानंतर त्याला अटक करण्यासाठी शासनाची परवानगी घ्यावी लागते. परस्पर पोलीस किंवा आयुक्त कोणाला अटक करुन या कायद्याखाली तरुंगात घालतात असे घडत

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

श्री. आर. आर. पाटील .....

नाही. त्यांचे प्रस्ताव शासनाकडे पाठवले जातात. शासनाने प्रस्तावाला 12 दिवसांमध्ये मान्यता द्यावयाची असते. शासनाने मान्यता दिल्यावर अशा व्यक्तिला अटक केली जाते. अटक केल्यानंतर 5 दिवसांच्या आत कोणत्या कारणासाठी अटक केली हे त्या संबंधित व्यक्तिला लेखी कळवावे लागते. शासनालाही हे सगळे प्रकरण उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाच्या दर्जाच्या तीन जणांची समिती आहे त्या समितीसमोर ठेऊन मान्यता घ्यावी लागते. संबंधित व्यक्ती त्या ठिकाणी येऊन अपील करु शकतो, आपले म्हणणे देऊ शकतो. त्यांनी मान्यता दिल्यावर..

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, तीन जणांची समिती गठीत केली जाते. मूळ मुद्दा असा आहे की, त्या तीन जणांच्या समितीसमोर ज्यावेळी प्रकरण जाते त्याची कालमर्यादा किती असावी ? एखाद्या व्यक्तिला अटक केल्यानंतर पाच दिवसामध्ये चार्जशीट तयार करुन त्याला द्यावी लागते. चार्जशीट बनवण्यासाठीचा हा पाच दिवसांचा कालावधी अतिशय कमी आहे. म्हणून अगोदरपासून त्याची कागदपत्रे तयार करुन दिली जातात हे कोणालाही माहीत नसते. म्हणून त्या व्यक्तिला त्या ठिकाणी रिप्रेझेंट करण्याचा जो कालावधी आहे तो त्या पध्दतीने कमी असावा आणि जर तो गुन्हेगार ठरला तर त्याची शिक्षा जास्त असावी.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, संबंधित व्यक्तिला तीन आठवड्यांच्या आत अपील करण्याची मुभा आहे. एकंदरीत गेल्या वर्षी ज्या 195 व्यक्तिंना अटक केली त्यातील फक्त 17 व्यक्ती या समितीसमोर अपिलामध्ये गेलेल्या आहेत. बाकीच्या लोकांनी शासनाने घेतलेला निर्णय जवळजवळ मान्य केल्यासारखी स्थिती आहे. एकंदरीत पाहिले तर आपण एमपीडीए लावतोच असे नाही. आपण एमपीडीएचा आपण फार कमी ठिकाणी अत्यंत अभ्यासपूर्ण आणि आवश्यक त्या ठिकाणीच वापर करतो. सभापती महोदय, राज्यभरातील स्थिती जर बघितली तर झोपडपट्टीमध्ये राहून दादागिरी करणारे, त्याला प्रोत्साहन देणारे जे गुंड आहेत अशा फक्त एका केसमध्ये गेल्या 8-9 महिन्यामध्ये कारवाई करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील....)

ही कारवाई अत्यंत अल्प आहे. 3 हातभट्टीवाल्यांवर कारवाई केलेली आहे, 191 घातक व्यक्तीवर कारवाई करण्यात आलेली आहे. माझे मत असे आहे की, या कारवाया मोठ्या प्रमाणात झाल्या पाहिजेत आणि कारवाई करीत असताना कुठे निरपराध माणसावर अन्याय होता उपयोगाचे नाही. मध्यंतरी मंत्रिमंडळाने निर्णय केला. सिनेमांची व्हिडिओ पायरशी मोठ्या प्रमाणात केली जाते. कॅसेटची पायरसी केली जाते. मुंबईतील फिल्म इंडस्ट्री हा मोठा व्यवसाय आहे. एखादा पिक्चर तयार झाल्यानंतर तो थिएटरला लागण्यापूर्वीच त्याच्या पायरटेड व्हिडिओ सिडीज बाजारात मिळतात. त्यामुळे बॉलिवुडमधील धंदा टिकेल की नाही असा प्रश्न या व्यावसायिकांच्या समोर निर्माण झालेला होता. या पुढच्या काळामध्ये झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबतच्या कायद्याला मान्यता दिल्यानंतर त्यामध्ये व्हिडिओ पायरसी करणारे गुंड देखील समावेश होतील.

ॲड अनिल परब : अशा प्रकारचा व्हिडिओ पायरसी बंद करणारा कायदा आपण करणार आहात. त्याबाबतीत मी सूचना करु इच्छितो. मुंबईतील केबल ऑपरेटर्सनी केबल बंद केली होती. यासंदर्भात मी माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांना भेटलो होतो. याबाबतीत निरपराध लोक भरडले जात आहेत. व्हिडिओ फिल्मस्च्या बाबतीत हायकोर्टाने एक जजमेंट दिली. जेथून ट्रान्समिशन केले जाते ते लोकांच्या घरापर्यन्त केबलच्या माध्यमातून पोहोचविण्याचे काम हे केबल ऑपरेटर्स करतात. हे मल्टि सिस्टिम ऑपरेटर्स गुन्हेगार ठरतात. पण ते फक्त वाहक असतात. हायकोर्टाने जजमेंट दिल्यानंतर मुंबईतील जवळ जवळ 8-10 एमएसओज्ना पोलिसांनी सील केले. हे करीत असतना पोलिसांनी जजमेंटचा आधार घेतला. पोलिसांनी सांगितले की, आम्हाला वस्तुस्थिती कळते, हे गुन्हेगार नाहीत. सभापती महोदय, ट्रान्समिशन परदेशातून किंवा दुसरीकडून कोठून होते आणि त्यामध्ये हे केबल ऑपरेटर्स् भरडले जातात. हा केन्द्र शासनाचा विषय आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांना मी या संदर्भात भेटलो होतो आणि त्यांनी मला मदत देखील केली होती आणि त्यांनी सरकारी वकिलांना सांगून आमचे म्हणणे होयकोर्टामध्ये मांडले होते. त्यामुळे हळूहळू सुधारणा झाली. परंतु त्यावेळी 4-5 केबल ऑपरेटर्स्ना अटक झाली होती आणि त्यावेळी मुंबईतील केबल बंद झाली होती. तेव्हा याबाबीचा देखील अवश्य विचार करावा अशी माझी माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : केन्द्राची मान्यता मिळाल्यानंतर कायद्यामध्ये ही गोष्ट समावेश करण्याचा विचार निश्चित करण्यात येईल. आज आपल्यासमोर जे विधेयक आहे ते तीन महिन्यांची मुदत सहा महिन्यापर्यन्त वाढविण्याच्या बाबतीत सरकारला अधिकार मिळावेत एवढयासाठीच आहे. तीन महिन्याचे अधिकार डेलिगेट केले तर त्यासाठी चार वेळा नोटिफिकेशन काढावे लागते आणि मध्ये काही वेळा गॅप येते. प्रशासकीय कारणासाठी हे विधेयक आणलेले आहे. तीन महिने ॲरेस्ट करता येत होती आता 6 महिने ॲरेस्ट करता येईल यासाठी हे विधेयक नाही. गृहमंत्री तीन महिन्यासाठी जे अधिकार डेलिगेट करीत होते ते आता एका वेळी 6 महिन्यासाठी अधिकार डेलिगेट करु शकातात, अशा प्रशासकीय कारणासाठी हे दुरुस्ती विधेयक आणलेले आहे. कायद्याचा मूळ हेतू आणि उद्देश यामध्ये कोणताही बदल केलेला नाही. प्रशासकीय सोयीसाठी बदल करण्यात येत आहे. म्हणून या विधेयकाला सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

श्री. मधुकर चव्हाण : गेल्या वर्षी या कायद्याखाली 165 लोकांना पकडले. त्याबाबतीत मी आपणास चॅलेंज करीत नाही. परंतु मुंबईमध्ये गेल्या 6 महिन्यामध्ये ज्या 37 झोपडपट्टीदादांनी अनधिकृत झोपडया उभारलेल्या आहेत त्यांना आपण पकडणार आहात काय ?

श्री. आर.आर.पाटील : मुंबईमध्ये झोपडपट्टीगुंडाकडून झोपड्या वाढण्यासाठी मिळत असलेले प्रोत्साहन महाराष्ट्रामध्ये विशेषत: जेथे जास्तीचे औद्योगिकीकरण झालेले आहे अशा पुणे, हिंजवडी परिसरामध्ये काही गुन्हेगारांच्या टोळया आढळून आलेल्या आहेत.

...नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ D/ 13:50

श्री.आर.आर.पाटील..........

एकंदरीत या कायद्याची अंमलबजावणी अत्यंत प्रभावीपणे करण्याची आवश्यकता आहे व निश्चितपणाने अशी अंमलबजावणी केली जाईल.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन 2007 चे वि.स.वि.क्रमाक-53 संमत करण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक-53 संमत झाले आहे.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 च्या सूचनेवरील निवेदनासंबंधी</u>

श्री.पांडुरंग फुंडकर : तालिका सभापती महोदय, नियम 93 अन्वये मांडलेल्या सूचनांवरील निवेदने आज पटलावर ठेवण्याचे निर्देश माननीय सभापतींनी दिले होते. किमान सन्माननीय सदस्यांना निवेदनच्या प्रती मिळाल्या पाहिजेत. यासंबंधी माननीय सभापतींशी चर्चा झाली होती व त्यांनी होकार दिला होता.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, हाफकीन इन्स्टिट्यूटसंबंधी माननीय राज्यमंत्री श्री.बाबा सिद्दिकी हे सभागृहात आले तर त्यासंबंधी चर्चा करता येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अचलपूर येथील दंगलीसंबंधी काल निवेदन केले जाणार होते, ते अद्यापही केलेले नाही.

श्री.आर.आर.पाटील : अचलपूर येथील दंगलीसंबंधी निवेदन पटलावर ठेवले जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विधेयके मंजूर करीत असताना आपण अनुकूल असतील त्यांनी "होय" म्हणावे असे म्हटले. परंतु "होय" असा आवाज ऐकू आला नाही. आम्ही मतदान घ्यावे अशी मागणी केली असती तर काय घडले असते? ही जबाबदारी कोणाची आहे? केवळ विधेयके पास करुन घ्यायची का? सत्ताधारी पक्षाचे सदस्य सभागृहात हजर असणे आवश्यक आहे. त्यांनी शासनाला मदत केली पाहिजे. आम्ही मतदानाची मागणी केली तर मग भानगडी होतात. त्याचा वेगळा अर्थ काढला जातो. शेवटच्या दिवशी तीनही विधेयके मंजूर करीत असताना आम्ही ती अडवू शकलो असतो. सभापती महोदय,आपण शासनाला सक्त ताकीद दिली पाहिजे. सरकार चालविण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाची आणि त्यांच्या सदस्यांची नाही का?

**तालिका सभापती** : महत्वाची विधेयके सभागृहात पारित होत असताना सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी सभागृहात उपस्थित राहणे अतिशय आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

----

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनेसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

उपसचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाजाच्या पत्रिकेतील बाब क्रमांक चारच्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 168 या लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 168 ही निवेदने कृपया छापावी.)

---

(नंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्या बाबत**

श्री. मधुकर सरपोतदार ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मुंबईच्या अतिरिक्त पोलीस आयुक्तांनी (कायदा व सुव्यवस्था) मुंबई शहर व उपनगरातील पालीस स्टेशनमध्ये पूर्वीपासून लावलेल्या या हिंदू देवदेवतांच्या तसबिरी व राष्ट्र पुरुषांचे फोटो तात्काळ काढून टाकण्याचे दिलेले आदेश, मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील पोलीस स्टेशनमध्ये पूर्वीपासून असलेल्या हिंदू देवदेवतांच्या व अन्य इसाई किंवा मुस्लीम देवतांचे तसबिरी व राष्ट्रपुरुषांचे फोटो काढण्याचे आदेश दिलेले आहेत. देवी-देवतांच्या तसबिरी का व कशासाठी काढण्यात याव्यात, याबाबत सदर आदेशात खुलासा केलेला नाही. या आदेशामुळे पोलीस स्टेशनमधील तमाम हिंदू अधिका-यांच्या, जनतेच्या व पोलीस कर्मचा-यांच्या भावना दुखावणे, सदर आदेश हा शासनाच्या धोरणात्मक निर्णयाचा भाग आहे काय? याबाबतीत शासनाने खुलासा करण्याची आवश्यकता आहे. किंवा दिलेले हे आदेश त्वरीत मागे घेऊन पूर्वीपासून जी चालत आलेली प्रथा आहे, परंपरा आहे परंतु कोणी तरी अधिकारी येतो आणि एका फटक्यात सर्क्युलर काढतो हे काही बरोबर नाही. देवी-देवतांच्या तसबिरी काढणे हे भावना दुखावणारे कार्य आहे त्यामुळे कृपया धार्मिक विषयाच्या संदर्भात अशा प्रकारचे आदेश देऊ नयेत एवढेच मला औचित्याच्या मुद्या द्वारे शासनास होते.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, नोंद घेण्यात आलेली आहे.

-----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक मतदार संघ ) : सभापती महोदय, परभणी कृषी विद्यापीठाला मंजूर पदे उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात औचित्याच्या मुद्याद्वारे विचार व्यक्त करीत आहे.

सभापती महोदय, परभरणी येथील कृषी विद्यापीठ हे जुने कृषी विद्यापीठ असून या विद्यापीठाअंतर्गत कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु आहे. या ठिकाणच्या पदव्यूत्तर अभ्यास क्रमाची क्षमता राज्यातील इतर कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयांपेक्षा जास्त असतांना सुध्दा परभणी येथील कृषी महाविद्यालयात निम्म्याच शिक्षक व शिक्षकेतर पदांना मान्यता दिलेली आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय अकोला येथील प्रवेश क्षमता 65 असून, मंजूर पदे 101 आहेत. डॉ. अन्नासाहेब शिंदे, कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय, महात्मा कृषी विद्यापीठ राहूरी या विद्यापीठाची प्रवेश क्षमता 80 असून मंजूर पदे 103 आहेत. कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय , मराठवाडयाची प्रवेश क्षमता 80 असून मंजूर पदे फक्त 58 आहेत. कृषी अभियांत्रिकी विद्यालय बाळासाहेब सावंत , कोकण कृषी विद्यापीठ दापोली हे विद्यापीठ आता आता म्हणजे 2001 मध्ये स्थापन झाले असून त्याची प्रवेश क्षमता 42 असून मंजूर पदे 101 आहेत. म्हणजे राज्यातील चारही कृषी विद्यापीठाची तुलना केली तर सर्वात जास्त प्रवेश क्षमता कृषी विद्यापीठ परभणीची असतांना या ठिकाणी सर्वात कमी पदे मंजूर केलेली आहेत. म्हणून यासंदर्भात शासनाने तातडीने निर्णय घेण्याची गरज आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय,नोंद घेण्यात आलेली आहे.

-----------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यभरात आयात केलेल्या निकृष्ठ गव्हाचे होत असलेले वितरण.

**मु.शी.** : राज्यभरात आयात केलेल्या निकृष्ठ गव्हाचे होत असलेले वितरण यासंबधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे , डॉ. नीलम गो-हे, सर्वश्री मधु चव्हाण, अरविंत सावंत वि.प.स. यांनी नियम 260 अन्वये दिलेला प्रस्ताव.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय मी आपल्या अनुमतीन नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"केंद्र सरकारने जून, २००६ पासून विदेशातून गहू आयात करण्यास सुरुवात करणे, विदेशातून विदेशातून आयात करण्यात आलेल्या या लाल गव्हापैकी लाखो टन लाल गहू भारतीय अन्न महामंडळाकडून महाराष्ट्रात पाठविण्यात येणे, गेल्या वर्षभरात नोव्हेंबर, २००६ पासून या आयात लाल गव्हाचा दर्जा तपासण्यासाठी राज्य सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रयोगशाळेत तसेच राज्यभरात इतर अनेक ठिकाणी या गव्हाचे नमुने पाठविले असता ते माणसांना खाण्यास अयोग्य असल्याचा अहवाल प्राप्त होणे, राज्य शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने एप्रिल,२००७ मध्ये राज्य सरकारला तपासणीसाठी पाठविण्यात आलेल्या नमुन्यांपैकी शेकडो नमुने पी.एफ.ए. प्रमाणकांनुसार नसल्यामुळे त्याचे वितरण ताबडतोब थांबविण्यात यावे असे स्पष्टपणे कळविणे, ठाणे जिल्ह्यातील चौदा तालुक्यांमध्ये १६०० स्वस्त धान्य दुकानातून या सडक्या आयात गव्हाचे वाटप केले जाणे, दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या १,३०,००० कुटुंबियांना तसेच शासनाच्या अंत्योदय योजनेअंतर्गत १,३९,००० कुटुंबांना अत्यल्प दराने पुरवठा केला जाणे, मानवाधिकार आयोगाकडे याबाबतच्या तक्रारी आल्यानंतर मानवाधिकार आयोगाने सडक्या लाल गव्हाचे वितरण थांबविण्याबाबत सरकारला निर्देश देणे, उच्च न्यायालयानेही या निकृष्ट गव्हाचे वितरण थांबविण्याबाबत निर्देश देणे, या गव्हाचे वितरण थांबविण्यात येईल असे प्रतिज्ञापत्र राज्य शासनाने मानवाधिकार आयोगाकडे सादर करुनही राज्यात अनेक ठिकाणी या गव्हाचे वितरण सुरु राहणे, हा गहू खाल्ल्याने अनेक नागरिकांना अनेक प्रकारचे आजार होणे, या संपूर्ण व्यवहारात कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार होणे, शासनाचे याकडे झालेले अक्षम्य दुर्लक्ष व याप्रकरणी करावयाची तातडीची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

सभापती महोदय, विरोधी पक्षातर्फे सभागृहात मांडला गेलेला प्रस्ताव महाराष्ट्राच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे तसेच तो केंद्र सरकारच्या दृष्टीनेही महत्वाचा आहे. या देशामध्ये शेतक-यांच्या हिताचे धोरण राबवायचे आहे की, शेतक-यांना आत्महत्या करण्याकरिता प्रोत्साहन देण्याचे धोरण राबवायचे हा खरा प्रश्न आहे. आयात गहू घोटाळा म्हणजे एक प्रकारे शेतक-याला आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त करण्याचेच काम यामधून होत आहे की, काय हे लक्षात येत नाही.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...........

हा गहू आपल्या देशात आयात करण्याची गरज होती का, गव्हाचा तुटवडा होता का, बाजारात गहू मिळत नाही अशाप्रकारची तक्रार जनतेने केली होती का ? असे कोणतेही कारण नसताना लाल गहू आयात करण्यात आला. या गव्हाच्या पोळ्या फार रुचकर, चवदार आहेत असे सांगितले गेले. त्या संदर्भात आलेले फोटो मी आपणास दाखविणार आहे. परदेशातून आयात केलेला लाल गहू सडका, कुजका असून परदेशात तो डुक्करांना खायला देतात, तो गहू 16 रुपये किलोने आयात केला. आपण राज्यातील शेतकऱ्यांना किलोमागे 8.50 रुपये देतो. ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. या लाल गहू आयातीच्या बाबतीत एक गोष्ट चांगली झालेली आहे ती म्हणजे, या गव्हाची आयात करणारे नेते राष्ट्रवादीचे, गव्हाचा पुरवठा करणारे मंत्री श्री.सुनील तटकरे राष्ट्रवादी पक्षाचे, या गव्हाच्या संदर्भात काँग्रेस, भाजप व शिवसेना पक्ष यांनी तक्रार केल्यानंतर हा गहू लॅबोरेटीजमध्ये पाठवून तो माणसास खाण्यास अयोग्य आहे असा रिपोर्ट देणाऱ्या मंत्री डॉ.विमलताई मुंदडा या देखील राष्ट्रवादी पक्षाच्या. खरे म्हणजे मी माननीय मुख्यमंत्र्यांना धन्यवाद देतो. कारण आम्ही केलेल्या तक्रारींची दखल घेऊन त्यांनी लाल गव्हाचे वाटप बंद करण्याचा निर्णय घेतला.

सभापती महोदय, महाराष्ट्रात अनेक रेशनिंग दुकानामध्ये या लाल गव्हाचे वाटप करण्यात आले. हा गहू विशेष घटक योजनेतील लाभार्थ्यांना देण्यात आला, दलित, शोषित वर्गाला देण्यात आला, आदिवासींना देण्यात आला. रोजगार हमी योजनेवर काम करणाऱ्या मजुरांना देण्यात आला. हा गहू कोणाकरिता आयात करण्यात आला, तर समाजातील जे शोषित, दलित, आदिवासी आहेत त्यांच्यासाठी आयात करण्यात आला. याठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबडेकर व महात्मा फुले, शाहू महाराज यांचे नाव घेऊन राज्य करायचे आणि सर्वसामान्य जनतेला सडका, कुजका गहू 16 रुपये दराने आयात करायचा. सर्वसामान्य जनतेला सडका व कुजका गहू वाटण्याचे पाप या सरकारने केलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...........

सभापती महोदय, आयात केलेल्या लाल गव्हाबाबत आम्ही उच्च न्यायालयात एक याचिका दाखल केलेली आहे. त्याच बरोबर मानव अधिकार आयोगाकडे केस दाखल केलेली आहे. या केसवर जे रिमार्क्स पास केलेले आहेत ते राष्ट्रवादी नेत्यांच्या डोळ्यात अंजन घालणारे आहेत. त्यामध्ये म्हटले आहे की, "माणसाला व्यवस्थित खाण्यायोग्य गहू दिला पाहिजे, माणसाला चांगल्या प्रकारचे धान्य देणे हे सरकारचे कर्तव्य आहे. सरकारने भविष्यात कोणतेही खाद्य आयात करताना ते माणसाला खाण्या योग्य असेल हे तपासले पाहिजे."

सभापती महोदय, रेशनवर लाल गव्हाचे वाटप होते अशी ओरड सुरु झाल्यावर सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.सुनील तटकरे यांनी एक बैठक बोलाविली आणि सांगितले की, हा लाल गहू ब्रेड आणि बिस्कीटसाठी वापरावा. जो गहू माणसाला खाण्या योग्य नाही अशाप्रकारचा रिपोर्ट आलेला असताना तो गहू ब्रेड आणि बिस्कीटसाठी वापरावा असे मंत्रिमहोदयांनी सांगितले. जेव्हा प्रकार लक्षात आला तेव्हा पुन्हा ओरड झाली. तेव्हा हा प्रकार बंद झाला.

सभापती महोदय, मानव अधिकार आयोगाने काय म्हटले आहे ते मी आपणास वाचून दाखवितो.

" After hearing the learned Advocate for the Petitioners as well as Shri Bakshi, Principal Secretary of Government of Maharashtra, following undisputed facts emerged :

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

"The red wheat imported by the State Government for distribution for PDS and open Market Sales Schemes (Domestic) people started making complaints regarding the quality of wheat as the same was inferior in quality and not fit for consumption. The State Government was required to send the 265 samples to Government Laboratory. 229 samples out of 265 turned out to be unfit for human consumption. With the result, the State Government was required to stay distribution on 12.4.2007. Again, State Government send 252 samples of wheat to Government Laboratory, Pune. This time the Laboratory opined 72 samples were unfit for human consumption and the rest found fit. The State Government, thereafter, instructed shopkeepers under OMSS to destroy the stock as stock started deteriorating." हा आपल्याच पुणे येथील पब्लीक हेल्थ लॅबॉरटीरीचा रिपोर्ट आहे. मानवाधिकार सी.जस्टीस यांनी अशाप्रकारे रिपोर्ट सादर केलेला आहे. अशाप्रकारचा सडका, कुचका गहू डुकरांनाही खाण्याच्या लायकीचा नाही, तो गहू प्राण्यांनाही देण्याच्या लायकीचा नाही. माझा प्रश्न असा आहे की, या गव्हाचे आपण काय करणार आहात ? माझी आपल्याला विनंती आहे की, या माध्यमातून आपण राष्ट्रवादी गांडूळ खत प्रकल्प सुरु करा. गावागावामध्ये जाऊन राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे गांडूळ खताचे प्रकल्प सुरु करा. सभापती महोदय, त्यांच्या गांडूळाचा खत पिकांना दिला तर त्याचे काय परिणाम होतील ? मलकापूरमध्ये गॅस्ट्रोची लागण झ ाली. मी असे म्हणत नाही तर आपले न्यायमूर्तीच असे म्हणतात की, " In view of the above, prima facie it does appear to the Commission that the State Government imported wheat from the Central Government, the Food Corporation of India for distribution to the Fair Price Shops of the PDS as well as Open Market Sales Scheme (OMSS) were of inferior quality This is evident from the fact that the State Government was required to stop distribution of PDS with

..2....



श्री.नितीन गडकरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

effect from 31.10.2007." अशाप्रकारचे आदेश मानवाधिकार आयोगाचे हायकोर्टाचे जस्टीस यांनी आदेश दिलेले आहेत. तरीसुध्दा राष्ट्रवादीचे लोक म्हणतात की, हा गहू चांगलाच आहे, तो चवदार आहे. परवा पार्लमेंटमध्ये कृषिमंत्र्यांना सांगण्यात आले की, याचे प्रात्येक्षिक करुन दाखवावे. परंतु मला कळत नाही की, माननीय उल्हास दादा आपण पुण्याचे आहात. आपण या चवदार गव्हाचा का आस्वाद घेत नाहीत ? परंतु आपली प्रकृती यामुळे बिघडणार आहे. यामुळे आपले शारीरिक व मानसिक स्वास्थ बिघडणार आहे. असे असतानाही आपले माननीय मंत्रिमहोदय म्हणतात की, हा गहू चांगला आहे. आपल्या विभागाचे सेक्रेटरी श्री.बक्षी असे म्हणतात की,"Shri Bakshi, Principal Secretary has made statement before the Commission that 1. State Government has issued order dated 31.10.2007 to stop the distribution of red imported wheat through the fair price shops of the PDS. 2) Directives have been given to the District Authorities to conduct Laboratory analyses of stock lying in each of the State Government Godowns. 3) The State Government is going to ask the Government of India regarding disposal of red imported wheat approximately 33000 metric ton lying in the Godowns and will not be distributed to fair price shops under PDS herein after." मग, हा गहू चवीला चांगला व चवदार आहे का ? आपल्या खात्याच्या सचिवांनीच दिनांक 31.10.2007 रोजी या गव्हाचे डिस्ट्रब्यूशन थांबविण्याचे आदेश काढलेले आहेत. माननीय मंत्रिमहोदय आपण कोणाची बाजू घेत आहात ? आज कित्येक गरीब लोकांना डिसेंट्री, गॅस्ट्रो, कॉलराची लागण झालेली आहे. माझी माननीय मंत्रिमहोदयांस अशी सूचना आहे की, आपण ज्या ज्या ठिकाणी राष्ट्रवादी गांडूळ खताचे प्रकल्प सुरु करणार आहात, त्याठिकाणी आपण त्याचे उद्घाटन करा. त्यावेळी आपण स्वत:, आणि माननीय श्री.गिरिष गांधी या प्रमुख राष्ट्रवादी नेत्यांनाही तेथे घेऊन जा व त्याठिकाणी आपण राष्ट्रवादी गांडूळ खत प्रकल्प सुरु करा.. श्री.बक्षी यांचा रिपोर्ट असा आहे की, "The State Government has already started supply and distribution of white/indigenous wheat received from the Food Corporation of India to the PDS."

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...........

अध्यक्ष महोदय, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागातर्फे लाल गव्हाचा दर्जा तपासण्यासाठी निदेश देण्यात आले आहेत, त्या निर्देशाच्या पत्रात स्पष्टपणे म्हटले आहे........ सन्माननीय तटकरेसाहेब हे आपणच म्हटले आहे........आदेशात असे म्हटले आहे की, "केंद्र शासनाच्या सूचना विचारात घेता असे निर्देश देण्यात येत आहेत की, राज्यातील सर्व शासकीय गोदामांमध्ये आणि सर्व स्वस्त धान्य दुकानांमध्ये साठवणुकीस असलेला लाल गहू प्रयोगशाळेत पाठवून तपासणी करण्यात यावी, तोपर्यन्त त्याचे वितरण करण्यात येऊ नये. सदर लाल गव्हाची गुणवत्ता विहित मानांकनापेक्षा कमी आढळल्यास स्वस्त धान्य दुकानदारांमार्फत त्याचे वितरण करण्यात येऊ नये." आदेशानुसार, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, दिनांक 31 ऑक्टोबर, आदेशाच्या खाली सही डॉ.ए.टी.कुंभार, उपसचिव, अनन व नागरी पुरवठा विभाग यांनी केली आहे. काहो, तुम्ही मला एक सांगा, तुम्ही म्हणता गहू चांगला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने एक पुस्तिका पण काढली. ही पुस्तिका काढत असतांना तुम्ही ब्रिफिंग केले नाही का ? हे आदेश तुम्हीच लिहून कळविले होते ना ? मग ही वस्तुस्थिती तुम्ही माननीय उपमुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून दिली नाही का ? गहू चांगला आहे, पण तुम्ही बदनामी करता, असाही आरोप तुम्ही आमच्यावर करता. दिनांक 28 मार्च 2004 ते 1 एप्रिल 2007 या कालावधीत मुंबई, ठाणे या शिधावाटप क्षेत्रातील 740 शिधावाटप केंद्रांची तपासणी करण्यात आली, 268 शिधावाटप केंद्रातील गव्हाचे नमूने राज्य सरकारकडून सार्वजनिक आरोग्य विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आले होते. त्यांनी दिलेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे की, सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पुरविण्यात येणारा गहू माणसांनी खाण्याच्या योग्यतेचा नाही. सरकारने स्पष्टपणे प्रत्येक वेळी म्हटले होते की, त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या नमुन्यापैकी 229 नमुने 1955 च्या आरोग्य सेवा अधिनियमान्वये माणसांच्या खाण्यास लायक नाही, मुर्शी वाढल्यामुळे गहू खराब झाला आहे. या गव्हाचे आता तुम्ही काय करणार आहात ? राष्ट्रवादी गांडुळखत अभियान सुरु करणार आहात, जरुर करा. हा प्रकल्प सुरु केला तर जरुर तुम्हाला राष्ट्रीय काँग्रेसचे देखील सहकार्य मिळेल. एक गोष्ट मात्र राष्ट्रवादी काँग्रेसची मंडळी नेहमी

....2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.........

सांगतात की, हा दिल्लीमध्ये झालेला कॅबिनेटचा निर्णय आहे, हा लाल गहू, डुकरांनीही खाण्याच्या लायकीचा नसलेला गहू आणला तो आम्ही एकटयाने आणलेला नाही, केंद्र सरकारच्या कॅबिनेट मंत्र्यांपासून पंतप्रधानांपर्यन्त सगळयांची याला मान्यता आहे. From the above statement on behalf of the State Government by the Principal Secretary, Food and Civil Supplies and Consumer Protection Department, Mantralaya, Mumbai, it is clear that the State Government has virtually accepted..." Here the word used is "Virtually accepted". It further states that: ".....the grievances voiced in the Petition. Since the policy decision has been taken in the matter not to distribute the red imported wheat which is of inferior quality to the fair price shops under the PDS and that the State Government is seeking appropriate directions from the Government of India regarding disposal of the red imported wheat."

यानंतर श्री.बोरले........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ AKN/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ..... 14:15

श्री.नितीन गडकरी .....

Sir, it is further stated that: " The Commission does not think it necessary to give further directions.However, considering the facts that a humanbeing is required to live in a dignified manner and living for the same is to be provided proper food, fit for human consumption, it is recommended that the State Government shall in future while importing wheat and/or any other food items shall make an endavour to see that the same should be fit for human consumption it fulfills the required standards and in conformity with PFA Rules 1955."

सभापती महोदय, नियंत्रक, शिधावाटप संचालक, नागरी पुरवठा, महाराष्ट्र शासन यांचे पत्र माझ्याकडे आहे. नागरी पुरवठा यांच्या कार्यालयातील श्री.गणेश ठाकूर यांनी सचिव, अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, मुंबई यांना दिनांक 9 एप्रिल, 2007 रोजी पत्र पाठविलेले आहे. त्या पत्रामध्ये त्यांनी काय म्हटलेले आहे. माझ्याकडे चार जिल्हाधिका-यांची पत्रे आहेत. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना मी वाचून दाखविणार आहे. सभापती महोदय, हे सर्व नमुने खराब निघाले. "Confirms to the Standards of Wheat as per item No. A 18.06.01 Appendix B of PFA Rules,1955 The 229 wheat samples also does not confirms to the standards of wheat as per item No.A 18.06.01 of Appendix B of PFA Rules,1955." हा गहू माणसांनी खाण्याच्या लायकीचा नाही, प्राण्यांना सुध्दा खाण्याच्या लायकीचा नाही आणि तुम्ही असा गहू 18 रुपये किलोने आयात करता ? गहू आयात करण्याची गरज होती काय, तुम्ही सांगा की, तुमच्या गावामध्ये गव्हाची टंचाई होती काय, गव्हाचे भाव वाढल्याची एक तरी बातमी तुम्ही वाचली काय, कशाला आणला हा घाणेरडा गहू ? कशा पद्धतीने घोटाळा झालेला आहे हे मी सांगणार आहे. सभापती महोदय, ही लूट सुरु आहे. या गव्हाच्या नमुन्याचे सर्व रिपोर्टस माझ्याकडे आहेत. याचे युरीक ॲसिडचे प्रमाणे 1200 पर्यंत गेलेले आहे. आपल्या सभागृहामध्ये कोणी डॉक्टर आहे काय ? युरीक ॲसिडचे 1200 प्रमाण म्हणजे किती आहे. माझ्याकडे गव्हाचे सर्व नमुने आहेत आणि तुम्ही काय करता, महात्मा

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .....

फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज यांच्या महाराष्ट्रात सामाजिक न्याय. आदिवासी भागामध्ये तुम्ही सांगितले की, 10 किलो केरोसीन पाहिजे असेल तर 10 किलो लाल गहू घ्या. तुम्ही आदिवासींना हा गहू घेण्याची जबरदस्ती केली. सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील आदिवासी भागामध्ये 10 किलो रॉकेल पाहिजे असेल तर 10 किलो लाल गहू घ्या अशी दुकानदारांनी जबरदस्ती केल्याच्या अनेक तक्रारी शिधावाटप कार्यालयामध्ये करण्यात आलेल्या आहेत.

सभापती महोदय, गहू आयातीबाबतच्या अलिकडच्या काही सत्य घटना मी पुराव्यासह सांगतो. कॉंग्रेस का हाथ, आम आदमी के साथ. ही घोषणा करुन तुम्ही सत्तेवर आलात आणि आता हात हातात धरुन अवलक्षण केले. सभापती महोदय, मंत्री महोदयांनी याचे उत्तर द्यावे की, तुमच्या जवळ जो सडका, कुजका गहू पडलेला आहे तो आता प्राण्यांना सुध्दा खाण्याच्या लायकीचा नाही. तुम्ही एक सेमिनार घ्या. प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांना बोलवा, अध्यक्ष म्हणून या राज्याचे उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना बोलवा, आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी रचनात्मक कार्यकर्ते आहेत, वनराईचे कार्यकर्ते आहेत. झाडे लावण्यात ते एक्सपर्ट आहेत. या 33 हजार मे.टन गव्हाचे काय करायचे यावर उपाय शोधा आणि तुम्ही मार्गदर्शन करा. पाहिजे तर कॉंग्रेस पक्षाच्या लोकांना बोलवा. सभापती महोदय, हे सर्व रॅकेट आहे. ऑस्ट्रेलियन व्हीट बोर्डाकडून गव्हाची खरेदी करण्यात आली. मी आपल्याला पुरावा देतो. श्री.गुजराल साहेब पंतप्रधान असतांना या ऑस्ट्रेलियन व्हीट बोर्डाकडून 1997-98 मध्ये जो 15 लाख मे.टन गहू आयात केला होता त्याची सी.बी.आय.ने चौकशी केली होती. माझ्याकडे आता सी.बी.आय. चे पत्र आहे. त्यामध्ये 12 कोटी रुपयांचा घोटाळा झाला होता. ऑस्ट्रेलियन व्हीट बोर्डाच्या विरोधात सी.बी.आय.ने क्रिमीनल केस रजिस्टर केली होती. 1997-98 च्या गहू घोटाळयात ही ऑस्ट्रेलियन व्हीट बोर्ड कंपनी गुंतलेली होती त्याच ऑस्ट्रेलियन कंपनीकडून आता गहू आयात करण्यात आलेला आहे. सभापती महोदय, या ऑस्ट्रेलियन व्हीट बोर्डाला प्राधान्य मिळाले. ऑलरेडी सी.बी.आय.ने कळविले आहे की, 1996-97 सालामध्ये गहू आयात झाला त्यात या कंपनीला ब्लॅक लिस्ट केलेले आहे आणि याच्या पहिल्या दोन निविदा या ऑस्ट्रेलियन व्हीट बोर्डाला देण्यात आल्या. लोकसभेमध्ये विचारण्यात आलेल्या प्रश्नाचे उत्तर माझ्याकडे आहे.

..3...



GRB/ AKN/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ..... 14:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .....

ऑस्ट्रेलियन व्हीट बोर्डाबाबत लोकसभेमध्ये प्रश्न विचारला होता तो मी आपणास वाचून दाखवितो "Unstarred Question No. 2769, to be answered on 21.08.2006. Kickbacks in wheat import. The question was: Will the Minister of Consumer Affairs,Food and Public Distribution be pleased to State:

(a) Whether huge quantity of wheat was imported from the Australian Wheat Board(AWB) in 1998;

(b) If so, the details and reasons thereof...." यावर मिनिस्टर ऑफ स्टेट्सने काय उत्तर दिले ते ऐका.

Shri Sunil Tatkare: Sir, I am on a point of Procedure.

Shri Nitin Gadkari: Sir, the reply was that: " The CBI has conveyed vide its letter dated 5.6.2006 to the Indian High Commission in Australia that if the Australian authorities co-operate even at this belated state and furnish the necessary evidence including authenticated copies of relevant documents to the CBI, the CBI would promptly examine reopening of the investigation and take the matter to its logical conclusion."

यानंतर कु.जयश्री....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ MAP/AKN/ यापूर्वी श्री.बोरले..... 14:20

**(सभापतीस्थानी : माननीय उप सभापती)**

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, पॉईंट ऑफ प्रोसिजरच्या माध्यमातून मला सभागृहाच्या असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेब यांनी केंद्राने आयात केलेल्या गव्हाच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केला. सध्या महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये लाल गव्हाबाबत चर्चा होत असतांना महाराष्ट्र पब्लिक डिस्ट्रीब्यूशन संदर्भात किंवा तत्संबंधी योजनांबाबत जे काही गव्हाचे वितरण झाले त्यासंदर्भात ही चर्चा आहे. परंतु जो विषय पूर्णपणे केंद्राच्या अखत्यारीतील आहे, त्यासबंधी येथे बोलणे प्रस्तुत नाही, असे मला वाटते.

श्री.नितीन गडकरी : माननीय सभापती महोदय, हे कसे प्रस्तुत आहे, ते मी आपल्याला सांगतो की, ऑस्ट्रेलियन व्हिट बोर्डाने पाठविलेला गहू भारतात आलेला आहे. त्याबाबत सी.बी.आय.ने जे म्हटले आहे ते मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी वाचून दाखवितो. " The CBI has conveyed vide its letter dated 5.6.2006 to the Indian High Commission in Australia that if the Australian authorities co-operate even at this belated state and furnish the necessary evidence including authenticated copies of relevant documents to the CBI, the CBI would promptly examine reopening of the investigation and take the matter to its logical conclusion." हे उत्तर सी.बी.आय.चे पार्लेमेंटमधील उत्तर मी याकरिता सांगतो आहे की, भ्रष्टाचाराची गंगोत्री तिकडे आहे आणि आता ही गंगा तुमच्यापर्यंत आलेली आहे. या गंगेचा उगम कोठून आहे हे सांगावे लागणार. यासंदर्भातील काही गोष्टी तुम्हाला ऐकायला ब-या वाटणार नाहीत. पण काय करणार तुमचा माझा नाईलाज आहे. सत्य येथे सहन होत नाही. पण मी काय करु ? सत्य असे असते की, ते सांगताही येत नाही आणि सहनही होत नाही, अशी अवस्था आहे. कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे? पण तुमच्यावर महाराष्ट्राचेच ओझे आधीच खूप जास्त आहे ते आम्ही सांगत नाही परंतु आता हे भलतेच येऊन चिपकलयं तर मी तरी काय करु अशी आपली अवस्था आहे. अध्यक्ष महाराज, मी आपल्याला सांगतो की, केंद्र सरकारने ज्यावेळी एन.डी.ए.सरकारच्या काळात गव्हाची खरेदी केली होती त्यावेळी देखील हा प्रश्न निर्माण झाला होता.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

परंतु आता सन 2004 मध्ये एन.डी.ए.जाऊन यु.पी.ए.सरकार आल्यावर देशामध्ये गव्हाचे उत्पादन घटत गेले. सन 2003-2004 प्रोक्योरमेंट 68 लाख टन आणि प्रॉडक्शन 73 लाख टन.सन 2004-2005 मध्ये प्रोक्योरमेंट 148 लाख टन आणि प्रोडक्शन 680 लाख टन, सन 2005-2006 मध्ये प्रोक्योरमेंट 92 लाख टन आणि प्रोडक्शन 693 लाख टन. सन 2006-2007 मध्ये प्रोक्योरमेंट 110 लाख टन प्रोक्योरमेंट आणि प्रॉडक्शन 749 लाख टन. सन 2006 च्या मार्च ते जून मध्ये 92 लाख टन गव्हाची खरेदी झाली. सन 2007 मध्ये 110 लाख टन गव्हाची खरेदी झाली कारण गहू आयात करण्याचे वातावरण तयार करण्यासाठी हा व्यवहार झाला. यासंदर्भात माझ्याकडे पूर्ण पुरावे आहेत परवा हायकोर्टात याबाबत ठप्पा लागला होता परंतु तेथील वकिलांनी सांगितले की, सुप्रिम कोर्टामध्ये यासंबंधी केस आहे. म्हणून मी आपल्याला एवढेच सांगू इच्छितो की, आपल्या देशातील गव्हाची खरेदी होते ते ती तीन राज्यातील होते पंजाब, उत्तर प्रदेश, हरयाणा इतर राज्यांमध्ये विशेष गव्हाची खरेदी होतच नाही. हे माझ्याजवळ त्यासबंधी डिटेल प्रोक्योरमेंट चार्ट आहे. भाजपशासित राज्यांनी खरेदी केलेला गहू नाफेडकडे आहे, फुड कॉर्पोरेशनकडे आहे, तुम्ही खरेदी करा, त्याचा काय संबंध येतो ? कशाला आमच्या अंगावर ढकलता ? आमच्या काळात ही स्थिती नव्हती.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मला पुन्हा एकदा पॉईंट ऑफ प्रोसिजरबाबत सांगावयाचे आहे. याला ज्यावेळी मी विस्तृतपणे उत्तर देईन, त्यावेळी तो राज्याच्या अखत्यारीतील नाही असा मुद्दा यावयाला नको. कारण गव्हाची किमान आधारभूत किंमतीवरती जी निश्चित करायची असते ती भारत सरकारच्या माध्यमातून राज्यसरकार निश्चित करीत असते महाराष्ट्र, गुजराथ, हरयाणा, पंजाब जी जी गहू पिकविणारी राज्ये आहेत त्या त्या ठिकाणी ती खरेदी होत असते. या खरेदीच्या बाबतीत अन्य राज्यांमध्ये काय काय घडलेले आहे. यावर भाष्य करावयाला माझी हरकत नाही परंतु यासंबंधीचे उत्तर ऐकण्याची तयारी असावी. इतर राज्यांतील गहु खरेदीबाबत आपण या राज्याच्या सभागृहामध्ये बोलू शकतो का ? सभापती महोदय आपण जर हो म्हणालात तर माझी हरकत नाही. गेल्याच आठवडयात लोकसभेमध्ये लाल गव्हाची जवळपास एक तास चर्चा झालेली आहे.

यानंतर श्री.गागरे.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, राष्ट्रवादीच्या गव्हाबाबतच्या पुस्तिकेचे प्रकाशन नागपूरमध्ये झाले. मी नियमाने बोलत आहे. आज आपण मला सांगत आहात की, हा प्रश्न केंद्र सरकारचा आहे हे कोणत्या नियमात लिहिले आहे. असे असेल तर माननीय उपमुख्यमंत्री यांनी नागपूर येथे या पुस्तकाचे प्रकाशन का केले ?. तुम्ही येथे असे बोलणार असाल तर आम्हालाही बोलण्याचा अधिकार आहे. मी कोणतीही बाब असंसदीय बोललो नाही. हा प्रस्ताव नियमाला धरुन नाही का ?.

**उपसभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, गव्हाबाबत 260 अन्वये प्रस्ताव दिला आहे, त्यावर चर्चा करण्यासाठी माननीय सभापतींनी परवानगी दिलेली आहे. फक्त या चर्चेमध्ये राज्याच्या संदर्भात बोलावे असे माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हा गहू दिल्लीहून आलेला आहे. हे पाप दिल्ली येथून आलेले आहे. खरी गंगोत्री तिकडेच आहे. मी कोणत्या नियमाप्रमाणे असंसदीय बोललो आहे, तो कोट करावे. सभागृह नियमाने चालते.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य असंसदीय बोलत आहेत असे मी म्हटले नाही. मी एवढेच बोललो की, केंद्र शासनाच्या अखत्यारित असलेल्या विषयाची आपण येथे चर्चा करु शकतो का ? एवढेच मी विचारले आहे. योग्य असेल तर आपण होय म्हणावे. शेवटी निर्णय सभापती महोदय आपणासच द्यावयाचा आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, परवा केंद्रीय मंत्री श्री.मोईली यांनी पार्लमेंटमध्ये प्रस्ताव मांडला की, शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघ रद्द करा. या सभागृहात माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी प्रस्ताव मांडला, तो प्रस्ताव आपण का ऐकून घेतला ? लोकशाहीमध्ये अजून आणीबाणी आलेली नाही. केंद्र सरकारने आयात केलेला गहू महाराष्ट्रात आपल्या समोर आला व हा गहू खाल्याने नागरिकांना अनेक प्रकारचे आजार झालेले आहेत, त्याचे परिणाम भोगत आहे म्हणून मी बोलत आहे. गव्हाच्या आकडेवारीबाबत चर्चा झालेली आहे, महाराष्ट्रात पुस्तिका निघाली आहे, आमच्यावर आरोप केलेले आहे. यामध्ये "आ बैल मुझे मार" अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. मी आणि श्री.किरीट सोमय्या यांनी ठरविले होते की, हा विषय काढायचा. माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना राजकारणाबद्दल कोणी नीट सल्ला देत नाही. हा विषय





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .....

अडचणीचा आहे. याबाबत चर्चा आम्ही काढली नव्हती. परंतु "आ बैल मुझे मार" म्हणून आमच्यावर आरोप केले. माननीय श्री.गोपीनाथ मुढे म्हणाले की, सी.बी.आय. चौकशी करा. या प्रकरणावर पार्लमेंटमध्येही चर्चा झाली. हे नसते झंझट तुमच्यामागे कशाला लावून घेता. याबाबत आम्ही काही बोललो होतो का ? विरोधी पक्ष नेते बोलले होते का ? नागपूरमध्ये कशाला पुस्तिका काढली ? ही पुस्तिका दिल्लीमध्ये काढायची होती ? ही पुस्तिका काढून आमच्यावर कशाला टीका केली ?

श्री.गिरीष गांधी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे, माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना सल्ला देण्याचा अधिकार आहे का ?

श्री.नितीन गडकरी : सल्ला तुम्ही ऐका किंवा ऐकू नका पण सल्ला देण्याचा मला अधिकार आहे.

**उपसभापती** : मी श्री.नितीन गडकरी यांना सांगू इच्छितो की, श्री.गिरीष गांधी हे तुमचे गुरु होते असे तुम्ही निरोप समारंभात काल सांगितले आहे. शिष्याने गुरुचे ऐकले पाहिजे. त्यामुळे इतर चर्चा आपण थांबवावी व मुळ विषयावर चर्चा करावी.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, गव्हाच्या प्रश्नावर सभागृहातही बरेच लोक अस्वस्थ आहेत. सभापती महोदयांची खुर्ची रामशास्त्रींची आहे, ते कोणत्याही पक्षाचे नाहीत. सभागृहाच्या मध्यभागी तुमचे आसन आहे. तुम्ही आमचेही आहात व त्यांचेही आहात. तुम्ही जो निर्णय द्याल तो मान्य आहे. काही लोक अस्वस्थ होणे सहाजिक आहे. श्री.गिरीष गांधी हे आमचे गुरु असले तरी त्यांचे असे आहे की, ते इकडे बोलले नाही तर त्यांना तिकडे दिल्लीत बोलणार. श्री.गिरीष गांधी काही बोलले नाही तर अडचण होऊ शकते. श्री.गिरीष गांधी हे मला आदरणीय आहेत.

**उपसभापती** : यामध्ये ग ची बाराखडी अशी आहे. ग गिरीष गांधींचा, ग गव्हातला, ग गडकरीतला.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हा गहू अनेक लोकांना पचत नाही त्यामुळे पोटात गडबड झाल्यामुळे म्हणा, पोटदुखीमुळे म्हणा काही लोक फार अस्वस्थ होतात. माझा शेवटी नाईलाज आहे. सभापती महोदय, मी आता फक्त 16 रुपये किलो दराने गहू आला. 10 लाख टन गव्हाची निविदा प्रक्रिया सुरु आहे.

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी माननीय सदस्यांनी चांगले काही तरी बोलावे अशी अपेक्षा आहे.

श्री.नितीन गडकरी : आपण काल निरोप समारंभात चांगले बोललो आहे.

यानंतर कु.धनश्री......

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.......

सभापती महोदय, आपण 16 रुपये या दराने गहू आणला आणि आता 10 लाख टनाची निविदा प्रक्रीया सुरु आहे. आपल्याकडे रबी हंगाम ऑक्टोबर महिन्यापासून सुरु होतो. शेतकऱ्याने आपल्याला 13 रुपये या दराने गहू दिला असता. आपल्याकडे जानेवारी महिन्यामध्ये सर्वत्र नवीन गहू उपलब्ध होतो. आपल्या शेतकऱ्यांना 8.50 रुपयांचा दर आणि निर्यात करताना 20 रुपये दर द्यावयाचा हा कोणता न्याय आहे ? आयात करुन कुजका, निकृष्ठ दर्जाचा गहू आपण आणला. शेतकऱ्यांच्या हिताचे हे कोणते धोरण आहे ? मी याबाबत येथे अशाकरिता बोलत आहे की, आता तरी निदानशासनाने गव्हाची आयात करणे थांबवावे. या गव्हामुळे 4 हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. हा पैसा शेतकऱ्यांना मिळाला असता तर त्यांना याचा फायदा झाला असता. गव्हाची आयात करताना आपण निविदा मागविली त्याबाबत मी आपल्याला पुरावा देतो. गव्हाची आयात करताना जेवहा निविदा मागविली त्यावेळी याच कंपन्यांनी प्रथम निविदा दिली. माझ्याकडे या कंपनीचे नाव देखील आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांच्या मी निदर्शनास आणू इच्छितो की, हा गहू केंद्र शासनाने आयात केलेला आहे. राज्य शासनाने तो वितरित केलेला आहे हे आपण निदर्शनास आणले. आपण केवळ वितरित झालेल्या गव्हावर बोलावे असे मला वाटते. केंद्र शासनाने जो गहू आयात केला त्यावर येथे चर्चा होऊ नये असे मला वाटते.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हा गहू जर महाराष्ट्र शसनाने आयात केला असता तर मी महाराष्ट्र शासनासंदर्भात येथे बोललो असतो. हा सगळा निकृष्ठ दर्जाचा गहू केंद्र शासनाने आयात करुन राज्य शासनाला पाठविला त्यामुळे या प्रश्नाचा संदर्भ महाराष्ट्र शासनाशी देखील आहे.

दुसरा मुद्दा असा आहे की, केंद्र शासनाने राबविलेल्या धोरणाचा परिणाम हा राज्य शासनावर होत असतो. लोकशाहीमध्ये या संबंधी चर्चा होणार आहे. सन्माननीय मंत्री महोदय श्री. दिलीप वळसे पाटील यांनी इतर राज्ये वीज खेचून नेतात याबद्दल निवेदन केले होते. तसे पाहिले तर इतर राज्याचा महाराष्ट्राशी काहीही संबंध नाही. मग त्यांनी निवेदन का केले ? इतर राज्यांनी वीज खेचल्यामुळे त्याचा परिणाम महाराष्ट्र राज्यावर होतो म्हणून याठिकाणी ते



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ......

` बोलले. केंद्र शासनाने केलेल्या खरेदीवर आम्ही बोलायचे नाही असे ठरविले तर इमर्जन्सी लावावी लागेल. सभापती महादय, मी आपल्याला पुरावा देतो. काँग्रेस पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी औचित्याचा मुद्दा मांडला होता. आपण त्यांना रोखले नाही. त्यांना बोलण्याची आपण परवानगी दिली. त्यांनी चर्चा केली. त्यांनी पाठविलेले पत्र रेकॉर्डवर आहे. मी ते आपल्याला वाचून दाखवितो.

"निकृष्ठ दर्जाचा ,मानवी शरीरास अयोग्य अशा लाल गव्हाचे रेशनवर होणारे वितरण तातडीने थांबविण्यात येईल, असे ठोस आश्वासन मंगळवार दिनांक 24 जुलै 2007 रोजी विधान परिषदेच्या सभागृहात मा. अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी दिलेले असताना व या गव्हाच्या वितरणाबाबत बंदी घातलेली असताना, ठाणे जिल्हयातील ग्रामीण व आदिवासी भागात सुमारे अडीच हजार मेट्रीक टनापेक्षा जास्त लालसर गव्हाचे वितरण सक्तीने अजूनही केले जात आहे. परिणामी आदिवासींच्या वाटयाला 10 किलो तांदूळ कमी प्रमाणात देण्यात येत आहे. कुपोषणग्रस्त भागातील संतप्त आदिवासी व गोरगरीब जनतेने श्रमजीवी संघटनेच्या नेतृत्वाखाली काल बुधवार, दिनांक 1 ऑगस्ट 2007 रोजी लोकमान्य टिळक पुण्यातिथी दिनी, ठाणे जिल्हयातील सर्व तहसील कचेऱ्यांमधील अधिकाऱ्यांना लाल गव्हाच्या पोळया खाऊ घालण्याचे आंदोलन केले आहे. संतप्त जनतेच्या भावना लक्षात घेऊन सभागृहात दिलेल्या आश्वासनाची तातडीने पुर्तता करण्यासाठी ठाणे जिल्हयातील तसेच राज्यात सर्वत्र या निक्ठ दर्जाच्या लाल गव्हास बंदी घालण्यात यावी, या सार्वजनिकदृष्टया अत्यंत महत्वाच्या मुद्यावर औचित्याचा मुद्दा सभागृहात मांडीत आहे."

सभापती महोदय, हा लाल गहू नागपूर जिल्हयामध्ये तयार झाला काय ? हा तुमच्या शेतात तयार झाला काय ? हा सगळा आयात केलेला गहू आहे. ही आपल्या तालुक्यातील गोष्ट आहे.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. येथे आता सन्माननीय सदस्य श्री.गिरीश गांधी यांनी येथे सांगितले की, येथे जी चर्चा आहे ती महाराष्ट्रातील गहू वितरणासंबंधातील आहे. परंतु आता सन्माननीय सदस्य श्री.गडकरी म्हणाले की, लाल गहू कोठला तर बाहेरून आलेला. म्हणजे असे गृहीत धरले जाते की, आलेला गहू हा बेकारच आहे. या ठिकाणी एक मुद्दा केवळ मला आपल्या लक्षात आणून द्यावयाचा आहे. ज्यावेळेस कोठलीही वस्तू आयात केली जाते आणि ती बंदरामध्ये उतरविली जाते त्यावेळेस ती वस्तू उतरवून घेण्यालायक आहे की नाही हे तपासले जाते. 50 क्विंटल गहू आपण असा परतही पाठविलेला आहे. म्हणून प्रश्न असा निर्माण होतो की, जो गहू आता वितरित केला जातो आहे तो किती तारखेला उतरवून घेतला होता ? आणि त्या तारखेला तो कशा अवस्थेत होता ? महाराष्ट्रात आला तेव्हा कशा अवस्थेत होता ? आणि मग वितरण व्यवस्था कशी झाली ? हे सारे स्पष्टपणे समोर आले पाहिजे. सभापती महोदय, माझा दुसरा एक हरकतीचा मुद्दा असा आहे की, आज शेवटचा दिवस आहे आणि विषय चर्चेला आलेला आहे, तेव्हा वेळेच्या बाबतीत आपण ठरवून द्यावे या चर्चेसाठी विरोधी सदस्यांना आणि सत्तारूढ सदस्यांसाठी किती वेळ दिला जाईल. आणि खुलाशाने या सगळ्या गोष्टी रेकॉर्डवर येणार आहेत का ?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आमच्या समोरच्या मित्रांना विनंती करीन की, आपण फार अस्वस्थ होऊ नका. मी असे सांगत होतो की, कॉंग्रेसचे आमदार श्री.संजय दत्त यांनी आपल्या औचित्याच्या मुद्याबाबत लेखी सूचना जी दिली होती त्यात पुढे असे म्हटले आहे की, ..... ठाणे जिल्ह्यातील सर्व तहसील कचेऱ्यांयमधील अधिकाऱ्यांना लाल गव्हाच्या पोळ्या खाऊ घालण्याचे आंदोलन केले आहे. संतप्त जनतेच्या भावना लक्षात घेऊन सभागृहात दिलेल्या आश्वासनाची तातडीने पूर्तता करण्यासाठी ठाणे जिल्ह्यात तसेच राज्यात सर्वत्र या निकृष्ट दर्जाच्या लाल गव्हावर बंदी घालण्यात यावी. या सार्वजनिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या मुद्यावर औचित्याचा मुद्दा सभागृहात मी मांडीत आहे. विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन माननीय सभापती महोदय, आपणास नम्र विनंती करीत आहे की, या निकृष्ट दर्जाच्या लाल गव्हावर राज्यात बंदी घालण्याबाबतचे निर्देश आपण कृपया शासनाला द्यावेत. ... कॉंग्रेसचे आमदार श्री.संजय दत्त., 2.8.2007. सभापती महोदय, या पत्राबरोबर त्यांनी एक व्यंगचित्रही जोडलेले आहे. कॉंग्रेसचे सन्माननीय आमदार श्री.संजय दत्त

..... 3सी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गडकरी ....

यांनी जोडलेल्या व्यंगचित्रामध्ये काय म्हटले आहे ? बहुतेक त्यात डुकराचे चित्र आहे. ते मालकाला म्हणत आहे की, मालक, सडका-किडका असा निकृष्ट दर्जाचा आयात केलेला लाल गहू खायला मी काय माणूस हाय व्हय. सभापती महोदय, आमदार श्री.संजय दत्त यांनी हे पत्र आणि व्यंगचित्र सगळ्या प्रेसला प्रसिद्धसाठी पाठवून दिले आहे. मग आपण मला कशासाठी दोष देता ? सभापती महोदय, ही लढाई देशी विरूद्ध विदेशी अशी आहे. खरे तर स्वदेशी विचारांचे समर्थन करण्याच्यादृष्टीने आपल्या देशामध्येच आपण उत्तम गहू तयार करून दिला तर मला वाटते विदेशातून गहू आयात करण्याची गरज पडणार नाही. सभापती महोदय, आबांची पुस्तिका आहे. पण जाऊ द्यात. मी पुस्तिका काढले की, आपण सारे फार अस्वस्थ होता. कशाला मी शेवटच्या दिवशी आपल्या सगळ्यांना नाराज करू. पण मग आबांनी तरी कशासाठी ही पुस्तिका काढली ? त्यात तुम्ही आरोप आमच्यावर केले आहेत तेव्हा आम्हाला त्याबद्दल बोलावे लागेल. सभापती महोदय, या बाबतीत पुस्तिकेचा जे उल्लेख आहेत, ती पुस्तिका देखील आता माझ्याकडे आहे. परंतु वेळ कमी असल्याने मी ते सारे कमी केले आहे, त्यासंबंधात मी बोलत नाही. पण या संदर्भात माझ्याकडे काही पत्रे आहेत. एक पत्र आहे जिल्हा पुरवठा अधिकारी,ठाणे यांचे. दुसरे पत्र आहे अप्पर जिल्हाधिकारी,रत्नागिरी यांचे., तिसरे पत्र आहे जिल्हाधिकारी,सांगली, माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र आहे., आणि जिल्हा पुरवठा अधिकारी,भंडारा यांचेही पत्र आहे.

सभापती महोदय, जिल्हा पुरवठा अधिकारी,ठाणे मुख्यालय जव्हार यांनी सांगितले आहे की, विक्रमगड येथील गोदामास भेट देऊन लाल गव्हाचा जो नमूना घेतला आहे तो गहू साठी संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेचा शिल्लक राहिलेला गहूसाठा आहे. या जिल्ह्यात संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना बंद झाल्यामुळे सदर साठा शिल्लक राहिला आहे. आणि तटकरे साहेबांनी काय केले ? तर सडका गहू गोदामात घेतला म्हणून गोदाम कीपरला निलंबित केले. त्यांनी ते चांगले केले, योग्य केले. त्यांनी म्हटले की, तू सडका गहू गोदामात का घेतला ? पण सभापती महोदय, आता सडका गहू ज्यांनी देशात घेतला त्याच्यावर तुम्ही काय कारवाई करणार ते सांगा. तो सावंतवाडीचा साधा गोडाऊन कीपर होता त्याला तुम्ही निलंबित केले. सभापती महोदय, माझ्याकडे कलेक्टरचेही पत्र आहे. विशेष घटक योजनेचा व संपूर्ण ग्रामीण योजनेतील हा गहू आहे, हे

..... 3सी 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सांगितले आहे अप्पर जिल्हाधिकारी,रत्नागिरी यांनी. त्यानंतर सांगली जिल्ह्यातील सेक्रेटरी त्यांच्या पत्रात काय म्हणतात ते मी आपल्याला वाचून दाखवितो. माननीय उपमुख्यमंत्र्यांचा हा जिल्हा, ते तेथील पालकमंत्री आहेत. सांगलीचे अधिकारी आपल्या पत्रात म्हणत आहेत की, सांगली जिल्ह्यात माहे 9/2006 पासून आयात गव्हाची उचल देण्यास भारतीय खाद्य निगमने सुरूवात केली आहे. आयात गव्हामध्ये ऑस्ट्रेलियन गहू पांढरा, कॅनेडीअन गहू लाल व रशियन गहू सर्वसाधारण काळपट होता. कॅनेडियन व रशियन गव्हाबाबत तक्रारी असल्याने सदर गव्हाची लॅब कडून तपासणी करण्यात आली होती. सोबत रिपोर्ट आहे. रिपोर्ट नुसार आयात गहू एफएक्यू दर्जाचा आहे. खराब गहू निदर्शनास आल्यावर सदर गहू भारतीय खाद्य निगम यांना परत करून तो बदलून घेण्यात आला आहे. आयात गव्हाबाबत भारतीय खाद्य निगमकडून ऑस्ट्रेलिया कॅनडा, रशिया, पांढरा, लाल अथवा काळपट अशा नोंदी न ठेवता आयात गहू म्हणूनच वाटप केला जातो. या पत्रावर नाव आहे, जिल्हाधिकारी सांगली. पत्राची तारीख आहे 18.10.2007, उपायुक्त,पुरवठा.

( यानंतर श्री. सरफरे ....3डी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

माहितीच्या अधिकारामुळे आज काल ही माहिती मिळवून दिल्यामुळे हे सर्व रेकॉर्ड उपलब्ध होते. . सभापती महोदय, गहू वाटप कोठे कोठे झाले? अंत्योदय योजना, अन्नपूर्णा योजना, शालेय पोषण आहार योजना ज्यामध्ये यूरीक ॲसिडचे प्रमाण 1200 आहे तो गहू तुम्ही लहान मुलांना आश्रमशाळेमध्ये वाटता काय? शालेय पोषण आहार, कामासाठी अन्न, ए.पी.एल.,बी.पी.एल. अंत्योदय योजना, अन्नपूर्णा, नारी निकेतन, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना यांना आपण हा सडका, कुजका गहू वाटता. यामध्ये 1200 यूरीक ॲसिड आहे. याबाबत भंडाऱ्याच्या जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र माझ याजवळ आहे. त्यांनी हा गहू वितरीत केला आहे.त्यांनी कुणा-कुणाला वितरीत केला. त्यामध्ये ए.पी.एल., बी.पी.एल., नारी निकेतन वसतिगृह, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना माननीय मंत्री श्री. तटकरे साहेब यामुळे राज्याचे कसे होईल? आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, स्त्री शक्ती, पुरोगामी राज्य, प्रगतीशील राज्य यांचे नाव घेऊन आपण सर्व दलितांना गहू वाटता, मुलांना वाटता, नारी निकेतनमध्ये वाटता, आश्रमशाळेमध्ये वाटता, विशेष घटक योजनेमध्ये वाटता....

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी उल्लेख केला की, शालेय पोषण आहार योजनेमध्ये या गव्हाचे वाटप केले जाते. त्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, शालेय पोषण आहार योजनेमध्ये तांदूळ वाटप केले जाते, गहू वाटला जात नाही.

श्री. नितीन गडकरी : आपले म्हणणे बरोबर आहे. परंतु माझ्याजवळ भंडाऱ्याच्या जिल्हाधिकाऱ्यांचे असलेले पत्र वाचून दाखवितो. हे दिनांक 3.11.2007 चे पत्र आहे. माहितीच्या अधिकार अधिनियम 2007 अन्वये आयात केलेल्या गव्हाबाबत मागितलेली माहिती. यामध्ये विविध योजनांतर्गत सन 2006-07 मध्ये वितरीत करण्यात आलेला लाह गहू.त्यामध्ये योजनेपुढे वाटप केलेले आकडे दिले आहेत. 1) अंत्योदय योजना सन 2006 मध्ये 1141.1 मे.टन सन 2007 मध्ये 5034.4 मे.टन, 2) अन्नपूर्णा योजना सन 2006 मध्ये 15.1 मे.टन, सन 2007 मध्ये 58.9 मे.टन 3) शालेय पोषण आहार 27.1 मे.टन, 4) कामासाठी धान्य 54.4 मे.टन . त्यानंतर ए.पी.एल. बी.पी.एल. अंत्योदय, कामासाठी धान्य, अन्नपूर्णा, नारी निकेतन,संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना यांच्यासाठी वाटप केले आहे.ही तुमच्या जिल्हाधिका-यांच्या पत्रातील आकडेवारी आहे. आकडेवारी दिली आहे. पाहिजे असेल तर ही माहिती आपणाकडे पाठवितो. सभापती महोदय, या



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ AKA/ KTG/

श्री.नितीन गडकरी...

गव्हाच्या नमुन्यांचे फोटो माझ्याजवळ आहेत. त्याबाबतचे गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्रचे रिपोर्ट फार भयंकर आहेत. माननीय सदस्य डॉ. अझिज साहेब आपण डॉक्टर आहात. या अहवालामध्ये यूरीक ॲसिड 1200 पर्यंत आहे असे म्हटले आहे. इतक्या प्रमाणामध्ये यूरीक ॲसिड जर असेल तर त्याचा शरीरावर काय परिणाम होईल हे जरा आपण सांगावे?

Dr. M. A. Aziz : Uric Acid is poisonous to the Urinary system.

श्री. नितीन गडकरी : हा रिपोर्ट माझ्याजवळ आहे, हे अतिशय वाईट आहे. मी आपणास हात जोडून सांगतो की, याबाबतीत आपण राजकारण बाजूला ठेवू या. याचा आपण राष्ट्रवादी गांडूळ खत प्रकल्प सुरु करा. आणि ते गावा-गावामध्ये गांडूळ खत करुन वाटा. झाडांना सुध्दा ते किती पोषक होईल हे सुध्दा आपण तपासून पहा. याशिवाय दुसरा उपाय नाही. 33 हजार टन गहू पडला आहे. माझ्याकडे फोटो आहेत त्यामध्ये अळया कशा आहेत. हे पहा? हा विक्रमगडच्या गोदामात सडत पडलेल्या गव्हाचा नमुना पहा. हे पोते पहा, साकीनाका, मुंबई येथे आयात केलेल्या सडलेल्या गव्हाचा नमुना पहा. घाटकोपर येथील गोदाम सडलेल्या, कुजलेल्या लाल गव्हाच्या गोण्या आहेत. यांचे आम्ही पचनामे केले आहेत, आणि सील केले आहेत. सर्व कागदपत्रे माझ्याजवळ आहेत. यामध्ये एक जरी खोटे असले तर मी हे सर्व सोडून देईन. हे सावंतवाडीचे गोदाम आहे, हा गहू हातात घेतला आहे, त्याला किती बुरशी आली आहे पहा. बांदा ग्राहक सहकारी रेशन दुकान नं. 1, रेशन दुकानदार विनायक नारायण येडवे यांच्या उपस्थितीत घेतलेल्या सडक्या गव्हाचा नमुना. हा भयंकर गहू आहे. या गव्हाचे गांडूळ खत करतांना सुध्दा याची चौकशी केली पाहिजे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

हा गहू समुद्रामध्ये फेकावयाचा की जमिनीमध्ये गाडावयाचा यावर एक समिती नेमावी. त्या समितीमध्ये सन्माननीय सदस्य श्री. गिरीश गांधी यांना घ्यावे. कारण त्यांचा पर्यावरणाच्या बाबतीत अभ्यास आहे. सभापती महोदय, मेळघाट भागातील गोदामाचा फोटो माझ्याकडे आहे. तो कुपोषित भाग आहे. परवा 35 ते 40 आमदारांनी आदिवासींच्या कुपोषणाचा प्रश्न विचारला. त्या ठिकाणी आपण हा गहू वाटत आहेत. माझ्याकडे दापोलीचा फोटो आहे. हे सर्व फोटो पंचनामे करुन आणलेले आहेत. यामध्ये किडे पडलेले आहेत. माझी माननीय उपमुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, आपण पुस्तक काढले आहे त्यामध्ये सप्लीमेंटरी जोडून हे फोटो लावा. माझे सभागृहाला वचन आहे की, मी महिनाभराच्या आत या फोटोचे उत्तम पुस्तक तयार करुन सभागृहाला सादर करीन. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी एक गोष्ट सांगावी. पहिल्यांदा 10 रुपये 30 पैसे किलो असा रेट आला होता. त्यामध्ये ज्या कंपन्या होत्या त्यात कारगिल, रॉयस ट्रेडिंग, कॉन्कार्डिया, अडानी ग्लोबल, ग्लॅनकोन, ऑर्चर डेनियल अशा कंपन्या आहेत. नंतर जो रेट आला होता तो रिजेक्ट केला. तो याकरिता रिजेक्ट केला की, आपण भारतीय शेतकऱ्यांना फार कमी भाव देतो त्यामुळे जास्त भावाने घेणे योग्य नाही म्हणून रिजेक्ट केला. नंतर त्याच कंपन्यांचे पुन्हा टेंडर आले. त्यामध्ये रेट आला 11 रुपये 30 पैसे. तो पुन्हा रिजेक्ट झाला. शेतकऱ्याला आपण जास्त भाव देत नाही म्हणून तो पुन्हा रिजेक्ट झाला. ज्या दिवशी रिजेक्ट केला त्या दिवशी नवीन टेंडर दिले आणि 16 रुपये किलो या दराने गहू घेतला. याबाबत कसे जस्टिफिकेशन देणार ? मला एका गोष्टीचा आनंद आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांच्या बाबतीत सांगण्यात आले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती प्रभा राव यांनी महाराष्ट्रात ठिकठिकाणी लाल गव्हाच्या बाबतीत चांगली भूमिका घेतली. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनीही चांगली भूमिका घेतली. ते आपल्या रेकॉर्डवर असेलच. माननीय मुख्यमंत्र्यांनी सुध्दा कडक आदेश दिले. मी माननीय मंत्रिमहोदयांना फक्त काही प्रश्न विचारतो. (1) केंद्रीय कृषी मंत्र्यांच्या अखत्यारित असणाऱ्या कृषी मंत्रालयाने भारतात विदेशातील लाल गव्हाची आयात करण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय ? (2) आयात केलेल्या गव्हाला प्रति किलो 16 रुपये भाव देण्यात आला, हे खरे आहे काय ? (3) भारतातील शेतकऱ्यांच्या गव्हाला केंद्र सरकार केवळ 8 रुपये प्रति किलो दर देते, हे खरे

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ AKA/

श्री. नितीन गडकरी .....

आहे काय ? (4) भारतात गव्हाचे उत्पादन वाढले असताना भारतीय बाजारपेठेत 10 रुपये प्रति किलो दराने गहू उपलब्ध असताना 16 रुपये प्रति किलो दराने गहू आयात करण्याची आवश्यकता होती काय ? (5) केंद्रीय कृषी मंत्रालयाने जो गहू आयात केला त्यापेक्षा कमी दराने आणि चांगल्या दर्जाचा गहू नाफेडने देण्याची तयारी दर्शवली होती, हे खरे आहे काय ? (6) आयात केलेल्या लाल गव्हाची जादा किंमत देताना जे हजारो करोड रुपये जास्त दिले गेले ते कोणाच्या खिशातून जाणार आहेत, मंत्र्यांच्या, मंत्रालयाच्या की सामान्य माणसाच्या ? (7) या हजारो कोटी रुपयांच्या लाल गहू आयात घोटाळ्याचे खरे लाभार्थी कोण आहेत ? (8) ज्यांनी सडका लाल गहू भारत सरकारला पुरवला त्याच बहुराष्ट्रीय कंपन्यांनी (कारगिल, ग्लॅनकोर) भारतात त्याचवेळेस 8 ते 9 रुपये किलो दराने उत्तम प्रतीचा गहू भारतीय शेतकऱ्यांकडून खरेदी केला हे खरे आहे काय ? (9) भारतातील सार्वजनिक उपक्रमांतर्गत चालविण्यात येणाऱ्या काही कंपन्यांनी यापेक्षा चांगल्या प्रतीचा गहू कमी दराने पुरविण्याची तयारी दाखवली होती, हे खरे आहे काय ? (10) नाफेडने उत्तम प्रतीचा भारतीय गहू 11 रुपये किलोने पुरवण्याची तयारी दाखविली होती, हे खरे आहे काय ? (11) जो सडका लाल गहू केंद्रीय कृषी मंत्रालयाने देशात आणि राज्यात आयात केला तो ऑस्ट्रेलियामध्ये पांढऱ्या डुकरांचे खाद्य म्हणून ओळखला जातो, हे खरे आहे काय ? या प्रश्नांची उत्तरे जनतेला दिली तर त्यातून समाधान होऊ शकेल असे मला वाटते.

सभापती महोदय, आता गव्हाचा आटा आणण्याचा प्रयत्न सुरु आहे. आधी लाल गहू आला तो संपत नाही म्हणून आटा आणावयाचा. त्यामध्ये 1200 युरीक ॲसीड आहे. माननीय मंत्रिमहोदय श्री. सुनील तटकरे यांनी ऐकून घ्यावे. आपण केंद्रीय कृषी मंत्र्यांना एक पत्र लिहावे. आपण मध्यंतरी त्याचे ब्रेड करण्याचा प्रयत्न केला. मंत्रालयात त्यासंदर्भात एक बैठक बोलावली होती पण आम्ही आरडाओरडा केला म्हणून ते थांबले. नाही तर तुम्ही ब्रेड आणि बिस्किटामध्ये हा गहू संपवला असता. आता त्याचा आटा आणण्याचा प्रयत्न सुरु आहे. आपण महाराष्ट्र सरकारच्या वतीने केंद्रीय कृषी विभागाला लिहावे की, कृपाकरुन आता आटा आणू नका.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ AKA/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 14:50

(श्री नितीन गडकरी...)

त्या आट्यावर 37 टक्के आयात कर माफ करण्याची केन्द्र सरकारची योजना आहे. हा आटा महाराष्टामध्ये आणायचा, तो आल्यानंतर येथील लोकांना गॅस्ट्रो होईल, डिसेण्ट्री होईल, पोटाचे विकार होतील, युरिनचे प्रॉब्लेम होतील. मग येथे तो विषय काढल्यानंतर असे सांगितले जाईल की तुम्ही लाल गव्हाचा विषय येथे मांडला. हा लाल गहू दिल्लीला आणला त्यामुळे हा विषय महाराष्ट्राशी संबंधित नाही. महाराष्ट्रातील लोकांचे अवयव खराब झाले तरी चालतील पण या विषयावर महाराष्ट्रामध्ये चर्चा उपस्थित करावयाची नाही. हा गव्हाचा आटा श्रीलंकेतून आणला जाणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. उल्लास पवार यांनी मला समजून घ्यावे. सार्कमध्ये जे सहा देश आहेत त्यातील बांगला देश, श्रीलंका आणि पाकिस्तान या तीन देशांना विशेष सवलती आहेत.म्हणून ऑस्ट्रेलिया, रशिया, झेकोस्लोव्हाकिया या देशातील गहू श्रीलंकेत बारीक करावयाचा त्याला पूर्ण टॅक्स एक्झंप्शन द्यायचे आणि तो हिंदुस्थानात आयात करायचा, असा हा प्रकार आहे. पण आपण असे करु नका. हे थांबवले पाहिजे. सभापती महोदय, श्रीलंका देशामध्ये एकही आटामिल नाही. श्रीलंकेने गहू आयात केलेला आहे. हा अमेरिकन गहू आहे. या गव्हाच्या 200 किलो मागे1200 काडी-कच-याचे नमुने आहेत. मला असे वाटते की हे गंभीर संकट आहे. सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी एपीएमसीबाबत पुस्तिका काढलेली आहे. त्यामध्ये काही चांगले लिहिलेले आहे. त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. या पुस्तिकेच्या पान क्रमांक 6वर असे म्हटलेले आहे की, "एनडीएच्या काळात व्यापा-यांना शेतक-यांचा माल थेट शेतक-यांकडून विकत घेता यावा यासाठी या सरकारने एपीएमसी कायद्यात सुधारणा केली. या सुधारणेमुळे शेतक-यांना अडत, मार्केट कमिटीचा सेस व इतर कर द्यावे लागत नव्हते. हे कर कमी झाल्याने शेतक-यांच्या मालाला चांगला भाव मिळायला लागला. शिवाय व्यापारी शेतात जाऊन माल खरेदी करु लागला. एपीएमसीमध्ये येण्यासाठी शेतक-यांचा होणारा वाहतूक खर्च कमी झाला. हा खर्च आणि हे कर शेतक-यांना भरावे लागत नसल्यामुळे शेतक-यांना आपल्या उत्पादनाचा चांगला मोबदला मिळायला लागला. शेतक-यांना आपला माल जास्तीत जास्त चांगल्या किंमतीला विकण्याचे स्वातंत्र्य मिळाले. परिणामी किमान आधार भावापेक्षा अधिक भाव त्यांना मिळू लागला. शेतक-यांच्या दृष्टीने ही हिताची बाब होती असे या पुस्तिकेमध्ये लिहिलेले आहे. हे चांगले लिहिलेले आहे. तुमचे राज्य

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी...)

आल्यानंतर दोन वर्षे गव्हाची मुबलकता होती. तुमचे राज्य आल्यानंतर दोन वर्षांनी हा प्रकार सुरु झाला त्याला आम्ही कसे जबाबदार राहाणार ? आमच्या काळामध्ये गहू सरप्लस झाला होता. त्यामुळे आम्हाला गव्हाची आयात करण्याची गरज भासली नाही. (अडथळा) गोडाऊन मोकळी केली नाही. मला एक सांगा. मी हार पत्करतो. मला सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी सांगावे की, त्यांच्याकडे बाजारात गहू मिळत नाही अशी एक तरी तक्रार आलेली आहे काय ? सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार, सन्माननीय सदस्य श्री. गिरीश गांधी यांनी देखील याबाबतीत सांगावे. बाजारात गहू नाही अशी एक तरी तक्रार आली होती काय ? बाजारातील गव्हाचा भाव 11 रु., 12रु. आहे. बाजारामध्ये गव्हाची तूट नाही तर तो मुबलक उपलब्ध आहे. अनेक लोकांजवळ गव्हाचा साठा होता. गहू आणण्याची गरज नव्हती. त्यामुळे गहू आयात करण्याची गरज नव्हती असे माझे मत आहे. तेव्हा माझा पहिला प्रश्न असा आहे की, गव्हाची कमतरता आहे असे एक तरी पत्र अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांकडे आलेले आहे काय ? मी खाली बसतो. माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी माझ्या या प्रश्नाचे उत्तर द्यावे. या दोन वर्षामध्ये गहू मिळत नाही किंवा गव्हाचा काळाबाजार होतोय अशी एक तरी तक्रार माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांकडे आलेली आहे काय ? माननीय मंत्री महोदयांनी काही तरी बोलावे...

श्री. सुनील तटकरे : मी आपले भाषण संपल्यानंतर बोलणार आहे.

श्री. नितीन गडकरी : याचा अर्थ महाराष्ट्रामध्ये गव्हाची गरज नव्हती, गव्हाची मागणी नव्हती, गव्हाचे दर वाढलेले नव्हते , गहू बाजारात उपलब्ध होता.

श्रीमती उषाताई दराडे : माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या प्रश्नाला उत्तर दिले नाही म्हणून त्याचा आधार घेऊन बोलणे इष्ट नाही. या प्रस्तावावर माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री उत्तर देणारच आहेत.

श्री. नितीन गडकरी : माननीय मंत्री महोदयांना मी उत्तर देण्यास सांगितले होते. सन्माननीय सदस्य श्रीमती उषाताई दराडे ह्या वकील आहेत. परंतु वकिलपत्र घेतल्या शिवाय कुणाची बाजू मांडता येत नाही.

...नंतर श्री. भोगले...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

सभापती महोदय, माननीय अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री यांच्या माहितीसाठी मी सांगू इच्छितो, महाराष्ट्र कांग्रेस के कार्यकर्ता आपका नाम ले रहे है. आपने जांच करके सिध्द करके दिखाया. मैं आपका अभिनंदन कर रहा हूँ. सभापती महोदय, लाल गव्हाचे वितरण थांबले. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी कोणाच्याही दबावाखाली न येता आदेश दिले, हा कुजका लाल गहू वाटप करु नका. सन्माननीय मंत्री श्री.तटकरे साहेब आपण मी केलेले अभिंनदन त्यांच्यापर्यंत पोहोचवा. मी माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. Nothing doing. महाराष्ट्रातील घाणेरडया लाल गव्हाचे यानंतर वितरण होणार नाही हा मुख्यमंत्र्याचा आदेश आहे. वितरण बंद करा हा आदेश दिला म्हणून मी त्यांचे अभिनंदन करतो. सभापती महोदय, एक लक्षात ठेवा. मी राजकारणात असत्य बोलत नाही. मी असत्य,चुकीचे आश्वासन देत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी दखल घेऊन कोर्टात ॲफिडेव्हीट करण्यापूर्वी व्ह्यू पॉईंट देऊन फाईलवर सही केली आहे. सन्माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्या चांगल्या कार्याचा गौरव या सभागृहात करावयाचा नाही तर कुठे करायचा? त्यांनी चांगली गोष्ट केली त्याबद्दल त्यांचा गौरव केला पाहिजे. माझी मंत्रीमहोदयांकडे मागणी आहे, पहिली गोष्ट म्हणजे तुम्ही केंद्र सरकारला पत्र लिहा की, एक म्हणजे यानंतर महाराष्ट्र सरकार आयात केलेला सडका लाल गहू, केंद्र सरकारच्या कोट्यातून आलेला लाल गहू घेणार नाही. दुसरे म्हणजे या गव्हाचा विदेशातून आलेला आटा घेणार नाही. तिसरी गोष्ट म्हणजे या लाल गव्हाची राष्ट्रवादी वर्मीकल्चर गांडूळ खत प्रकल्प योजना जाहीर करा. मंत्रीमहोदय, हा गहू हवेत ठेवू नका. अनेक जनावरांनी खाल्ला आहे. नागपूरला एनएसयुआयचे रविनगर येथे अधिवेशन झाले. मुले आली होती. स्वयंपाकी पोळ्या करीत होते. मुले त्यांच्या अंगावर धावली. त्यांनी कणीक जवळ असलेल्या विहिरीत टाकली. तो सगळा आटा गेला विहिरीत. दुसऱ्या दिवशी सरकारने विहीर साफ केली. सरकारने तो आटा बाहेर काढला. तिथे म्हशी आल्या आणि म्हशींनी तो आटा खाल्ला. 20 म्हशी मेल्या. 33 हजार टन गहू आहे. माणसांची वाट लावली तुम्ही. मेहेरबानी करुन जनावरांचा जीव घेऊ नका. यासाठी उच्चस्तरीय समिति नेमा. सन्माननीय उपमुख्यमंत्री यांचा सल्ला घ्या. पर्यावरण तज्ज्ञ म्हणून सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी यांचा सल्ला घ्या. तो गहू विहिरीत टाकायचा, की जमिनीत गाडायचा, त्याचे गांडूळ खत ......................................................................

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

12-01-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3G.2

श्री.नितीन गडकरी.....

करायचे किंवा सेंद्रीय खत करायचे याचा निर्णय घ्यावा लागेल. तो उघड्यावर राहिला आणि चुकून जनावरांनी खाल्ला तर तेही मृत्युमुखी पडतील हे मी गंभीरपणे सांगतो.

श्री.दिवाकर रावते : (जागेवर बसून) गांडुळांनी तो गहू खाल्ला आणि ते मेले तर?

श्री.नितीन गडकरी : गांडूळ मेले तर काय? हा मुलभूत प्रश्न आहे. माननीय राष्ट्रपतींनी गौरव केलेले माझे आदरणीय ज्येष्ठ मित्र सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी पर्यावरण तज्ज्ञ आहेत, गांडूळ मरतील की नाही याचा ते खुलासा करतील.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेब, काल मी तुम्हाला प्रेमाने पुरणाच्या पोळ्या खायला घातल्या होत्या, त्या आवडल्या का?

श्री.नितीन गडकरी : होय.

**उपसभापती** : त्या लाल गव्हाच्याच होत्या.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी गहू उत्पादक शेतकरी आहे. आपण चुकीचे बोलता असे म्हणत नाही. पण त्या पोळ्या सुंदर होत्या हे 101 टक्के सांगतो. पुरणाच्या पोळ्या करणाऱ्या माणसाला बोलवा. तो लाल गहू नव्हता हे 101 टक्के सत्य आहे. या प्रकरणातील गंभीर गोष्ट लक्षात घेता राज्य सरकारतर्फे ठराव करुन केंद्र सरकारकडे पाठवा. या सगळ्या खरेदी व्यवहाराची सी.बी.आय.मार्फत चौकशी करावी. अशा प्रकारचा गहू आयात करता कामा नये. लोकांचे आरोग्य बिघडता कामा नये. तुम्ही महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेता आणि विशेष घटक योजनेत आदिवासी भागात सडका गहू जबरदस्तीने देता.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

असे पाप पुन्हा होऊ नये याची खबरादारी घ्यावी मानवाधिकार आयोगाने आपल्याला या लाल गव्हाच्या संदर्भात चांगली चपराक लावलेली असून आपल्याला यासंदर्भात अफेडवीट द्यावे लागले असून आता ही केस हायकोर्टात गेंलेली आहे. लाल गव्हाच्या संदर्भात आपण देशातील जनतेचे तसेच महाराष्ट्रच्या जनतेचे आरोग्य धोक्यात आणले होते म्हणून आपण देशातील तसेच महाराष्ट्रातील जनतेची क्षमा मागितली पाहिजे. या लाल गव्हाच्या संदर्भात बाबा सिद्दीकी, मनोहर नाईक, तसेच डॉ. विमल मुंदडा यांनी प्रामाणिकपणे लॅबचा रिपोर्ट दिला त्यामुळे मी त्यांचा आभारी आहे. तसेच या लाल गव्हाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी गंभीर भूमिका घेऊन लाल गव्हाचा पुरवठा थांबवला त्यामुळे त्यांचेही मी अभिनंदन करतो. लाल गव्हाच्या संदर्भात अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी या देशाची आणि महाराष्ट्र शासनाच्या जनतेची क्षमा मागावी अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, लाल गव्हाच्या संदर्भात मी माझे विचार थोडक्यात मांडणार आहे. गव्हाचे वितरण करणारी जी पध्दत आहे तीच मुळात सदोष आहे. गोदिया जिल्हयात आदिवासी विकास महामंडळाची धान्य पोहचविण्याकरिता नियुक्ती केलेली आहे व हे महामंडळ निर्धारित वेळेत लाभार्थ्यांना घान्य पोहचवण्यास नेहमी अपयशी ठरले आहे. शासकीय गोदाम सौंदड येथे अंत्योदय योजनेचा 2500 क्विंटल पांढरा गहू आणि 1200 क्विंटल बीपीएल योजनेतील गहू शिल्लक असतांना या महामंडळाच्या गलथान कारभारामुळे दिवाळीच्या सणाच्यावेळी गरीब तो जनतेला प्राप्त झालेला नाही त्यामुळे यासंदर्भात शासनाने दखल घेऊन गरीब आदिवासी जनतेला गव्हाचे वाटप करण्यसाठी योग्य आदेश द्यावेत अशी विनंती आहे.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी विस्तृतपणे विचार मांडलेले असल्यमुळे मी अधिक न बोलता त्यांनी जे विचार मांडले त्याला समर्थन देतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठवेणे.**

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सोमवार दिनांक 26 नोव्हेंबर, 2007 रोजी हाफकिन इन्स्टीटयूटवरील लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदय अधिक माहिती देणार होते परंतु सदर माहिती अजूनपर्यंत देण्यात आलेली नाही. माननीय मंत्रीमहोदय या ठिकाणी आता उपस्थित आहेत. त्यामुळे हाफकिन इन्स्टीटयूटच्या संदर्भात त्यांनी आता माहिती द्यावी अशी विनंती आहे.

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री मुधकर चव्हाण एवं माननीय सदस्य श्री विनोद तावडे साहब ने यहां पर सोमवार को लक्षवेधी के माध्यम से एक मुद्दा उपस्थित किया था. मैं सभागृह में आश्वासन देना चाहता हूं कि रिवेन्यु डिपार्टमेंट और फायनान्स डिपार्टमेंट के कान्करेंस से गवर्नमेंट जी.आर. निकालेगी.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांच्या सहभागाने, जी 65 एकर जमीन रिलायन्सला जाणार होती ती वाचविल्यामुळे मी माननीय मंत्रीमहोदयांचे मनापासून अभिनंदन करतो.

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यभरात आयात केलेल्या निकृष्ठ गव्हाचे होत असलेले वितरण.

**मु.शी.** : राज्यभरात आयात केलेल्या निकृष्ठ गव्हाचे होत असलेले वितरण यासंबधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे , श्रीमती नीलम गो-हे, सर्वश्री मधु चव्हाण, अरविंत सावंत वि.प.स. यांनी दिलेला प्रस्ताव.

( चर्चा पुढे सुरु.....

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे ( अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी व अन्य सदस्यांनी नियम 260 अन्वये लाल गव्हाच्या वितरणा संदर्भात चर्चा उपस्थित केली त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

या प्रश्नावर गेल्या एक-दोन महिन्यांपासून भाजपने फार मोठे राजकीय मायलेज मिळविण्याचा अभिनिवेश तयार केला होता. या संदर्भात सर्वोच्च व्यासपीठावर वस्तुस्थिती मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांचे मी आभार मानतो. मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी आणि भाजपचे दिल्लीतील नेते यांच्यामध्ये कम्युनिकेशन गॅप आहे की काय अशी मला शंका येते. गहू आयाती संदर्भात संसदेत चर्चा झाली. श्री.विजयकुमार मल्होत्रा जे भाजपचे नेते आहेत, त्यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे हा प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नावर जवळपास 55 ते 60 मिनिटे चर्चा झाली. या चर्चेमध्ये माननीय केंद्रीय कृषि मंत्री श्री.शरद पवार यांनी अतिशय सविस्तरपणे उत्तरे दिलेली आहेत. त्या संदर्भातील माहिती सुध्दा सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना असेल. या चर्चेच्या वेळी कोण कोण सदस्य बोलले याची देखील त्यांना माहिती असेल. त्यांनी आता याठिक्ाणी जे भाषण केले त्यावरुन मला त्यांची कीव येते. त्यांनी याठिकाणी जी माहिती दिली ती माहिती दिल्लीतील मंडळीना माहीत नव्हती की काय ? माहिती असून सुध्दा माननीय केंद्रीय कृषि मंत्र्यांनी दिलेल्या सविस्तर व समर्पक उत्तरामुळे त्याठिकाणी हा विषय काढला नसेल असे मला वाटते. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार व दिवाकर रावते यांचा उल्लेख केला. गहू आयातीच्या संदर्भात संसदेत चर्चा झाली. त्या चर्चेच्या अनुषंगाने त्यांच्या मित्रपक्षाचे मुखपृष्ठ असलेल्या दैनिक "सामना" मध्ये बातमी होती की, "नंदीग्राम अडचणीचा आणि गहू आयातीचा बार फुसका". गहू आयातीच्या चर्चेच्या अनुषंगाने संसदेत जी चर्चा झाली त्याचे सविस्तर विश्लेषण दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी ते विश्लेषण वाचले नसेल असे मला वाटते. त्यांनी ते विश्लेषण वाचले असते तर त्यांनी हा प्रश्न उपस्थित केला नसता.

..2..

श्री.सुनील तटकरे..............

सभापती महोदय, मी या निमित्ताने एक गोष्ट सांगू इच्छितो की, गहू आयातीच्या संदर्भात संसदेत चर्चा झालेली आहे. या गव्हाचे वाटप गेल्या वर्षी सप्टेंबर 2006 मध्ये सुरु झाले आणि हा प्रश्न यावर्षी म्हणजे ऑक्टोबर 2007 मध्ये उपस्थित करण्यात आला. ज्यावेळी अणुकरारावरुन लोकसभा विसर्जित होते की काय अशाप्रकारचे वातावरण निर्माण झाल्यानंतर या गहू आयातीच्या आंदोलनास सुरुवात झाली. या गव्हाचे वाटप सप्टेंबर 2006 मध्ये सुरु असताना त्यावेळी कोणालाही यासंदर्भात भावना व्यक्त करण्याची गरज वाटली नाही.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून मी बोलत आहे. अणूकरारावरचे वातावरण सुरु होण्याच्या 2 महिने आधीच आमचे अभियान सुरु झालेले आहे. संभाजी नगरमध्ये लोडशेडींगच्या निमित्ताने 200-300 महिला रस्तारोको करीत असताना त्यांना माझ्यासमोर गहू फेकला व हा गहू खाण्यालायक आहे का ? असा प्रश्न त्यांनी मला केला व त्यासंबंधी त्यांनी आंदोलन केले. हे सर्व टी.व्ही.वर आलेले आहे. त्यानंतर मी याच्या मागे लागलो. त्यामुळे हे सर्व 2 महिने अगोदर पासून सुरु आहे. त्यानंतर अणूकराराचे वातावरण तयार झाले.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी बऱ्याचशा गोष्टींची कबुली दिलेली आहे. त्यांनी किमान 10-12 महिन्यांनंतर हे सुरु झाले, अशी कबुली दिली, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, गेल्यावर्षी या गव्हाचे वितरण सुरु झाल्यानंतर डिसेंबरमध्ये अधिवेशनाच्यावेळी पहिल्याच दिवशी काँग्रेस पक्षाच्या सहकाऱ्यांनी मला घेराव घातला व मला गव्हाच्या वाटपाबाबत विचारले. त्यांनी काही चपात्याही करुन आणलेल्या होत्या. त्यावेळी मी स्वत: या विभागाचा मंत्री म्हणून त्यांना सांगितले की, नागपूर विभागामध्ये वितरित केलेल्या गव्हाच्या चपात्या आपण तयार करु व उद्या याचवेळी आपण येथे भेटू. दुस-या दिवशी मी चपात्याही सोबत आणल्या होत्या, परंतु दुसऱ्या दिवशी मला कोणीही भेटले नाही....(अडथळ) ...आपण सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांचा जो पुरस्कार करता, तो पुढेही करत रहा. ते इतके दिवस किती खरे बोलत आले आहेत ते स्पष्ट झालेले आहे. त्यांचे म्हणणे आपण आपल्या पुस्तिकेतही टाका. काँग्रेस आमदारांचे म्हणणे आपल्या पुस्तिकेत घातले तर आम्हाला काही वाटणार नाही. सभापती महोदय, त्यावेळी हा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर दुस-या दिवशी कोणीही उपस्थित राहू शकले नाही. खुल्या बाजारात गव्हाची आवक एफसीएने मोठया प्रमाणात उपलब्ध करुन दिली. कारण, खुल्या बाजारामध्ये गव्हाचे दर वाढण्याची स्थिती त्यावेळी निर्माण झाली होती. गव्हाच्या निमित्ताने काही प्रश्न जरुर निर्माण झाले होते. परंतु मघाशी सन्माननीय सदस्यांना माननीय मंत्रिमहोदय, श्री. दिलीप वळसे-पाटलांनी सांगितले की, त्या पुस्तिकेतील पुढील मजकुरही वाचा. मात्र, गडकरी साहेबांनी काही गोष्टी वाचण्याच्या जाणीवपूर्वक ठेवलेल्या दिसत आहेत.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

ज्या गोष्टी अडचणीच्या असतील त्या वाचायच्या नाहीत आणि ज्या सोयीच्या असतात त्याच फक्त वाचायच्या, हे योग्य नाही. सन्माननीय सदस्य अनेक वर्षे या सभागृहात असल्यामुळे कोणत्या गोष्टी नेमक्या वाचायच्या, हे त्यांना चांगले माहिती असल्यामुळेच त्यांनी त्यांच्या सोयीच्या गोष्टी तेवढया वाचल्या. गहू कोणत्या कारणांसाठी आयात करावा लागला, याचीही त्यांना माहिती आहे. ज्यावेळी केंद्रामध्ये माननीय श्री.वाजपेयी साहेबांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार होते त्यावेळी गहू भरपूर शिल्लक होता. बफर स्टॉक का करावा लागतो, याचीही त्यांना माहिती आहे. ...(अडथळा) परंतु तो स्टॉक निर्यात कशा पध्दतीने झाला ? आपल्याकडे अन्नपूर्णा, अंत्योदय आणि बीपीएलच्या ज्या योजना आहेत व त्या माध्यमातून सवलतीच्या दराने जो गहू आपण विकतो तो गहू निर्यात करण्याची परवानगी आपल्या सरकारने त्याच दराने व्यापाऱ्यांना दिलेली आहे. याबाबतीत स्टेट कार्पोरेशन असते, त्यामार्फत आयात आणि निर्यात केली जात असते. परंतु यांनी अशाप्रकारचा एक चांगला उद्योग सुरु केला. चांगला गहू आपल्या देशातील शेतकऱ्यांनी पिकवला असतानाही तो मातीमोल भावाने निर्यात करण्याची महान व ऐतिहासिक परवानगी त्यावेळच्या आपल्या सरकारने दिलेली आहे. तेव्हा पासूनच ही सर्व भरलेली गोडाऊन्स् बंद होण्याची प्रक्रिया फार मोठया प्रमाणात सुरु झाली. आता ते पुण्य की पाप हे आपणच शोधावे. ...(अडथळा) मीही रेकॉर्डवरच बोलत आहे. हे संसदेमध्ये झालेले रेकॉर्ड आहे. निर्यात केव्हा झाली, किती दराने झाली याचे संसदेतील रेकॉर्ड माझ्याकडे आहे. ...(अडथळ) किती दराने परवानगी दिली, हे फार चांगले काम आपण केलले आहे. आम्ही 2-5-7 रुपये दराने गहू आणि तांदूळ देत असतो, त्याच दराने आपण खाजगी व्यापाऱ्यांना देण्याची परवानगी देऊन या देशाचे नेमके कोणते हित साधले हे आपल्यालाच माहीत आहे. या देशातील किमान आधारभूत किंमतीवर शेतकऱ्यांकडून जो गहू खरेदी केला जातो त्यामध्ये 50 रुपयांपेक्षा जास्त दर आपण वाढवलेला नाही. त्यामुळे उत्पादन घटण्यावर परिणाम झाला. तेव्हापासूनच भारतातील शेतकऱ्यांनी गव्हाचे उत्पादन कमी करण्यास सुरुवात केली. केंद्र सरकारने जी आधारभूत किंमत त्यांना द्यावयास पाहिजे होती ती आपण दिलेली नाही. आपण फक्त 10-50 रुपयांच्या आसपासच दरवाढ त्यावेळी केली.

नंतर श्री.रोझेकर...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.........

त्यामुळे गव्हाचे उत्पादन प्रचंड प्रमाणात घटले. त्यामुळे गहू उत्पादन आणि गव्हाची आवश्यकता याचे समीकरण घालण्याचा प्रश्न केंद्र सरकारपुढे निर्माण झाला त्यावेळी गहू आयात करण्याशिवाय दुसरा पर्याय शिल्लक उरला नव्हता.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, समोरच्या बाजूला बहुतेक राष्ट्रवादी काँग्रेसचे सदस्य आणि मंत्री उपस्थित आहेत, चर्चेवर काँग्रेस पक्षाचा बहिष्कार आहे काय ?

श्री.दिलीप-वळसे पाटील : सभापती महोदय, मघाशी विधानसभेमध्ये ज्यावेळी शिवसेनेचे सदस्य घोषणा देत होते त्यावेळी भारतीय जनता पक्षाचे सदस्य बसून होते. त्यामुळे आता काँग्रेसचे सदस्य त्यांच्याबरोबरच गेले आहेत.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, ज्यावेळी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन गडकरी हे बोलत होते त्यावेळी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते हे गप्प बसून होते.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, शिवसेनेने देखील या गव्हाच्या संदर्भात आंदोलन केले होते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आमच्या आंदोलनाला उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील सामोरे आले, माननीय मुख्यमंत्री आले नाहीत.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, त्यावेळी कोणत्या परिस्थितीत गहू आयात करावा लागला, हे लक्षात आले असावे. गहू आयात करावा लागला, ही सत्य परिस्थिती आहे. प्रश्न असा आहे की, सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गहू वाटप झाला आहे. आपण 33 हजार मेट्रिक टनाबाबत विचारीत आहात, मी त्याचेही उत्तर देणार आहे. 18 लक्ष 50 हजार मेट्रिक टन गहू वाटलेला आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, आदिवासी समाज यांचा उल्लेख केला. पण मी सांगू इच्छितो की, सर्व समाजासाठी हा गहू वाटप केलेला आहे, सर्वांसाठी वाटला गेला आहे, सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत सगळयांना दिला आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उपसभापती** : मंत्री महोदय, आपण डिस्टर्ब होऊ नका.

.....2..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी डिस्टर्ब होत नाही, माझे उत्तर असे आहे की, त्यांना ते शांतपणे ऐकून घेता येत नाही म्हणून तेच डिस्टर्ब होत आहेत. मी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन गडकरी यांना गेल्या पंधरा वर्षापासून या सभागृहामध्ये पहातो आहे, एवढे डिस्टर्ब झालेले मी त्यांना कधी बघितलेले नाही.

सभापती महोदय, गेल्या वर्षभरामध्ये या गव्हाचे वाटप सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत झ ाले, सूंपर्ण ग्रामीण योजनेअंतर्गत झाले आणि महाराष्ट्रामध्ये वाटप केलेला गहू 18 लक्ष 50 हजार मेट्रिक टन एवढा आहे. हा गहू वाटप होत असतांना त्या त्या वेळी काही तक्रारी जरुर आल्या. चार-पाच ठिकाणी तेथील लॅबमध्ये गहू पाठविण्यात आला. त्याच्या तारखा व सर्व रेकॉर्ड माझ्याकडे आहे. प्रश्न असा आहे की, ज्यावेळी याबाबत मुंबई भागामध्ये तक्रार आली त्यावेळी हा गहू त्या त्या ठिकाणच्या प्रयोगशाळेमध्ये पाठविला होता. सगळयांनी मानवी खाण्यास योग्य आहे, असेच प्रमाणपत्र दिलेले होते. वेळोवेळी ज्या ज्या वेळी चर्चा झाली त्यावेळी एफ.सी.आय.कडून गहू घेत असतांना एफ.सी.आय.च्या अधिका-यांनी आणि राज्य सरकारच्या अधिका-यांनी गहू खाण्यास योग्य आहे की नाही याची पडताळणी केल्याखेरीज गहू घेऊ नये, अशा खबरदारीच्या सूचना आम्ही दिल्या होत्या. त्या खबरदारीच्या उपाययोजनानुसार हा गहू भारतीय खाद्य नियामक आयोगाकडून घेतला आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत महाराष्ट्रातील सर्व जनतेला तो वाटप केला. त्यानंतर मार्च महिन्यामध्ये प्रश्न उपस्थित झाला. मुंबईमध्ये वितरणासाठी 10 हजार मेट्रिक टन गहू उपलब्ध झाला, ज्यावेळी 3 हजार मेट्रिक टन गव्हाचे वाटप मुंबईमध्ये सुरु झाले त्यावेळी तक्रार झाली. त्या तक्रारीच्या अनुषंगाने व त्याची योग्य ती दखल घेऊनच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यासमोर त्याचा पंचनामा करुन प्रयोग शाळेमध्ये गहू पाठविला. त्यामुळे आपण जे म्हणता की, 276 नमुने पाठविले, हे 276 नमुने पाठविले ते सार्वजनिक वितरण व्यवस्थतील नव्हते. मघापासून आपण ओरडून ओरडून सांगत होता. माझ्या हातात कागदपत्र आहेत. महाराष्ट्रामध्ये 1000-2000 गोडाऊन्स आहेत. आपण जे फोटो दाखविता, ते कुठले आहेत, कसले आहेत, तेही मी सांगणार आहे. या गोडाऊन्समध्ये बाजुला टाकलेला गहू आणायचा, त्याचे फोटो काढायचे आणि ते तुम्ही दाखविणार.

यानंतर श्री.बोरले..........

अग्रिम प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे .......

त्याची उत्तरे माझ्याकडे आहेत. आम्ही जे काही गव्हाचे नमूने पाठविले ते खुल्या बाजारातील गव्हाचे पाठविले हाते. त्यातील 80 टक्के गहू खाण्यास योग्य नाही असे नमुने जरुर आलेले आहेत. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गव्हाचे वाटप नव्हते. (अडथळा) सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेब बोलल्यानंतर मला त्याचे उत्तर दिले पाहिजे. मानवाधिकार आयोगासमोर झालेल्या निर्णयानंतर सुध्दा सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेबांनी एवढे भाष्य केले असेल तर त्याचे उत्तर मला देणे गरजेचे आहे. मानवाधिकार आयोगाने 31 तारखेलाच यासंबंधीचा निकाल दिलेला आहे.

श्री.नितीन गडकरी : प्रधान सचिव श्री.बक्षी साहेबांनी मानवाधिकार आयोगासमोर ॲफिडेव्हिट केले. ते मी तुम्हाला वाचून दाखवू काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, त्यासंदर्भात मला सुध्दा माहिती आहे. मी त्यासंदर्भात नंतर बोलतो. तुम्ही मघाशी वारंवार बोललात. महत्वाकांक्षी गांडूळ प्रकल्पाच्या बाबतीत तुमच्या मनातील उर्मी सारख्या बाहेर पडत होत्या, त्याचे उत्तर मला दिले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेब मी त्याचे उत्तर दिले नाही तर कसे चालेल ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, Any decision given by the Court's Chief Justice त्यांच्या निर्णयाच्या विरोधात तुम्ही जर बोललात तर कन्टेम्पट ऑफ कोर्ट होईल. ही केस सुरु झाल्यानंतर प्रधान सचिव श्री. बक्षी साहेबांनी हे स्वत: कबूल केले की, माझ्या जवळ ॲफिडेव्टि आहे, मी ते वाचून दाखवितो. त्यांनी सांगितले की, हा गहू कुजका आहे आणि त्यावर तुम्ही निर्णय दिला. हा गहू माणसांनी खाण्याच्या लायकीचा नाही त्यावर श्री.बक्षी साहेबांनी असे सांगितले की, आम्ही या गव्हाचे वितरण थांबवितो, आम्ही या गव्हाचे वाटप करणार नाही. त्यांची वकिली पुन्हा तुम्ही कशाला करता ?

श्री.दिलीप वळसे पाटील : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेब सांगत आहेत की, कोणत्याही न्यायाधिशांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द बोलणे कन्टेम्पट ऑफ कोर्ट आहे. माननीय मंत्री महोदयांनी कोणत्याही निर्णयाविरोधात उल्लेख केलेला नाही, त्यांनी कोणते परिच्छेद वाचलेले

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील.......

नाहीत आणि या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांना किंवा माननीय मंत्र्यांना आपली मत वक्त करण्यापासून न्यायालयीन परिस्थितीमध्ये त्याचा काही प्रतिबंध नाही. ज्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी बोलत होते त्यावेळी सत्ताधारी पक्षाच्या सर्व सदस्यांनी त्यांचे म्हणणे शांततेने ऐकून घेतले. त्यांनी जी कागदपत्रे दाखविली, ती आम्ही बघितली. माननीय मंत्री महोदय उत्तर देत आहेत. त्यांचे शांततेने ऐकून घेतले पाहिजे. त्यानंतर जर सन्माननीय सदस्यांना काही शंका-कुशंका असतील तर मंत्री महोदयांचे उत्तर झाल्यानंतर विचारण्याचा आपल्याला अधिकार आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जे जे मुद्दे त्यांच्या नेहमीच्या शैलीमध्ये सभागृहात सांगण्याचा प्रयत्न केला ते किती अयोग्य आहेत एवढेच मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. ज्यावेळी ते मुद्दे मांडत होते त्यावेळी हा निकाल लागलेलाच होता. त्याबद्दल मी काही म्हणतच नाही. मी कबूल करतो की, प्रयोग शाळेकडे आपण जे नमुने पाठविले, प्रयोग शाळेचे रिपोर्ट मी डिनाय करीत नाही. माझ्याकडे ते रिपोर्ट आहेत. त्यानंतरच मी स्वत: गहू वितरण थांबविण्याचा निर्णय घेतलेला आहे. माझ्या निर्णयामध्ये कोणीही हस्तक्षेप केला नाही. सभापती महोदय, हेच नमुने आम्ही पुण्याला पाठविले. पुण्याला जे नमुने पाठविले ते स्वतंत्र नमुने नाहीत. जे नमुने आम्ही वाशीला पाठविले होते त्याच दुकानातील नमुने आम्ही पुण्याला पाठविले. पुण्यावरुन त्या नमुन्याच्या बाबतीत जे काही विश्लेषण आले ते जवळपास 50 टक्क्यापेक्षा अधिक खाण्यास योग्य आहेत असे विश्लेषण आले. मंत्री म्हणून मी ज्यावेळी रेकॉर्डवर बोलतो म्हणजे माझ्याकडे पुरावे आहेतच. म्हणूनच आम्ही याबाबत असे ठरविले की, कोणत्याही परिस्थितीमध्ये ज्यावेळी अशा प्रकारे रिपोर्ट येतात त्यावेळी आम्ही विक्री करण्यास बंदी केली. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांचा औचित्याचा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी वाचून दाखविला. ज्यावेळी तो औचित्याचा मुद्दा सभागृहात उपस्थित झाला होता त्यावेळी मी सभागृहात उपस्थित नव्हतो. पण त्या औचित्याच्या मुद्यावर मी जे निवेदन केल त्या निवेदनामध्ये सुध्दा मी ही बाब स्पष्ट केलेली आहे की, हा गहू खुल्या बाजाराअंतर्गत विक्रीसाठी ठेवण्यात आला होता त्याला मी स्वत: स्थगिती दिलेली आहे. 5-6 महिन्यांनी ज्यावेळी योग्य रिपोर्ट आले त्यावेळी

..3...



GRB/ D/ MMP/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ....... 15:20

श्री.सुनील तटकरे .......

सुध्दा ते कन्झम्पशनसाठी योग्य आहेत की नाहीत याची तपासणी केली आणि ते कन्झम्पशनसाठी अयोग्य आहेत असे म्हटल्यानंतर ते नमुने डिस्पोज ऑफ करण्याचा निर्णय घेतला आणि ते डिस्पोजही केले आहे.

यानंतर कु.जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

हा प्रश्न फक्त खुल्या बाजाराच्या विक्रीअंतर्गतचा आहे. ठाणे,पूणे आणि सिंधुदूर्ग येथील प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेबांनी काढला होता तो खरा आहे. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत दिला जाणारा गहू, तसेच पब्लिक डिस्ट्रीब्यूशन सिस्टीममधून दिला जाणारा गहू याचा होणारा साठा हा किती दिवस असतो, हेही आपल्याला माहीत आहे. सर्वसाधारपणपणे आपल्या महाराष्ट्रामध्ये एका महिन्याला जवळपास 1,20,000 लाख मेट्रिक टन धान्य पी.डी.एस.मधून घेतले जाते. त्या सगळया धान्याचा खप दर महिन्याला स्वतंत्ररित्या होतो. जे जे नमुने आपण आता फोटोमध्ये दाखविले त्याची तुम्ही जरुर पुस्तिका काढा हे संपूर्ण ग्रामीण योजनेअंतर्गत झालेला पुरवठा असून, पाच सहा महिने उचल झाला नाही असा तो गहू आहे. संपूर्ण ग्रामीण योजनेअंतर्गत कशा पध्दतीचे धान्य वाटप केले जाते हे आपल्याला माहीतच आहे. 50 टक्के रोख आणि 50 टक्के धान्य अशा वेळेला मजूराला दिलेले वेतन तसेच त्यांना जे कुपन्स देण्यात येतात ते कुपन्स घेऊन हे मजूर बाजारात जात नाहीत. त्यामुळे तो धान्याचा साठा पडून राहतो. वाडयाला ज्यावेळी आपले लोक तपासणीसाठी गेले असतां त्यांना सांगितले की, संपूर्ण ग्रामीण योजनेअंतर्गत वाटला जाणारा गहू वाटपासाठी अयोग्य आहे. तरीसुध्दा जबरदस्तीने राजकीय हेतूने एखादी गोष्ट केली जाते त्यावेळी ख-या गोष्टीकडे दुर्लक्ष करण्याची जूनी सवय असल्यामुळे तशा प्रकारचा गव्हाच्या नमून्याचे फोटो काढून सतत टी.व्ही.वर दाखविण्याचे काम आमच्या सहकारी मित्रांनी केलेले आहे.

मी एक उदाहरण देतो आपण जो पिंपरी-चिंचवड येथील दुकानाचा हवाला दिला. ज्यांनी पत्रकारपरिषद घेतली ते गेलेच नाहीत तर आपले काही सदस्य गेले. त्यात त्यांनी दुकानामध्ये सांडलेला धान्य एकत्र करुन त्याचे एकूण 25 किलोचे पोते बाजूला न विकण्यासाठी म्हणून काढून ठेवले व तसे आपल्याला सांगितले होते की, हा गहू मातेरे आहे, तो विकण्यासाठी नाही. तरीदेखील आपण त्याचे नमूने टी.व्ही.वर दाखविले. आपण ज्या चित्राचा हवाला दिला ती वस्तुस्थिती नाही तर पूर्वग्रहदुषित व राजकीय दृष्टीने केलेले काम आहे. ते मला येथे सांगितलेच पाहिजे. आपण जे सिंधुदूर्ग जिल्हयाच्या प्रश्नाबाबत सांगितले ते खरे आहे. तेथील गोदामकारावर जी कारवाई केली. आपले सरकार असतांना आपलेही काही मंत्री या

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

खात्याचे काम करीत होते, आपल्यालाही कल्पना आहे की, गहू तांदूळ घरामध्ये साठा करुन ठेवला तर तो साफ करावा लागतो नाही तर त्याच्यामध्ये अळया होतात. फ्युमिगेशन, अपग्रेडेशन ही गेल्या 50 वर्षांपासूनची प्रोसिजर आहे, त्यासाठी सरकार काही निधी ठेवत असते. या गोदामकारांनी तेथील धान्याचे फ्युमिगेशन आणि अपग्रेडेशन करण्याची खबरदारी घेतली नाही, म्हणून त्यांच्यावर कारवाई झाली. त्यांच्या निष्काळजीपणामुळे तो गहू खराब झाला. जो गहू खरेदी झाला त्यासंदर्भात मला सांगावयाचे आहे की, गहू आयात करणे आणि गहू खरेदी होणे या दोन गोष्टीतील फरक समजावून घ्यावा. मी सांगितले की, 18,50,000 मेट्रिक टन गव्हाचे वाटप सहा ते सात कोटी लोकांना झाले, त्यांनी तो खाल्ला पण त्यांना काही झाले नाही. तुम्ही सांगितले त्याप्रमाणे जर काही आजार झाले असते तर प्लेग वगैरे सारख्या साथी आल्या असत्या. महाराष्ट्रातील सर्वसामान्य लोकांना हा गहू आम्ही गेले वर्षभर देत आलो. आता आपण जे म्हणताय 21 तारखेला किंवा त्याच्या अगोदर ज्या वेळेला या प्रश्नाच्या बाबतीत चर्चा झाली. ज्यावेळेला भारतातील गव्हाचे उत्पादन मोठया प्रमाणावर वाढले याचे कारण माननीय श्री.पवार साहेब ज्यावेळी या देशाचे कृषी मंत्री त्यावेळी किमान आधारभूत किमतीमध्ये त्यांनी फार मोठया प्रमाणावर वाढ केली. 235 रुपये पर क्विंटल जादा दर दिला. या सा-याचा परिणाम गव्हाचे उत्पादन देशामध्ये मोठया प्रमाणावर होण्यामध्ये झाला. त्यामुळे पुन्हा एकदा गोदामे पहिल्यासारखी भरलेली दिसत आहेत.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, देशातील फुड सिक्युरिटीचा प्रश्न ज्यावेळी उभा राहतो त्यावेळेला केंद्रसरकारची ही जबाबदारी असते की, या देशाला लागणाऱ्या गव्हाचा आपल्याला प्रॉपर स्टॉक करावयाचा असतो. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी हा वादाचा मुद्दा काढण्याचे काहीही कारण नाही. आपल्या सरकारच्या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये सरकारी गोदामामधील गहू खाजगी व्यापा-यांना सरकारी किंमतीमध्ये एक्सपोर्ट करण्याची जी परवानगी दिली त्यामुळे जो स्टॉक कमी झाला हे एका बाजूला घडले आणि दुस-या बाजूला आपल्या सरकारच्या कालावधीमध्ये, आपल्या सरकारच्या संपूर्ण पाच वर्षामध्ये 50 वर्षाची दरवाढ लक्षात घेऊन किमान आधारभूत किमत देण्यात आली म्हणजे दरवर्षी फक्त 10 रुपये शेतक-यांना वाढवून

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे - पाटील........

देण्यात आले. त्यामुळे या देशातील गव्हाचे उत्पादन ड्रॉप झाले ते वाढविण्यासाठी शेतक-यांना पेरणी करण्यापूर्वी त्यांनी त्या ठिकाणी गव्हाची आधारभूत किमत केंद्रसरकारने जाहीर करावी लागते ती किमंत सरकारने जाहीर केली म्हणून गेल्या काही वर्षामध्ये या देशामध्ये गव्हाचे उत्पादन वाढले.

यानंतर श्री.गागरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

आयात केलेला गहू कमी दर्जाचा असल्याचे सांगितले जात आहे. केंद्र सरकारला देशातील धान्याचा योग्य तो स्टॉक राखून ठेवावा लागतो. त्यासाठी मार्केटमध्ये प्रोक्युअरमेंट करावी लागते. व आयात करावी लागते. खुल्या मार्केटमध्ये कोणत्या धान्याचा साठा कमी आहे, त्याप्रमाणे निर्णय घ्यावा लागतो. नाही तर देशातील धान्याच्या किंमतीवर या धोरणाचा परिणाम होण्याची शक्यता असते. त्याचा परिणाम थेट ग्राहकांना भोगावा लागतो. त्यामुळे आयातीचा किंवा निर्यातीचा निर्णय वेळोवेळी त्या त्या परिस्थितीनुसार घ्यावा लागतो. गव्हाच्या खरेदीमध्ये देशातील स्टॉक राखण्याच्या दृष्टीने निर्णय घेतला आहे. गहू किंवा इतर वस्तुंच्या किमतीतील चढउताराबाबत मी उदाहरण देऊ इच्छितो. आज क्रूड आईल खरेदी केले तर आजची किंमत व दहा दिवसानंतरची किंमत यामध्ये फरक असतो. त्यामुळे एखादी वस्तू स्वस्त किंवा महाग मिळू शकते.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या गव्हाचे वितरण करीत असताना दिनांक 1.12.2006 रोजी औरंगाबाद येथील प्रयोगशाळेतून फिट फॉर कन्झमशन असा रिपोर्ट आलेला आहे. सांगली येथील गव्हाचा रिपोर्ट फिट फॉर कन्झमशन आलेला आहे. दिनांक 2 आक्टोबर 2007 रोजी मानवत परभणी येथे पाठविला तेथूनही फिट फॉर कन्झमशन रिपोर्ट आला आहे. धुळे येथील गव्हाचा रिपोर्ट फिट फॉर कन्झमशन आलेला आहे. फक्त श्री.किरीट सोमय्या यांनी दिलेला नमुना नॉट फिट फार कन्झमशन आलेला आहे. लातूर येथे गहू पाठविला, येथील रिपोर्ट दिनांक 11.11.2007 रोजी आला असून तो फिट फॉर कन्झमशन आहे. याबाबत त्या त्या वेळी खुलासा करण्यात आलेला आहे. गव्हाची खरेदी करताना दिवाळीचा सण तोंडावर असताना खरेदी करण्यात आलेली आहे, बाजारामध्ये गव्हाच्या किमतीचा समतोल राखण्यासाठी ही खरेदी करण्यात आली आहे. त्यावेळी अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या वतीने मी निर्णय घेतला आहे, माननीय मुख्यमंत्री महोदयांना त्यावेळी याची कल्पना होती, त्यांची परवानगी घेतली आहे कारण ते सरकारचे प्रमुख आहेत. काही बाबतीत माझ्या स्तरावर निर्णय घेतला होता. सध्या राज्यात 33 हजार मेट्रीक टन गहू शिल्लक आहे. फिट फॉर कन्झमशन असा रिपोर्ट असला तरी सध्या राज्यात गव्हाचे वाटप थांबविले आहे, आता भारत सरकारकडून धान्याचा साठा मोठया प्रमाणावर आलेला आहे.

.....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना मी सांगू इच्छितो की, चर्चा करताना काही बाबतीत राजकीय हेतू असू शकतो. तुमच्या सद्‌भावनाबद्दल माझ्या मनात शंका नाही. तुमच्या राजकीय हेतूबद्दल शंका आहे. ज्यावेळेला एकदा प्रश्नाचा आपण पाठपुरावा करता. त्यावेळी राजकीयदृष्टया हेतू निर्माण होण्याची शक्यता निश्चितपणे होत असते.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव श्री.बक्षी यांनी ॲफेडेव्हीट सादर केले आहे.

"The State Government has issued order dated 31.10.2007 to stop the distribution of red imported wheat through the fair price shops of the PDS"

मंत्रीमहोदय Fit for Human consumption म्हणत असले तरी सचिवांनी त्याचे वाटप रोखले आहे. आमच्याकडील पुराव्यानुसार हा गहू Not fit for Human consumption. आहे. एवढा चांगला गहू असेल तर श्री.बक्षी यांनी दिनांक 31.10.2007 रोजी ॲफेडेव्हीट का करुन दिले आहे. गहू चांगला आहे तर वाटा, त्याचे वाटप बंद का केले आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, प्रयोगशाळेच्या रिपोर्टनंतर सध्या गव्हाचे वाटप थांबविले आहे. याबाबत अनेक गैरसमज झाल्याने वाटप थांबविण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु या गव्हाच्या 44 पैकी 43 नमुने मानवी खाण्यास योग्य म्हणजे Fit for Human consumption असल्याचे सिध्द झाले आहे.

नंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

Shri Nitin Gadkari : Sir, the State Government is going to ask the Government of India regarding disposal of red imported wheat approximately 3000 Metric Ton lying in the godowns and will not be distributed to fair price shops under PDS herein after.The State Government has already started supply and distribution of white indigenous wheat received from the food Corporation of India to the PDS. From the above statement made on behalf of the State Govt. by the Principal Secretary, Food Civil Supplies and Consumer Protection Department,It is clear that the State Government has virtually accepted the grievances voiced in the Petition. Since the policy decision has been taken in the matter not to distribute the red imported wheat which is of inferior quality to the fair price shops under the PDS and that the State Government is seeking appropriate directions from the Government of India regarding disposal of the red imported wheat.

सभापती महोदय, आपण येथे सर्व कबूल करीत आहात की, हा गहू खराब दर्जाचा होता.त्यामुळे त्याचे वितरण थांबविलेले आहे. परंतु पुन्हा हा गहू चांगला आहे असे आपण एका बाजूला म्हणता हे कसे काय योग्य आहे ? आम्ही सचिवांवर विश्वास ठेवायचा की आपल्यावर विश्वास ठेवायचा ?

श्री. सुनिल तटकरे : सभापती महोदय, सचिवांचे ॲफिडिव्हेट हे माननीय मंत्री महोदयांच्या ाहीनेच होते. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी, आपण देखील सरकारमध्ये काम केलेले आहे. त्यामुळे ही प्रक्रीया कशी असते याची आपल्याला माझ्यापेक्षा अधिक माहिती आहे . आपण तर वजनदार मंत्री म्हणून सरकारमध्ये काम केलेले आहे. गव्हाचे वाटप काँशिअसली थांबविण्यात आलेले आहे. 3 हजार मॅट्रीक टन गहू शिल्लक राहिला आहे.यासंदर्भात लॅबोरेटरीतील रिपोर्ट आल्यानंतर हा गहू केंद्र शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या अंतिम निर्णयानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल. म्हणूनच सभापती महोदय, आपण मघाशी सांगितल्याप्रमाणे,

..2..



श्री. सुनील तटकरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्रामध्ये गेले वर्षभर, वेगवेगळया योजनांतर्गत आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत 1 लाख 57 हजार मॅट्रिक टन गव्हाचे वितरण झाले. त्यापैकी काही गहू हा भारताने उत्पादित केलेला होता. तसेच साधारणत: 14 ते 15 लाख मॅट्रिक टन गहू हा आयात केलेला आहे. 3 लाख मॅट्रिक टन पांढऱ्या रंगाचा गहू होता. 10.5 ते 11 लाख मॅट्रिक टन गहू लाल रंगाचा होता.या सर्व गव्हाचे वाटप महाराष्ट्रामध्ये निश्चितपणे झाले आहे. यासंदर्भात ज्या ज्या शंका सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी उपस्थित केलेल्या आहेत त्या शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे यासंदर्भात प्रकल्प निर्मिती करण्याची आवश्यकता नाही. आवश्यकता भासल्यास आपला मौलीक सल्ल्याचा जरूर विचार करण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजने मधून अर्ध्या दराने धान्य दिले जात होते. परंतु कूपनचे वाटप न झाल्यामुळे, हा सर्व गहू शिल्लक राहिला आहे. यासंबंधी संबंधित अधिकाऱ्यानी योग्य ती काळजी न घेतल्यामुळे त्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही केली गेली अशी माझ्याकडे माहिती आहे. मला येथे असे विचारावयाचे आहे की, अशा प्रकारचा गहू किती तालुक्यांमध्ये शिल्लक आहे? मी आपल्याला सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती चुकीची आहे. मुळशी तालुक्यात गेल्या 2 वर्षात संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत गव्हाचे वाटप झाले नाही तर तेथे गहू शिल्ल्क कसा काय राहणार आहे आणि हा गहू सडणार कसा काय ? या गहू घोटाळयासंबंधी आपण उत्तरामध्ये उल्लेख करावा.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत नियमाप्रमाणे काही गहू गोदामामध्ये शिल्लक ठेवला जातो. जिल्हयामध्ये ग्रामपंचायतीच्या अखत्यारित जी कामे घेतली जातात त्या कामांच्या अनुषंगाने गव्हाचे वितरण केले जाते तसेच कामांची बिले रेकॉर्ड करुन त्याची रक्कम 50 टक्के रोख व 50 टक्के धान्य रुपाने दिली जाते. असा गहू त्याठिकाणी होती किंवा काय याबाबत चौकशी करण्यात येईल व योग्य ती कार्यवाही केली जाईल.

यानंतर श्री. सुंबरे...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी अशी एक म्हण आहे. ....

श्री. दिलीप वळसे-पाटील : (खाली बसूनच..) अजून मंत्र्यांचे उत्तराचे भाषण संपलेले नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मंत्र्यांचे उत्तराचे भाषण संपलेले नाही असे ते म्हणतात. पण आपण ते संपलेले आहे असे सांगितले म्हणूनच मी प्रश्न विचारण्यास उभा राहिलो. पण तरीही मंत्र्यांना काही सांगावयाचे असल्यास ते अजूनही सांगू शकतात. सभापती महोदय, आपण म्हणता आहात की, मंत्र्यांचे भाषण संपले. पण माननीय मंत्री श्री.वळसे-पाटील मात्र सांगत आहेत की, श्री.तटकरे साहेबांचे भाषण अजून संपलेले नाही. कदाचित त्यांच्या पक्षाचा आदेश तसा असेल ...

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, येथे पक्षाच्या आदेशाचा प्रश्न नसतो. जेव्हा आपण येथे अशा महत्त्वाच्या विषयावर चर्चा उपस्थित करतो. आता भारतीय जनता पक्षाने एका बाजूने एका पुस्तकाचे प्रकाशन केलेले आहे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बाजूनेही एका पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले आहे. या काही प्रश्नांची उत्तरे या सभागृहाला मिळाली पाहिजेत. एनडीए सरकारच्या काळामध्ये जो गहू देशाच्या कोठारांमधून निर्यात करण्यात आला ... अडथळा ......ज्यातून 16 हजार कोटी रूपयांचे नुकसान या देशाचे झाले आहे त्या संदर्भात भारतीय जनता पार्टी काही जबाबदारी घेणार आहे का ?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना येथे अशा प्रकारे सदस्यांना प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे का ? ....

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मी तेच सांगत होतो. मंत्री महोदय भाषण करीत असताना आपण वारंवार मध्येच उठून बोलत होता. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांचे बोलण्याची स्टाईल आम्हाला चांगली माहिती आहे. मी पहिल्यापासून तेच सांगत आहे, जे मी आता सांगितले आहे. ...

...... 3पी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी ही म्हण मी आपल्याला सांगितली. मी माननीय मंत्री महोदयांना दोष देत नाही. असे आहे की, त्यांची बिचाऱ्यांची इच्छा असो वा नसो, त्यांनी येथे त्यांच्या नेत्यांची, श्री.पवार साहेबांची भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणूनच मी ही म्हण म्हणून दाखविली आहे. पण मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, त्यांनी जे काही येथे सांगितले त्यामध्ये आणि त्यांच्या विभागाच्या प्रधान सचिवांनी सरकारच्या वतीने जे ॲफिडेविट करून दिले आहे त्यामध्ये खूप मोठी तफावत आहे. मंत्री महोदय येथे सांगत आहेत की, लाल गहू चांगला आहे, आरोग्याला देखील चांगला आहे वगैरे वगैरे परंतु त्यांच्या विभागाच्या प्रधान सचिवांनी वेगळेच सांगितले आहे म्हणजे वेगळेच ॲफिडेविट करून दिलेले आहे. जर आपण म्हणता आहात की, हा उरलेला गहू चांगला आहे, माणसाने खाण्यास योग्य आहे, आरोग्याला चांगला आहे तर मग हा उरलेला 3300 टन गहू आपण राष्ट्रवादी काँग्रेसने घेऊन गावोगावी मोफत वाटून द्यावा. आम्ही त्याला हरकत घेणार नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती दराडे ताईंना मी सांगेन की, त्यांनी हा उरलेला गहू त्यांच्या बीडमध्ये घेऊन जाऊन वाटावा. ... सभापती महोदय, मी येथे असे सांगत हातो की, मंत्र्यांचे उत्तर आणि त्यांच्याच विभागाच्या प्रधान सचिवांचे ॲफिडेविट यामध्ये विसंगती आहे. मी आता ते येथे पुन्हा वाचून दाखवित नाही. माझ्याकडे त्या ॲफिडेविटची प्रत आहे. पण प्रधान सचिवांनी हे ॲफिडेविट करण्यापूर्वी मंत्र्यांची, माननीय मुख्यमंत्र्यांचीही सही त्यावर घेतलेली आहे. तरी देखील मी आपल्याला सांगू इच्छितो की, सन्माननीय मंत्री महोदय, श्री. तटकरे यांची येथे झालेली कुचंबणा माझ्या लक्षात आलेली आहे. त्यांची अडचण मी समजून घेतो. त्यांना एकच विनंती करतो की, केंद्र सरकारकडे हा गहू थांबविला आहे, तो पुन्हा येथे येऊ नये. ....

( यानंतर श्री. सरफरे .... 3क्यू 1 ..

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

सचिवांनी प्रतिज्ञापत्र दिले आहे. हा गहू पुन्हा पाठवू नका असे पत्र आपण केंद्र सरकारला पाठविणार काय? दुसरी गोष्ट अशी की आता पुन्हा आणू नका. 1200 यूरीक ॲसिड असलेला गहू बिस्किट बनविणाऱ्या कंपन्यांना देण्यासाठी आपण मंत्रालयामध्ये मिटींग बोलाविली. तसा प्रयत्न करु नका. मेहरबानी करुन आपण तशी कारवाई करणार काय?

श्री. सुनील तटकरे :सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मिटींग गहू आला त्यावेळी बोलाविली नाही. खुल्या बाजारातून ज्यावेळी गहू सरकारकडे येतो त्याबाबतची माहिति आपण माननीय श्री. हरिभाऊ बागडे आणि माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्याकडून घेण्याचा प्रयत्न करा. खुल्या बाजारातून गहू ज्यावेळी मार्केटमध्ये येतो त्यावेळी तो बेकरीवाल्यांना देण्याची पध्दत पूर्वीपासून आहे. आपण म्हणता त्याप्रमाणे यासंबंधी बैठक अगोदर झ ाली आहे, ती नंतर झालेली नाही. गहू आल्यांनतर आणि त्याचे निष्कर्ष प्राप्त झाल्यानंतर त्याच्या वाटपाला स्थगिती देण्याचे आदेश माझ्या स्तरावर झाले आहेत. तेव्हा माननीय सदस्य वारंवार मघापासून रेटून बोलत आहेत...

**उपसभापती** : मंत्रिमहोदय, माननीय सदस्य आता रेटून बोलत आहेत, नंतर ते आपल्याशी खेटून बोलतील.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, जाता जाता एकच गोष्ट सांगतो. ते म्हणाले की माननीय श्री. पवार साहेबांची मी वकिली करतो. माननीय श्री. पवार साहेब हे खूप मोठे आहेत, ते कुठे आणि मी कुठे, तुम्ही कुठे हे तुम्हालाही माहीत आहे. त्यांच्यासमोर आपले स्थान काय हे तुम्हालाही माहीत आहे आणि माझे स्थान काय आहे हे महाराट्रातील लोकांनाही माहीत आहे. त्यांचे समर्थन करण्याइतपत मी मोठा नाही. त्यांचे समर्थन करण्याइतपत ते प्रगल्भ आहेत. तुम्ही त्यांच्या बाबतीत अनेक वेळा बोलला आहात. त्यामुळे तुम्ही जे बोलला आहात त्याबाबतची वस्तुस्थिती मी याठिकाणी मांडली आहे. सरकारने ॲफिडेव्हिट केले असेल, किंवा वाटप केले असेल हे महाराष्ट्रात वर्षभर झाले आहे. मी फक्त एवढेच म्हटले की, तुमची वेळ चुकली आहे. वेळ चुकल्याचा तुमच्यावर परिणाम झाल्यामुळे तुम्ही हे बोलत आहात. तुम्हाला वाटले होते की, लोकसभेच्या निवडणुका लवकरच येणार असल्यामुळे तुम्ही हा विषय हाती घेतला होता. त्यामुळे तुमची गडबड झाली आहे. बाकी गडबड होण्याचे कारण नाही. मी आपणास सांगू इच्छितो की, गव्हाचे वाटप योग्यरितीने झाले आहे. तसेच, यापुढे जेव्हा जेव्हा भारतीय अन्न महामंडळाकडून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री.सुनील तटकरे..

गहू उपलब्ध केला जाईल त्याचे परिक्षण केल्यानंतरच तो लोकांना वाटप करण्याबाबत काळजी घेतली जाईल.

**उपसभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

----

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सिंधुदुर्ग जिल्हयात झालेल्या धान्य घोटाळयाबाबत**

**करावयाच्या निवेदनासंबंधी**

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, गेल्या आठवडयात सिंधुदुर्ग जिल्हयात झालेल्या धान्य घोटाळयाबाबत चर्चा झाल्यानंतर विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी केली जाईल , ज्या धान्य दुकानांना परवाने दिले आहेत ते रद्द केले जातील आणि या प्रकरणामध्ये जे अधिकारी सहभागी आहेत त्यांची तातडीने बदली केली जाईल असे मंत्रिमहोदयांनी आश्वासन दिले होते. परंतु अद्यापपर्यंत यासंबंधी कारवाई झाली नाही. तेथील डी.एस.ओ. आणि तहसिलदार हे 48 तास अटकेत होते. तरीदेखील त्यांच्यावर निलंबनाची कारवाई झाली नाही. याबाबत सोमवारी मंत्रिमहोदयांनी निवेदन करावे असे आपण निदेश दिले होते. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस असतांनाही शासनाकडून निवेदन आले नाही. हा आपण दिलेल्या निदेशाचा अवमान आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, कामकाज संपण्यापूर्वी निवेदन केले जाईल.

(गोंधळ)

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी निवेदन केले जाईल असे मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे.

(गोंधळ)

**उपसभापती** : मंत्रिमहोदयांनी कामकाज संपण्यापूर्वी निवेदन केले जाईल असे म्हटले आहे.

श्री. अनिल परब : सभापती महोदय, हे अधिकारी 48 तासापेक्षा अधिक काळ अटकेत होते. तेव्हा आपण त्यांना निलंबित केले पाहिजे.

(यानंतर श्री. बरवडे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आज निवेदन आले नाही तर आम्ही वेलमध्ये बसू. जे अधिकारी 48 तास जेलमध्ये राहिले त्यांना निलंबित करीत नाहीत. शासन कशासाठी त्यांना प्रोटेक्ट करते ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : निवेदन करु असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे. सभागृहाची बैठक संपण्यापूर्वी ते निवेदन करणार आहेत.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा काय पोरखेळ चालला आहे ?

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी उपस्थित केलेल्या मुद्यावर सभागृहाची बैठक संपण्याच्या आधी माननीय राज्यमंत्री श्री. राणा जगजितसिंह पाटील यांनी निवेदन करावे. जोपर्यंत ते निवेदन करणार नाहीत तोपर्यंत सभागृहाचे कामकाज चालू राहील.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, काल या सभागृहामध्ये नियम 93 च्या सूचना चालू असताना अचलपूरच्या दंगलीसंबंधीची नियम 93 ची सूचना होती. त्याबाबत माननीय सभापतींनी संध्याकाळपर्यंत मंत्रिमहोदयांना निवेदन करण्यास सांगितले होते. आज नियम 93 ची निवेदने पटलावर ठेवलेली आहेत. हे निवेदन पटलावर ठेऊन चालणार नाही. या नियम 93 च्या निवेदनावर चर्चा व्हावी असे आदेश दिलेले होते.

**उपसभापती** : माननीय मंत्रिमहोदय काल निवेदन करण्यास तयार होते. आपणच ते निवेदन पुढे ढकलले होते. आजच्या अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाल्यानंतर ताबडतोब ते निवेदन होईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अचलपूरची दंगल होऊन दोन आठवडे झालेले आहेत.

**उपसभापती** : माननीय मंत्रिमहोदय काल निवेदन करण्यास तयार होते. माझ्याकडे निवेदनाची प्रत आली होती. त्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना वाटावयाच्या होत्या आणि त्यासाठी त्यांनी परवानगी मागितली असता त्यांना सांगितले की, हे निवेदन उद्या करावे. त्याप्रमाणे ते आज निवेदन करणार आहेत. आता यानंतर अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करावयाची की मध्यंतर घ्यावयाचे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आजचा अंतिम आठवडा प्रस्ताव पॅकेजच्या संदर्भात आहे. त्याच्याशी संबंधित एकही मंत्री या ठिकाणी उपस्थित नाही. आम्ही कोणासमोर बोलावयाचे ?

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.15 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 3.52 ते 5.15 मध्यंतर )

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(मध्यंतरानंतर)**

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**अखिल भारतीय प्रतोद परिषदेसंबंधी घोषणा**

**उपसभापती** : केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालय, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने चौदावी अखिल भारतीय प्रतोद परिषद सोमवार, दिनांक 4 फेब्रुवारी व मंगळवार, दिनांक 5 फेब्रुवारी 2008 रोजी विधान भवन, मुंबई येथील मध्वर्ती सभागृहात घेण्यात येणार असून परिषदेच्या कार्यक्रमाचा सविस्तर तपशील सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेच्या संदर्भात**</u>

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मी दिनांक 27 नोव्हेंबर 2007 रोजी नियम 289 अन्वये सूचना दिली होती व आपण त्याबाबतीत माझे म्हणणे मांडण्याची मला परवानगी दिली होती. मी माझे म्हणणे मांडल्यानंतर त्या विषयावर शासनाने तातडीने निवेदन करावे असे निर्देश आपण दिले होते. त्यासंदर्भात अद्यापपर्यन्त निवेदन आलेले नाही किंवा ते सर्क्युलेटही केलेले नाही. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे.

**उपसभापती** : अधिवेशन संपण्यापूर्वी निवेदन केले जाईल.

--

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषाताई दराडे)**

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 4.15

**पृ.शी.**: विदर्भातील शेतक-यांच्या पॅकेज जाहीर करुनही आत्महत्या न थांबणे

**मु.शी.** विदर्भातील शेतक-यांच्या पॅकेज जाहीर करुनही आत्महत्या न थांबणे या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ. नीलम गो-हे, श्री. मधुकर चव्हाण, व डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

"विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या थांबण्यासाठी राज्य शासनाने 1075 कोटी रुपयांचे विदर्भ पॅकेज जाहीर करणे, हे पॅकेज जाहीर केल्यानंतर आत्महत्या न थांबल्यामुळे जून, 2006 मध्ये भारताच्या पंतप्रधानांनी पुन्हा नागपूरमध्येच येऊन 3750 कोटी रुपयांचे पंतप्रधान पॅकेज जाहीर करणे, सदर दोन्ही पॅकेजमधून विविध योजनांसाठी निधी उपलब्ध करुन आर्थिकदृष्टया दुर्बल शेतक-यांकरिता भू-सुधार, जलसंधारण, सेंद्रीय शेती आदी बाबीसाठी कार्यक्रम मंजूर करणे, दुभत्या जनावरांच्या वितरणासाठी तरतूद करणे, सेंद्रीय शेती अभियान योजनेकरिता निधी उपलब्ध करणे, शेतक-यांच्या अवजारांसाठी निधी उपलब्ध करणे आणि जो थोडा फार निधी उपलब्ध झाला, तो त्या त्या योजनांसाठी न वापरता शासकीय अधिका-यांनी त्याचा मोठ्या प्रमाणात अपहार करणे, पॅकेजअंतर्गत वाटप करण्यात येणा-या वस्तू उदाहरणार्थ कृषिपंप, स्प्रे पंप इत्यादींच्या खरेदीत भ्रष्टाचार होणे, शेततळ्यांच्या (चेकडॅम) शीर्षकाखाली आलेले 60 कोटी रुपये खर्च होणे परंतु प्रत्यक्षात शेततळी न होणे, सेंद्रीय शेतीशाळा सुरु न होणे, महासंचालक या पदावरील व्यक्तीचे पद सचिव स्तरावरुन सहसचिव दर्जाचे करणे, तसेच महासंचालकांची सतत बदली करणे, वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होणे आणि या सर्व परिस्थितीकडे शासन करीत असलेले दुर्लक्ष, यामुळे वाढत असलेल्या शेतक-यांच्या आत्महत्या व याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, हे अधिवेशन सुरु झाल्यापासून शेतक-यांच्या कर्जमुक्ती संदर्भात संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एक मानसिक, वैचारिक धारणा निर्माण झाली. सर्वसाधारणपणे शेतक-यांच्याबाबतीत

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...)

बोलले जाते त्यावेळी ग्रामीण भाग आणि शहरी भाग असा वितंडवाद होतो. किंबहुना शहरी भागातील जनतेला या ग्रामीण भागातील शेतक-यांबद्दल कोणतीही सहानुभूती किंवा आपुलकी वाटत नाही अशा प्रकारचा अनुभव अनेकांच्या बोलण्यातून येत असतो. परंतु आता प्रथमतःच महाराष्ट्रामध्ये एक वेगळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. गेल्या 15-20 दिवसामध्ये या महाराष्ट्राच्या सर्व शहरी भागातील सर्व स्तरातील माणसांपासून ते ग्रामीण भागातील माणसांपर्यन्त सर्वच पातळीवर आता शेतक-यांना कर्जमुक्ती दिली पाहिजे अशी भावना निर्माण झालेली आहे आणि ती भावना अतिप्रबळ आहे. या सदनामध्ये कर्जमुक्तीच्या संदर्भात चर्चा झाली त्यावेळी देखील या सदनातील सर्व विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांपासून ते सत्ताधारी पक्षातील सर्व सन्माननीय मंत्रीमहोदय आणि सन्माननीय सदस्यापर्यंत सर्वांनी एकच भावना व्यक्त केलेली आहे. मला आग्रहाने आणि सन्मानाने बोलावेसे वाटते की, ही भावना इतकी तीव्र आहे की तिचे प्रतिबिंब विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये उमटले. म्हणून या सदनामध्ये त्यासंबंधीचा प्रस्ताव आणला पाहिजे ...

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

अशाप्रकारे शेतकऱ्यांच्या संदर्भातील आपल्या भावना व्यक्त करुन या सदनाच्या माध्यमातून आदर व्यक्त केलाच, परंतु आमच्या विधानसभेच्या सभागृहामध्ये झालेल्या चर्चेच्या अंती सातत्याने मागणी केल्यानंतर माननीय अध्यक्षांनी सरकारला असे सांगितले, सूचना नव्हे, जवळजवळ निर्देश दिले की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी कर्जमाफीच्या संदर्भातील धोरण जाहीर करा. कर्जमाफी केव्हा होईल हा नंतरचा प्रश्न आहे. परंतु कर्जमाफीची भूमिका जाहीर करा अशा प्रकारे माननीय अध्यक्षांनी सांगणे आणि या सभागृहाच्या माननीय सभापतींनी भावना व्यक्त करणे ही मला वाटते महाराष्ट्राच्या इतिहासातील फार मोठी घटना आहे. म्हणून कर्जमाफीच्या संदर्भात शेतकऱ्यांबाबत ज्यांनी ज्यांनी संवेदना मांडल्या ते कोणत्या पक्षाचे आहेत, कोणत्या परिस्थितीतील आहेत यापेक्षाही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या संवेदनांना एवढे बोलके करण्याचे काम केले त्याबद्दल मी सर्वांना मनापासून धन्यवाद देतो, त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, मला याठिकाणी आवर्जून उल्लेख केला पाहिजे. देशोन्नती या वृत्तपत्रामध्ये आज अग्रलेख छापून आला आहे. कर्जमाफी नकोच नको. अनेकांचा गैरसमज झ ाला. श्री.प्रकाश पोहरे सातत्याने प्रश्न लावून धरतात, त्यांनी असा अग्रलेख का लिहावा? अग्रलेख वाचल्यानंतर मर्म लक्षात येते. श्री.मोहन धारिया यांना मी फोन करुन सांगितले, तुम्ही माझ्या दिंडीत याल का? यामागे संदर्भ असा आहे की, त्यांनी पुण्याला कर्जमाफीच्या संदर्भात उपोषण केले होते. मी दिंडी काढली ती कर्जमुक्तीची होती. कर्जमाफी हा विषय नव्हता. सन्माननीय श्री.अंतुले यांनी कर्जमाफी केली. सन्माननीय श्री.शरद पवार यांनी कर्जमाफी केली. पुन्हा महाराष्ट्रामध्ये कृषि क्षेत्रात धोरणामुळे असेल, नैसर्गिक आपत्तीमुळे असेल पुन्हा शेतकरी अडचणीत आला. तो इतका अडचणीत आला की, आंतरराष्ट्रीय पातळीवर विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येबाबत सहानुभूती निर्माण करण्याची परिस्थिती आली. शेतकऱ्यांना कर्जमाफी हा एकमेव मार्ग आहे हा विचार मांडला गेला. मी दिंडी काढण्यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी यांच्याशी चर्चा केली होती. त्यांचे मला मार्गदर्शन लाभले होते. कर्जमाफी तुम्ही कोणाला देणार हा विषय नेहमी चर्चेला येतो. मरतात ते मूर्ख आणि रखडतात ते शहाणे अशी भूमिका तयार होते. तुम्ही ज्या तारखेपासून कर्जमाफी करणार आहात त्या तारखेपासून शेतकऱ्यांनी प्रामाणिकपणे कर्ज फेडले असेल तर त्यांना तो परतावा मिळाला पाहिजे आणि समान पातळीवर

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

सर्वांना आणले पाहिजे. कर्जमाफी हा मार्ग नाही. कर्जमाफी केल्यानंतर पुढे कर्ज घ्यायला लागणार नाही ही भूमिका सर्व तज्ञांनी मांडली आहे. तशी ती श्री.प्रकाश पोहरे यांनीही मांडली आहे. त्यांचे मी अभिनंदन करतो. जाहीर भूमिका अग्रलेखाच्या माध्यमातून त्यांनी मांडली. अधिवेशन संपत आले आणि कर्जमाफी हे धोरण घेऊन मी काय, आपण सर्वच शेतकऱ्यांच्या या भावनांशी एकमत आहोत. प्रामाणिकपणे सांगायचे तर आजच्या भाषणाचा रोख समजून घ्या. सरकार आहे, सरकारला जमेल ते करावे लागते. जमेल ते करीत असताना ते योग्य आहे की अयोग्य आहे याचा लेखाजोखा पूर्णत्वाला गेल्यानंतर समजते. परंतु ते त्यांच्यापर्यंत पोहोचू देणार नसाल आणि सरकारने निर्माण केलेल्या योजनांना मूठमाती देणारे अधिकारी निर्माण होत असतील तर, आजच्या चर्चेचा तोच रोख आहे. सन्माननीय मंत्रीमहोदय, पॅकेजचे वाटोळे कोणी केले असेल, तुम्हाला नम्रपणे सांगतो, ही चर्चा केल्यानंतर या सदनामध्ये तुम्हाला सांगावे लागेल की, एकाचाही मुलाहिजा ठेवला जाणार नाही. केवळ निलंबन नाही तर ज्यांनी ज्यांनी शेतकऱ्यांच्या मढ्यावरचे लोणी खाऊन त्यांना आत्महत्या करायला प्रवृत्त केले त्यांच्यावर गुन्हा दाखल कराच, नोकरीतून बडतर्फ करुन त्यांना आयुष्यातून उठवा. अशी जरब त्यांच्यावर बसली पाहिजे. ज्यांच्या जिवावर सरकार योजना राबविते, त्या सरकारी योजनांचे हे अधिकारी वाटोळे करतातच, परंतु त्या शेतकऱ्यांनाही उद्ध्वस्त करतात हा आजच्या चर्चेचा खरा भाग आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

हा आजच्या चर्चेचा खरा भाग आहे. आपण जे निर्णय घेतलेले आहेत त्यातील उणिवा आम्हाला या ठिकाणी दाखविल्याच पाहिजे. शासनाने पहिले पॅकेज 1075 कोटीचे दिले. हे पॅकेज देण्यासाठी माननीय मुख्यमंत्री नागपूरमध्ये आले होते तेव्हा माननीय फुंडकर साहेब आणि इतरांनी त्याचे स्वागतही केले होते. हे पॅकेज दिल्यानंतर शेतक-यांना आता काही तरी दिलासा मिळेल असे आम्हाला वाटले होते परंतु आम्ही जी अपेक्षा केली होती ती फोल ठरली. शासनाने हे पॅकेज दिल्यानंतर दुसरी घोषणा केली की, कापूस एकाधिकार खरेदी योजना बंद करण्यात येत असून केंद्राच्या हमी भावाप्रमाणे आता कापसाची खरेदी केली जाईल. यामध्ये केंद्राने अग्रीम देणे बंद केले. हे जे पॅकेज होते ते एकूण दोन वर्षाचे होते. दोन वर्षाचा अग्रीम काढण्याचा प्रयत्न केला गेला. पहिल्या वर्षी कापसाला 1700-1800 प्रती क्विंटल भाव देण्यात आला. यामध्ये शेतक-यांचा अग्रीम साधारणत: 780 कोटी रुपयांचा होता. शासनाकडे जमा असलेला शेतक-यांचा अग्रीम शासनाने दिला नाही. आणि 1075 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. सभापती महोदय, शेतक-यांच्या संदर्भात जो हिशोब आहे तो गंभीर आहे. शासनाने शेतक-यांची शुध्द फसवणूक केलेली आहे. तुम्ही शेतक-यांचे अग्रीमचे पैसे शेतक-यांना दिलेच नाही. त्यानंतर दुस-याही वर्षी अग्रीम मिळाला नाही. दुस-या वर्षी कापसाला 1600-1700 रुपये प्रती क्विंटल भाव देण्यात आला होता. त्याच्या मागच्या वर्षी 1800-1850 रुपये या प्रमाणे कापसाची खरेदी करण्यात आली होती. त्यावेळेस हा अग्रीम जवळ जवळ 2000 कोटी झाला. परंतु तरी सुध्दा शेतक-यांचे अग्रीमचे पैसे आपण शेतक-यांना दिले नाही. शेतक-यांना जी रक्कम मिळावयास पाहिजे होती ती दिली गेली नाही. त्यावेळेस एकाधिकार कापूस खरेदी योजना पूर्णपणे बंद झाली होती. शासन कापसाची खरेदी हमी भावाने करीत होती परंतु ती फक्त समाधानासाठी करीत होती. त्याच वेळेला कापसाचे जागतीक भाव कमी झाले होते. त्यामुळे या सभागृहात चढ उताराच्या संदर्भात चर्चा देखील झाली होती तसेच या विषयाची चर्चा सगळीकडेच सुरु झाली होती. चढउतार निधीचे 780 कोटी रुपये या पॅकेजमध्ये टाकले गेले. शासनाने यासंदर्भात काय केले? मुख्यमंत्री नागपूरला येऊन शेतक-यांसाठी 1075 कोटी रुपयांचे पॅकेज दिले. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी शेतक-यांसाठी जे पॅकेज दिले त्या पॅकेजमध्ये शासनाने शेतक-यांची शुध्द फसवणूक केलेली

श्री. दिवाकर रावते....

आहे. हा जो प्रकार झालेला आहे तो सरकारकडून झालेला आहे. यामध्ये अधिका-यांचा काही दोष नाही. बनवाबनवी सरकारने केली, अधिका-यांनी नाही. शेतक-याचे अग्रिमचे जे पैसे द्यावयाचे होते ते पैसे शेतक-याला न देता अग्रीमच्या पैशाचेच म्हणजे 1075 कोटी रुपयांचे पॅकेज देण्यात आले. एका अर्थाने शेतक-यांच्या खिशातील पैसा, शेतक-यांचा घामाचा पैसा, शेतक-यांच्या कष्टाचा पैसा म्हणजे 1200 कोटी रुपये सरकारने आपल्या तिजोरीत वळते करण्याचे काम केलेले आहे. आपल्याकडे म्हटले जाते की, "ज्याने पाप केले आहे त्याला ते येथेच फेडावे लागते." त्यामुळे तुम्हाला याची किंमत विदर्भात नक्कीच मोजावी लागणार आहे. हे पाप काही आम्ही आपल्याला करावयास सांगितले नव्हते. आम्ही शेतक-यांना हे देऊ, ते देऊ असे सांगून शासनाने शेतक-यांना फसवलेले आहे. हे पॅकेज दिल्यानंतरही शेतक-यांच्या आत्महत्येच्या प्रमाणात काही घट झाली नाही उलट शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढले गेले. पॅकेज देऊनही आत्महत्या का होत आहेत यासंदर्भात बाहेर सुध्दा खूप चर्चा झाली, वर्तमानपत्राचे रकानेच्या रकाने भरभरुन यावयास लागले आणि त्याचा परिणाम म्हणून 1 जुलै, 2006 रोजी माननीय पंतप्रधानांनी पॅकेज घोषित केले. आता कर्जमुक्तीचा आणि कर्जमाफीचा प्रश्न केंद्राकडे अडकलेला आहे. मागील काळत, माननीय अंतुले आणि माननीय शरद पवार या मुख्यमंत्र्यांनी कर्ज मुक्ती दिली होती मग आताचे मुख्यमंत्री शेतक-यांना कर्जमुक्ती का देत नाही? कर्जमुक्तीच्या संदर्भात आपण केंद्राकडे कशसाठी बोट दाखवता ? सभापती महोदय, केंद्रसरकारचा गुंता मोठा असतो. केंद्राला काही महाराष्ट्रापुरती मदत देता येत नाही तर त्यांना देशातील सर्व राज्याचा विचार करावा लागत असतो. माननीय पंतप्रधांनी जे पॅकेज दिले त्याचेही तसेच झाले. माननीय पंतप्रधानांनी विदर्भातील 6 जिल्हयांना पॅकेज दिले तेव्हा त्याच्या बरोबर त्यांना देशातील 36 जिल्हयांसाठी पॅकेज जाहीर करावे लागले.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..............

आपणास विदर्भातील सहा जिल्ह्यासांठी 3750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर झाले. इतर 36 जिल्ह्यांसाठी 70 हजार कोटींचे पॅकेज जाहीर झाले. कोणत्या विभागाला किती मिळाले हा विषय नाही. जेव्हा देश पातळीवर विषय जातो त्यावेळी अशी परिस्थिती होती. विदर्भातील शेतकरी सरकारकडे मायबाप म्हणून पाहत आहे. आता तरी हे सरकार आपल्यासाठी काहीतरी दिलासा देणारी घोषणा करील या आशेवर तो होता. शेतकरी या सरकारला मायबाप समजत आहे, पण या सरकारला त्याचे काही देणे घेणे नाही. जे पॅकेज देण्यात आले त्यामध्ये कर्जमाफी नव्हती फक्त व्याफ माफी होती. व्याजमाफी दिल्यामुळे ते पैस बँकेत गेले, तो पुस्तकी विषय आहे त्यात मी जात नाही. विदर्भात व मराठवाड्यात सिंचनाचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर आहे. तेव्हा सिंचनावर जास्तीत जास्त भर दिला पाहिजे असे पॅकेजमध्ये सांगण्यात आले. शेतकऱ्यांनी घोटभर पाणी मागितले, त्यांची कर्जमाफी करावी अशी मागणी केली. परंतु सरकारने त्यांच्यासाठी विहीर खणून ठेवली.

सभापती महोदय, विदर्भात शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यास भाग पडत आहे. विदर्भात अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. सरकारने शेतकऱ्यांचे कर्जमाफ करण्याची इच्छा शक्ती दाखवावी. हे मी आपणास अतिशय कळकळीने सांगत आहे. सन्माननीय मंत्रिमहोदयांचा राजकीय वारसा पाहता ते शेतकऱ्यांना न्याय देतील अशी आम्हाला त्यांच्याकडून अपेक्षा आहे. मंत्रिमहोदय शेतकरी आहेत. त्यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी चांगली जाणीव आहे.

सभापती महोदय, पॅकेज अंतर्गत गायींचे वाटप करण्यात आले. पण प्रत्यक्षात गाईचे वाटप झाले किंवा कसे याची माहिती मंत्रिमहोदयांनी करुन घेतली काय ? माझ्याकडे जी माहिती आहे ती मी आपणास सांगतो. 300 गायी वाटपात गैरव्यवहार झालेला आहे. एकूण 5 कोटी 25 लाख रुपयांची पूरक मागणी सादर करण्यात आली होती त्यापैकी 1 कोटी रुपये अकोला जिल्ह्यासाठी मिळाले. त्यातील 70 लाख रुपये दुग्ध महासंघास मिळाले तर 30 लाख रुपयांचा घोटाळा झालेला आहे. या घोटाळयामध्ये जे कोणी असतील त्यांना अजिबात दयामाया दाखवू नका. मेळघाळ - चिखलदार येथे कागदोपत्री गाई खरेदी करण्यात आल्या, परंतु त्या अस्तित्वात नाहीत हे उघड झालेले आहे.

यानंतर श्री.पुरी..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

यामध्ये घोटाळा झालेला आहे व तो अधिकारी पातळीवर झालेला आहे. त्या अधिकाऱ्यांना आपण जेलमध्ये टाका व शासनातील सर्व पातळीवरील निलंबनाची नाटके बंद करा. अशाप्रकारे निलंबन करावयाचे आणि 6 महिन्यांनतर त्यांवर कुठलाही आरोप ठेवायचा नाही व पुन्हा त्याला रिइस्टेट करावयाचे, पुन्हा त्याचे खाणे-पिणे सुरु, हे बंद करा. त्याला आपण परत 5-6 वर्षांनी नोकरीत घेता तो परत भ्रष्टाचार करण्यास मोकळा होतो. या पॅकेजच्या माध्यमातून ज्या अधिकाऱ्यांनी मुडदयाच्या टाळूवरील लोणी खाल्ले त्यांच्या घरादारांवर आपण नांगर फिरवा. आंतरराष्ट्रीय स्तरावर आत्महत्येचा विषय जातो आणि महाराष्ट्राची नाचक्की होते, हे योग्य आहे का ? कालही माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की, ज्या 75 टक्के शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, ते आपल्या विदर्भातील आहेत. परंतु आपले अधिकारी एवढे बेबंद वावरतात ? त्यांना आपण निलंबित केलेले आहे, याचाच अर्थ त्यांनी गायी वाटपांमध्ये भ्रष्टाचार केलेला आहे व तो सिध्दही झालेला आहे. यामध्ये प्रत्येकी कोणी किती खाल्ले ते आपण शोधून काढा. त्यांची आपण नार्कोटेस्ट घ्या व प्रत्येक गायीमागे 2 हजार रुपये प्रमाणे ज्या मंत्र्यांकडे पैसे जातात, त्या मंत्र्यांचीही नार्कोटेस्ट घ्या व त्यांनाही आपण घरी पाठवा. हे एवढे साधे आहे का ? आज माणसं मरत आहेत. परंतु आपला भ्रष्टाचार चालूच आहे. हे काय चालले आहे ? आपण 5-7 हजार रुपयांची एक गाय 12-12 हजार रुपयांना कशी देता ? अत्यंत वेदना निर्माण करणाऱ्या घटना मी पाहिलेल्या आहेत.

सभापती महोदय, सेंद्रीय खताच्या बाततीत तशीच परिस्थिती आहे. परवा यासंबंधीची बाब सभागृहात आली होती. यासंबंधीची 3 कोटी 40 लाख रुपयांची मागणी होती. मला निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, कृषि विभागातील अधिकाऱ्यांच्या मनमानीमुळे अमरावती जिल्हयात सर्रास बोगस खतांची विक्री होत असल्याची घटना दिनांक 3 सप्टेंबर,2007 रोजी उघडकीस आली. याबाबत स्थानिक जनतेने तीव्र आक्षेप घेतला होता, परंतु कोणावरही कारवाई करण्यात आली नाही व अशाप्रकारे बोगस बियाणे व बोगस खतं शेतकऱ्यांना देण्यात आले. त्यातून त्या शेतकऱ्यांना किती उत्पादन मिळाले हा प्रश्न समोर येतो.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, गांडूळ खतासंबंधीची बाबही परवा सभागृहात आली होती. ती 75 लाख रुपयांची मागणी होती. विदर्भ पॅकेजअंतर्गत अकोट कृषि कार्यालयात दिनांक 31 मार्च,2007 पर्यंत रुपये 1 कोटी 70 लाखांचे शेतकरी पॅकेज देण्यात आले होते. गांडूळ शेड उभारण्यासाठी 39 लाख इतकी रक्कम मंजूर करण्यात आली होती. माननीय मंत्रिहोदयांना मी पुरावे देतो. त्यामध्ये अडकलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांना आपण सोडू नका. यामध्ये 1 कोटी 70 लाखांच्या साहित्य वाटपामध्ये मोठया प्रमाणात घोळ झाल्यामुळे चौकशी अधिकारी श्री.आमनकर यांनी चौकशी केल्यानंतर आर्थिक व्यवहाराचे अभिलेखे कोणत्याही नमुन्यात नसणे, रजिस्टरमधील साध्या कागदावर कोटींचा व्यवहार लिहिलेला असणे व त्याची पाहणी प्रमाणित केली नसणे इत्यादी सिध्द झालेले आहे. याठिकाणी प्रश्न असा आहे की, पुढे काय ? कोटयावधी रुपयांचा घोळ सापडलेला आहे. परंतु त्याबाबतीत काहीच होत नाही. सभापती महोदय, हा पंतप्रधान पॅकेजचा विषय आहे. विम्याबाबचा खुलासा माननीय मंत्रिमहोदयांनी काल केला. विम्याबाबतच्या भावना सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी येथे व्यक्त केल्या. आज शेतकऱ्यांना विमा मिळत नाही. एखाद्या शेतकऱ्याच्या शेतीमध्ये गारपीट झाली असताना त्यास विमा मिळत नाही. त्याच्या बाजूच्या शेतक-यास मिळतो, परंतु त्यास मिळत नाही. विम्याच्या बाबतीतील अवस्था फारच विचित्र आहे. त्याबाबतीत आपण लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

सभापती महोदया, पॅकेज अंतर्गत नांगराचा फाळ शेतक-यांना देण्यात आला. बळीराजाला नांगर. हा नांगराचा फाळ 350 ते 450 रुपयांपर्यन्त मिळतो. एक रुपयाला घेतलेल्या नांगराच्या फाळाची किंमत अधिका-यांनी दहा रुपये लावली, या सर्व बाबीची चौकशी झाली पाहिजे. जरी एक रुपयाचा फाळ दहा रुपयांना घेतला असला तरी तो शेतक-यांपर्यन्त पोहोचला नाही, ही खरी व्यथा आहे. नांगराचा फाळ कसा दिला ? बघा. मी येथे त्याचे छायाचित्र आणले आहे, तेच मी येथे दाखविणार आहे.

(सन्माननीय सदस्य छायाचित्र सभागृहात दाखवितात.)

सर्वांनी पहा, माझ्या हाताने मी हा नांगराचा फाळ वाकवित असतांनाचे हे चित्र आहे, वाकतो का हो नांगराचा फाळ माणसाच्या हाताने ? हे छायाचित्र दिवसभर दूरचित्रवाणीवर दाखवित होते. नांगराचा फाळ वाकविण्याएवढी माणसाची ताकद असते ? याचे आम्ही प्रदर्शनच भरविले होते, पत्रकारांनी ते पाहिले आहे. माणूस उघडा झाल्यानंतर काय परिस्थिती होते तशी परिस्थिती आम्ही पत्रकारांना दाखविली आहे. हे काय चालले आहे ? काय देत आहोत ? कशाला देत आहोत ? अधिकारी काय करीत आहेत ? हेच छायाचित्र ज्या पत्रकारांनी बघितले नसेल त्यांनाही आता दाखवितो, ज्यांनी बघितले नाही त्यांना दाखवितो. तुम्हाला कशाला बोचले पाहिजे ? मला या ठिकाणी विनंती करावयाची आहे की, हे सर्व पाहून तुम्हाला यातना झाल्या पाहिजेत. सरकार याचा फायदा घेत आहे असे नाही तर शासकीय अधिकारी बदमाशीने घेत आहेत, त्याची तुम्हाला चीड आली पाहिजे. यामुळेच तुम्हाला जागा खाली कराव्या लागणार आहेत. "केले तुका, झाले माका", तसे होणार आहे. त्यांचे तुम्ही काय करणार आहात ? हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, डिझेल पंपचे वाटप पॅकेजअंतर्गत झाले. प्रदर्शनामध्ये माननीय मंत्री महोदय डिझेल पंप बघून आलेले आहेत. तुमचे काय मत झाले, तेही या ठिकाणी मांडले तर बरे होईल. हे सगळे येथे मी उचलून आणले आहे. त्याचेही छायाचित्र दाखवितो.

(सन्माननीय सदस्य छायाचित्र दाखवितात.)

हा डिझेल पंप कसा आहे, किती निकृष्ट आहे, काय झाले त्याचे ? पंप चालू झाला की अर्ध्या-पाऊण तासात त्याचा स्फोट होतो. कशासाठी देत आहात ? शेतक-यांना जगविण्याकरिता

...2........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

पंप आले की अधिका-यांची घरे-दारे भरण्यासाठी पंप आले ? त्याचा स्फोट होतो. मी तर तो पंपच येथे आणून दाखविणार होतो, पण येथे अशा वस्तू आणता येत नाहीत, म्हणून आणला नाही, ही सर्व छायाचित्र मात्र मी माननीय सभापतींच्या परवानगीने आणलेली आहेत. सभापती महोदय, डिझेल पंपाची किंमत बाजारात 17 हजार रुपये आहे. डिझेल उपलब्ध होते ना ? पण माझ्या सरकारचे भारनियमन आहे, विजेचा पंप देता येत नाही, म्हणून डिझेलचा पंप दिला, फुटणारा. नंतर लक्षात आले की काही तरी गडबड झाली आहे. शासनाने लगेच 6 ऑगस्ट 2005 रोजी जी.आर.काढला, डिझेल पंपाचे वाटप थांबवा आणि केरोसिनचे पंप द्या. हे पंप आमच्या चिखलदरा परिसरात वाटलेले आहेत. ही प्रशासकीय यंत्रणा जागरुक आहे. पंप दिले, पंप दिले, असा प्रचार करीत आहात, वाटोळे झाले म्हणून विरोध पक्ष फिरत आहे. पण प्रत्यक्षात जे घडले आहे त्याचा लेखाजोखा करावा लागणार आहे. 526 पंपांचे वाटप अमरावतीमध्ये धारणी, चिखलदरा येथे तालुकावाईज केले आहे.

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ......

धारणी, चिखलदरा हा भाग उंचावर आहे. त्यांना केरोसीनचे पंप दिले. केरोसीनच्या एका पंपाची किंमत 16 हजार रुपये लावलेली आहे, माननीय मंत्री महोदयांनी याची चौकशी करावी. हा पंप बाजारामध्ये 8 ते 10 हजार रुपयांना मिळतो. मी काल किंमत काढली. मला हे सत्य सभागृहात मांडावयाचे होते. जो पंप बाजारामध्ये 10 हजार रुपयांना मिळतो त्या पंपाची किंमत पॅकेजमध्ये 16 हजार रुपये लावलेली आहे. यामध्ये अधिका-यांनी 5-6 हजार रुपये खाल्ले. गायी वाटपामध्ये जसे पैसे खाल्ले तसे यामध्ये सुध्दा पैसे खाल्लेले आहेत. सभापती महोदय, या पंपाचे वजन किती आहे ? या पंपाचे वजन 17 किलो आहे. मी वजन का सांगितले कारण हा पंप उचलण्यासाठी दोन माणसे लागतात. एका शेतक-याला तो पंप उचलता येत नाही. पंप चालविण्यासाठी केरोसीन किती लागते ? एक शेतकरी एका हंगामामध्ये किमान 50 दिवस पंप चालवितो. एका दिवसाला 4 लिटर केरोसीन लागते तर 50 दिवसाला किती केरोसीन लागेल ? एका कुटुंबाला 4 लिटर केरोसीन मिळते. केरोसीन 20 ते 22 रुपये लिटर आहे. केरोसीनसाठी त्या शेतक-याने रोज शंभर रुपये खर्च करायचे आणि ते करोसीन मिळत सुध्दा नाही. हा निर्णय कोणी घेतला, ही कल्पना कोणाच्या डोक्यातून आली ? केरोसीन मिळत नसतांना शेतक-यांना केरोसीन पंप दिले. 10 हजार रुपये किंमतीचा पंप 16 हजार रुपयांना दिला. यातील 6 हजार रुपये कोणी खाल्ले ? हे पंप आता पडून आहेत. केरोसीन नाही तर या पंपाचे करायचे काय ? सभापती महोदय, मी भ्रष्टाचाराचा नमुना सांगतो. ज्या कंपनीने हे पंप लाँच केलेले आहेत आणि ज्या कृषी अधिका-यांच्या माध्यमातून या पंपाचे वाटप झालेले आहे त्यांना शोधून काढा आणि केरोसीनसह जाळून टाका. आदिवासी भागामध्ये अधिका-यांनी एका पंपामागे 5-6 हजार रुपये खाल्लेले आहेत. अर्ध्या किमतीत पंप घ्यायचे आणि पॅकेज अंतर्गत तेच पंप पुन्हा वाटायचे आणि पुन्हा 16 हजार रुपये कमवायचे अशी सायकल तयार झालेली आहे. करोसीन पंप वाटपाची शक्कल कोणत्या अधिका-यांनी लढविली ?

सभापती महोदय बैलगाडीबाबत तर सांगावेच लागेल. याबाबतचा लेखाजोखा माननीय मंत्री महोदयांना करावा लागेल. निकृष्ठ दर्जाची बैलगाडी आपण पुरविली.

( सन्माननीय सदस्य छायाचित्र दखवितात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..........

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी ती बैलगाडी परवा बघितली. त्या बैलगाडीला नट-बोल्ट आहेत. मी सर्व पुरावे गोळा करुन येथे आणलेले आहेत. मी प्रचार करीत नाही. माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, अधिका-यांनी केलेले पाप तुम्ही तुमच्या डोक्यावर घेऊ नका. त्या अधिका-यांना घरी पाठव, हे मी सुरुवातीलाच सांगितले. त्या बैलगाडीमध्ये 5 क्विंटल कापूस भरला तर ती बैलगाडी उलटी होते. ज्यांनी बघितले नसेल त्यांनी खरोखर तेथे जाऊन बघावे. एका बैलगाडीची किंमत 9,850 रुपये आहे. बैलगाडीची एवढी किंमत आहे काय ? पॅकेज अंतर्गत पुरविण्यात आलेल्या साहित्याचे प्रदर्शन मला सगळीकडे भरवायचे आहे. 5 क्विंटल कापूस भरल्यानंतर ती बैलगाडी उलटी होते. माननीय मंत्री महोदयांनी हे सर्व तेथे जाऊन बघितले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, ताडपत्रीबाबत सांगायचे तर ते फारच भयानक आहे. बाजारामध्ये एका ताडपत्रीची किंमत 300 ते 350 रुपये आहे. परंतु ताडपत्रीची किंमत प्रती नग 2,698 रुपये इतकी दाखविलेली आहे. एक हजार कोटी रुपयांच्या ताडपत्र्यांचे वाटप करण्यात आलेले आहे.

यानंतर कु.जयश्री.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

आणि त्याच्यावर तीनपट खरेदी दलाली पॅकेजमध्ये , कोण पैसे खाते ? या पॅकेजअंतर्गत फाटणा-या ताडपत्र्यांचा पुरवठा आणि तीनपट दराने खरेदी पॅकेजमध्ये ? सन्माननीय सदस्य श्री.गडकरी तूम्ही त्या दिवशी आमच्या बरोबर तेथे आला होतात,तुम्ही ते सर्व पाहिलेले आहे. पी.व्ही.सी.चे जे पाईप बनतात, त्यामध्ये चुनखडीचे मॅनुफॅक्चरींगचे प्रमाण सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी सांगितले म्हणून मला माहित आहे , ते 10 असावे लागते.

( सन्माननीय सदस्य छायाचित्र दाखवितात.)

त्यामुळे तो पाईप मजबूत असतो. परंतु यामध्ये 40-50 टक्के चुनखडीमुळे तो इतका ठिसूळ बनतो की, ते मी पण हाताने फोडले आणि पी.व्ही.सी.चे शिक्के त्यावर मारले. हे तुमचे पाईप आम्ही कालपरवा काढले होते. शेतक-याने वापरावयाचे पाईप हाताने तोडता येतात का? आमच्या नितीनभाईंनी पण ते हाताने तोडून पाहिले तर ते लगेच तुटले. त्यानंतर ते पाईप आमच्या रामदासभाईंनी देखील हात लावून ते पाईप कसे आहेत, ते पाहिले. शेतीमध्ये वापरावयाचे पाईप हाताने तुटतात का ? पण ते हाताने सहज तुटले, आणि त्याच्यावर आय.एस.आयचा मार्क दिलेला होता. किती कोटीचे पाईप आणले ? दिडशे कोटी रुपयांचे पाईप ? किती खाल्ले असतील हो काही हजार खाल्ले मी समजू शकतो कोटयवधी रुपये हडप केले पाईप मध्ये ? कृषी विभागातर्फे प्रत्येक शेतक-याला एक कार्ड देण्यात आलेला आहे, त्यामध्ये त्या शेतक-याने त्यांना काय हव आणि काय नको ते मांडावयाचे त्या मागणीप्रमाणे आपण त्यांना देता का ? यासंदर्भात मी एक मी एक उदाहरण देतो की, स्प्रे पंपचा पुरवठा जो केला तो तर आणखी एक विनोदच आहे. तोही मी सभागृहामध्ये दाखविण्यासाठी आणला असता परंतु तो आणता येत नाही, कारण त्याला काही मर्यादा आहेत. या पंपाची किमंत जास्तीत जास्त 250 ते 350 रुपये असेल. परंतु त्याची किमंत 840 रुपये कावली, एवढी त्याची किंमत खरोखरच आहे काय ? पॅकेजला खाण्याचे साधन मानलेले आहे. 840 रुपये मी त्याची किमंत लावल्यावर त्याचा शोध कोण घेणार ? पॉवर पंप 2500 रुपयांचा असून तो तुमच्या दर करारामध्ये 4300 रुपये त्याची किमंत लावली. मघाशी मी ज्याप्रमाणे पेट्रोकेरोसिन पंपाचे उदाहरण दिले होते. पेरणी यंत्र घ्यायला 6000 रुपये शेतकऱ्याने द्यायचे असतात, त्याची किमंत किती होती तर ती 6000 रुपये होती. या सगळया किमंतींचा

...2........

श्री.दिवाकर रावते.......

अंदाज घ्यायचा असेल तर ई-टीव्हीवरील सकाळचा "अन्नदाता" हा कार्यक्रम पहा आणि शेतीच्या अवजारांची किमंत लिहून ठेवा. पेरणी यंत्र आम्ही प्रदर्शनात ठेवले होते. तीन फाळाच्या या पेरणी यंत्राची किमंत सहा हजार रुपये ? लुटायलाही काही मर्यादा पाहिजे. ही आकडेवारी माझी नाही तर शासनाने काढलेल्या परिपत्रकातील आहे. यामध्ये कोणते यंत्र, कोणाकडून, किती किंमतीमध्ये, किती संख्येमध्ये घेतले आणि कोणाला किती दिले, याचा उल्लेख आहे.

या योजनेमधून ज्या निविष्ठा वाटप होणार आहेत त्यामध्ये खते, कीटकनाशके, औजारे या सर्वांचा समावेश आहे. माननीय मंत्रिमहोदय, आपण कसली चौकशी करता, हे मला माहित नाही. या सहा जिल्हयांमध्ये पॅकेजच्या नावाने पैसे खाण्याचे घबाड अधिका-यांना सापडले आहे. या कृषि अधिका-यांची अशी परिस्थिती आहे की, त्यांनी भराभरा औषधे विकत घेतली आणि पॅकेजअंतर्गत वितरणाकरिता घेतलेली औषधे प्रमाणित केली गेली नाही, त्याची कोणतीही कागदपत्रे तयार केली नाहीत. केवळ धडा-धडा औषधे वाटली, हिशोब केला नाही, केवळ खर्च केले. एका कास्तकाराला 100 टक्के अनुदानातून 1,500 रुपयांची औषधे आणि खते दिली. ती निकृष्ट दर्जाची औषधे दिली गेली. अधिका-यांना माहित होते की, आपले काहीही होणार नाही. अशाप्रकारे या पॅकेजची चर्चा होईल, असे त्यांना स्वप्नातही वाटले नसेल.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

लोक बोंबलतील व निघून जातील. औषधे प्रमाणित न करता का दिली आहेत ? ही औषधे कशाप्रकारे खरेदी केली ? ही औषधे वाया गेली आहेत. इतक्या विचित्र पध्दतीने हे काम झालेले आहे. सभापती महोदय, मी बैलजोडीबाबत बोललो आहे. बैलजोडी कृषी खाते देते. काही ठिकाणी दुग्धविकास खाते देते. बैलजोडया वाटप करण्याचे काम खरे तर कृषी खात्याकडे आहेत. जनावराचे दुध संपले किंवा भाकड झाले तर त्यांना पिळता येत नाही. मी माननीय कृषी मंत्री यांना आज आव्हान देतो की, कृषी विभागाकडून जेवढया बैलजोडया घेतल्या आहेत, त्या तपासा. आपल्याला दिसेल की, या बैलांना खाटीकसुध्दा विकत घेणार नाही. अशा बैलजोडयांना 4500 रुपये अनुदान आहे. केवळ 50 टक्के अनुदानामध्ये हे सर्व केले आहे. ते कोण तपासणार आहे ?. कृषी विभागाने सर्वत्र मरतुकडे बैल आणून दिलेले आहेत. प्रत्येक जोडीमागे 1000-1500 रुपये मार्जीन काढले आहेत. टी.व्ही.वरील "अन्नदाता" कार्यक्रमात कोणती वस्तू कोठून खरेदी करावी याची माहिती दाखविली आहे. या कार्यक्रमात गुजरातमध्ये चांगल्या दुधाळ गायी मिळतात, त्यांचे खूर व रंग कसा असतो हे दाखविले आहे. अशा चांगल्या गायी आम्हाला दिल्या नाहीत. शेतकऱ्यांना दुध मिळण्याकरिता गायी नाहीत. केवळ अधिकाऱ्यांचे खिसे भरण्याकरिता व त्यातून काही शिल्लक राहिले तर वरच्या साहेबांना कमीशन देण्याकरिता गायी दिल्या आहेत. शेण तर खाल्ले, पण गाईमध्येही पैसे खाल्ले आहे. सभापती महोदय, पाईप व मोटार पंपाबाबत माहिती दिली आहे. होंडा कंपनीचा मोटारपंप देतो असे म्हटले होते. परंतु मद्रास येथील पंप आणला आहे, मद्रासचा पंप स्वस्त व निकृष्ट असून त्याचा स्फोट होत आहे. पंपाची किंमत जास्त दाखवून स्वस्त पंप आणला आहे. माननीय कृषी मंत्री महोदयांना गांडूळ खत संदर्भात मी अत्यंत गांभीर्याने विचारु इच्छितो. त्यांनी तितक्याच गांभीर्याने याची चौकशी करावी, अशी मागणी करतो. गांडूळ खतासाठी एक बादली, लहान पाईप, एक प्लॅस्टीकचे भांडे, एक टाकी, प्लॅस्टीकची पिशवी दिलेली असून यामध्ये 5 किलो गांडूळ खत करावयाचे आहे. याचे चित्र मी आज सोबत आणलेले नाही, तरी तर ते तुम्हाला दाखविले असते. गांडूळ खत शेतकऱ्यांना द्यावयाचे आहे. प्रत्येक तालुक्याला 5-6 लाख रुपयाचे युनिट दिले आहे. त्या युनीटने गांडूळ खत तयार करावे आणि गरीब

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/

श्री.दिवाकर रावते .....

कास्तकऱ्यांना द्यावे, हा त्यामागे उद्देश आहे. परंतु हे युनीट कोणाला दिले आहेत, त्याची चौकशी करावी ? किती राजकीय प्रभावीत लोकांना हे काम दिले आहे. कशाच्या माध्यमातून हे युनीट दिले आहेत ? बलदंड लोकांना 5-6 लाखाची युनीट आपण दिली असतील तर त्यातील लाभार्थींची संख्याही आपण बघावी. सुमारे 30 कोटीची तरतूद असलेली प्रत्येकी 5-6 लाखाची मोठी युनीट सध्या अस्तित्वात आहे का ? ही रक्कम वाया गेली आहे. बरीच युनीट अस्तित्वात नाहीत. गांडूळ खताबाबत अत्यंत गंभीर परिस्थिती आहे. ही युनीट उभी राहिली असतील तर आनंद आहे परंतु मी मंत्री महोदयांना खात्रीपूर्वक सांगतो की, यातील 50 टक्के पैसे गायब झालेले आहेत. सभापती महोदय, माहितीच्या अधिकाराद्वारे मी माहिती मागवली आहे, "तालुकानिहाय खरेदीची माहिती, वस्तु पुरवठा झाल्याचा व लाभार्थीला त्या वस्तु दिल्याचा दिनांक, पॅकेज अंतर्गत बांधलेले बंधारे" ही माहिती आहे. मंत्री महोदयांना मी एक उदाहरण देऊ इच्छितो, मंत्री महोदयांनी आम्हाला पुढच्या अधिवेशनात सांगावे की, यावर कोणती कारवाई केली ? त्याची जाहीर वाच्यता करावी. अधिवेशनाअगोदर ही माहिती सांगितली तर आनंद आहे. वाशिममध्ये मातीचे एकंदरीत 12 बंधारे बांधले आहेत.

नंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

त्यांची देयके जिल्हापरिषदेने पूर्णपणे दिलेली आहेत. तिच देयके 12 बंधाऱ्यांच्या पॅकेजअंतर्गत पुन्हा दिली असल्याचे दाखविण्यात आले. किती हुशार अधिकारी आहेत ? माती बंधाऱ्यामध्ये लाभार्थ्याला सरळपणे लाभ होतो. त्यात काही अडचण असेल तर लाभार्थी हा तक्रार करतोच. या हुशार अधिकाऱ्यांनी वन खात्याच्या जमिनीमध्ये जाऊन गुपचूप बंधारे बांधले. वन खात्याने त्यांना नोटीस दिली. त्या कामाचे पेमेंट झाले होते. त्यानंतर बंधाऱ्याचे कामही थांबले. हे एक केवळ वाशिम जिल्हयाचे मी आपणास उदाहरण देत आहे. अशा धटना अनेक जिल्हयामध्ये घडलेल्या आहेत. कृषी अधिकारी असे वागत आहेत की, आपल्यावर आता कोणाचेच निर्बंध नाही.

सभापती महोदय,वाशिम जिल्हयामधील सूरकंडी तालुक्यामधील एक बंधारा आहे. तेथील कृषी अधिकारी श्री. नाईकवार यांना जर कळाले की, सन्माननीय सदस्य श्री. गिरीश गांधी हे आपल्या संदर्भात प्रश्न विचारणार आहेत , तर ते आदरणीय श्री. शरद पवार यांच्यापर्यंत देखील जाऊन पोहचतील व त्यांना विचारतील साहेब आपण आता काय करणार ? जगामधील एकही माणूस असा नाही, की लाभ घेण्यासाठी त्याला ते भेटू शकत नाही. त्यांच्या विरुध्द आपण चौकशी करणार काय ? या पॅकेजमुळे हे अधिकारी 3 ते 4 कोटी रुपयांचे मालक झाले आहेत. लोक उघडया डोळयांनी या सर्व गोष्टी पाहत आहेत. एक एक अधिकारी हे आता कोटयाधीश होत आहेत. हे पॅकेज पंतप्रधानांनी शेतकऱ्यांकरिता पाठविले होते. हे सर्व आपल्या खात्यामध्ये सुरु आहे. तालुका कृषी अधिकारी श्री. नाईकवार यांच्याकडे लक्ष द्या आणि या संपूर्ण बंधाऱ्याप्रकरणी जी गफलत झालेली आहे तसेच जी देयके देण्यात आलेली आहेत त्याबाबत चौकशी करा.

सभापती महोदय, यासंदर्भात आणखी एक अशी गंमत आहे की, एका ठिकाणी एक दर व दुसऱ्या ठिकाणी दुसरा दर लावला जातो. माझ्याकडे कृषी पंप देण्यात आलेल्या लाभार्थ्यांची यादी आहे. आपल्याकडे द्राक्षाच्या मळयांसाठी सर्रास हाच पंप वापरला जातो. 18/7/2006 ही तारीख त्या पंपावर आहे. मी सर्व लाभार्थ्यांची नावे आता येथे वाचून यामध्ये वेळ घालवित नाही. या पंपांची खरेदी किंमत आहे रुपये 1500. कृषी अधिकारी यामधून कोटयाधीश होणार नाहीत तर काय होणार ? या पंपासंबंधी तक्रार करण्यात आली. या तक्रारीसंदर्भात पुरावा नष्ट करण्याचा प्रकार

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

झाला असेल तर जी खरेदी झालेली आहे, चेक दिलेला आहे याचे रेकॉर्ड आहेत. याबाबत आपण काय करणार आहात ? त्यासंबंधी शिवसेनेने आंदोलन केले होते. श्री. बकवाळा, जिल्हा कृषी अधिकारी हे या प्रकरणातील प्रमुख आरोपी आहेत. कारंजा तालुक्यातील कृषी अधिकारी श्री. कंडारकर हे सुध्दा या प्रकरणामध्ये निलंबित आहेत. तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी, पंतप्रधानांनी दिलेल्या पॅकेजमधील 24 चेक परत आले म्हणून त्यांचे निलंबन करण्यात आले. त्यामुळे बोंबाबोंब झाली. त्यामुळे अधिकाऱ्यांना निलंबित केले. ही जबाबदारी कोणाची आहे ?

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

ही सगळी जबाबदारी तुमच्या त्या खालच्या अधिकाऱ्याची आहे, त्याला तुम्ही परत पाठविले. पण मग कृषी अधिकारीदेखील यामध्ये जबाबदार आहे ना ? त्याला तुम्ही का सांभाळले ? त्याला का नाही निलंबित केले ? सभापती महोदय, कोठे तरी थातुर मातूर कारवाई करायची आणि नंतर पुन्हा त्याला सेवेत सामावून घ्यायचे हा जो प्रकार आहे तो आपण थांबविणार आहात की नाही ? सभापती महोदय, सर्वात कहर असा केला आहे की, ज्या जिल्ह्यामध्ये चेक्स परत आले आणि त्या संदर्भात शेतकऱ्यांचे आंदोलन झाले त्या बाबतीत एकाचे निलंबन तुम्ही केले पण त्यामध्ये तुमचा जिल्हा कृषी अधिकारी श्री.बकवाड हा मुख्यत: जबाबदार आहे त्याला मात्र तुम्ही प्रमोशन दिले. त्याला तुम्ही आता नागपूरला आणला आहे, वसंतराव नाईक कृषी प्रशिक्षण केंद्रामध्ये बढती दिली आहे. असा तुमचा सारा कारभार चालला आहे का ? सभापती महोदय, या पॅकेजअंतर्गत चेक तरी किती रूपयांचे दिले असतील ? मी आपल्याला सांगतो की, केवळ 3 रूपयांचा चेक दिला आहे, कोठे 50 रूपयांचा, 70 रूपयांचा चेक दिलेला आहे. या लोकांनी माझ्याकडे याबद्दल ॲफिडेविट करून दिलेले आहे, लेखी लिहून दिले आहे. सभापती महोदय, या शेतकऱ्यांना या पॅकेजमधून लाभ मिळवून देण्यासाठी त्या त्या अधिकाऱ्याला किती पैसे द्यावे लागले आहेत, त्यांनी किती मागितले ? तर 1 हजार, दोन हजार रूपये मागितले असेही शेतकऱ्यांनी सांगितले. याची आपण तपासणी करणार आहात का ? याची नार्को टेस्ट करणार काय ? आणि त्यात दोषी सापडतील त्या अधिकाऱ्यांच्या घरावर आपण नांगर फिरविणार आहात का ? सभापती महोदय, अशा प्रकारे चौफेर

**<u>सभापतीस्थानी - माननीय सभापती</u>**

भ्रष्टाचार चालू असताना आमचे शिवसेनेचे आमदार श्री.संजय राठोड यांनी तो काल मांडला. मी सुद्धा ते पहायला आलो. त्यांचा खुलासा आला, तो मान्य झाला. परंतु त्यांनी उघडकीस आणलेल्या भ्रष्टाचार सिद्ध झाला आणि त्या संबंधात अधिकारी निलंबित झाले आहेत. आता निलंबन ही शेवटची स्टेज आहे का ? सभापती महोदय, वणीला एक आत्महत्या झाली. कशासाठी ? पॅकेजसाठी म्हणून म्हणजे पॅकेजमधील पैसे दिले जात नाहीत म्हणून ही आत्महत्या झाली. श्री.पुंडलिक महादेव गिरसावळे, वय वर्षे 45 हा शेतकरी पॅकेजचे पैसे मिळावेत म्हणून त्या अधिकाऱ्याकडे सारखा जात होता. त्यासाठी त्याच्या लाभाचे पैसे देखील त्याने भरले, त्यानंतरही अनेक फेऱ्या मारल्या. शेवटी हा अधिकारी पैसे देत नाही म्हणून मग त्याने आत्महत्या केली. आता

...... 4सी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

त्या कृषी अधिकाऱ्याच्या विरूद्ध तुम्ही काय कारवाई करणार आहात ? सभापती महोदय, या शेतकऱ्याने आत्महत्या कशी केली ? त्याने त्या अधिकाऱ्याकडे जाऊन चेक मागितला, पण त्याने चेक दिला नाही म्हणून संतापून तो बाहेर गेला आणि विष घेऊन आला आणि त्या अधिकाऱ्याच्या कार्यालयात, त्याच्या समोर ते विष पिवून त्यांनी आत्महत्या केली. त्या अधिकाऱ्यानेच त्याला दवाखान्यात दाखल केले आणि संध्याकाळपर्यात चेक तयार करून तो त्याच्या खिशामध्ये कोंबला. एवढे नतद्रष्टपणे हे चालले आहे. राज्य सरकारने पॅकेज दिले, त्यानंतर पंतप्रधानांनी पॅकेज दिले आणि आपल्या अधिकाऱ्यांनी मात्र स्वत:ची घरे भरण्यासाठी त्या पॅकेजचे वाटोळे करून ठेवले. त्या अधिकाऱ्यांचे आपण केवळ निलंबन करू नका तर त्या अधिकाऱ्यांना तुम्ही बुडविणार आहात की नाही ?

( यानंतर श्री. सरफरे .... 4डी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

म्हणून माझा प्रश्न असा आहे की, या अधिकाऱ्यांनी गडगंज संपत्ती निर्माण करुन शेतकऱ्यांना जगविण्यासाठी आणलेले पॅकेज साफ करुन टाकले आहे. त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार? फक्त निलंबन करुन उपयोग नाही. या पॅकेजची चर्चा याठिकाणी घेतली की, केंद्र सरकारने या पॅकेजचा शोध घेण्यासाठी, तपास करण्यासाठी आपले अधिकारी मंत्रालयात पाठविले. केंद्र सरकारचा तुमच्या सरकारवर विश्वास नाही.म्हणून माननीय पंतप्रधानांनी सांगितले की, या पॅकेजचा शोध माझ्या कार्यालयामार्फत केला जाणार आहे. सभापती महोदय, या पॅकेज अंतर्गत 5 रुपये आले असतील तर त्यामधील 2 रुपये शेतकऱ्याला मिळाले आणि 3 रुपये भ्रष्टाचारामध्ये गेले आहेत. तेव्हा या भ्रष्टाचाराची अत्यंत वरिष्ठ पातळीवर, प्रत्येक लाभार्थ्याकडे जाऊन सखोल चौकशी झाली पाहिजे. आणि भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना शोधून काढून त्यांना कायम घरी पाठविण्यात आले पाहिजे, त्यांची रवानगी तुरुंगामध्ये केली पाहिजे. त्यांना आयुष्यातून आपण उठवाल की नाही? असा मी याठिकाणी प्रश्न उपस्थित करतो. या भ्रष्टाचाराबाबत खेद व्यक्त करुन आपल्या प्रशासनावर आपली पकड नसल्यामुळे आणि गांभीर्य नसल्यामुळे आपणावर तोंडघशी पडण्याची पाळी आली आहे. याचा दोष तुमच्यावर आहे. मुख्यमंत्री महोदय आपण सभागृहामध्ये आला आहात म्हणून मी पुन्हा सांगतो की, आपण संपूर्ण कर्जमुक्ती करावी, हाच यावरील एक उपाय आहे अशी मी मागणी करतो. आपण दिले तर ठीक आहे. नाहीतर आपण "देता कां जाता" एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, केंद्र सरकारने दिलेल्या पॅकेजच्या असफलतेबाबत या सभागृहामध्ये अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने हा प्रस्ताव आणावा लागला याची मला कल्पना नव्हती. परंतु या नागपूर अधिवेशनाचे एक वैशिष्टय असे की, याठिकाणी सरकार आल्यानंतर गेली अनेक वर्षे आपण पाहिले आहे की, विदर्भाच्या विकासासाठी, विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी दर अधिवेशनामध्ये एक पॅकेज जाहीर केले जाते. या राज्यातील शेतकऱ्यांचे आत्महत्त्यांचे प्रमाण वाढत असतांना शासनाने 2005 मध्ये पॅकेज जाहीर केले. हे अधिवेशन सुरु होण्याच्या आदल्या दिवशी इंदिरा इंस्टिटयूटचा रिपोर्ट माझ्याकडे आला. त्यानुसार राज्यात 1 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या. माननीय मुख्यमंत्र्यांनी ते मान्य केले आणि सांगितले की, हे खरे आहे. त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी आत्महत्त्या थांबाव्यात याकरिता 1 हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले. मी त्याच्या खोलात जाणार नाही. माझे सहकारी माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी 1 हजार कोटींच्या पॅकेजमध्ये बनवा बनवी कशी झाली हे सांगितले ? पॅकेज जाहीर झाल्यानंतर मी माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले होते. मी त्यावेळी म्हटले आहे की, विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या थांबण्याकरिता आपण पॅकेज जाहीर केल्याबद्दल आपले अभिनंदन करतो. परंतु नंतर त्या पॅकेजमधील बारकावे पाहिल्यानंतर असे लक्षात आले की, यामध्ये शेतकऱ्याला बनविले गेले आहे, यामध्ये बनवा बनवी झाली आहे. शेतकऱ्याकडील 30 टक्के रक्कम वर्षानुवर्षे सरकारकडे होती ती पॅकेजच्या नावाने परत केली गेली हे शेतकऱ्यांच्या लक्षात आले. शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले नाही तर त्यावरील व्याज माफ केले. आणि त्या कर्जाचे पुनर्गठन करण्याचा सरकारने निर्णय घेतला. पुनर्गठन याचा अर्थ असा की, तेच कर्ज शेतकऱ्याच्या छातीवर कायम ठेवून त्यावरील व्याज माफ करावयाचे आणि पुन्हा त्याला नव्याने तेवढेच कर्ज द्यावयाचे. म्हणजेच विदर्भातील शेतकऱ्याची कर्जामधून मुक्ती नाही. त्यांना दुप्पट कर्जामध्ये बुडविण्याचे पाप सरकारने केले. पहिल्या कर्जावरील व्याज माफ केल्यानंतर कर्ज पुनर्गठीत करुन नव्याने डबल कर्ज त्याच्या अंगावर झाले.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

पहिल्या पॅकेजमध्ये बनवले गेले. आत्महत्या थांबल्या नाहीत. 2006 मध्ये या देशाच्या माननीय पंतप्रधान महोदयांच्या नजरेला ज्यावेळेला ही गोष्ट आली की, मुख्यमंत्र्यांच्या पॅकेजनंतरही या राज्यातील आत्महत्या थांबत नाहीत म्हणून माननीय पंतप्रधानांनी 2 दिवस या विदर्भामध्ये दौरा करुन नंतर त्यांनी 3700 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. म्हणजे 3700 कोटी आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेले 1000 कोटी रुपयांचे पॅकेज अशा प्रकारे जवळपास 5 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर झाल्यानंतर सुध्दा आत्महत्या थांबल्या नाहीत. या पॅकेजचा बट्ट्याबोळ कसा झाला हे सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी सांगितले. मी या ठिकाणी कॅगने पाहणीचे जे सनसनाटी निष्कर्ष काढले त्याचा उल्लेख करणार आहे. देशोन्नती वर्तमानपत्रामध्ये ते प्रसिध्द झाले होते. कॅग म्हणजे भारत सरकारच्या महालेखाकार व नियंत्रक यांच्या कार्यालयाने पाहणी केली. कॅगने जो उल्लेख केलेला आहे त्यामध्ये "कथित बोगस लाभार्थी, दलालांचा सुटसुळाट, आर्थिक अनियमितता, निधीचा गैरवापर, प्रचंड प्रमाणात अखर्चित निधी, सरकारी आदेश व मार्गदर्शक सूचनांच्या विपरित अंमलबजावणी, समस्येचे गांभीर्य लक्षात न घेता केलेल्या खर्चातील सावळागोंधळ आदींमुळे पॅकेजचा लाभ सुस्थितीतील बड्या शेतकऱ्यांना प्रामुख्याने मिळाला आणि अडचणीत असलेल्या, कर्जाच्या बोजाखाली दबलेल्या शेतकऱ्यांपैकी 95 टक्के गरजू शेतकऱ्यांपर्यंत हे पॅकेज पोहोचले नाही असे अनुदान या पाहणीअंती काढण्यात आले आहे." हे आम्ही म्हणत नाही तर भारत सरकारचे कॅग म्हणते. त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, "पॅकेजमधील व्यक्तिगत लाभाच्या योजनांमधील 193 कोटी 74 लाख रुपये इतका प्रचंड निधी कुचकामी नोकरशाही खर्च करु शकली नाही. मदतीसाठी अर्ज केलेले तब्बल 15 हजार 464 म्हणजे अर्ज केलेल्यांपैकी 43 टक्के शेतकरी वंचित राहिले. तळपायाची आग मस्तकात पोहोचविणारी संतापजनक बाब म्हणजे अखर्चित निधी चक्क बँकांमध्ये मुदतठेवीच्या रुपाने गुंतवून त्यावर व्याज कमावण्याची सरकारी सावकारी देखील काही बड्या अधिकाऱ्यांनी केली आहे." माननीय मुख्यमंत्र्यांनी याची चौकशी करावी. ही बाब गंभीर आहे. पॅकेजचा पैसा आपण बँकांमध्ये मुदत ठेवीच्या रुपात ठेवता, त्यावर व्याज घेता. माननीय पंतप्रधानांनी आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी हे पैसे मुदत ठेवीमध्ये ठेवण्यासाठी दिलेले

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

श्री. पांडुरंग फुंडकर .....

नव्हते. पण अधिकाऱ्यांनी ते केले. मुदत ठेवीच्या रुपाने ते पैसे बँकत ठेवले आणि बँकेतून त्यावर व्याज कमावण्याचे पाप या अधिकाऱ्यांनी केले. कॅगने पुढे असे म्हटले आहे की, "नानाविध संकटामुळे उद्‌ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना संजीवनी देण्याच्या अतिशय उदात्त हेतूने केंद्र व राज्य सरकारने जाहीर केलेल्या या पॅकेजची नोकरशाहीने अतिशय संतापजनक पध्दतीने अक्षरश: वाटली लावली." म्हणजे केंद्र सरकारने उदार मनाने दिले. माननीय मुख्यमंत्र्यांनी उदार मनाने या ठिकाणी जाहीर केले. मात्र अधिकाऱ्यांनी या पॅकेजची वाट लावली. कॅगने तपासलेल्या विविध प्रकरणांमध्ये दोषी अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची शिफारस पंतप्रधान कार्यालयाला पाठविलेल्या अहवालात केली आहे. या पध्दतीने जर या राज्यामध्ये पॅकेज राबविले गेले असेल तर शेतकऱ्यांना या ठिकाणी न्याय कसा मिळणार आहे ? माननीय मुख्यमंत्रीजी, हे जे पॅकेज जाहीर झाले ते पॅकेज राबविण्यासाठी केंद्र सरकार व राज्याकडून प्राप्त झालेल्या निधीची नीट अंमलबजावणी करण्यासाठी आपण वसंतराव नाईक स्वावलंबन मिशनची स्थापना केली आणि त्या मिशनचे महासंचालक म्हणून सचिव स्तरावरील अधिकारी राहील असे आपण सांगितले होते. माननीय मुख्यमंत्र्यांनी कबूल केले होते की, सचिव दर्जाचा अधिकारी महासंचालक राहील.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 17:20

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

परंतु शेतक-यांच्या आत्महत्या थांबविण्यामध्ये स्वारस्य नसल्यामुळे महासंचालक या पदाचा दर्जा खाली करण्यात येऊन तेथे सहसचिव दर्जाचा अधिकारी देण्यात आला. एवढयावरच न थांबता या महासंचालकांची दोन वर्षामध्ये 5 वेळा बदली करण्यात आली. सभापती महोदय, महासंचालकाची दोन वर्षात 5 वेळा बदली होते. या पध्दतीने या पॅकेजकडे सरकार पाहाणार असेल तर ते शेतक-यांच्या दृष्टीने घातक आहे. हे पॅकेज कृषी विभागामार्फत राबविले जाते. आज या कृषी विभागामध्ये 456 पदे रिक्त आहेत. यवतमाळ जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त आत्महत्या झालेल्या आहेत. या भागामध्ये कृषी विभागातील 993 मंजूर पदापैकी 614 पदे भरलेली आहेत आणि 379 पदे रिक्त आहेत. पॅकेजचे कोट्यवधी रुपये येऊन पडतात. परंतु अधिकारी नाही, जागा रिक्त आहेत, अनेकांचे पगार थकलेले आहे अशी परिस्थिती आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की विदर्भामध्ये सावळा गोंधळ आहे. करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे यांना मी सांगू इच्छितो की, ते ज्या जिल्हयातील आहेत त्या अकोला जिल्ह्यामध्ये लांडग्याप्रमाणे पॅकेजचे लचके तोडण्याचे काम अधिका-यांनी केलेले आहे. त्यांना केवळ सस्पेण्ड करुन चालणार नाही. आऊटडेटेड औषधे, खते शेतक-यांना देण्यात आली. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी बैलगाडीचा विषय सांगितला. मला नवल वाटते, हे पॅकेज बनविणारे बुध्दिमान अधिकारी कोण आहेत ? शेतक-यांना ज्याची गरज पडत नाही अशा वस्तू शेतक-यांना देण्यात आलेल्या आहेत. एकाही शेतक-याने ताडपत्री मागितलेली नाही. मग ही ताडपत्री त्यांना देण्याचे कोणाच्या डोक्यातून आले ? कोणत्या बुध्दिमान अधिका-याने हे पॅकेज बनविले ? मी माननीय कृषी मंत्र्यांना विचारु इच्छितो की, त्यांच्याकडे एका तरी शेतक-याने ताडपत्रीची मागणी केलेली आहे काय ? असेल तर तसे त्यांनी सांगावे. शेतक-याला नको असेलेले तिफण, नको असलेले पाईप, नको असलेले पंप दिले जात आहेत. ह्या नको असलेल्या गोष्टी शेतक-यांना दिल्यानंतर शेतक-यांना त्यांचा कोणता उपयोग करणार ? लोडशेडिंग असल्यामुळे पंप घेऊन शेतकरी काय करणार ? सभापती महोदय, राज्यातील लोडशेडिंग हे देखील शेतक-यांच्या आत्महत्येला जबाबदार आहे. लोडशेडिंग आहे म्हणून डिझेल दिले, डिझेल चालत नाही म्हणून रॉकेल दिले, हे रॉकेल कोठून आणणार ? कृषी प्रदर्शनाला सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

आणि मी भेट दिली होती. आम्ही शेतक-यांच्या पोटी जन्माला आलेले कार्यकर्ते आहोत. शेतामध्ये काम करणारे कार्यकर्ते आहोत. म्हणून मी सांगू इच्छितो की, या राज्यातील शेतक-यांची या शासनाने मजाक चालविलेली आहे. शेतक-याच्या पोटी मी जन्म घेतला. त्याची अशी दुर्दशा होत असेल, शासन त्याची अशी थट्टा करणार असेल त्याची मान कसाई बनलेल्या अधिका-याच्या हातात दिली असेल तर या राज्यातील शेतकरी वाचू शकणार नाही. शासनाने शेतीशाळा काढल्या. त्याबाबतीत मी माहितीच्या अधिकाराखाली माहिती घेतली. शेतक-याला सुशिक्षित करण्यासाठी शेतीशाळा सुरु केल्या. एका शेतीशाळेवरचा खर्च 22 हजार रुपये आहे. मी गावातील लोकांना शेतीशाळा सुरु झाल्या काय असे विचारले असता त्यांनी त्या सुरु झाल्याचे सांगितले. त्या शेतीशाळेमध्ये काय शिकविले असे मी विचारले. त्यावेळी ग्रामस्थांनी सांगितले की, काहीच नाही. ते म्हणाले गाव आमचा, जागा आमची, पाणी आमचे, चहापाणीही आमचा. एक अधिकारी आला आणि भाषण देऊन निघून गेला. त्यासाठी 22 हजार रु. खर्च आला. कागदोपत्री सर्व बरोबर आहे. मी माहितीच्या अधिकाराखाली किती गावांमध्ये या शेतीशाळा काढल्या याची माहिती घेतली. मी 50 गावामध्ये जाऊन आलो. तेथील शेतक-यांनी मला सांगितले की या शेतीशाळांच्या नावाने कराडो रुपये काढले गेले. सभापती महोदय, याची चौकशी कोण करणार ? शेतक-यांसाठी अवजारे खरेदी केली गेली. निविदा न बोलावता ही अवजारे खरेदी केली गेली. कोणत्या अधिका-याला हे खरेदीचे अधिकार तुम्ही दिलेत ?

....नंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.......

सभापती महोदय, या शेतीशाळांच्या माध्यमातून सेंद्रीय खताचा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मांडला, मी एका जिल्हयाचे उदाहरण देणार आहे. पॅकेजच्या अंमलबजावणीसाठी बुलढाणा जिल्हयात सेंद्रीय शेती तंत्रज्ञान अभियान राबविण्यासाठी 7 संस्थांना काम देण्यात आले. खाजगी संस्थाना हे काम दिले. या संस्थांची निवड कशी केली? कोणी केली? संस्थांचे अर्ज मागविले होते का? वृत्तपत्रात जाहिरात दिली होती का? सेवाभावी संस्थांची नावे मागविली होती का? ठरवूनच अधिकाऱ्यांनी नातेवाईकांच्या संस्था बोलावल्या. या 7 संस्थांना पूर्ण जिल्हयाचे लाखो रुपयांचे काम देण्यात आले. हे कोण बघणार आहे? एक-एक बाब सांगितली तर एक तासही पुरणार नाही. या पध्दतीने या पॅकेजचा बट्टयाबोळ करण्याचे पाप कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांनी केले. अधिकाऱ्यांनी सल्ला दिला तसे तुम्ही आम्हाला बनवित आहात. या पॅकेजमधील 2177 कोटी रुपयांची तरतूद विदर्भातील सिंचनासाठी वळविण्यात आली. सिंचनाचा बॅकलॉग कोणी निर्माण केला? त्यात शेतकऱ्यांचा दोष आहे का? शेतकऱ्यांसाठी माननीय पंतप्रधानांनी दिलेल्या पॅकेजमधून गेल्या अनेक वर्षाचे तुमचे पाप तुम्हाला झाकायचे म्हणून 2000 कोटी रुपये तुम्ही सिंचनासाठी तरतूद केली. विदर्भात 8 मोठे प्रकल्प, 9 मध्यम प्रकल्प आणि 65 लघुपाटबंधारे प्रकल्प आहेत. या पॅकेजमधून त्या प्रकल्पांना निधी देण्याचे ठरले, जाहीर करण्यात आले. परंतु एक मध्यम प्रकल्प वन कायद्यामुळे अडकून पडला आहे. एका मध्यम प्रकल्पाचे काम पूर्ण झाले. 65 पैकी 43 लघुपाटबंधारे प्रकल्प आहेत त्यांचे काम नाबार्डकडून उपलब्ध झालेल्या रु.91.88 कोटीमधून पूर्ण करावयाचे आहे तेही तुम्ही पॅकेजमध्ये समाविष्ट केले. किती बनवता? एका बाजूला सिंचनासाठी पैसा देत नाही आणि दुसऱ्या बाजूला या पॅकेजमधील 2000 कोटी रुपये काढून सिंचनासाठी दिले. कॅगला जलसंपदा विभागाच्या पाहणीत आढळून आले की, विदर्भात 2007 पर्यंत सिंचन सुविधांसाठी पंतप्रधान पॅकेजमधून एक नवा पैसा प्राप्त झाला नाही. हे कॅगचे म्हणणे आहे, आमचे नाही. किती बनवाबनवी चालली आहे? मला खूप बोलायचे होते परंतु वेळ कमी असल्यामुळे मी एकच मागणी करणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मागणी केली त्या मागणीचे मी समर्थन करतो. एकदा सर्व वस्तुस्थिती महाराष्ट्राच्या जनतेसमोर येऊ द्या. केंद्र सरकार पैसा देते. या राज्यातील मृत शेतकऱ्यांच्या टाळूवरील लोणी खाणारे अधिकारी सरकारच्या योजनांचा कशा पध्दतीने बट्टयाबोळ करतात हे पहा. सन्माननीय कृषिमंत्री

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.......

महोदय आपण एकदा श्वेतपत्रिका काढा. पंतप्रधान पॅकेजमधील डिसेंबरपर्यंत किती पैसा आला? राज्य सरकारने किती पैसा दिला? किती योजनांवर पैसा खर्च केला आणि किती लाभार्थ्यांपर्यंत, शेतकऱ्यांपर्यंत तुमच्या योजना पोहोचल्या या संदर्भात श्वेतपत्रिका जाहीर करा. या पॅकेजमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी उच्च पातळीवर करा. आता कोणती उच्च पातळी शिल्लक आहे माहिती नाही. चोरांच्या हाती तिजोरीच्या चाव्या दिल्या आहेत. आपल्या सरकारची ही पध्दतच आहे, चोरांच्या हाती तिजोरीच्या चाव्या दिल्या तर न्याय मिळू शकत नाही. उच्च पातळीवरुन याची चौकशी झाली पाहिजे. याच कारणामुळे पंतप्रधान कार्यालयाने प्रामाणिकपणे हे पॅकेज राबविले जाईल की नाही अशी शंका व्यक्त केली. म्हणूनच पंतप्रधान कार्यालयाने दिल्लीहून काही अधिकारी पाठविले, आपल्याकडे शंकेच्या नजरेने पाहिले जात आहे. म्हणून प्रामाणिकपणे, इमानदारीने या पॅकेजची चौकशी झाली पाहिजे. शेतकऱ्यांच्या मढ्यावरचे लोणी खाल्ले त्या अधिकाऱ्यांना सस्पेंड करुन भागणार नाही. या विदर्भातील सहा जिल्हयांमधील 2000 महिलांचे कुंकू पुसले गेले. कितीही पॅकेज दिले तरी त्या कुंकवाची किंमत होऊ शकणार नाही. आम्हाला परखडपणे बोलावे लागत आहे. कोण याला जबाबदार आहे? काय चूक होती त्या महिलांची? त्यांचे कुंकू पुसले गेले. त्या विधवा झाल्या. त्यांची आज काय अवस्था आहे? मी एक उदाहरण सांगून माझे भाषण पूर्ण करणार आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, मी ज्या तालुक्यात वास्तव्य करतो त्या तालुक्यातील महादू हटकर या धनगर समाजातील एका शेतक-यांनी आत्महत्या केली होती त्यावेळेस कलेक्टरांनी ही केस सँक्शन केली. परंतु हे पैसे देत असतांना पध्दत अशी आहे की, आत्महत्या केलेल्या शेतक-याच्या पत्नीला 30 हजार रुपये चेकने दिले जातात व उरलेले 70 हजार रुपये पोस्टामध्ये तीच्या नावे जमा केले जातात. परंतु या प्रकरणात असे झाले की, कलेक्टर ऑफिस कडून तहसिल ऑफिसमध्ये 70 हजार रुपयांचा चेक पाठविण्यात आला परंतु 10 महिने होऊनही या विधवा महिलेला पैसे हे मिळाले नाही. ही महिला माझ्याकडे आली व तीने मला सर्व हकीकत सांगितली. सगळीकडे या प्रकरणाची बोंबाबोंब झाली परंतु या केसमध्ये तहसिलदारला दोषी न धरता साध्या कारकुनाला सस्पेंड करण्यात आले. आपण या केसमध्ये तहसीलदाराला दोषी का धरले नाही हा माझा सवाल आहे. हे सरकार अधिका-यांना असेच पाठीशी घालत राहिले तर शासनाचा अधिका-यांवर कोणताही धाक राहणार नाही. एका अधिका-याला जर शिक्षा झाली तर 50 अधिकारी त्यापासून धडा घेऊ शकतात. या प्रकरणामध्ये विधवा बाईचे 70 हजार रुपये 10 महिने ज्या अधिका-याने वापरले त्या अधिका-याला दोषी न धरता एका साध्या कारकुनाला सस्पेंड करण्यात आले आहे ते चुकीचे आहे. विदर्भात 2000 महिला विधवा झालेल्या आहेत. आतापर्यंत जेवढया शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत त्यातील 40 टक्के आत्महत्या करणा-या शेतक-याच्या विधवा बायकांना पैसे मिळालेले आहेत. अजूनही 60 टक्के विधवा आपल्या नावाने किंकाळ्या फोडत आहेत. तो शेतकरी दारु प्याला म्हणून त्याने आत्महत्या केली, त्याला दारुचे व्यसन होते म्हणून त्याने आत्महत्या केली या अशा पध्दतीने आपण 60 टक्के आत्महत्या करणा-या शेतक-यांच्या विधवांना अजूनही पैसे मिळालेले नाहीत. 60 टक्के विधवांचे पाप शासनाने आपल्या डोक्यावर घेतलेले आहे. त्यामुळे या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी. तसेच पॅकेजमध्ये कोणा कोणाला किती मदत केली गेली यासंदर्भात श्वेतपत्रीका काढली जावी एवढी मी आपल्या माध्यमातून विनंती करतो. सभापती महोदय, असे जर केले नाही तर ही वादळा पूर्वीचा शांतता आहे हे आपण विसरु नका. विदर्भातील शेतक-यांच्या संवेदना आता मेलेल्या आहेत. शेतकरी संवेदनाहीन झालेला आहे. शेतकरी भोळा आहे. सभापती महोदय, शेतकरी जसा भोळा आहे तसाच शंकर भगवान हे

....2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

सुध्दा भोळे आहेत त्यांना तिसरा डोळा आहे. त्यामुळे या भोळया शेतक-याने तिसरा डोळा उघडला तर शेतक-याच्या टाळूवरील लोणी खाणा-याला तो भस्मसात करुन टाकल्याशिवाय राहणार नाही. यामध्ये जे जबाबदार आहेत ते यामध्ये भस्मसात होऊन जातील आणि याचा प्रत्यक्ष अनुभव आपल्याला येणा-या निवडणुकीमध्ये नक्की दिसून येईल एवढा इशारा देतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-----------------

यानंतर हिंदी भाषण श्री. अग्रवाल यांच्याकडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री अनिस अहमद ( पशुसंवर्धन एवं दुग्ध विकास मंत्री ) : अध्यक्ष महोदय, यहां पर अंतिम आठवडा प्रस्ताव के माध्यम से विदर्भ में किसानों की आत्म हत्या एवं विदर्भ पैकेज के संबंध में कई सन्माननीय सदस्यों ने अपने विचार व्यक्त किये हैं. मैं यहां पर बताना चाहूंगा कि 6 दिनों में प्रधानमंत्री पैकेज के अंतर्गत विदर्भ के वर्धा, वाशिम, अकोला, बुलढाणा, अमरावती एवं यवतमाल इन 6 जिलों में लगभग 50 हजार गाय देने के लिए अर्जी आयी हैं. जिसमें से अभी तक सरकार ने प्रधानमंत्री पैकेज और सी.एम. पैकेज के माध्यम से इन इलाकों में करीब 16 हजार गाय बांटने का काम किया है. गाय बांटने में 75 प्रतिशत पैसा सरकार देती है और 25 प्रतिशत पैसा किसान से लिया गया है. गाय खरीदने के लिए कोई टेंडर नहीं निकाले गये हैं. किसानों ने खुद अपनी पसन्द से मार्केट से गाय खरीदी हैं. तीन दिन तक किसान वह गाय अपने पास रख सकता है और यह देख सकता है कि वह गाय कितना दूध दे रही है ? अगर वह गाय 8 से 10 लीटर दूध दे रही है तो किसान वह गाय अपने पास रख सकता है. अगर वह गाय इतना दूध नहीं दे रही है तो किसान वह गाय वापस कर सकता है. किसानों को जोड़ धंधा मिलना चाहिए, इस उद्देश्य से ये गाय बांटी गई हैं. गाय का दूध बेचकर किसानों को ज्यादा पैसा मिलेगा. इसके साथ ही मैं यहां बताना चाहूंगा कि दूध जमा करने का जो काम है उसमें पश्चिम महाराष्ट्र में 55 पैसे और विदर्भ में 1रु.10 पैसे कमीशन के रुप में दिये जाते हैं. हमने तीन साल में दो बार दूध के भाव बढ़ाये हैं. यह भाव इस नीयत से बढ़ाये गये हैं कि किसानों को इसका फायदा मिले और उसको जोड़ धंधा मिले. यहां पर किसानों ने हल चलाने और खेती करने का काम किया है. केवल खेती से किसान को उतना फायदा नहीं मिलता है इसलिए यहां के किसानों के लिए जोड़ धंधे उपलब्ध कराने की जरुरत है. पश्चिम महाराष्ट्र में गोकुल एवं वारणा जैसी बड़ी दूध उत्पादक संस्थाओं में कैसे काम होता है ? वहां के किसान किस तरह से दूध का उत्पादन बढ़ा रहे हैं एवं वे कैसे वाय प्रोडक्ट बना रहे हैं ? इसकी जानकारी प्राप्त करने के लिए विदर्भ के किसानों को ग्रुप में पश्चिम

--4J-1

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री अनिस अहमद का भाषण जारी....

महाराष्ट्र में ले जाया गया. मैं यहां बताना चाहूंगा कि दो साल पहले विदर्भ के इन 6 जिलों में 20-25 हजार लीटर दूध का उत्पादन होता था, लगभग 10 हजार गाय बांटने के बाद इन 6 जिलों में दूध का उत्पादन करीब 61 हजार 200 लीटर हो गया है. अगर गाय मर जाती है तो किसान को नुकसान होता है इसलिए सरकार की तरफ से गाय का बीमा कराया गया है. मंत्रालय लेबल पर गाय की खरीद नहीं हो रही है. कलक्टर लेबल पर गाय की खरीद हो रही है. कौन सी गाय खरीदनी है, उसका निर्णय कलक्टर लेबल पर हो रहा है. विदर्भ के किसानों के साथ न्याय हो, उनको जोड़ धंधा मिले इसलिए विदर्भ के किसानों को गाय बांटने का काम इस सरकार द्वारा किया गया है. यहां पर वेटरनरी डॉक्टर नहीं थे. एम.पी.एस.सी. के माध्यम से इन डॉक्टरों की भर्ती का काम किया गया है. विदर्भ में जहां पर पी.एम. पैकेज का काम चल रहा है वहां पर 300 एल.डी.ओ. काम करेंगे. इन एल.डी.ओ. की ट्रेनिंग होगी फिर वे इन इलाकों के पशु वैद्यकीय दवाखानों में रात दिन काम करेंगे. पिछले दिनों इन इलाकों में दिंडी निकाली थी. वहां पर श्री थोरात साहब भी आये थे. सिंदखेड से सेवाग्राम और वाशिम से वर्धा तक दिंडी निकाली थी. इसके साथ ही मैं बताना चाहता हूं कि जो बांझ गाय हैं उनका आर्टिफिशियल ट्रीटमेंट करके बछड़ा पैदा करने का काम हो रहा है. कौन सी गाय इस तरह के आर्टिफिशियल ट्रीटमेंट के माध्यम से बछड़ा पैदा कर सकती है इसके बारे में काम चल रहा है. इस तरह का इलाज करके जो गाय बछड़ा दे सकती है उसके लिए 10 हजार रुपये देने का काम किया जा रहा है. पशु वैद्यकीय युनिवर्सिटी के माध्यम से यह काम किया जा रहा है. इस तरह से हम यहां के किसानों की मदद कर रहे हैं. हम किसानों को जोड़ धंधा देने के संबंध में मदद कर रहे हैं. मुझे लगता है कि इस तरह के कामों के संबंध में राजनीति नहीं होनी चाहिए. जो अधिकारी काम नहीं कर रहे हैं उनके कान पकड़ने की जरुरत है. विदर्भ में जो आत्म हत्या हो रही हैं उसके ऊपर राजनीति नहीं होनी चाहिए लेकिन आज बड़ी-बड़ी रैलियां निकल रही हैं. हमारा कहना है कि बड़े-बड़े भाषण करने से आत्म हत्या रुकने वाली नहीं हैं. किसानों को आज सही रास्ता दिखाने वाले लोग चाहिए. कुछ लोगों ने बड़ी-बड़ी दिंडी निकालने का काम किया है एवं राजनीति करने का काम किया है.

...2...

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात. )

श्री.दिवाकर रावते : अर्ध्या गायी मेल्या आणि अर्ध्या आजारी आहेत. माननीय मंत्रिमहोदय, चुकीची माहिती देत आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या प्रस्तावाच्या निमित्ताने माननीय रावते साहेबांनी भाषण केले, मीही केले. परंतु आम्ही आमच्या भाषणात सरकारवर आरोप केले नाहीत. अधिकाऱ्यांनी पॅकेज कसे फसवले, एवढेच आम्ही सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. परंतु आम्ही राजकारण करीत आहोत, असे माननीय मंत्रिहोदयांचे म्हणत आहेत, ते पूर्णपणे चुकीचे आहे. सभापती महोदय, अकोला जिल्हयामध्ये 1000 गायी वाटण्यात आल्या असे माननीय मंत्रिमहोदयांचे म्हणणे आहे, परंतु त्यातील 300 गायी वाटण्यातच आल्या नाहीत. गायी वाटपामध्ये मोठयाप्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे.

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांच्या विभागामार्फत जे काम झाले, ते त्यांनी सांगावे.

श्री अनिस अहमद : अध्यक्ष महोदय, इस साल एम.पी.एस.सी. के माध्यम से जितने एल.डी.ओ. के पद खाली हैं उनको भरा जायेगा और जहां पर एल.डी.ओ. नहीं है वहां पर इनको भेजा जायेगा. एल.डी.ओ. हर गांव में जायेंगे. जितनी गाय हैं उनके संबंध में मैं कहना चाहूंगा कि ये जो गाय हैं वे कैसे प्रिग्नेंट हों इसके बारे में काम किया जायेगा जिससे इन जगहों पर दूध का उत्पादन बढ़ सकता है. मेरे पास अधिकारियों ने लिस्ट दी है कि कौन कौन से जिले में कितना दूध का उत्पादन हो रहा है एवं कौन कौन सी गाय कितना दूध दे रही है. जो गाय बांटी गई हैं वे गाय 6 लीटर से 15 लीटर तक दूध देने वाली गाय हैं.

श्री.पांडुरंग फुंडकर : अध्यक्ष महोदय, हमने कहा है कि अकोला में जो गाय बांटी गई हैं उनमें भ्रष्टाचार हुआ है. इस बारे में सन्माननीय सदस्य श्री रावते साहब ने भी कहा है कि भ्रष्टाचार हुआ है. कागज पत्रों में ही गाय बांटी गई हैं. गाय किसानों के घर में नहीं गई हैं. गाय ली थी बाद में वह मर गई इस तरह की भी बात की गई है. हमारा कहना है कि किसानों के घर में गाय नहीं गई है

श्री.दिवाकर रावते : माननीय विरोधी पक्षनेत्यांना मी विनंती करतो की, आपण त्यांच्यासोबत हिंदी भाषेत बोलू नये. आपण मराठी भाषेतच बोलावे. (...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अकोला जिल्हयात गायी वाटपामध्ये मोठयाप्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. 1000 गायींपैकी 300 गायी वाटल्याच नाहीत, परंतु त्या वाटल्याचे कागदोपत्री दाखवून पैसे खाण्यात आले. तसेच ज्या गायी वाटल्या, त्यातील बऱ्याच गायी मरण पावल्या. त्यामुळे याबाबतची चौकशी झाली पाहिजे, एवढीच आमची मागणी आहे.

श्री अनिस अहमद : सन्माननीय विरोधी पक्ष नेता श्री फुंडकर साहब ने जो कहा है उसके बारे में मैं कहना चाहूंगा कि अगर ऐसा कुछ हुआ होगा तो उन अधिकारियों के खिलाफ हम जरुर कार्रवाई करेंगे और अगर जरुरत पड़ी तो उन अधिकारियों को सस्पेंड करने में भी हम पीछे नहीं हटेंगे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आज सरकारचे अधिकारी वाट्टोळे करीत आहेत. त्यांचे निलंबन होऊन काही होणार नाही. माननीय मंत्रिमहोदय याठिकाणी सतत सांगत आहेत की, आम्ही अमुक करु, तमुक करु. यासंदर्भात मुडदे बाहेर काढून काही होणार नाही. आपण त्यांना काही करणार नसाल तर आम्हीही एक दिवस भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये आपले कपडे काढू.

**सभापती** : माननीय कृषि मंत्र्यांनी उत्तरास सुरुवात करावी.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात ( कृषि मंत्री ) : सभापती महोदय, अंतिम आठवडयाच्या प्रस्तावाच्या निमित्ताने माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर व सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विदर्भाच्या 6 जिल्हयांतील शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या पॅकेजसंबंधी चर्चा उपस्थित केली. अतिशय चांगली चर्चा त्यांनी सदनामध्ये उपस्थित केली. सभापती महोदय, शासनामध्ये काम करीत असताना काही त्रुटी किंवा अनियमितता होत असेल तर त्यासुध्दा निदर्शनास येतातच. परंतु पॅकेजच्या संदर्भात काही गैरसमज होत असतील तर ते दूर करण्याचे प्रयत्न शासनाच्या माध्यमातून झाले पाहिजेत. दुर्दैवाने विदर्भातील 6 जिल्हयांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. आज देशातील अनेक राज्यांमध्येही शेतकरी आत्महत्या करीत आहेत, परंतु आपल्या राज्यामध्ये विदर्भातील 6 जिल्हयांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण जास्तीचे आहे. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीने, त्यांना ताकद देण्याच्या दृष्टीने गेल्या तीन वर्षामध्ये दोन पॅकेजच्या माध्यमातून शासनाने प्रयत्न केलेला आहे. राज्य सरकारने 1075 कोटी रुपयांचे पॅकेज दिले.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात........

त्यानंतर सन्माननीय पंतप्रधानांनी 3750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. एकूण 5 हजार कोटी रुपयांचे पॅकेज या सहा जिल्हयाला देण्यात आले आहे. यामध्ये तीन वर्षाच्या अलिकडच्या कालखंडाचा विचार केला तर 3 हजार कोटी रुपयांचा खर्च झालेला आपल्याला दिसतो. खर्च होत असतांना 1100 कोटी रुपयांची व्याजमाफी किंवा कर्जाचे पुनर्गठण यासाठी बँकांना दिले गेले, ही रक्कम थेट चेकव्दारा बँकांना दिली गेली, हे देखील मी मुद्दाम या निमित्ताने सांगू इच्छितो. 600 कोटी रुपये कापसासाठी दिलेले आहेत, 1200 कोटी रुपये सिंचन, पाणलोट क्षेत्र विकास, सुक्ष्म सिंचन यासाठी दिलेले आहेत. विदर्भातील सहा जिल्हयांमधील सिंचन अनुशेष पूर्ण करण्याकरिता हा निधी जलसंपदा विभागाला दिलेला आहे. 100 कोटी रुपये कृषि विस्तारासाठी दिलेले आहेत. यामधून स्पष्ट चित्र असे दिसते की, 5 हजार कोटी रुपयांपैकी 3 हजार कोटी रुपये प्रत्यक्ष खर्च करीत असतांना 1700 कोटी रुपये थेट बँकांमध्ये गेलेले आहेत, निरनिराळया स्किम्समध्ये गेलेले आहेत. 1200 कोटी रुपये सिंचनाकरिता वापरीत आहोत, त्याचे दृष्य परिणाम काही कालावधीनंतर दिसू शकतील.

सभापती महोदय, प्रामुख्याने टीका झाली ती राज्य सरकारचे जे पॅकेज आहे त्यातील एका बाबतीत टीका होत आहे. एक बाब मी नम्रपणे सांगू इच्छितो की, राज्य शासनाचे पॅकेज हे निरनिराळया विभागामार्फत दिले जात आहेत, केवळ कृषि विभागाच्या माध्यमातून पॅकेज राबविले जात आहे, असे नाही तर सहकार, पणन, महिला व बाल कल्याण, जलसंपदा या विभागांमार्फत पॅकेज राबवित असतांना कृषि, पशुसंवर्धन व दुग्ध विकास विभाग यांच्यावर टिकेचा रोख होता. या विभागाने असा निर्णय घेतला की, सहा जिल्हयातील 60 हजार कुटुंबांवर तीन वर्षात प्रत्येकी 25 हजार रुपये खर्च करावयाचे आहेत आणि त्यावरच आधारित चर्चा या ठिकाणी झाली, हे मी नमूद करु इच्छितो. त्यामुळे हे निदर्शनास आणून दिले पाहिजे की, 5 हजार कोटी रुपयांच्या पॅकेजमध्ये प्रत्यक्षात खर्च झालेल्या 3 हजार कोटी रुपयांमध्ये कृषि विभागाचा वाटा, 25 हजार रुपयांप्रमाणे 60 हजार कुटुंबांवर खर्च झालेल्या 78 कोटी रुपयांचा आहे. सगळी चर्चा प्रामुख्याने साहित्य वाटपाबाबत झाली होती. म्हणजे या 78 कोटी रुपयांवर झालेली आहे, हे मला नम्रपणे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. मी आपल्या सांगू इच्छितो की, या पॅकेजमध्ये 78.45 लाख रुपयांचा खर्च

....2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात.........

झाला. साधारणत: 150 कोटी रुपये 60 हजार कुटुंबावर येत्या तीन वर्षामध्ये खर्च करावयाचे आहेत. यामध्ये प्रामुख्याने निविष्टा वाटप आहे. औजारे, बैलजोडया, बैलगाडया, पाईप लाईन, पंप संच, ताडपत्री यांचा समावेश यामध्ये आहे. या सगळया बाबी कृषि विभागाच्या माध्यमातून होत असल्या तरी जिल्हाधिका-यांची समिती गठीत करण्यात आली आहे, त्यांच्या माध्यमातून लाभार्थ्यांची निवड केल्यानंतर कृषि विभागाच्या माध्यमातून लाभार्थी कुटुंबाला विचारले जाते की कोणती निविष्टा त्यांना हवी आहे. त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांच्याकडून त्या निविष्टेचा फॉर्म भरुन घेतला जातो. आपण देखील सत्ता उपभोगली आहे, याची आपल्याला जाणीव आहे की, सर्व सामुग्री ही एम.अे.आय.डी.सी. किंवा एम.एस.एस.आय.डी.सी. किंवा मार्केटिंग फेडरेशन यांच्याकडून मागविली जाते, त्यांच्याकडे मागणी नोंदविण्यात येते. मागणी करतांना एकत्रित तीन वर्षाची मागणी नोंदविण्यात आली. याचे वाटप किती झाले याचा आकडा मी आपल्याला सांगू इच्छितो. कल्टिवेटर बाबतचा मुद्दा आपण उपस्थित केला. हे कल्टिवेटर मल्टिपरपज आहे, निरनिराळे साहित्य जोडून मशागत करण्याची सोय त्यामध्ये आहे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात......

अशाप्रकारचे हे कल्टीव्हेटर आहे. या योजनेअंतर्गत 76,775 निरनिराळया अवजारांचे वाटप करण्यात आलेले आहे. ही अवजारे 58 हजार कुटुंबांना वाटण्यात आलेली आहेत. 2,504 बैलजोडयांचे वाटप करण्यात आलेले आहे. 7,468 बैलगाडयांचे वाटप करण्यात आलेले आहे. 34,029 पाईप वाटण्यात आलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी असे सांगितले की, 150 कोटी रुपयांचे पाईप वाटण्यात आले, ही वस्तुस्थिती नाही. 4 कोटी रुपयांचे पाईप आपण वाटप केलेले आहेत. तीन वर्षाचे 150 कोटी रुपयांचे पॅकेज आहे. एखाद्या शेतक-याने जर म्हटले की, मला पाईप लाईन करावयाची आहे, मला इतके पाईप पाहिजे तर त्या शेतक-याला आपण पाईप देतो. पंपसंच हा चर्चेचा मुद्दा झाला. विद्युत पंपासंदर्भात आमचा आग्रह राहिला की, जेथे विज पुरवठा होऊ शकतो तेथे प्राधान्याने विद्युत पंप देण्यात यावेत. 18,942 विद्युत पंप आपण दिलेले आहेत. एवढेच नाही तर पेट्रोकेरोसीन आणि डिझेल पंप असे दोन्ही मिळून जवळपास 19 हजार पंप आपण दिलेले आहेत. 7 हजार डिझेल पंप आणि 12 हजार पेट्रोकेरोसीन पंप आपण दिलेले आहेत. एक गोष्ट स्पष्ट आहे की, कृषी विभाग एम.ए.आय.डी.सी., एम.एस.एस.आय.डी.सी. आणि मार्केटिंग फेडरेशन यांच्याकडे मागणी नोंदवितो त्यावेळी आय.एस.आय. मार्क असलेल्या दर्जेदार साहित्याची मागणी केली जाते. 5 हॉर्सपॉवरची इलेक्ट्रीक मोटर घ्यायची म्हटले तर या तीन्ही संस्था कोटेशन मागवितात आणि त्यामध्ये लोएस्ट असेल त्याला फायनल करतात. त्यामुळे ब्रॅन्डेड माल बाजूला पडतो, ही वस्तुस्थिती आहे. आपण इलेक्ट्रीक मोटर आणि पंप सिलेक्ट केल्यानंतर त्या शेतक-याला सांगितले की, तुला ज्या कंपनीची मोटर पाहिजे ते नाव अर्जामध्ये नमूद कर, तुला ती मिळेल. चांगल्या कंपनीची वस्तू महाग असली तरी त्या कंपनीचे कोटेशन सुध्दा आपण घेऊन ठेऊ आणि शेतक-यांनी वरची रक्कम भरली तर त्याला चांगली इलेक्ट्रिक मोटर, पंप सेट देऊ. कोणतीही तक्रार येणार नाही असाच आमचा प्रयत्न आहे.

सभापती महोदय, आपण शेतक-यांना ताडपत्रीचे वाटप केले. ताडपत्रीबाबत माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर बोलले. सोयाबीन काढल्यानंतर ते झाकून ठेवण्याची पद्धत

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात......

आहे. ब-याच वेळा अवेळी पाऊस येतो म्हणून सोयाबीन झाकून ठेवले जाते. ब-याच शेतक-यांच्या शेतामध्ये सोयाबीन निळया रंगाच्या ताडपत्रीने झाकून ठेवल्याचे आपल्याला दिसते. म्हणून ताडपत्री वाटपाचा समावेश करण्यात आला. 1 लाख 48 हजार निरनिराळया वस्तूंचे वाटप केल्यानंतर आमच्याकडे एकूण 80 तक्रारी आल्या. त्यामध्ये प्रामुख्याने आमचा लाभार्थ्यांच्या यादीमध्ये समावेश का झाला नाही, अशा प्रकारच्या तक्रारी होत्या. आम्हाला साहित्य का मिळत नाही, अशा प्रकारच्या तक्रारी होत्या. यामध्ये तीन तक्रारी गंभीर स्वरुपाच्या होत्या. या तीन तक्रारी आमदार महोदयांनीच केल्या होत्या आणि त्या गुणवत्तेच्या संदर्भातील होत्या. विधानसभेच्या सन्माननीय सदस्यांनी शेतक-यांना जे साहित्य वाटप करण्यात आले होते त्याचे प्रदर्शन भरविले होते. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब सुध्दा तेथे जाऊन आले. मी सुध्दा ते प्रदर्शन बघण्यासाठी गेलो होतो. नेमके काय चालले आहे, हे मला कळले पाहिजे म्हणून मी तेथे गेलो होतो. विधानसभेचे विरोधी पक्षनेते श्री.रामदास कदमसाहेब सुध्दा तेथे आले होते. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मला सांगितले की, तुम्ही तेथे जा आणि बघून या की नेमके काय चालले आहे. मी त्या प्रदर्शनातील वस्तू बघितलेल्या आहेत.

यानंतर कु.जयश्री......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात......

माननीय विरोधी पक्षनेते विधानसभा श्री.रामदास कदम हे बरोबर होते मी त्यांना म्हटले की, या वस्तू आहेत त्या येथेच ठेवा पण आपण त्यासंबंधीच्या चौकशीला आपण सुरुवात करु. त्यानंतर ते म्हणाले की, यवतमाळमधील काही नमुने मिळाले नाहीत. तरी देखील त्यामधील संपूर्ण वस्तूंची तपासणी करण्याची आमची तयारी आहे. त्या प्रदर्शनातील वस्तू कोणत्या शेतक-याच्या आहेत,कोठून आल्या आहेत, कशा आल्या आहेत यासंदर्भात आमची चौकशी चालू आहे. या सर्व वस्तुंचे स्पेसिफिकेशन निश्चित असते. आपल्याला माहित असेल की कोणत्या अवजारांना कोणते स्पेसिफिकेशन असले पाहिजे. किती वजन असले पाहिजे बैलगाडी असली तर ती कशी असली पाहिजे. यासंबंधी प्रामुख्याने निकष तयार केलेले आहेत. तेवढे मिळाले तरी आपण सेंट्रल गर्व्हनमेंटच्या एका संस्थेकडून तपासणी घेण्याची तयारी आपली असते. आपली तयारी आहे की, काही जर चुकीच्या पध्दतीने समोर आले असेल तर आपली अजूनही तयारी आहे. कोणत्याही निविष्ठेमध्ये त्यांचे स्पेसिफिकेशनप्रमाणे आले नाही तर सेंट्रल गर्व्हनमेंटची रेल्वेची जी संस्था आहे तिच्या माध्यमातून तपासण्याची तयारी शासनाची आहे. यात कोणाची चूक असेल त्यांना शिक्षा करण्याची तयारी आहे. खरे म्हणजे या सगळया प्रोसिजरमध्ये आहे त्यानुसार साहित्याच्या चौकशी करता येईल आणि त्याबाबतीत काही गैरसमज असतील तर ते दूर होतील त्याची अडचण वाटत नाही. आम्हाला मात्र जी काळजी वाटते ती जैविक निविष्ठांची. त्यासंदर्भात आम्ही मान्य करतो की, जैविक निविष्ठा म्हणजे फर्टिलाईझर, खते, कीटकनाशके यांच्या बाबतीतील पुढच्या ज्या मागण्या आहेत त्या पुरविल्या जातात. त्यातून मोठया प्रमाणात तक्रारी आल्या हे मी मान्य करतो हिंगणघाटची यासंदर्भात तक्रार असेल किंवा अन्य कोणती तक्रार असेल तर या संदर्भात विभागाने निर्णय घेतलेला आहे की, जैविक निविष्ठा द्यावयाच्या की नाही ? कारण राज्यात अनेक संस्था, कुटीरउद्योगाच्या माध्यमातून यामध्ये आहेत. प्रथमत: जैविक निविष्ठा द्यावयाच्या की नाही हे आम्ही ठरवित आहोत. द्यावयाच्या असतील तर शेतक-यांनी विकत घ्यावे, पावती आणून द्यावी आम्ही त्याचे पैसे चेकने देऊ, अशीही व्यवस्था करण्याची तरतूद केलेली आहे. यासंदर्भात काही गैरव्यवहार झाला त्यासंदर्भातील उल्लेख झाला या गैरव्यवहारामध्ये दोषी असलेल्या कर्मचारी अधिका-यांना आम्ही फक्त निलंबितच केले नाही तर त्यांच्यावर फौजदारी केस दाखल केलेली

....2

श्री.बाळासाहेब थोरात .....

आहे. अजूनही कोठे असे प्रकार आढळले तर त्यांनाही शिक्षा करण्यात येईल. हेतूपुरस्सर कोणी या पॅकेजमध्ये घोटाळा करीत असेल तर त्यांच्यावर सुध्दा विभागीय चौकशी जाहीर होईलच. त्याच्या पलीकडे अजून फौजदारी केस दाखल करण्याची तयारी आमची आहे. कोणाचीही यामध्ये गय केली जाणार नाही, हे माझे स्पष्ट आश्वासन आहे. याबाबत कोणतीही अडचण नाही हे सुध्दा मी यानिमित्ताने स्पष्टपणे सांगत आहे.

एक चित्र आपल्याला दिसत आहे की, एकंदर विषयामध्ये पॅकेजबाबयत चर्चा होत असतांना जे सर्व राज्यशासन करते त्यानुसार कृषी विभाग काम करीत आहे. रिक्त जागा भरण्यामध्ये कोर्टाच्या अडचणी येतात, काही जागांसदर्भात कोर्टाकडून स्टे आलेला असतो. प्रयत्न करुनही या जागा भरण्याबाबतची कोणत्याही अडचणी दूर होत नाहीत. निरनिराळया मार्गांनी आम्ही जागा भरत आहोत. कृषी सेवकाच्या 900 जागा आम्ही चार दिवसांमध्ये याद्यांच्या आधारावर भरलेल्या आहेत. या याद्यांमधील नावे आम्ही संबंधित वेबसाईटवर प्रसिध्दही केली होती. यामधील सर्व अधिकारी व कर्मचारी वाईट नसतात. कारण एक गाव म्हटले की, त्यामध्ये निरनिराळया 40 योजनांच्या माध्यमातून काम करण्यात येत असते. या योजनांअतंर्गत आमचे अधिकारी कपाशीचे, भाताचे मदतीचे चेक लिहिण्याचे काम करीत असतात. त्याच्याकडून चूक होतही असतील, नाही असे नाही. ज्या अधिकारी व कर्मचारी यांनी रात्रंदिवस जागून हजारो चेक लिहिले असतील त्यांच्याकडून चूक झाली असली तरी हेतुपूरस्सर चूक झाली नसेल आणि तसे असेल तर ती समजून घेण्यात यावी. परंतु जर त्यांच्याकडून हेतुपूरस्सर चेक लिहिण्यामध्ये चूक झाली असेल तर मग त्यांना शिक्षाही झालीच पाहिजे.

आपण येथे महालेखापालांच्या शे-याबाबत आणि कॅगसंदर्भातील सर्व मुद्यांवर कृषी विभागातील अधिका-यांची चर्चा झाली.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात .....

त्यांचे अनेक गैरसमज होते, ते दूर झाले आहेत, अजून काही शंका दूर करण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्नशील आहोत. कॅगच्या बाबत तीन दिवस आमच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा चालली होती. या चर्चेमध्ये अनेक गोष्टी क्लिअर झालेल्या आहेत, असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी अमरावती येथील खताचा मुद्दा मांडला. खताच्या बाबतीत तक्रार आली तर त्वरीत कारवाई सुरु केली जाते. सध्या तक्रार असलेल्या सर्व दुकानामधील नमुने खात्याने घेतले आहेत. हे नमुने सील करुन तपासणीसाठी पाठविले आहेत. तपासणी रिपोर्ट आल्यानंतर संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल. या व्यतिरिक्त जेथे संशय आलेला आहे, त्यांच्या दुकानातील विक्री बंद करण्यात आली आहे, ही वस्तुस्थिती मी सांगू इच्छितो. तसेच वाशिमबाबत जी तक्रार केली आहे, त्याबाबतचे बारकावे सध्या माझ्याकडे नाहीत. वाशिम येथे कृषी विभागाकडून वन क्षेत्रामध्ये मातीचा बंधारा बांधलेला आहे, त्याची तपासणी करण्यात येईल. पंप व पाईपबाबत सांगितलेल्या बाबी तपासून घेण्यात येतील. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी बुलढाणा येथील सेंद्रीय शेतीबाबत तक्रार केली आहे, ही तक्रार तपासण्यात येईल. शेतीशाळेबाबत कोठे काही चुकीचे घडले नसेल असे मी म्हणत नाही कारण त्यांचे काम महाराष्ट्रभर चालू आहे. परंतु केंद्र सरकारच्या प्लॅनिंग कमीशनने काही बाबतीत महाराष्ट्राचे कौतुक केले आहे, त्यामध्ये शेती शाळेचा विशेष उल्लेख केलेला आहे. शेती शाळा कोणाच्या घरात भरत नसून ती शेतावर भरते. शेतीची आवड असणारे अनेक शेतकरी शेतावर एकत्र आणून त्यांच्याबरोबर चर्चा केली जाते. याद्वारे एकात्मिक कीड व्यवस्थापनाबाबत काही योजना व बिजोत्पादनाचा कार्यक्रम अतिशय चांगल्या पध्दतीने राबविला जातो. शेती शाळेचे काम खूप चांगल्या पध्दतीने चालले आहे हे जाणीपूर्वक आपणास सांगू इच्छितो. कृषी खात्याकडून सर्व गावांचे माती परीक्षण करण्यात आले आहेत. या मातीमध्ये कोणती खते टाकली पाहिजेत व कोणते टाकू नयेत. चुकीची खते कशी टाकू नयेत हे समजून सांगण्याची जबाबदारी प्रत्यक्ष शेतावर जाऊन पार पाडली जाते. त्यामधील काही शेतकऱ्यांना बरोबर घेऊन त्यांना प्रत्यक्ष शिकविण्याचा प्रयत्न केला जातो. एखाद्या ठिकाणी काही चुका झाल्या असतील तर त्याची चौकशी करण्यात येईल.

.....2



असुधारीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात.....

परंतु जे चांगले काम चालू आहे, त्याचे निश्चितपणे कौतुक केले पाहिजे अशा प्रकारची अपेक्षा मी व्यक्त करतो. माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार बुलढाणा जिल्हयातील लाभार्थींना 10 महिने पैसे का मिळाले नाही, याची चौकशी जिल्हाधिकारी किंवा वरील पातळीवर करण्यात येईल.

सभापती महोदय, या विषयावर चर्चा होत असताना पॅकेजचीही चर्चा झाली व सभागृहाच्या लक्षात आले असेल की, 5 हजार कोटीच्या पॅकेजमध्ये आपण 78 कोटी रकमेची चर्चा केली आहे. काही त्रुटी दूर सर्व काही सुरळीत करण्यासाठी कृषी खाते प्रयत्नशील आहे, याची ग्वाही देतो. विविध योजना पुढील कालखंडात चांगल्या प्रकारे कशा राबविल्या जातील व शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत कशी होईल, यासाठी निश्चित प्रयत्न करण्याची ग्वाही देतो आणि माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने सभागृहाला कळाले की, 5000 कोटी रुपयांचे पॅकेज आहे, माननीय मंत्री महोदयांनी हे सांगितले बरे झाले. भ्रष्टाचार झाला आहे, तो तर कागदोपत्री आहे, त्याबाबत विषयच नाही. मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, अधिकाऱ्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराबाबत तपास किंवा चौकशी करण्यात येईल. परंतु 5000 कोटी पॅकेजपैकी दोन वर्षामध्ये फक्त 78 कोटी रुपये वापरले असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. आता आपण सांगत आहात की, ही रक्कम सिंचनासाठी आहे. याबाबत मी सांगतो की, सिंचनाबाबतची तरतूद सोडून द्या. कारण त्याला किती वर्षे लागतील ? त्यातील काही निधी तुम्ही पश्चिम महाराष्ट्रात घेऊन जाल. त्याचे काही सांगता येत नाही, त्यामुळे या पॅकेजच्या निधीबद्दल आम्हाला भितीच वाटते. आपण पॅकेजमधील फक्त 78 कोटी रुपये वापरले आहेत, हे आणखी गंभीर प्रकरण आहे. म्हणजे झालेला भ्रष्टाचार केवळ 78 कोटी रुपयात झाला आहे. गायीच्या बाबतीत मी स्पष्ट म्हटले आहे की, 30 लाख रुपयाच्या गायी कागदोपत्री दाखविल्या आहे. मी मंत्री महोदयांना सांगितले आहे की, विविध योजना राबविण्याची सरकारची इच्छा असूनही अधिकारी तुम्हाला बुडवित आहेत. मी दोष तुम्हाला न देता अधिकाऱ्यांना देत होतो. तुम्ही स्वतःच्या अंगावर दोष घेतला आहे, हरकत नाही. 30 लाखाच्या गायी गायब झाल्या तर माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले पाहिजे होते की, आपण निदर्शनास आणलेली बाब तपासण्यात येईल व दोषींवर कारवाई केली जाईल. परंतु हे न सांगता मंत्री महोदयांनी स्वतःच्याच अंगावर घेतले आहे. ठीक आहे, आनंद आहे, त्याला तुम्ही जबाबदार आहात. या पॅकेजमधील फक्त 78 कोटी रुपये वापरुन आपण शेतकऱ्यांची व विदर्भाची दयनीय अवस्था निर्माण केली आहे. पॅकेजबाबत आपण किती गंभीर आहात, हे दाखवले आहे. यामध्ये आणखी एक गोष्ट अनाकलनीय आहे.

नंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

पॅकेजमधून ज्या विहिरींचे वाटप करताना विहिरी या पक्षाची खाजगी मालमत्ता आहे अशा पद्धतीने वातावरण निर्माण करुन विहिरींचे वितरण करण्यात आले. पालक मंत्री हे अधिकृत आहेत. जी. आर मध्ये संपर्क मंत्री यासंबंधी उल्लेख आहे. संपर्क मंत्री, हे पद नवीन कोठून आणले ? शासन निर्णयामध्ये अशी नोंद आहे की, पालक मंत्री, संपर्क मंत्री यासंबंधी नोंद घेतील. म्हणजे अर्धे आमचे, अर्धे तुमचे आणि बाकी सगळे घरचे. अशाप्रकारे राष्ट्रवादी आणि काँग्रेस पक्षाने वाटणी सुरु केलेली आहे.अशा प्रकारे विहिरींचे वाटप करताना राजकारण मध्ये आणले आहे हे मी आपल्या निदर्शनास येथे आणू इच्छितो. ही गोष्ट पटणारी आहे असे मला तरी वाटत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी या पॅकेजसंदर्भात यापूर्वी दोन मागण्या केल्या होत्या. पहिली मागणी अशी होती की, या पॅकेजसंबंधी एक श्वेतपत्रिका शासनाने प्रसिध्द करावी. सिंचनासाठी अनुदान दिले, चेक डॅम करिता किती निधी दिला, किती शेतकऱ्यांना अनुदान मिळाले, अगर सेंद्रीय खतासाठी, गांडूळ खतासाठी शासनाने किती पैसे दिले, यामुळे किती व्यक्तिगत लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ झाला याची माहिती प्रसिध्द करावी. म्हणून माझी अशी मागणी आहे की, या पॅकेजसंबंधी शासनाने श्वेतपत्रिका प्रसिध्द करावी. जेथे भ्रष्टाचार झाला तेथे कारवाई करण्यात आली. हे पॅकेज 64 तालुक्यांसाठी तयार करण्यात आले होते. आपण त्याठिकाणी कार्यवाही केली परंतु आमची अशी मागणी आहे की, 6 जिल्हयांमध्ये अशी परिस्थिती सध्या निर्माण झालेली आहे. याबाबत उच्च स्तरीय चौकशी करण्यात यावी अशी आमची मागणी आहे. याबाबत आपण काहीही सांगितले नाही. आपण या गोष्टीचे समर्थन करुन उत्तर दिले. माझे असे म्हणणे आहे की, शेतकऱ्याने आत्महत्या केल्यानंतर 10 महिन्यानंतर त्याच्या कुटूंबियांना पैसे मिळाले याबाबत आपण कलेक्टरकडून कोणता रिपोर्ट मागविणार ? बाबूला सस्पेंड करा असा कलेक्टरांनीच न्याय दिलेला आहे. माझे असे म्हणणे आहे की, तहसीलदार या प्रकरणामध्ये जबाबदार असतील व त्यांनी 10 महिने पैसे वापरले तर त्यांना निलंबित करण्यात येईल अशी आपण घोषणा करावी. तसेच शासनाने यासंदर्भातील श्वेतपत्रिका प्रसिध्द करावी.

..2..

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आता जी माहिती दिली त्यासंदर्भात मी आपणास सांगू इच्छितो की, शासनास 25 हजार रुपये याप्रमाणे 60 हजार कुटूंबांना मदत शासनाने केलेली आहे. शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी 3 वर्षामध्ये शासनाने 78 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. पुढील वर्षी 60 हजार कुटूंबियांना शासनाकडून मदत देण्यात येईल. किती लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाला आहे हे पाहण्यासाठी आपल्याला श्वेतपत्रिकेची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. ही सर्व माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबियांना पैसे देण्यास उशीर का झाला याबाबत सचिव स्तरावर चौकशी करुन कार्यवाही करण्यात येईल.

............

**सभापती** : नियम 93 अन्वये सूचनेवर दोन प्रश्न विचारण्यात येतील असे आपण काल ठरविले आहे. आता नियम 93 अन्वये सूचना घेण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3...



DVG/ KTG/ AKA/ प्रथम श्री. गागरे... 18:05

**मु. शी.** : अचलपूर (अमरावती ) येथे दिनांक 22 ऑक्टोबर,2007 रोजी दुर्गा विसर्जन मिरवणूकीवर कासदपूरा परिसरातील मशिदीमधून झालेली दगडफेक.

**पृ. शी.** : अचलपूर (अमरावती ) येथे दिनांक 22 ऑक्टोबर,2007 रोजी दुर्गा विसर्जन मिरवणूकीवर कासदपूरा परिसरातील मशिदीमधून झालेली दगडफेक. याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.आर.आर. पाटील ( गृहमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता, यांनी अचलपूर (अमरावती ) येथे दिनांक 22 ऑक्टोबर,2007 रोजी दुर्गा विसर्जन मिरवणूकीवर कासदपूरा परिसरातील मशिदीमधून झालेली दगडफेक. या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अचलपूर जिल्हा अमरावती येथे दिनांक 22 ऑक्टोबर 2007 रोजी सायंकाळी दुर्गा विसर्जनाच्या मिरवणूकीवर कासदपूरा परिसरातील मशिदीमधून दगडफेक करण्यात आली. ही दंगल एकतर्फी होती. देवीची मिरवणूक सुरु असताना देवीवर दगडफेक करण्यात आली. ज्याठिकाणाहून ही दगडफेक करण्यात आली होती, तेथील साधारण पाऊण किमी वरील दुकाने जाळली गेली. त्या शहरामध्ये दोन तास पोलीस नव्हते. तेथे केवळ 10 पोलीस बंदोबस्तासाठी होते. दोन हजार लोकांचा जमाव त्याठिकाणी जमलेला होता. या जमावाने तेथे मोठया प्रमाणात लूटमार केली. तेथे बऱ्याच प्रमाणात जाळपोळ झाली. मला येथे असे विचारावयाचे आहे की,यासंदर्भातील माहिती सीआयडी यांनी पोलीसांना दिली होती काय. तसेच 14 ऑक्टोबर रोजी एका प्रार्थना मंदीरामध्ये भडकाऊ भाषण करणारा एक निवृत्त शिक्षक आहे, त्यांच्या भाषणामुळे हे प्रकरण अधिक भडकले. त्यांच्यावर अजूनही आरोपपत्र दाखल करण्यात आलेले नाही. आरोपी मोकळा फिरत आहे. यासंबंधी आपण कारवाई करणार आहे ? दंगलीच्या दोन दिवसांपूर्वी सीआयडीने रिपोर्ट दिल्यानंतर तेथे पोलीस बंदोबस्त देण्यात आला नाही ही माहिती खरी आहे काय ? महोदय, याठिकाणी घोषित केले गेले की, मालेगाव येथे झालेल्या दंगलीच्या धर्तीवर मदत केली जाईल परंतु त्याप्रमाणे मदत करण्यात आली नाही. फक्त 14 लाख रुपयांची मदत करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मालेगावच्या धर्तीवर मदत देण्याच्या बाबतीत शासनाने आदेश काढलेले आहेत. तसेच त्याप्रमाणे काहींना मदत दिलेली आहे. त्या निकषाप्रमाणे कमी मदत दिली असेल तर त्यांना मालेगावला जितकी मदत दिली होती तेवढी देण्यात येईल. सभापती महोदय, या घटनेची पूर्वकल्पना पोलिसांना नव्हती. तसे पाहिले तर अचलपूर हे संवेदनक्षम शहर आहे. तेथे नेहमीच पोलीस बंदोबस्त जास्त ठेवलेला असतो. परंतु या वेळेस सर्वच ठिकाणी दुर्गापूजा आणि मिरवणुका असल्याने सगळीकडेच बंदोबस्त ठेवावा लागत होता आणि त्यामुळे त्या ठिकाणी त्या मानाने कमी बंदोबस्त होता. दुसरे असे की, ज्या शिक्षकांने भावना भडकविण्याचे काम केले असे जे विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले आहे त्याची माहिती माझ्याकडे नाही. परंतु तपासामध्ये ही बाब देखील तपासून घेण्यात येईल आणि याची दखल घेण्यात येईल व आरोपपत्र दाखल करण्यात येईल. पुरावा मिळाला तर या गोष्टी निश्चितपणे केल्या जातील.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्यांचा दोष नाही त्यांच्यावर देखील केसेस केल्या गेल्या आहेत...

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, याबाबतीत चौकशीमध्ये आढळून येईल त्याप्रमाणे कारवाई करू. कारण शेवटी दोषी कोण आहे वा कोण नाही हे काही तुम्ही वा मी पण सांगू शकत नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ही दंगल एकतर्फी झालेली आहे. कारण यात हिंदूंची घरे आणि दुकाने जाळली गेली आहेत. हिंदूंच्या गल्लीमध्येच ही सारी जाळपोळ झाली आहे. कारण काय सांगितले तर गणपतीमध्ये 'मंदिर वही बनाएंगे' ही कॅसेट लावली होती असे असे अधिकृत स्टेटमेंट दिले गेले आहे आणि त्या रागातून हे झालेले आहे. तेव्हा या हिंदुस्थानमध्ये आणि या महाराष्ट्रात गणपतीबाप्पाच्या मंदिरामध्ये अशा प्रकारे कॅसेट लावू शकत नाही का ? ही कॅसेट वाजविण्यावर बंदी नसताना देखील तेथील हिंदू लोकांना पोलिसांनी अडकविले आहे. तेव्हा ही कॅसेट वाजविण्यावर बंदी आहे काय ? नसल्यास, अशा प्रकारे कारवाई केल्याबद्दल संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर आपण कारवाई काय करणार ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या दंगलीची सुरूवात त्या कॅसेटमधून झाली आहे. या दंगलीमुळे दुसऱ्या समाजातील लोकांच्या भावना दुखावल्या आहेत .... अडथळा ....
सभापती महोदय, मी जे काही तेथे घडले आहे ते सांगत आहे. सन्माननीय सदस्यांनी इतके माझ्यावर रागाविणे बरोबर नाही. सभापती महोदय, तेथे ही परिस्थिती निर्माण झाली. या कॅसेटवर कोठलीही बंदी अद्यापपर्यंत तरी घालण्यात आलेली नाही. परंतु या कॅसेटमुळे जर दंगली भडकणार असतील तर त्या कॅसेटमध्ये नेमके असे काय आहे याची शासन चौकशी करील, तपासणी करील.

**

...... 4पी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : यवतमाळ येथील उपविभागीय पोलीस अधिकाऱ्याने मद्यधुंद अवस्थेत दुचाकी स्वारांना धडक दिल्याने त्यांचा झालेला मृत्यू.

**मु.शी.** : यवतमाळ येथील उपविभागीय पोलीस अधिकाऱ्याने मद्यधुंद अवस्थेत दुचाकी स्वारांना धडक दिल्याने त्यांचा झालेला मृत्यू याबाबत श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.दिवाकर रावते यांनी "यवतमाळ येथील उपविभागीय पोलीस अधिकाऱ्याने मद्यधुंद अवस्थेत दुचाकी स्वारांना धडक दिल्याने त्यांचा झ ालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाया पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापण्यात यावे. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 खालील मा.उपमुख्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, उपविभागीय अधिकारी श्री.नळे हे गाडीने जात असताना वर्धा येथे त्यांच्या गाडीने दुचाकीला धडक मारल्याने त्या अपघातामध्ये दोन शिवसैनिक मृत पावले आहेत. त्या अपघातानंतर त्या गाडीचा चालक पळून गेला. सभापती महोदय, एका सामान्य गाडी चालकाने असे केले असते तर गोष्ट वेगळी होती. परंतु उपविभागीय अधिकारी गाडीत असताना असा अपघात झाला असेल तर त्याने स्वत:हून पोलीस ठाण्यामध्ये जाऊन त्याची नोंद करायला पाहिजे होती. परंतु श्री.नळे हे त्यावेळी मद्यधुंद अवस्थेत असल्याने ते तेथून पळून गेले आणि ते त्याच पोलीस ठाण्यामध्ये पूर्वी कार्यरत असल्याने त्यांनी नंतर फोन करून ही माहिती तेथील पोलीस अधिकाऱ्यांना दिली आणि त्यांनीही त्याला त्यासंबंधात सहकार्याचीच भूमिका घेतली. पण श्री.नळे यांची कॅप त्या ठिकाणी सापडल्यामुळेच तेच ती गाडी चालवित असल्याचे समजले. तेंव्हा हे श्री.नळे तेथून पळून गेल्यानंतर आतापर्यंत सापडले आहेत की नाही ? त्यानंतर त्यांची रक्त तपासणी करून ते त्यावेळी मद्य प्यायले होते की नाही हेही तपासता आलेले नाही, तेथील पोलिसांनी हे सारे अतिशय सफाईने करून त्यांना साथ दिली आहे. तेव्हा या अपघात प्रकरणी श्री.नळे यांना अटक करून आपण कोणती कारवाई करणार आहात ? तसेच त्यांना स्थानिक पोलिसांनी जे सहकार्य केले त्याबद्दल त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, हे श्री.नळे डीवायएसपी आहेत आणि तो अपघात झाल्यानंतर त्यांनी पळून जायला नको होते. उलट जखमी माणसाची त्यांनी काळजी घ्यायला पाहिजे होती. ही घटना घडल्यानंतर ते पळून गेलेले आहेत आणि त्यांना लोकांनी पळून जाताना पाहिले आहे व ओळखले देखील आहे. पण नंतर दुसराच कोणी तरूण मी ती गाडी चालवित होतो म्हणून पुढे आला असून त्याबाबत पोलिसांनी तपास केला असता तो त्यावेळी ती गाडी चालवित नसल्याचे निष्पन्न झालेले आहे. ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे .... 4क्यू 1 ...

श्री. आर.आर.पाटील ....

सभापती महोदय, श्री. नळे हे बेपत्ता आहेत, त्यांचा पोलीस शोध घेत आहेत. त्यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविण्याचे पोलिसांनी निश्चित केले आहे. चौकशीच्या कामामध्ये व्यत्यय येऊ नये म्हणून आजच त्यांना सस्पेंड करण्याचे आदेश देण्यात येत आहेत. आणि चौकशीअंती त्यांच्यावर जी कारवाई आवश्यक असेल ती केली जाईल.

<u>माननीय कृषी मंत्र्यांनी करावयाच्या निवेदनासंबंधी</u>

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण येथील पुरवठा अधिकाऱ्याला 48 तास तुरुंगात ठेवण्यात आले, त्याला पोलीस कस्टडी देण्यात आली होती. तरीसुध्दा त्यांना निलंबित करण्याची कारवाई शासनाकडून झालेली नाही. आज देखील ते शासकीय सेवेत असून बाहेर फिरत आहेत. यासंबंधीचा मुद्दा माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी सदनामध्ये मांडल्यानंतर माननीय उपसभापतींनी सोमवारी निवेदन करण्याबाबत निदेश दिले. त्यानंतर आज माननीय सदस्यांनी पुन्हा हा विषय उपस्थित केल्यानंतर मंत्रिमहोदयांनी सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी निवेदन केले जाईल असे सांगितले. त्यामुळे अजूनपर्यंत निवेदन झाले नाही आणि कारवाई देखील झालेली नाही म्हणून आम्हा सदस्यांना चिंता व काळजी वाटते.

श्री. राणा जगजितसिंह पाटील (कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, उक्त विषयाच्या संदर्भात सोमवारी निवेदन करण्याचे निदेश माननीय उपसभापतींनी दिले होते. तथापि, विशेष सहाय्य विभागाने विनंती केली होती की, या संदर्भात विविध विभागाकडून माहिती संकलित करावयाची आहे त्यामुळे निवेदन करण्यासाठी वेळ मागितला होता. परंतु अद्यापि माहिती उपलब्ध न झाल्यामुळे मला सदनाला एवढीच विनंती करावयाची आहे की, यासंबंधी नियमाप्रमाणे योग्य ती कारवाई करण्यात येईल.

(गोंधळ)

(विरोधी पक्षाकडील सर्व माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलू लागतात.)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हे काय चालले आहे?

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. 48 तास पोलीस कस्टडीमध्ये असणाऱ्या अधिकाऱ्याला सस्पेंड केले पाहिजे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(गोंधळ)

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, महाराष्ट्र शासकीय कर्मचारी सेवेच्या नियम व शर्तीमधील तरतुदीनुसार असे शासकीय अधिकारी सेवेतून निलंबित व्हावयास पाहिजेत.

सभापती : It is deemed to be suspended after 48 hours. याचा अर्थ ते आपोआप सस्पेंड होतात. आणि जर असे झाले नसेल तर या अनुषंगाने शासनाला मी सूचना देतो की, पोलीस कस्टडीमध्ये ज्या अधिकाऱ्यांना 48 तास ठेवण्यात आले असेल त्यांच्यावर तातडीने कारवाई केली पाहिजे. त्यादृष्टीने सोमवारी निवेदन करण्यास मी शासनाला सांगितले होते.. परंतु ती कारवाई अद्यापपर्यंत पूर्ण झालेली नाही. ती पूर्ण कशी होईल यादृष्टीने शासनाने जरुर ते प्रयत्न करावेत.

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य उभे राहून घोषणा देतात.)

श्री. अरविंद सावंत : शासकीय अधिकाऱ्यावर कारवाई न करणाऱ्या सरकारचा निषेध करुन आम्ही सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाकडील सर्व माननीय सदस्य सभात्याग करतात.)

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>पृ.शी./मु.शी.: सत्रकाळातील कामकाजाचा आढावा</u>

**सभापती** : हिवाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो.

एकूण बैठकीची संख्या - 11

एकूण काम - 84 तास

मंत्री उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ - 30 मिनिटे.

अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ - 2 तास 30 मिनिटे

प्रत्यक्षात झालेले कामकाज - 81 तास .

रोजचे सरासरी कामकाज 7 तास 20 मिनिटे.

विधान परिषद नियमानुसार बैठकीची वेळ 4 तास आहे. म्हणजेच आपण एकूण 20 दिवसांचे काम केले आहे.

<u>तारांकित प्रश्न -</u>

आलेल्या सूचना - 3766, कार्यवाहीसाठी घेतलेल्या सूचना - 2928, स्वीकृत प्रश्न - 728,

तोंडी उत्तरे - 45 प्रश्न.

<u>नियम 93 अन्वये सूचना -</u>

एकूण सूचना - 126 सूचना, स्वीकृत सूचनांची संख्या - 63 सूचना, चर्चा झाली - 33 सूचना.

<u>लक्षवेधी सूचना -</u>

प्राप्त झाल्या - 861, मान्य - 191, चर्चा झाली - 23

<u>विशेष उल्लेख</u> 49 सूचना मांडण्यात आल्या.

<u>औचित्याचे मुद्दे</u> 25 उपस्थित करण्यात आले.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......

नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा

प्राप्त झाल्या -4, मान्य झाली-4, चर्चा झाली-1

शासकीय विधेयके संमत - 8

नियम 269 अन्वये प्रस्तावावरील चर्चा - 3

शासकीय ठराव चर्चा झाली - 1

अर्धा-तास चर्चा

प्राप्त झाल्या - 54, मान्य झाल्या - 43, चर्चा झाली - 5

या प्रसंगी मी सदस्यांच्या हेही निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, कामकाज सल्लागार समितीने आपल्या दिनांक 29 नोव्हेंबर, 2007 रोजी झालेल्या बैठकीत सभागृहाचे कामकाजाचे दिवस वाढविण्यासंबंधात विचारविनिमय केला असून आगामी हिवाळी अधिवेशन कमीतकमी तीन आठवड्यांचे असेल, असा निर्णय घेतलेला आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

**पृ.शी./मु.शी.**: पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा

**सभापती** : मी खालील घोषणा करतो :-

राज्यपालांना अशी शिफारस करण्याचे ठरले आहे की, महाराष्ट्र विधान परिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक 10 मार्च, 2008 रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात यावे.

-----

**पृ.शी./मु.शी.**: सत्र समाप्तीसंबंधी घोषणा

**सभापती** : सभागृहाचे कामकाज आता संपले आहे. राज्यपालांकडून पुढीलप्रमाणे संदेश आला आहे.

"मी, एस.एम.कृष्णा, महाराष्ट्राचे राज्यपाल, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2) उपखंड (क) व्दारे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, याव्दारे शनिवार, दिनांक 1 डिसेंबर, 2007 रोजी होणाऱ्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्तीबरोबरच महाराष्ट्र विधान परिषदेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे.

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल, असे मी जाहीर करतो.

( यानंतर राष्ट्रगीत झाले )

( सायंकाळी 6.23 वाजता सत्र संस्थगित झाले )

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही